म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं. ४२८.

# समाजसेवेचीं तत्वें व मार्ग.

लेखक

पुरुषोत्तम गोविंद नाईक,

लाइफवर्कर, समाजसेवासंघ, मुंबई,

('वेश्या व वेश्याव्यवसाय' या पुस्तकाचा कर्ता)

प्रस्तावनालेखक

गोपाळ कृष्ण देवधर, एम्. ए.

समाजसेवासंघ, गिरगांव, मुंबई.

१९२९.

REFBK-0003025

किंमत एक रुपया.

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. नि.
ना. ........
ठाणे.

सं. नि. १५३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. 3025

# समाजसेवेचीं तत्वें व मार्ग.

लेखक

पुरुषोत्तम गोविंद नाईक,

लाइफवर्कर, समाजसेवासंघ, मुंबई,

( 'वेश्या व वेश्याव्यवसाय' या पुस्तकाचा कर्ता )

प्रस्तावनालेखक

गोपाळ कृष्ण देवधर, एम्. ए.

समाजसेवासंघ, गिरगांव, मुंबई.

१९२६.

REFBK-0003025

किंमत एक रुपया.

मुद्रकः—**चिंतामण सखाराम देवळे,** मुंबईवैभव प्रेस, सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीज् बिल्डिंग, सँढर्स्ट रोड, गिरगांव, मुंबई.

---

प्रकाशक—**नारायण मल्हार जोशी,** जनरल सेक्रेटरी, सोशल सर्व्हिस लीग, गिरगांव, मुंबई.

# अल्प निवेदन.

समाजसेवेची कल्पना आपल्याकडे नवीन नसली तरी तिला आज जें सर्वव्यापी स्वरूप प्राप्त झालें आहे तें अगदीं नवीन आहे आणि अजूनहि समाजसेवेच्या कल्पना सारख्या बदलत आहेत. या सर्व नवीन कल्पना पाश्चात्य देशांतूनच मुख्यतः आपल्याकडे आल्या आहेत. इंग्रजी भाषेंत या विषयावर हजारों ग्रंथ आहेत. या विषयाचे भाग व पोटभाग करून त्या प्रत्येकावर त्या त्या विषयाच्या तज्ज्ञांनीं लिहिलेलीं शेंकडों पुस्तकें आहेत. प्रस्तुत पुस्तक हें कोणच्याही एका पुस्तकाचें भाषांतर नाहीं, पण वर निर्दिष्ट केलेल्या अनेक ग्रंथांपैकीं कांहीं पुस्तकें वाचून त्यांच्या आधारें हें लिहिलें आहे. मुंबई येथील समाजसेवासंघांत गेलें एक तप प्रत्यक्ष काम करण्याची संधि प्रस्तुत लेखकाला मिळाल्यामुळें स्वतःच्या अनुभवाचाहि या पुस्तकांत प्रसंगोपात उपयोग केला आहे.

समाजसेवेचीं निरनिराळीं कामें आपल्याकडे होत असलीं तथापि समाजसेवेसंबंधीं साधारण माहिती मराठींत असलेल्या पुस्तकाची अत्यंत अवश्यकता आहे हें मुंबई येथील समाजसेवासंघाचे जनरल सेक्रेटरी रा. नारायण मल्हार जोशी, बी. ए. यांनीं प्रस्तुत लेखकाला सांगितलें, या विषयावर लिहितांना कोणचे ग्रंथ मुख्यतः उपयोगी पडतील याची माहिती दिली आणि पुस्तक तयार होईपर्यंत प्रयत्न शिथिल होऊं नयेत म्हणून वेळोवेळीं प्रोत्साहन दिलें याबद्दल लेखक त्यांचा अत्यंत आभारी आहे.

समाजसेवासंघाच्या 'समाजसेवक' मासिकांत हे लेख प्रथम क्रमशः प्रसिद्ध झाल्यामुळें त्याचे मुख्य संपादक रा. पुरुषोत्तम गोपाळ काणेकर यांच्या नजरेखालून ते गेले व त्यांत त्यांनीं पुष्कळ सुधारणा केली, हें कृतज्ञतापूर्वक नमूद केलें पाहिजे. रा. गोपाळ कृष्ण देवधर, एम. ए. यांची या पुस्तकाला प्रस्तावना मिळाली हा खरोखरीच मोठा सुयोग होय. या इलाख्यांत ज्या समाजसेवेच्या निरनिराळ्या चळवळी चालल्या आहेत त्या सर्वांशीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें रा. देवधर यांचा संबंध आहे. त्यामुळें ते नेहमीं कोणच्या ना कोणच्या कामांत गुंतलेले असतात. अशा गडबडींत लेखकाच्या विनंतीला मान देऊन ही प्रस्तावना त्यांनीं वेळेवर दिली याबद्दल लेखक त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

अनेक प्रकारें गैरसोय झाली असतां ती सोसून पुस्तकाची छपाई सर्वांगसुंदर केल्याबद्दल 'मुंबईवैभव' छापखान्याचे मॅनेजर रा. सिद्धये यांचाहि लेखक आभारी आहे.

ता. २० नवंबर १९२६ **पुरुषोत्तम गोविंद नाईक.**

# प्रस्तावना.

सांप्रत ‘ समाजसेवा ’ व ‘ समाजसेवक ’ हे शब्दप्रयोग जिकडे तिकडे व वारंवार ऐकूं येतात. नियमितपणें सतत समाजसेवा करण्याच्या उद्देशानें निघालेल्या संस्थांची संख्याहि दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्यांखेरीज समाजसेवेचीं अनेक नैमित्तिक कामें लहानमोठ्या प्रमाणावर निघत असतात. अशा रीतीनें देशाच्या वेगवेगळ्या भागांमध्यें समाजसेवेसंबंधानें जागृति होत चालली असून ती उत्तरोत्तर वाढतच जाणार अशीं सुचिन्हें दिसत आहेत. कांहीं वर्षांपूर्वीं अखिलभारतीय आणि प्रांतिक समाजसेवा परिषदांचीं जीं अधिवेशनें झालीं त्यांतून पसार झालेले ठराव आणि बारा पंधरा वर्षांपूर्वींपर्यंत भरल्या जाणाऱ्या सामाजिक परिषदांमध्यें पसार होणारे ठराव यांची तुलना करून पाहिल्यास समाजसुधारणाविषयक कल्पनेची व्याप्ति पूर्वींपेक्षां पुष्कळ वाढली असल्याचेंच दिसून येईल. समाजसुधारणेला अवश्य असणाऱ्या गोष्टींच्या यादींत हल्लीं ज्या नव्या गोष्टींची भर पडत आहे त्यांत वादग्रस्त बाबी म्हणण्यासारख्या नाहींत. तथापि पूर्वीं त्यांच्याकडे फारसें लक्ष गेलें नव्हतें. समाजसुधारणेसंबंधाचे जे प्रश्न मागील पिढीनें हातीं घेतले होते ते राष्ट्रीय प्रगतीच्या दृष्टीनें अर्थातच महत्वाचे होते. राष्ट्रीय प्रगतीच्या आड येणाऱ्या धोंडी मार्गांतून दूर कराव्या आणि धर्माशीं संलग्न झाल्यामुळें दृढमूल झालेल्या चालीरीतींचें संशोधन करून समाजाची रचना न्याय व समता यांच्या पायावर करावी ही थोर भावना आपला पगडा लोकांच्या विचारांवर बसवीत चालली आहे. स्त्रिया व पुरुष यांच्यामधील विषमता शक्य तितकी दूर करावी, व्यक्तिस्वातंत्र्याला अधिक वाव द्यावा, व्यक्तीला अथवा लहानमोठ्या व्यक्तिसमूहाला स्वतःची भौतिक व आत्मिक उन्नति करून घेण्याचा मार्ग मोकळा ठेवावा, हें उच्च ध्येय दृष्टीपुढें ठेवूनच सामाजिक सुधारणेच्या चळवळीचा उपक्रम करण्यांत आला आणि या चळवळीची या पुढील वाढहि त्याच धोरणाच्या भरभक्कम पायावर उभारली गेली पाहिजे. सामाजिक सुधारणेचे कित्येक प्रश्न हळूहळू सुटण्याच्या मार्गास लागले आहेत, परंतु कित्येक प्रश्नांच्या बाबतींत कृतीच्या दृष्टीनें अद्यापि व्हावी तितकी प्रगति झालेली नाहीं. कित्येक प्रश्नांच्या बाबतींत तर अद्यापि प्रत्यक्ष क्रियेलाहि प्रारंभ व्हावयाचा आहे तर कित्येक बाबतींत अद्यापि लोकमत प्रबुद्ध व्हावयाचें आहे. तथापि, महत्वाच्या पण वादग्रस्त अशा प्रश्नांखेरीजहि सामाजिक आणि अर्थातच राष्ट्रीय प्रगतीला आवश्यक असे अनेक प्रश्न आहेत. इतकेंच नव्हे तर, नित्य बदलणाऱ्या मनूंत राजकारण, निरनिराळ्या राष्ट्रांमधील संबंध, व्यापार, उद्योगधंदे, कारखाने इत्यादिकांमुळें नवीन नवीन सामाजिक प्रश्न उद्भवत असून त्यांकडे दुर्लक्ष्य करून बिलकुल चालावयाचें नाहीं, इतकेंच नव्हे तर ते सोडवल्याशिवाय गत्यंतर राहिलें नाहीं आणि त्यामुळें या प्रश्नांकडे लक्ष्य देणें अत्यंत जरूरीचें झालें आहे. समाजसेवेची चळवळ ही अशा प्रकारच्या प्रश्नांकडे विशेषतः लक्ष देण्यासाठीं आणि ते शक्य तितक्या लवकर व सुलभतेनें सोडविण्यासाठीं अवतीर्ण झाली आहे असें स्थूल मानानें म्हणावयास हरकत नाहीं.

पुष्कळ सामाजिक प्रश्न सकृद्दर्शनीं सोपेसे वाटतात, परंतु थोड्या बारकाईनें विचार केल्यास त्याचें स्वरूप संकीर्ण–विशेष गुंतागुंतीचे असल्याचें दिसून येतें. कोणताहि प्रश्न यशस्वीपणें सोडवावयाचा तर प्रथम त्याच्या बाबतींतील कार्यकारणसंबंधाचें यथार्थ ज्ञान असावें लागतें. तसें नसल्यास उपाय करतां अपाय होण्याचा दृढ संभव असतो. अनुकंपादि सद्भावना असल्याखेरीज समाजसेवा होऊं शकत नाहीं, परंतु सद्भावना योग्य रीतीनें फलद्रूप होण्यास सम्यक् ज्ञानाची आवश्यकता असते. आणि कृतीमध्यें कुशलता पाहिजे. '**योगः कर्मसु कौशलम्**' हें गीतावचन समाजसेवायोगालाहि यथार्थपणें लागू पडतें. किंबहुना मुंबईच्या समाजसेवासंघाच्या "Know, Love and Serve" या ब्रीदवाक्यांत सूत्ररूपानें दर्शविल्याप्रमाणें समाजसेवायोग म्हणजे ज्ञानयोग, भक्तियोग व कर्मयोग यांचा सुंदर संगमच आहे.

सामाजिक घटकावयवांना विशेष कार्यक्षमत्व प्राप्त करून देणें आणि जे घटक दुर्बल, निरुपयोगी, किंवा उपद्रवी म्हणून गणले जातात त्यांना सबळ, कार्यक्षम व उपयुक्त बनविणें हें समाजसेवेचें मुख्य साध्य आहे. अर्थात्, हें ध्येय किंवा साध्य राष्ट्राच्या उत्कर्षाला पोषक असेंच असल्यामुळें समाजसेवेसंबंधानें जी जागृति सध्यां झाली आहे तिला योग्य वळण लागून समाजसेवेची कल्पना सर्वत्र रूढ होण्यास त्या विषयावर जितकें वाङ्मय निर्माण होईल तितकें पाहिजेच आहे. पाश्चात्य देशांमध्यें या विषयावर आणि त्यांत अंतर्भूत होणाऱ्या तपशिलाच्या बाबींवर अफाट ग्रंथसंपत्ति निर्माण झालेली आहे. वेगवेगळ्या कार्यक्षेत्रांत कार्य करणाऱ्या समाजसेवकांनीं आपले विचार व अनुभव अनेक ग्रंथांमध्यें नमूद केले आहेत; नानाविध सामाजिक चळवळींच्या इतिहासाचीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत आणि समाजसेवेविषयीं अगत्य बाळगणाऱ्या व स्वतः समाजसेवा करूं इच्छिणाऱ्या लोकांना मार्गदर्शक होणारीहि शेंकडों पुस्तकें त्या त्या देशांच्या भाषांमध्यें उपलब्ध आहेत. मराठींतील एतद्विषयक वाङ्मय अत्यंत अल्प आहे, आणि समाजसेवेविषयीं माहिती देणारें पुस्तक अद्यापि प्रसिद्ध झालेलें नाहीं.

रा. नाईक यांच्या प्रस्तुत पुस्तकानें वरील उणीव थोड्या अंशीं तरी भरून काढली आहे, ही निःसंशय समाधानाची गोष्ट होय. रा. नाईक यांनीं 'समाजसेवा' या विषयाचा चांगला व्यावहारिक रीतीनें व्यासंग केला आहे, इतकेंच नव्हे तर, मुंबईच्या समाजसेवासंघाचे आजन्म सेवक ( life-worker ) या नात्यानें त्यांनीं कित्येक वर्षें समाजसेवेचीं वेगवेगळीं कामेंहि केलीं आहेत आणि दुसऱ्याहि कित्येक समाजसेवासंस्थांच्या कामाशीं त्यांचा साक्षात् व निकट संबंध आलेला आहे. अर्थात् त्यांच्या पुस्तकामध्यें उपपत्ति व प्रक्रिया यांचा मिलाफ बऱ्याच अंशानें दिसून येतो. प्रतिपाद्य विषयाची रूपरेखा त्यांनीं थोडक्यांत, साध्या भाषेंत विशदपणें दाखविली असून, एवढ्या लहान पुस्तकांत तपशिलाच्या जितक्या बाबी दाखविणें शक्य होतें, तितक्यांचा त्यांनीं समावेश केलेला आहे. या पुस्तकावरून आपल्यापुढें सांप्रत कोणते अगत्याचे प्रश्न आहेत आणि ते कोणत्या प्रकारें सोडविले पाहि-

जेत, याची स्थूल कल्पना तरी येईल. शहरांत किंवा खेड्यांत, सर्व जातींसाठीं किंवा विशिष्ट जातीसाठीं, कोणत्याहि एका बाबीपुरती किंवा अनेक बाबींमध्यें, व्यक्तिशः किंवा संघटनेच्या द्वारें समाजसेवा करणारांना किंवा करूं इच्छिणारांना प्रस्तुत पुस्तक उपयोगीं पडेल यांत शंका नाहीं. असो. अशा प्रकारचें वाङ्मय मराठींत अधिकाधिक निर्माण होवो, अशी इच्छा प्रदर्शित करून हा प्रस्तावनालेख संपवितों. रा॰ नाईक यांनीं या प्रश्नासंबंधीं दोन प्रास्ताविक शब्द लिहिण्याची मला संधि दिली याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी,
गिरगांव, मुंबइ.
११. नोव्हेंबर १९३६.

गोपाळ कृष्ण देवधर.

# अनुक्रमणिका.


| | | पृष्ठ. |
|---|---|---|
| | विषयप्रवेश. | १ |
| प्रकरण १ लें.— | समाजसेवेची अवश्यकता ... ... | २१ |
| प्रकरण २ रें.— | समाजसेवेचीं मूलभूत तत्वें ... ... | ३६ |
| प्रकरण ३ रें.— | समाजसेवेचें शिक्षण ... ... ... | ५० |
| प्रकरण ४ थें.— | दान ... ... ... ... | ६४ |
| प्रकरण ५ वें.— | धर्मादाय संस्थांची संघटना ... ... | ८० |
| प्रकरण ६ वें.— | समाजसेवकांच्या वसाहती ... ... | ९६ |
| प्रकरण ७ वें.— | व्यक्तिगत समाजसेवा ... ... ... | ११५ |
| प्रकरण ८ वें.— | कामगारवर्ग आणि समाजसेवा ... ... | १३४ |
| प्रकरण ९ वें.— | खेडीं आणि समाजसेवा... ... ... | १५२ |

# समाजसेवेचीं तत्वें व मार्ग.

## विषयसंक्षेप.

**विषयप्रवेश**—पृष्ठें १–२०. समाजाचें शरिराशीं साम्य—व्यक्ति तितक्या प्रकृति—समाजसेवा एका दृष्टीनें सोपी तर एका दृष्टीनें कठीण—समाजसेवेची व्याख्या—समाजसेवेचा रूढ अर्थ—समाजसेवासंघांची पूर्वीं फारशी आवश्यकता नव्हती—औद्योगिक युगाचा परिणाम—औद्योगिक युगजन्य सामाजिक क्रांति—धार्मिक बुद्धीचें दान—दान म्हणजे प्रेम—समाज सुधारकांची मदत—समाजसेवा व समाजसुधारणा—समाजसुधारणेचीं मूलभूततत्वें—'मूले कुठारः'—आदर्शभूत समाज.

**प्रकरण १ लें—समाजसेवेची अवश्यकता**—पृष्ठें २१–३५. समाजाचें ऋण—समाजाच्या उत्क्रांतीच्या पायऱ्या—संस्कृति व व्यक्तींचें परावलंबन—व्यक्तीवरील समाजाचे हक्क.

**प्रकरण २ रें—समाजसेवेचीं मूलभूत तत्वें**—पृष्ठें ३६–४९. शिक्षण-प्रसार—जातिभेदाची आडकाठी—व्यक्तिस्वातंत्र्य—'स्वराज्या'चा खरा पाया.

**प्रकरण ३ रें—समाजसेवकाचें शिक्षण**—पृष्ठें ५०–६३. सहानुभूति व ज्ञान—आढ्यतेचा अभाव—धिम्मेपणा—तपशीलवार माहितीची आवश्यकता—ध्येय व तत्वें— आवड व तारतम्य.

**प्रकरण ४ थें—दान**—पृष्ठें ६४–७९. दान व समाजसेवा यांमधील भेद—धार्मिक कल्पनांचा दानावर पगडा—दानाच्या आवश्यकतेचीं खोल व व्यापक कारणें—आजारीपणा कमी करण्याचे उपाय—आयुष्य वाढविणाऱ्या संस्था—डॉक्टरहि नकोत—नीतिविषयक भ्रामक कल्पना—गुन्हेगार आणि मुलें यांचें शिक्षण व सुधारणा.

**प्रकरण ५ वें—धर्मादाय संस्थांची संघटना**—पृष्ठें ८०–९५. अपात्रीं दानाचा परिणाम—धर्मादाय संस्थांची संघटना करण्याचे प्रयत्न—दानांतले स्वार्थी हेतु—एल्बरफेल्ड पद्धति—दान व सामाजिक बंधनें—दानानें हित तसें अहितहि होतें—मनुष्य आणि मनुष्येतर प्राण्यांमधील फरक—दुर्बलांना साहाय्य न मिळतां ढोंग्यांचा सुळसुळाट.

**प्रकरण ६ वें--समाजसेवकांच्या वसाहती**—पृष्ठें ९६-११४. समाजसेवकांच्या वसाहती—टॉयन्बी हॉल—धार्मिक संस्थांची समाजसेवा—विद्यार्थी व समाजसेवा--मुलांकरितां करावयाचीं कामें—कामगार वर्गाकरितां काम—स्त्रियांनीं चालविलेल्या वसाहती.

**प्रकरण ७ वें व्यक्तिगत समाजसेवा**—पृष्ठें ११५-१३३. व्यक्तिगत गुणांचा विकास—व्यक्तिवैशिष्ट्य—स्वावलंबी होण्याची अवश्यकता—तीन उदाहरणें—अनुकूल गृहस्थितीची आवश्यकता—व्यक्तिगत समाजसेवेपासून विशेष फायदे.

**प्रकरण ८ वें--कामगार वर्ग आणि समाजसेवा**—पृष्ठें १३४-१५१. समाजसेवकाची राष्ट्रीय दृष्टि—मित्रमंडळें—मजूरसंघ—सहकारी चळवळ—कामगारांचे क्लब.

**प्रकरण ९ वें--खेडीं आणि समाजसेवा**--पृष्ठें १५२-खेड्यांतील स्वाभाविक राहणी—खेड्यांत समाजसेवेची आवश्यकता.

# समाजसेवेचीं तत्वं व मार्ग.

## विषयप्रवेश.

Why do they shun your touch, my friend,
and call you unclean,
Whom cleanliness follows at every step
making the earth and air sweet for our dwelling
and ever luring us back from returing to the wild ?
You help us, like a mother her child, into freshness
and uphold the truth, that disgust is never for man.
The holy stream of your ministry carries pollutions away
and ever remains pure.
Once Lord Shiva had saved the world
from a deluge of poison
by taking it himself,
And you save it every day from filth with the same sufferance.
Come friend, come my hero, give us courage
to serve man, even while bearing the brand
of infamy from him.

RABINDRANATH TAGORE.

कोणत्या ना कोणत्या रीतीनें परस्परांशीं कायमचा किंवा तात्पुरता निकट संबंध येऊन एकत्र झालेल्या कमी अधिक माणसांच्या जमावाला समाज असें स्थूलमानानें ह्मणतां येईल. असे अनेक समाज, अनेक कुटुंबें, अनेक खेडीं, अनेक शहरें आणि अनेक राष्ट्रें मिळून एक मोठा समाज—विराट् घटना (organism) होते आणि त्याची रचना अत्यंत गुंतागुंतीची असते. गतकाळांत अनेक प्रकारच्या इष्टानिष्ट परिस्थितीचे बरेवाईट संस्कार होऊन त्याला हल्लींचें स्वरूप प्राप्त झालेलें असतें. आणि आजसुद्धां अनेक प्रकारच्या गोष्टींचे कमी जास्त परिणाम त्याच्यावर होतच असतात. या विराट् देहाचे वेगवेगळे भाग किंवा घटक परस्परांशीं मोठ्या विलक्षण रीतीनें गुंतले गेले आहेत, आणि

त्यांचा परस्परांशीं अगदीं जिव्हाळ्याचा निकट संबंध आहे. मनुष्याच्या शरिराप्रमाणें हा देहसुद्धां मंद गतीनें लहानाचा मोठा झालेला असतो. आणि या देहाच्या वर्धनाचा इतिहास फार मनोरंजक आहे. परंतु हीं सर्व ऐतिहासिक साधनें उपलब्ध नसल्यामुळें याची संगतवार व संपूर्ण माहिती मिळणें कठीण पडतें. मनुष्याच्या शरिरांतील प्रत्येक परमाणूप्रमाणें समाजाचे घटकहि आस्ते आस्ते लहानाचे मोठे झालेले असतात आणि त्या प्रत्येकाचा वेगळा इतिहास असतो. कारण प्रत्येकाला पुनः वेगळ्या परिस्थितींतून जावें लागतें. समाजांतील प्रत्येक व्यक्तीची नैसर्गिक प्रवृत्ति संघ करण्याकडे असते, असें आपण पाहतों. आणि समान परिस्थितींतील कुटुंबांचा कोणत्या ना कोणत्या प्रकारें निकट संबंध येऊन एक संघ तयार होतो. अशा रीतीनें बनलेले अनेक प्रकारचे निरनिराळे संघ मिळून एक खेडें होतें. पुढें या खेड्याचें शहर होतें, शहरांचे प्रांत होतात, कांहीं प्रांत मिळून एक राष्ट्र होतें, राष्ट्रांचे राष्ट्रसंघ होतात आणि कांहीं राष्ट्रसंघ मिळून एक सर्वराष्ट्रीय संघटना होते. या संघांकडे पाहाण्याची जशी आपली दृष्टि असेल त्याप्रमाणें त्यांची रचनाहि आपल्याला वेगवेगळी दिसेल; परंतु त्या सर्वांच परस्परांशीं अगदीं निकट संबंध असतो हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. एकाच ठिकाणचे अनेक संघ आपल्याला वेगवेगळाले दिसतात याचें कारण असें कीं वेगवेगळ्या परिस्थितीचा वेगवेगळा परिणाम होऊन त्यांचें स्थित्यंतर झालेलें असतें.

## समाजाचें शरिराशीं साम्य.

माणसाचें शरीर एका दृष्टीनें डोकें, खांदे, हात, मांड्या, कंबर, पाय वगैरेंचें झालेलें आहेत, असें आपण म्हणूं, तर दुसऱ्या दृष्टीनें तें हाडें, मांस, स्नायु, रक्त, वसा यांचें बनलेलें आहे असें आपल्याला म्हणावें लागेल. उदाहरणार्थ, आपण पाय घेतला तर त्यांत वरीलपैकीं प्रत्येकाचा थोडा अंश आहे असें आपल्याला आढळून येईल. त्यांत कांहीं हाडें आहेत, कांहीं स्नायु आहेत, कांहीं रक्त आहे असें आपण कबूल करूं आणि पुनः रुधिराभिसरण योग्य रीतीनें होऊन सर्व शरीर निरोगी राहावें म्हणून व्यायाम घ्यावयाचा असल्यास तो हस्तपादादि अवयवांच्या साहाय्यावांचून घेतां यावयाचा नाहीं. सारांश, आपल्या सोयीकरितां शरिराचे वेगवेगळाले भाग आपण कल्पिले तरी वस्तुतः ते तसे आपल्याला करितां येत नाहींत. हेंच तत्व समाजाला बरोबर लागू पडतें. एखाद्या शहरांत राहाणाऱ्या लोकांचे हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, पारशी, यहुदी

इत्यादि धार्मिक संघ असूं शकतील; तसेंच निरनिराळया लोकांच्या धंद्याप्रमाणें त्यांचे संघ होऊं शकतील. याशिवाय धनवान् आणि दारिद्री, सुशिक्षित आणि अशिक्षित असे अनेक तऱ्हेचे भेद आहेत. धार्मिक प्रश्न घ्या, आर्थिक प्रश्न घ्या, सामाजिक प्रश्न घ्या, राजकीय प्रश्न घ्या, किंवा दुसरा कोणताहि प्रश्न घ्या, त्यांत भेद आणि मतभेद हे असणारच. या अनेक भेदांचा परस्परांशी विरोध असल्यास त्या विरोधांतून आणखी अनेक प्रकारचे गुंतागुंतीचे प्रश्न उपस्थित होतात; इतकेंच नव्हे तर त्यांची गुंतागुंत अधिक घोटाळयाची होते. पण त्या सर्व गोष्टींचा समाजांत अंतर्भाव झालेला असतो, हें विसरतां कामा नये. यांतील लहान समाजांचा परस्परांशीं संबंध असतो, इतकेंच नव्हे तर त्यांचें बरे वाईट परिणाम सर्व समाजावर होतात. समाजांतील पोटसमाजांचा संबंध परस्परांशीं असतो आणि त्या सर्वांचा संबंध मोठ्या समाजाशीं असतो. प्रत्येक लहान समाजाला थोडें बहुतस्वातंत्र्य असतें, परंतु त्याला मोठ्या समाजाशीं अगदीं फटकून वागणें शक्य नसतें. ग्रहमालेंतील प्रत्येक ग्रहाची ज्याप्रमाणें ठराविक कक्षा असते आणि त्या कक्षेमध्यें तो फिरत असतो आणि पुनः ही सर्व ग्रहमाला सूर्यासभोवार फिरत असते, तद्वतच लहान लहान समाज आपल्या पुरते पाहातातच, पण त्याबरोबरच सर्व समाजाचेंहि हित त्यांना पाहावें लागतें. सर्व समाजाचें हित व आपलें हित वेगळें आहे असें त्यांना ह्मणतां येत नाहीं. कारण वस्तुतः तें वेगळें नसतें. एखादा आंबा पडतांना आपण पाहावा आणि तो खाण्याची अनिवार इच्छा होऊन आपल्या तोंडाला पाणी सुटावें, पण तो पडतांना पाहाण्यास व त्याचा आवाज ऐकण्यास ज्याप्रमाणें कानाडोळ्यांनीं आपल्यास मदत केली तशीच हातापायांनीं मदत केल्याशिवाय तो तोंडांत जाऊं शकत नाहीं आणि तोंडांत जाऊनसुद्धां आपलें कार्य होत नाहीं; कारण आपल्या जठराग्नीला त्या आम्रफळाच्या रसाचें रक्त करून शरीरपोषणाकरितां सर्व शरीरभर पोंचवावें लागतें. समाजरूपी शरिराचीसुद्धां अशीच स्थिति आहे. अनेकांनीं निःस्वार्थ बुद्धीनें अनेक तऱ्हेनें साहाय्य केल्याशिवाय समाजाची वाढ होत नाहीं. उलटपक्षीं, लहान लहान समाज परस्परांशीं फटकून वागूं लागल्यास त्यांचा व त्यांच्याबरोबर सर्व समाजाचा उत्तरोत्तर ऱ्हास होऊं लागतो.

अनेक व्यक्ति मिळून एक समाज होतो हें वर आपण पाहिलेंच आहे. ह्या व्यक्ति अनेक लहान लहान समाज करून राहातात आणि एकाच वेळीं त्या अनेक समाजांचे घटक असूं शकतात. प्रत्येक व्यक्ति आधीं कोणत्या तरी कुटुंबाची घटक

असते, मग जात किंवा वर्ग येतो, खेडें येतें, शहर येतें, राष्ट्र येतें आणि शेवटीं सारा मानवसमाज येतो. या प्रत्येकांत त्याच्यापेक्षां लहान समाज अंतर्भूत झालेला असतो हें सांगावयास नकोच. याशिवाय प्रत्येक व्यक्ति वर निर्दिष्ट केलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या समाजाची घटक असते. पण व्यक्ति व समाज परस्परावलंबी असतात. एकावर होणारे परिणाम साहजिकच दुसऱ्यावर होतात. सारांश प्रत्येकाचें हिताहित दुसऱ्यावर अवलंबून असतें.

## व्यक्ति तितक्या प्रकृति.

वेगवेगळ्या परिस्थितींतील माणसें एकत्र होऊन समाजांत अनेक तऱ्हेचीं कामें करित असतात. कांहीं लोक एखादें काम एकत्र करितात, एखादा खेळ खेळतात किंवा अनेक तऱ्हेचे वेगवेगळे व्यवसाय एकत्र किंवा वेगवेगळेपणीं करितात. त्या सर्वांचें हित एकच असतें असें नाहीं, त्या सर्वांची कामाची जागा एकच असते असें नाहीं किंवा त्या सर्वांची परिस्थिति एकच असते असें नाहीं. कांहींची वित्तासाठीं धडपड चाललेली असते, कांहींजण कीर्तीसाठीं हपापलेले असतात तर कांहींचा दुसरा कांहीं तरी आवडीचा विषय असतो. कोणाला कोर्टांत खटले जिंकून पुढें यावें असें वाटतें, कोणाला प्रसिद्ध कादंबरीकार व्हावें असें वाटतें, कोणाला शास्त्रीय शोध लावावे असें वाटतें, कोणाला हिमालय पर्वताचें अति उच्च शिखर—गौरी शंकर—चढून जावें असें वाटतें, कोणाला सायकलवरून, मोटरमधून किंवा विमानांतून पृथ्वीप्रदक्षिणा घालावीशी वाटते तर कोणाला वक्ता व्हावें असें वाटतें. कांहीं लोकांना रात्रंदिवस काबाडकष्ट करून पोटाला बरें वाईट अन्न व शरीराला जाडें भरडें वस्त्र मिळण्या इतकीहि मजुरी मिळत नाहीं. उलट पक्षीं कांहीं लोकांचें ध्येय वडिलार्जित इष्टेट किंवा विनकष्टानें मिळत असलेली संपत्ति ख्यालीखुशालींत उडविणें एवढेंच असतें. कांहीं कारखानदार असतात तर कांहीं कामगार असतात. कांहींना पैसा मिळविण्यांतच आनंद वाटतो तर कांहींना पैशाची मातब्बरी वाटत नाहीं. कांहींना अधिकार हवा असतो, कांहींना कीर्ति हवी असते तर कांहींना तिसरेंच कांहीं तरी हवें असतें. कांहीं लोक समाजाचें पाऊल पुढें पडण्यासाठीं अहोरात्र मेहनत करित असतात तर कांहीं दिसेल त्या मार्गांनीं स्वार्थ साधीत असतात आणि त्या ऐवजीं काडीभरही समाजाला मोबदला देत नाहींत. कांहीं समाजाच्या हिताच्या गोष्टी करित असतात तर कांहीं समाजाचें हित नाहीं तर नाहींच पण अहित मात्र होईल अशा गोष्टी करितात.

समाजांत बहुसंख्याक लोक प्रामाणिकपणानें आणि मेहनतीनें राहणारे असतात; पण पुष्कळ लोक समाजाला केवळ भारभूत झालेलेहि असतात. कांहींचें काम आपल्या दृष्टोत्पत्तीस येतें, पण दुसऱ्या कांहीं लोकांचे श्रम तितकेच महत्वाचे असून—उदाहरणार्थ सर्व साधारण स्त्रियांचें दररोजचें घरांतील काम—दिसण्यांत येत नाहीं. कांहीं फक्त दुसऱ्यांकडून आपली करमणूक करून घेतात आणि कांहीं दुसऱ्यांची करमणूक करण्यांतच समाधान मानतात. कांहीं लोक जन्मतःच बुद्धिमान् असतात आणि कांहीं उपजतच निर्बुद्ध असतात. कांहीं लोक येईल त्या संधीचा उपयोग करून घेतात तर कांहींना किती वेळ जरी संधि मिळाली तरी तिचा उपयोग करून घेतां येत नाहीं. कांहींचा स्वभाव मनमिळाऊ असतो तर कांहीं जात्याच तुसड्या स्वभावाचे असतात. कांहीं लोक उदार बुद्धीचे असतात तर कांहीं मनस्वी स्वार्थी आणि अनुदार असतात. सारांश, प्रत्येकांत कांहीं बरे तर कांहीं वाईट गुण असतात. आणि परिस्थितीप्रमाणें प्रत्येक जण क्षणभर स्वार्थी तर क्षणभर निःस्वार्थी होत असल्यामुळें त्याच्यांत सुधारणा होणें किंवा त्यांच्या स्वभावांत सुधारणा होणें किंवा त्यांच्या स्वभावांत बदल होणें शक्य असतें. समाजरूपी इमारत अशा प्रकारच्या मालमसाल्याची बनेलली आहे. समाज हा जंगी कारखाना हजारों प्रकारच्या परस्परांत गुतलेल्या लहान मोठ्या यंत्रांचा मिळून झालेला आहे. आणि यापैकीं प्रत्येक यंत्र—व्यक्ति—स्त्री अथवा पुरुष—जाणून वा न जाणून आपापलें कार्य करित आहे आणि या सर्वांचें ध्येय सहकार्य हें आहे. या जगांत मनुष्य आपल्यापुरताच राहूं शकत नाहीं. या प्रचंड कारखान्याचा तो एक अत्यंत सूक्ष्म भाग आहे आणि सर्व कारखान्याप्रमाणेंच त्यांतील प्रत्येक लहानसहान यंत्र समाजाच्या दृष्टीनें महत्वाचें आहे. मात्र व्यक्तीला समाजासाठीं वाटेल तो स्वार्थत्याग करणें भाग पडतें, पण समाज मात्र व्यक्तीसाठीं तितका स्वार्थत्याग करूं शकत नाहीं. समाज—हा सजीव देह—एकदम तयार झाला किंवा एकदम तयार करण्यांत आला अशांतला भाग नाहीं. व्यक्ति, व्यक्तिसमूह, राष्ट्रें आणि वेगवेगळाले समाज आपापलें कार्य करित आले आणि तें कार्य मागें ठेवून कालगतीनें अदृश्य झाले. त्यांच्या पुढील पिढीनें त्यांत भर घातली आणि तेहि गेले. अशा प्रकारें मंदगतीनें होत आलेल्या कार्याचा आजचा समाज हा परिणाम आहे. थोडथोडें साठवत व त्याची पुनर्घटना व सुधारणा होत होत आजचा समाज झालेला आहे.

## समाजसेवा एका दृष्टीनें सोपी तर एका दृष्टीनें कठीण.

अशा विराट् स्वरूपी, बहुरूपी आणि अठग धान्याचें कडबोळें झालेल्या समाजाची सेवा करणें एका तऱ्हेनें सोपें असतें तर एका तऱ्हेनें कठीण असतें. सोपें असें कीं, समाजांतील कोणाहि व्यक्तीला आपल्या सामर्थ्याप्रमाणें समाजसेवा करण्यास वरील परिस्थितीमुळें पुष्कळ वाव मिळतो आणि कामाच्या विस्तृत क्षेत्रामुळें लहान महान व्यक्तीलासुद्धां आपल्या आवडीप्रमाणें कामाची निवड करून त्यांतच आपल्या शक्तीचा व्यय करण्यास ठीक पडतें. कठीण अशा अर्थानें कीं, सर्व मानवजातीची सुधारणा करण्याची महत्वाकांक्षा धरणाऱ्या मनुष्याला समाजांत असे नाना पंथ असल्यामुळें सर्वांना पटेल व रुचेल असें ध्येय ठेवणें कठीण पडतें व त्यामुळें तो एका पोटसंघाला प्रिय तर दुसऱ्या पोटसंघाला अप्रिय होतो सर्व समाजाची सुधारणा हें एकच ध्येय विचारपूर्वक ठरवून त्याप्रमाणें आपला कार्यक्रम आखणारा व कांहीं झालें तरी त्या ध्येयापासून न ढळणारा समाजसेवक, आपलें ध्येय बरोबर आहे अशी त्याची खात्री झाल्यावर, लोकांच्या निंदास्तुतीची परवा करित नाहीं आणि ध्येयाशीं एकरूपता झाल्यामुळें त्याच्या कार्यांत खंड पडण्याचा संभव नसतो. पण परबुद्धीनें वागणारा व लोकप्रियता हेंच ध्येय मानणारा स्वार्थी मनुष्य लोकमत प्रतिकूल झाल्यावर त्या झंजावातांत कोठें उडून जाईल, त्याचा ठावहि लागणार नाहीं. आणि तें तात्पुरतें वारें नाहींसें झालें कीं त्या व्यक्तीचें नांवहि ऐकूं येईनासें होतें याचा अनुभव आपल्याला पदोपदीं येतो.

## समाजसेवेची व्याख्या.

समाजाचें स्वरूप वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें सर्वव्यापी असल्यामुळें त्याची सेवा करण्याचा मार्ग एकच नाहीं आणि म्हणूनच समाजसेवा या सकृद्दर्शनीं अगदीं साध्या शब्दाचा अर्थ वस्तुतः फारच व्यापक आहे. समाजांतील प्रत्येक व्यक्तीनें व्यक्तिशः किंवा सामुदायिक प्रयत्नानें केलेल्या प्रत्येक गोष्टीचा जर ती समाजाच्या आहिताची नसेल तर समाजसेवेंत अंतर्भाव होऊं शकतो. या व्यापक अर्थानें गिरणींत कापड विणणारा कामगार, धान्य पिकविणारा शेतकरी, आपलें काम बिनचूक व प्रामाणिकपणें करणारा सरकारी कामदार, प्रांतिक किंवा वरिष्ठ कौन्सिलचा सभासद, सार्वजनिक संस्थांत काम करणारा प्रत्येक मनुष्य, इतकेंच नव्हे तर स्वच्छता राहाण्यासाठीं साफसफाई करणारा, कविश्रेष्ठ रवींद्रनाथ

टागोर यांनीं शिरोभागीं दिलेल्या त्यांच्या कवितेंत वर्णिलेला, म्युनिसिपालिटीचा झाडूवाला व दुसरे असंख्य लोक समाजसेवकच होत. मात्र त्यांच्या कृतीपासून समाजाचें कोणत्याहि तऱ्हेचें नुकसान होतां कामा नये—यदाकदाचित् फायदा न झाला तरी चालेल. परंतु समाजसेवा व समाजसेवक या शब्दांचा वर दिलेला अर्थ जरी खरा असला तरी ते शब्द आज सामान्यतः एका ठराविक अर्थानें योजण्यांत येतात. त्या शब्दांनीं एका ठराविक कार्याचा बोध होतो आणि इतउत्तर जेथें जेथें त्या शब्दांचा उल्लेख येईल तेथें तेथें या ठराविक अर्थानेंच ते योजले आहेत असें वाचकांनीं समजावें.

## समाजसेवेचा रूढ अर्थ.

अमुक अमुक ठिकाणीं एक समाजसेवासंघ आहे असें म्हटलें म्हणजे एक ठराविक कार्यक्रम आपल्यापुढें उभा राहतो. रात्रीच्या शाळा, प्रौढ विद्यार्थ्यांकरितां शिक्षणाचे वर्ग, वाचनालयें, मुलांचे क्लब, गृहपरिचर्या, इजा झालेल्याला तात्कालिक मदत वगैरेचें शिक्षण देण्याची व्यवस्था इत्यादि समाजसेवेच्या ठराविक कार्यक्षेत्रांत येणाऱ्या गोष्टी आपल्या डोळ्यांपुढें उभ्या राहतात. सारांश, समाजसेवा म्हणजे सुस्थितींतील माणसांनीं दुःस्थितींतील माणसांचें दुःख कमी करण्याकरितां व सुख वाढविण्याकरितां केलेले प्रयत्न, अथवा ज्यांना आपली स्थिति कशी सुधारावी हें कळत नाहीं किंवा आपलें आयुष्य अधिक सुखावह करण्याकरितां आपल्या परिस्थितींत कोणते फेरफार करावेत तें समजत नांहीं त्यांना मदत करण्याकरितां समाजांतील कांहीं लोकांनीं केलेले संघटित प्रयत्न होत. जग आहे त्यापेक्षां अधिक चांगलें व अधिक सुखी व्हावें याकरितां केल्या जाणाऱ्या सर्व तऱ्हेच्या प्रयत्नांना समाजसेवा म्हणावें असेंहि कांहींचें मत आहे. सारांश गरीब, अनाथ, दीन, दुबळे यांना योग्य मदत करणें; अशा प्रकारची मदत योग्य तऱ्हेनें देतां यावी म्हणून समाजांतील घटकावयवांचे एकमेकांशीं येणारे हितसंबंध, मनुष्याच्या योग्य सुखाचीं साधनें व समाजसुखांत भर टाकून समाजाचें स्थैर्य कोणत्या उपायानें दृढतम करितां येईल, यासंबंधीं सोपपत्तिक व शास्त्रीय विवेचन ज्या शास्त्रांत केलें आहे त्या शास्त्राचा अभ्यास करणें, या शास्त्रांत प्रतिपादिलेल्या तत्वांचें आचरणांत रूपांतर करितां यावें म्हणून वैयक्तिक सुख किंवा सामुदायिक सुख वाढविण्यासंबंधीं प्रत्यक्ष काम करणें, लहान मुलांच्या आरोग्यासंबंधीं

काळजी घेतली जावी म्हणून त्या संबंधींच्या शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार करणें, गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांना उपदेश व कृति यांच्या योगानें सुमार्गावर आणण्याचा प्रयत्न करणें, सहकारी चळवळ वगैरे सारख्या चळवळींचा पुरस्कार करून लोकांची सांपत्तिक स्थिति सुधारणें वगैरे गोष्टी समाजसेवेच्या कक्षेत येऊं शकतील.

समाजसेवा अमूक एका वर्गाकरितां आहे किंवा अमूक एका वर्गांतच ती करावी अशा प्रकारचे निर्बंध नाहींत. समाजघटनेंत दोष आहेत आणि ते नाहींसे करण्याकरितां समाजसेवेची अवश्यकता आहे. म्हणून एका गोष्टींतच समाजसेवा आहे असेंहि म्हणतां येणार नाहीं. सर्वांना सारखा न्याय मिळावा, सुखाची वृद्धि व्हावी, सर्वांना स्वातंत्र्य असावें आणि आपलें सुख व स्वास्थ्य वाढविण्याला प्रत्येक माणसाला सारखी संधि मिळावी, हा समाजसेवेचा मुख्य हेतु आहे म्हणून समाजसेवा एका व्यक्तीनें, वर्गानें किंवा एका संस्थेनेंच केली पाहिजे किंवा अमुक एका तऱ्हेनेंच केली पाहिजे असें मुळींच नाहीं. करितां ज्या ज्या मार्गांनीं समाजसेवेचा उपरिनिर्दिष्ट उद्देश फलदायी होईल असें वाटले त्या त्या मार्गांनीं प्रयत्न करणें प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य आहे.

## समाजसेवासंघांची पूर्वी फारशी आवश्यकता नव्हती.

पूर्वींची समाजसेवा वैयक्तिक परोपकार बुद्धीवर अवलंबून असे. कोणत्याहि समाजसेवेच्या कार्याला परोपकारी व्यक्तीकडून स्वयंस्फूर्तीनें तात्पुरती मदत होऊन तें कार्य होई. एखाद्या रहदारीच्या रस्त्यावर पाणी नसलें किंवा वाटसरूंना विश्रांती घेण्याला सावलीचें ठिकाण नसलें तर एखादा दानशूर मनुष्य तेथें विहीर खणी व लोकांच्या पाण्याची सोय होई आणि तोच किंवा दुसरा एखादा गृहस्थ तेथें धर्मशाळा बांधी. कधीं कधीं एकट्या माणसाच्या देणगीनें हीं कार्यें न होतां जवळपासेच सर्व गांवकरी लोक एकत्र मिळून अंगमेहनतीनें अशा प्रकारचीं कामें करित. गावांतील एखाद्या कुटुंबावर किंवा एखाद्या भागावर, आग लागणें किंवा नदीचें पाणी वाढून घरें वाहून जाणें अशासारखी एखादी आपत्ति आपल्यास गांवाच्या इतर भागांतील लोक तात्काळ तेथें जाऊन संकटग्रस्तांना त्या संकटांतून मुक्त करित व त्यांना ताबडतोब हवी असलेली मदत देत. निराश्रित व पोट भरण्याला नालायक झालेल्या माणसांच्या सोयीकरितां जागोजाग अन्नसत्रें व सदावर्तें असत. अन्नान्नस्थिति झालेल्या माणसाला

कोठेंहि गेलें तरी अन्नवस्त्र हें मिळेच. आजाऱ्याला पैसा न खर्चतां औषध मिळण्याच्या सोई असत आणि समाजसेवासंघ नसले तरी दर एक प्रसंगीं कोणाचीहि पै न घेतां परोपकार बुद्धीनें लोकांच्या उपयोगीं पडणारीं वृद्ध माणसें घरोघरीं असत. शिवाय, या कामाला वाहिलेलीं अशीं कांहीं माणसें प्रत्येक गांवांत असत. सारांश, खेड्यापाड्यांतून अवश्य असलेलें समाजसेवेचें कार्य तेथील लोकच करीत व ही व्यवस्था चांगल्या रीतीनें चाले. याचें कारण असें कीं, लोकांची सांपत्तिक स्थिति चांगली असे व सर्वत्र एकत्र कुटुंबपद्धति असल्यामुळें निराधार व अन्नान्न स्थितीप्रत पोंचलेलीं अशीं माणसें अगदीं थोडीं असत. आणि जीं कांहीं असत त्यांना शेजारीपाजारी किंवा शेट सावकार अवश्य ती मदत करीत. त्या मदतीकरितां गांव सोडून जाण्याचा प्रसंग त्यांच्या-वर बहुधा येत नसे; शिवाय ज्या थोड्यांना कोठेंच आधार नसे ते तीर्थाच्या ठिकाणीं जात आणि तेथें तर त्यांची चैनच होई. हजारों मैलांचा प्रवास एक पैहि खर्च न करितां करितां येण्यासारखा असे. कारण मुक्कामाच्या प्रत्येक टप्याला धर्मार्थ भोजन मिळण्याची सोय असे. त्यामुळें लहान लहान प्रवाशांच्या टोळया अशा रीतीनें प्रवास करीत दूर दूर जात. पण येथें एक विशेष गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे ती ही कीं, वर उल्लेखिलेल्या सर्व प्रकारच्या सोयी सहज होण्यासारख्या असूनसुद्धां अगदीं निरुपाय तरच त्या सोयीचा लोक फायदा घेत. कारण फुकट व बिनमेहनतीनें. दुसऱ्यांनीं केलेल्या दानाचा फायदा घेणारे निर्लज्ज लोक त्या काळीं खरोखरीच अगदीं विरळ असत. दान घेणें हें स्वाभिमानशून्य व अगदीं अवनत स्थितीला पोंचलेल्या माणसाचें काम आहे, अशी लोकांची सामान्यतः समजूत असे. सारांश, त्या काळीं समाजसेवेचे संघ-टित प्रयत्न झालेले नसले तथापि तशा संघटित प्रयत्नांची फारशी आवश्यकताहि नव्हती असें ह्मटलें तरी चालेल. पण ही सर्व परिस्थित आज बदललेली आहे.

## औद्योगिक युगाचा परिणाम.

त्या काळीं घराघरीं कलाकौशल्याचे व इतर धंदे चालत आणि जे कारखाने असत ते फार लहान प्रमाणावर असत. ह्यामुळें कारखानदार व कामगार यांना परस्परांच्या गरजा व अडचणी सहज कळत. त्याकरितां त्रयस्थाची अवश्यकता लागत नसे. कामगारांना मालकांशीं प्रत्यक्ष बोलण्याची संधि मिळत असल्यामुळें संप करण्या इतका अनवस्था प्रसंग येत नसे व कारखानदारांनीं कामगारांना

कसें वागवावें याविषयीं कायदेकानू करण्याची अवश्यकता सरकारला भासत नसे. क्वचित् एखादा शिरजोर सावकार आपल्या लोकांना त्रास देतांना आढळा-वयाचा, पण तोसुद्धां आजच्या मोठ्या कारखानदारांपेक्षां पुष्कळसा बरा असे आणि गांव करील तें राव करूं शकणार नाहीं या म्हणीची त्याला पूर्ण जाणीव असल्यामुळें त्याला आपला दोष दिसावयाला वेळ लागत नसे आणि तितकेंहि करून तो ताळ्यावर आला नाहीं तर गांवकरी लोक त्याला तसें करण्याला भाग पाडीत. आजच्या मोठ्या कारखा-न्यांची स्थिति याच्या अगदीं उलट आहे. त्यांतील कामगारांना आपला मालक कोण हेंच आधीं माहिती नसतें. कारण हल्लीं बहुधा एक मालक असला तरी तो कारखान्यांत येतोच असें नाहीं. सारांश, तत्कालीन कारखानदार आजच्या इतके स्वार्थलोलुप नव्हते व एखादा कारखाना चालवून चार माणसांना अन्नाला लावणें हें त्यांना अभिमानाचें व परोपकाराचें वाटे. त्यामुळें त प्रसंगीं आपल्या फायद्याकडे पाहत नसत आणि त्यांचें फायद्याकडे लक्ष असलें तरी त्यांचा पैशाचा लोभ अनावर होत नसे. ही स्थिति हळुहळू पालटत गेली. हातानें चालणाऱ्या लहान लहान कारखान्यांच्या जागीं वाफेच्या व विजेच्या साहाय्यानें चालणारे मोठमोठे कारखाने आले. कामधंदा मिळेनासा झाल्यामुळें खेड्यांतील लोकांची सांपत्तिक स्थिति वाईट होत चालली, त्यामुळें लहान गांवांतील लोक कामधंद्याकरितां शहरांत येऊं लागले. कांहीं वर्षांमागें जेथें ओसाड व पडीत जागा होती तेथें लाखों लोक-वस्तीचीं शहरें झालीं. कारखानदार व कामगार यांचे संबंध दुरावत चालले आणि सलोखा होता तेथें तेढ उत्पन्न झाली. पूर्वींचे कामाचे व मजुरीचे नियम बदलले आणि कारखानदारांच्या स्वार्थाला कोणत्याच प्रकारचें नियमन राहिलें नसल्यामुळें संपत्तीच्या लोभानें ते अमानुष कृत्यें करूं लागले. कामाचे तास अतोनात वाढले, पुरुषांना मजुरी द्यावी लागते म्हणून बायका कामाला लावूं लागले आणि ह्यापेक्षांहि फायदा अधिक मिळावा म्हणून लहान लहान मुलगे व मुली रात्रंदिवस कामाला लावूं लागले आणि या आपल्या लोभी वृत्तीला कधीं तरी नियंत्रण बसेल या भीतीनें सर्व कारखानदार आपापले संघ करूं लागले. काम-गारांना मदत करणें हें आपलें कर्तव्य आहे असें समजणारा कारखानदारहि काम-गारांना मदत करणें म्हणजे त्यांच्यावर उपकार करणें होय असें मानूं लागला. सारांश, आपल्या फायद्याकरितां ईश्वरानें गरीब व असहाय लोक उत्पन्न केले-

आहेत त्यांना शक्य तों पिळावें, शक्य ती अधिक संपत्ति बऱ्याबुऱ्या मार्गांनीं मिळवावी आणि सदोदित नानातऱ्हेच्या ऐश्वर्यांत पैसा घालवावा असें कारखानदारांना वाटूं लागलें. औद्योगिक क्रांतीचा येथें कळस झाला आणि कामगारांची कल्पनातीत अवनति झाली. ही स्थिति चालू राहिल्यास सर्व राष्ट्राचा ऱ्हास होईल हें जाणून जनता व सरकार यांनीं कारखानदारांची इच्छा नसतांहि या स्थितींत सुधारणा करण्यास कारखानदारांना भाग पाडण्यास सुरवात केली आणि कालांतरानें कारखानदारांचा स्वार्थ पूर्ण नियंत्रित होईल अशी आशा आतां वाटूं लागली आहे.

## औद्योगिकयुगजन्य सामाजिक क्रांति.

या औद्योगिक क्रांतीमुळें लोकांच्या सामाजिक परिस्थितींत पुष्कळ बदल झाला. कारखान्यांत काम करणें सोईचें पडावें म्हणून हजारों लोक कारखान्याच्या जवळ पास राहूं लागले. त्यामुळें अर्थातच जागा गलिच्छ, अपुरी आणि गचडीची झाली. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत काम करावें लागल्यामुळें सूर्यदर्शन तर नाहींच पण आपलीं मुलं माणसेंहि कामगारांना जागेपणीं दिसेनाशीं झालीं आणि कारखान्यांतील कोंदट हवा, अस्वच्छता, तासाचे तास उभें राहून काम करणें, स्त्रीपुरुषांनीं गलिच्छ वातावरणांत एकत्र काम करणें वगैरे नाना प्रकारच्या अनिष्ट गोष्टींमुळें हें वातावरण इतकें बिघडलें कीं तें सुधारण्याचे प्रयत्न करणें व्यक्तीच्या आटोक्याबाहेर गेलें व त्यासाठीं अनेक परोपकारी माणसांना एकत्र होऊन संघटित प्रयत्न करावे लागले.

वस्तुतः पुष्कळशीं कामें यंत्रांनीं होऊं लागल्यामुळें मनुष्याचे श्रम कमी होऊन तो अधिक सुखी व्हावा व दुसऱ्या अधिक चांगल्या गोष्टींकडे लक्ष्य देण्यास त्याला अधिक सवड मिळावी. परंतु दुर्दैवानें वाफेच्या साहाय्यानें यंत्रें चालू झाल्याचा अगदींच विपरीत परिणाम झाला. लोक अधिक सुखी होण्याची गोष्ट तर राहोच, पण त्यांना सर्व तऱ्हेनें पिळून काढून त्यांना अधिक दुःखी करण्याकडे वाफेच्या यंत्रांचा उपयोग झाला. माणसांची किंमत यंत्रांपेक्षांहि कमी झाली. श्रीमंत होते ते अधिक श्रीमंत झाले, व गरीब होते ते अधिक निर्धन झाले. त्यामुळें संकटपरंपरा वाढली, समाजांतील भेद अधिक दुणावत चालले, नाना प्रकारचीं व्यसनें उत्पन्न झालीं, आणि समाजसेवेच्या क्षेत्राला सीमाच नाहींशी झाली.

हे कारखाने व ही औद्योगिक परिस्थिति आतां इतकी वाढली आहे कीं, ती नाहींशी होईल आणि आजचे कारखाने जाऊन त्या ऐवजीं घरगुती धंदे येतील व सर्व पूर्ववत् होईल अशी अपेक्षा करणें व्यर्थ आहे. आणि कारखान्यांत सुधारणा झाली, कामाचे तास कमी झाले, मजुरी वाढली व दुसऱ्या अनेक सुधारणा झाल्या—इतकें होण्याला कैकवर्षे लागतील—तर आजची स्थिति सुधारेल हें खरें; पण या औद्योगिक क्रांतीमुळें जे प्रश्न उत्पन्न झाले आहेत ते त्यामुळें कधींहि नाहींसे व्हावयाचे नाहींत. याकरितां समाजसेवेच्या संघटित प्रयत्नांची आवश्यकता कमी होण्या ऐवजीं ती दिवसेंदिवस वाढत जाणार.

एकत्र कुटुंबपद्धतींत दुसरे कितीहि दोष असले तरी एक मोठा फायदा होता. तो असा कीं, कुटुंबांतील वृद्ध, आजारी व दुर्बळ माणसांची सोय लाजेकाजेस्तव तरी कुटुंबांतच करावी लागे. त्यांचा समाजावर फारसा भार पडत नसे. परंतु औद्योगिक क्रांतीन कुटुंबाचे शक्य तितके लहान तुकडे करण्याचें श्रेय घेतलें. इतकें कीं बाप, आई, मुलगा व मुलगी हींहि परस्परापासून अलग केलीं. घराचा लोभ साहाजिकच न सुटल्यामुळें निरुपाय तितकींच माणसें खेडें सोडून शहरांत येऊं लागलीं. त्यामुळें आई गांवीं तर बाप शहरांत, मुलगा एका कारखान्यांत तर मुलगी दुसऱ्या कारखान्यांत अशी त्रिस्थळी स्थिति झाली. परावलंबी माणसांची संख्या वाढली व आजारी पडल्यास कोणीच विचारीनासें झालें. यामुळें खेड्यांत व शहरांत दोन्ही ठिकाणीं पराधीन माणसांची संख्या वाढली, अनेक प्रकारचे सामाजिक प्रश्न उपस्थित झाले आणि प्रत्येक स्थळीं—खेड्यांत व शहरांत-समाजसेवक व समाजसेवासंघ यांची अवश्यकता सारखीच भासूं लागली.

## धार्मिक बुद्धीचें दान.

पूर्वीं आणि पुष्कळ अंशीं अझूनसुद्धां दान धार्मिक बुद्धीनें करण्यांत येतें. असें दान केल्यानें आपल्याला मुक्ति मिळेल व आपलें पाप नाहींसें होईल म्हणून दान करणें हें आपलें कर्तव्य आहे, असें समजून स्वर्गप्राप्तीच्या स्वार्थी बुद्धीनें दान करणारे लोकच बहुतेक आढळतील. दान घेणाराच्या दृष्टीनें ते मुळींच विचार करित नाहींत. साधारणपणें सर्व धर्मांत दानाची हीच कल्पना आढळेल. जोंपर्यंत दान करितांना दान घेणाराचें हिताहित पाहाण्याऐवजीं दान देणाराच आपल्या वैयक्तिक हिताकडे पाहातो तोंपर्यंत त्या दानापासून राष्ट्राचें हित होणें शक्य नाहीं. जुनी दानाची कल्पना दानाच्या आधुनिक

कल्पनांशीं जुळती नाहीं. कारण उपरिनिर्दिष्ट दानाचा परिणाम अनिष्ट होतो, त्यानें दान घेणारांची संख्या कमी होण्याऐवजीं उलट वाढते व त्यामुळें हे लोक समाज आहे तोंपर्यंत असणारच अशी जनतेची भ्रामक कल्पना होते, असा अनुभव आहे. आपलें नांव आपल्या पाठीमागें चालावें म्हणून अन्नसत्रें किंवा सदावर्तें काढणारे लोक आणि आपली दानशूर वृत्ति लोकांना दिसावी म्हणून खिशांत बऱ्याच पया ठेवून त्या रस्त्यानें भिकाऱ्यांना वांटीत जाणारे लोक यांच्यांत कोणत्याहि प्रकारें फरक नाहीं. या दोन्ही प्रकारच्या लोकांत दात्याला अवश्य लागणारा स्वार्थत्याग, परोपकार, राष्ट्रहितबुद्धि हीं नसतात. आपल्या स्वतःला लयलूट होऊन उरलेल्या संपत्तींतून दान करणारे किंवा आपल्याबरोबर संपत्ति नेतां येणार नाहीं म्हणून दान करणारे यांच्यांतहि वरील गुणांचा अभावच असतो. त्याचप्रमाणें एखाद्या माणसाच्या दीन स्थितीचा कळवळा येऊन विकारवश होऊन दान करणारे लोक, न्यायान्यायाचा विचार न करितां धनसंचय करित असतां कैक लोकांच्या माना मुरगळल्यामुळें त्या अपकीर्तीवर झाकण घालण्याकरितां किंवा त्या पापाचें क्षालन करण्याकरितां दान करणारे लोक किंवा लोकांनीं आपल्याला धर्मात्मे म्हणावें म्हणून दान देणारे लोक या सर्वांचा वरील लोकांत समावेश करितां येईल. आणि एकंदरींत त्यांनीं वरील कृतीमुळें समाजाचें हित करण्याऐवजीं अहितच केलें असें विचाराअंतीं आपल्याला म्हणणें भाग पडेल. उपरिनिर्दिष्ट लोक व भिकारी आपल्यापुढें आला असतां त्याला तशी स्थिति येण्याला कोणतीं कारणें घडलीं व स्थिति जाऊन तो स्वाभिमानी, स्वावलंबी होऊन पुनः भिकारी म्हणून आपल्या दारांत येणार नाहीं असें होण्याला काय केलें पाहिजे याचा सर्व तऱ्हेनें विचार करून त्याप्रमाणें स्वतः प्रयत्न करणारा मनुष्य यांच्यांत किती महदंतर आहे हें सांगणें नलगे.

## दान म्हणजे प्रेम.

दानाचा मूळचा अर्थ म्हणजे आपण आपल्या बांधवांकरितां प्रदर्शित करावयाचें प्रेम असा आहे आणि सर्व प्रकारच्या समाजसेवेच्या मुळाशीं हें तत्व असावें लागतें. हें तत्व म्हणजे समाजसेवेचा प्राण आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. कारण ज्याच्यावर आपण प्रेम करितों तो निरंतर सुखी राहावा अशी आपली इच्छा असणें व त्याप्रमाणें आपण प्रयत्न करणें स्वाभाविक

असतें; परंतु आतांपर्यंतची दानपद्धति आपण पाहिल्यास तींत या तत्वाचा मागमूसहि आपल्याला कोठें आढळणार नाहीं. कसें तरी दान करावयाचें, त्याचा दूरदृष्टीनें विचारच करावयाचा नाहीं, अशी स्थितिच आपल्याला आढळेल.

समाज आहे असाच राहाणार व त्यांत आंधळे अनाथहि असणार, इतकेंच नव्हे तर आंधळे अनाथ आहेत म्हणूनच धनिकांना दान करावयास संधि मिळते अशा प्रकाची विचारसरणी अझूनपर्यंत होती. दात्याला दान करितांना एक प्रकारचा आनंद होत असे आणि आपण गरिबाची कींव केली असें त्याला स्वाभिमानपूर्वक वाटे. आणि या परोपकाराबद्दल दान घेणारांनीं आपल्याला धन्यवाद द्यावे अशी त्याची मनापासून अपेक्षा असे. पण दान घेणारा अशा प्रकारें उतराई व्हावा अशी इच्छा करणें म्हणजे खऱ्या मैत्रीचा अभाव नव्हे काय ? त्या काळचे दाते आपल्याला धन्य मानीत व आपण आहोंत म्हणूनच गरीब लोक वांचतात असें त्यांना मनापासून वाटे. गोरगरीबांना उपदेश करण्यांत आणि त्यांना सद्गुणी व निर्व्यसनी होण्यास सांगण्यांत त्यांना आनंद वाटे. पण स्वतः उपदेशिलेल्या गोष्टी आपल्या अंगीं आहेत किंवा नाहींत किंवा आपण त्या आचरीत आहोंत किंवा नाहीं हें पाहाण्याची त्यांना अवश्यकता वाटत नसे. इतकेंच नव्हे तर तसें होणें आपल्याला जरूर आहे हेंहि त्यांच्या ध्यानींमनीं नसे. उलटपक्षीं, मन मानेल त्या प्रमाणें वागण्याची आपल्याला ईश्वरानें मुभा दिलेली आहे, असें त्यांचें प्रामाणिक मत असे. हीं मतें आजच्या समाजाच्या गळीं उतरणें दुरापास्त आहे हें सांगण्याची अवश्यकता नाहीं.

## समाजसुधारकांची मदत.

अशा प्रकारचें दान करणें हिताचें नाहीं, उलट समाजाला अहितकारक आहे, म्हणून ही दानाची कल्पना बदलली याची समाजामध्यें जाणीव होण्यास प्रथम समाजसुधारकांचे प्रयत्न कारणीभूत झाले. सुमारें पाऊणशें वर्षांपूर्वीं कै. लोकहितवादी व त्यानंतर कै. आगरकर यांनीं लिहिलेले लेख जर आपण पाहिले तर आपल्याला असें आढळून येईल कीं, दानाची व समाजसेवेची आधुनिक तत्वें लोकप्रिय होण्यास प्रथमतः यांच्याच लेखांचा पुष्कळ उपयोग झाला. उदाहरणार्थ कै. लोकहितवादी यांनीं ता. १९ नव्हेंबर १८४८ रोजीं ‘ मानास व दानास पात्र ’ या मथाळ्याखालीं एक पत्र तत्कालीन ‘ प्रभाकर ’ पत्रांत लिहिलें. त्यांत ते म्हणतातः—“ मोठा धर्म आणि दान करावयाचें झालें म्हणजे हजारों भटांस जेवण घालितात. कोणी पांच हजार खर्च लावून देऊळ

बांधितात. कोणी मनास येईल तसा पैसा टाकितात. त्यांस योजना नीट कळत नाहीं. काय म्हणे अमक्यानें एक लक्ष रुपये धर्मादायास टाकिले. त्यांपैकीं देवळास पन्नास हजार गेले, पंचवीस हजार ब्राह्मण भोजन, दहा हजार खर्च देऊन लग्नें केलीं. असा व्यय केला. हें पाहून मला वाटतें कीं, मूर्खपणाची हिंदु लोकांपुढें हद्द झाली ! ह दोन लाख रुपये जर नीट खर्च केले असते तर किती उपयोगी कामें झालीं असतीं बरें ? किती दरिद्राचा ऱ्हास होता, किती ज्ञान व शहाणपण पटवायास येतें. परंतु मातींत पैसा कितीही घातला तरी त्याचा कांहीं फायदा आहे काय ? माणसें ही जिवंत माती, त्यांस कांहीं सुखाचा उपयोग व्हावा तें टाकून मातीच्या शोभेत द्रव्य खर्च करून काय उपयोग ? जर हिंदु लोकांस वास्तविक धर्म करावयाचा असेल तर इतकाच करावा कीं, जेणें करून लोकांचें अज्ञान दूर होईल, पुस्तकें व विद्या वाढतील व जेव्हां हे लोक आपल्या मूर्खपणाच्या मार्गांतून सुटतील तेव्हांच सुखवृद्धि होईल. आयुष्याचा उपयोग कसा करावा, आपला जन्म लोकांस कोणत्या प्रकारें उपयोगी करावा, आपण पृथ्वीवर होतों त्याची मागें स्मृति रहावी याविषयीं उपाय करावा, सारासार विचार करून ईश्वराचें भय बाळगावें व खरेपणा धरावा, हें कोणी पाहात नाहीं. धर्मात्मे लोक पुष्कळ आहेत व आम्ही धर्म फार केला असें ते म्हणतात. परंतु आंधळयास त्यांनीं जेवावयास घातलें काय ? दुर्जनांस सुजन केलें काय ? कोणता परोपकार आपले लोकांमध्यें त्यांनीं केला ? कोणी म्हणतो मी वैशाखांत मडकीं दिलीं, आंवळे दिले. हा धर्म कशाचा ? हा मूर्खपणा आहे. भटांनीं वेड लावावें आणि गृहस्थांनीं त्याप्रमाणें नाचावें. यजमानास सांगावें कीं, उष्णकाळीं क्षीरभोजन घालावें म्हणजे यजमान पुण्य जाणून तसें करितो. पण वास्तविक यामध्यें पुण्य कशाचें ? आळशी लोक द्रव्य खाऊन जातात आणि मालकास पुण्य पुण्य म्हणून ठकवितात इतकेंच आहे. वास्तविक पुण्य हेंच कीं, यथायोग्य पात्र पाहून धर्म करावा. तान्हेला आहे त्यास पाणी द्यावें. कुंभ भरून ब्राह्मणास दिला व त्यानें तो जातांना टाकून दिला. कारण त्याचे घरीं हौद आहे. मग त्याला यजमानाच्या कुंभांतील पाण्याचें काय करावयाचें आहे ? अर्थातच तो तें मडकें ओतून टाकतो. तेव्हां हा धर्म कसा ? परंतु हाच धर्म आहे, असें जे म्हणतात, ते मूर्ख नव्हत काय ?"

दुसऱ्याहि अनेक समाजसुधारकांनीं या कार्यास हातभार लावला आणि त्यांचे हे प्रयत्न आज तागायत अव्याहत चालू आहेत ही समाधानाची गोष्ट होय.

## समाजसेवा व समाजसुधारणा.

परंतु समाजसेवा व समाजसुधारणा ह्या दोन शब्दांतील भेद येथें लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे. हिंदुस्थानांत समाजसुधारणा हा शब्द इंग्लंडांतल्यापेक्षां कांहींशा निराळया अर्थानें वापरला जातो. समाजाला उपयुक्त अशा सुधारणा करणें हा उद्देश दोहींकडे सारखाच आहे. तथापि इंग्लंडांतील समाजसुधारणेमध्यें सामाजिक चालीरीतींचा फारसा संबंध येत नाहीं. तिकडे स्त्रियांच्या शिक्षणाला आडकाठी नाहीं, बालविवाहाची चाल प्रचारांत नाहीं, विधवाविवाहास प्रतिबंध नाहीं. त्यामुळें स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, बालविवाह वगैरे बाबतींत सुधारणा करण्याकरितां चळवळ करण्याची तिकडे अवश्यकता भासत नाहीं. परंतु हिंदुस्थानांतील परिस्थिति याच्या अगदीं उलट आहे. इकडील समाजसुधारकांना वरील गोष्टींकडे विशेष लक्ष्य द्यावें लागतें. उलट, पाश्चात्य देशांतील सुधारणेशीं सामाजिक चालीरीतींचा कांहीं संबंध येत नसल्यामुळें गरीब लोकांना स्वच्छ, हवाशीर भरपूर जागा असलेलीं घरें स्वस्त भाड्यानें पुरविणें, वयातीत माणसांना पेन्शन मिळण्याची व्यवस्था करणें, शिक्षणप्रसार, तुरुंगांची सुधारणा इत्यादि गोष्टींचा समाजसुधारणेंत अंतर्भाव होतो. येथें समाजाच्या प्रगतीच्या आड येणाऱ्या अनिष्ट चालीरीति कैक शतकें रूढ असून अज्ञ जनांच्या समजुतीप्रमाणें त्यांना धर्माचें पाठबळ आहे असें समजलें जातें. म्हणून इकडील परिस्थितीच्या दृष्टीनें या चालीरीतींमध्यें इष्ट तो फेरफार करणें आणि अगदींच वाईट असतील त्या अजिबात टाकून देणें हेंच इकडे समाजसुधारकांचें महत्वाचें काम आहे. इकडील समाजसुधारणेशीं सामाजिक चालीरीती व त्यांना आधारभूत म्हणून समजला जाणारा धर्म यांचा संबंध येत असल्यामुळें पाश्चात्य देशांतील समाजसुधारणेपेक्षां इकडील समाजसुधारणेचें स्वरूप भिन्न झालें आहे. पाश्चात्य देशांतील समाजसुधारणेशीं सामाजिक चालीरीती व धर्म यांचा कांहींच संबंध येत नाहीं असें म्हटलें तरी चालेल.

समाजसुधारणेंत जशा कांहीं अतिशय वादग्रस्त बाबी आहेत तशा समाजसेवेमध्यें नाहींत. जुन्या व नव्या दोन्हीं मतांच्या लोकांना समाजसेवेमध्यें एकत्रपणें व सहकारितेनें काम करण्यास पुष्कळ जागा आहे. विधवांनीं पुनर्विवाह करणें धर्मदृष्ट्या इष्ट नाहीं असें ज्यांना मनःपूर्वक वाटतें त्यांनाहि विधवांना शिक्षण देणें, आर्थिक स्वातंत्र्याचा मार्ग सुलभ करून देणें, समाजाचे उपयुक्त

घटकावयव होण्यास साहाय्य करणें इत्यादि बाबतींत विधवाविवाहाला प्रतिबंध नसावा असें प्रतिपादणाऱ्या समाजसुधारणावादी लोकांशीं सहकारिता करितां येईल. जातिभेद मानणाऱ्या लोकांनाहि केवळ भूतदयेची दृष्टि ठेवून सर्व जातींना शिक्षण, औषधपाणी वगैरेंच्या बाबतींत साहाय्य करून तसें करणाऱ्या व जातिभेद न मानणाऱ्या लोकांशीं सहकारिता करितां येईल; अस्पृश्यांची सध्यांची हीन स्थिति सुधारण्यास हातभार लावितां येईल. सारांश, समाजसुधारणेचा भर मुख्यतः न्याय व समता यांच्यावर असून समाजसेवेचा मुख्यतः भूतदया आणि सर्वांचें चांगलें व्हावें अशी इच्छा यांच्यावर आहे. दयेच्या पूर्वी न्यायाची अवश्यकता आहे हें खरें असलें तरी भूतदयेचें महत्व अगदींच कमी नाहीं.

## समाजसुधारणेचीं मूलतत्वें.

समाजसेवा आणि समाजसुधारणा या बाबी वरील प्रकारें एकमेकांपासून भिन्न असल्या तरी आधुनिक पद्धतीप्रमाणें समाजसेवा करण्यास समाजसुधारणेचीं कांहीं मूल तत्वें मान्य असलीं पाहिजेत. जे कोणी अंध-पंगू असतील त्यांना मदत करणें म्हणजे देवाच्या विरुद्ध जाणें होय, कारण पूर्वजन्मीं केलेल्या पातकाबद्दल या जन्मीं देवानें त्यांना ही शिक्षा दिलेली असते; स्त्रियांना शिक्षण देणें हें धर्मदृष्ट्या पाप आहे; विधवांनीं आपल्या चरितार्थाकरितां घरच्या किंवा माहेरच्या पुरुषांवर अवलंबून राहावें हा त्यांचा धर्म आहे, स्वतंत्रपणें आयुष्य घालविण्याचा त्यांना हक्क नाहीं; मजूर, शेतकरी वगैरे शूद्र वर्गाची स्थिति नेहमीं हलाखीची असली तरच ते आपली पायरी सांभाळून राहातील, नाहींपेक्षां ते शिरजोर होऊन समाजाची उलथापालथ होईल व धार्मिक बंधनांस कोणी विचारणार नाहीं; शूद्रांना व अतिशूद्रांना शिक्षण देणें हें धर्मदृष्ट्या पाप आहे; स्मृतिनिर्बंधांना अनुसरून शूद्रांना व अतिशूद्रांना साक्षर होण्याचा किंवा धनसंचय करण्याचा अधिकार नाहीं; अशा प्रकारचीं ज्यांचीं मतें असतील म्हणजे समाजसुधारणेचीं साधीं मूलतत्वेंहि ज्यांना मान्य नसतील त्यांना समाजसेवेविषयीं सहानुभूति वाटणें शक्य नाहीं. आणि ते लोक उघडपणें विरोध करूं शकले नाहींत तरी समाजसेवेसंबंधाच्या चळवळीचे ते अंतःस्थ शत्रूच होत असें समजलें पाहिजे.

कारखाने निघाले त्या वेळची कामगारांची स्थिति पाहिली किंवा तशाच प्रकारच्या गोष्टी कीं ज्यांत आज पुष्कळ सुधारणा झाली आहे त्यांचा आपण

विचार केला कीं उघड उघड अन्यायाच्या गोष्टी त्यांनीं कशा सहन केल्या याचें आपल्याला आश्चर्य वाटतें. पण आजच्या स्थितीचा जर आपण विचार केला तर आपल्यालाहि दिसून येईल कीं, आज आपल्या समाजांत प्रत्यहीं अशा अनेक गोष्टी घडत आहेत कीं, ज्यांच्याबद्दल आपली भावी पिढी आपल्याला दोष देईल. वेश्या व वेश्यागारें यांच्यावर कर बसवून तो पैसा धर्मसुधारणा व शहरसुधारणा यांकडे एका काळीं खर्च करीत याबद्दल आज आपल्याला आश्चर्य वाटतें. पण आपलें अबकारी धोरण यापेक्षां वेगळें आहे काय ? दारू-बाजीचे अनिष्ट परिणाम स्पष्ट कळत असूनसुद्धां तो पैसा शिक्षणाकडे खर्च होतो म्हणून पुष्कळ लोक या धोरणाची तरफदारी करीत असतात. शिवाय जगांतील घडामोडी इतक्या शीघ्र गतीनें होत आहेत कीं, पुढें होणाऱ्या कित्येक गोष्टींची आज आपल्याला कल्पनाहि नाहीं.

**‘ मूले कुठारः ’**

पण येथें एक गोष्ट आपल्याला कबूल करावी लागेल कीं, आपल्या मागील पिढीपेक्षां आज आपल्या ज्ञानांत पुष्कळच भर पडली आहे. समाजसेवेचें ध्येय व समाजसेवेचे मार्ग यांत आज कल्पनातीत फरक झाला आहे आणि या बाबतींत लोकमतहि पुष्कळ बदललें आहे. पूर्वींच्या काळीं सामाजिक संकटांचा प्रतिकार करण्याचा लोक प्रयत्न करित, पण त्यांच्या कारणांचा कोणी दूरवर विचार करित नसे. चिकित्सक बुद्धीनें त्याचीं कारणें कोणीं शोधून काढीत नसे आणि प्रत्यक्ष दिसणाऱ्या परिणामाशिवाय त्यासंबंधी कोणालाच फारशी माहिती नसे. पण आज कोणत्याहि प्रकारच्या सामाजिक अन्यायाचीं किंवा संकटाचीं मूळ कारणें शोधल्याशिवाय त्याला उपाय योजणें समाजसेवेच्या दृष्टीनें चुकीचें समजण्यांत येतें. तथापि आजसुद्धां अशा प्रकारचीं उदाहरणें नाहींत असें मात्र नाहीं. उदाहरणार्थ दारूमुळें लोकांची अवनति झाली असें आपण समजतों व दारू बंद करण्याचे कडक उपाय योजतों; पण दारूच्या पिठ्यांत जाण्याला ज्या गोष्टी कारणीभूत होतात—वाईट घरांत व वातावरणांत राहणें, कोंदट हवेच्या कारखान्यांत सर्व दिवसभर काम करणें व संध्याकाळीं थकून भागून आल्यावर योग्य प्रकारें मनाची करमणूक करण्याला साधनें नसणें वगैरे· त्यांचा कोणीच विचार करित नाहीं.

आजारी पडल्यावर डॉक्टराच्या घरीं खेटें घालण्यापेक्षां आजारी पडण्याचा प्रसंगच न येईल तर पाहावा, अशा प्रकारचें लोकमत आतां हळू हळू होऊं

लागलें आहे. अतिशय दाटीच्या व घाणेरड्या वस्तींत अनेक प्रकारच्या रोगांचा प्रादुर्भाव लौकर होतो व येथें राहाणाऱ्या माणसाच्या अंगीं अशक्त प्रकृतीमुळें रोगाचा प्रतिकार करण्याचें त्राण नसल्यामुळें तीं रोगाला पटापट बळी पडतात, म्हणून अशा प्रकारची गलिच्छ वस्ती शहरांतून नाहींशी करण्याचे प्रयत्न होत आहेत. मुबलक व मोकळी हवा मिळेल अशा प्रकारची घरांची बांधणी करण्याबद्दल कायदे होत आहेत. सारांश, समाजाच्या नाशाला कारणीभूत होणाऱ्या गोष्टींसंबंधानें अधिक विचार न करितां त्यांच्या बाह्यात्कारीं दिसणाऱ्या परिणामांना आळा घालण्याची वृत्ति आतां कमी होऊन अशा गोष्टींचें मूळ शोधण्याकडे लोकांचें लक्ष्य अधिकाधिक लागूं लागलें आहे.

लोकशाहीच्या तत्वाचा प्रसार दिवसेंदिवस अधिक होऊं लागला आहे. अद्यापपर्यंत कारखानदारांना मजूर आपले अंकित राहाणार असें वाटे व मजुरांनाहि वाटे कीं आपण मजूरच राहणार, मजूरी करण्याकरितांच आपला जन्म आहे, धनी आपल्याला मजुरी देतात हे त्यांचे आपल्यावर मोठे उपकार आहेत आणि त्यांच्या इच्छेविरुद्ध गेलों तर आपलें कांहीं चालणार नाहीं. लोकशाहीच्या तत्वांचा फैलाव होऊं लागल्यामुळें उपरिनिर्दिष्ट मतांचा फोलपणा उभयपक्षांनाहि आतां थोडथोडा दिसूं लागला आहे. रंकाचा राव होणें हें कोणाहि व्यक्तीला शक्य आहे. कामगार श्रम करितात म्हणूनच कारखाने चालतात व त्यामुळें धन्यांना पैसे मिळून त्यांची चैन चालते. तसेंच धनी कामगारांना मजुरी देतो ती आपल्या घरची देत नाहीं तर कामगारांच्या श्रमाचा तो मोबदला देतो. ते त्यांच्यावर उपकार नाहींत तर ते पैसे त्यांच्या हक्काचेच आहेत. कारण, कारखान्यावर उभयतांचाहि सारखाच हक्क आहे. एक भांडवल पुरवितो व दुसरा श्रम करितो. सारांश, गोरगरिबानांहि आतां आपल्याला नागरिकत्वाचे हक्क असावे, शिक्षण संपादन करण्याला सर्वांना सारखी संधि मिळावी, उच्चनीच भाव नसावा, माणसें तेवढीं सारखींच म्हणून सर्व हक्क आपल्याला दान म्हणून नव्हेत तर आपला हक्क म्हणून मिळावे असें थोडथोडें वाटूं लागले आहे.

**आदर्शभूत समाज.**

समाजांतील प्रत्येक व्यक्तीला आपली सर्व बाजूंनीं सुधारणा करण्याला संधि व वाव मिळाला पाहिजे. कारण समाजांतील व्यक्तींची सुधारणा होईल तेव्हांच समाजाची सुधारणा होणार. पण सुधारलेला समाज म्हटला कीं त्यांत सर्व समाजाचीच सुधारणा झालेली असली पाहिजे. आदर्शभूत समाजांत एका

व्यक्तीनें मात्र दुसऱ्या व्यक्तीसाठीं स्वार्थत्याग करावा किंवा एका पोटसमाजाची अतिशय सुधारणा झालेली असावयाची व दुसरा पोटसमाज अज्ञानांत व पारतंत्र्यांत रुतलेला असावयाचा, असें आढळणार नाहीं. आपली सुधारणा न करितां केवळ वाडवडिलांची कीर्ति गाऊन समाजाची प्रगति होत नाहीं. समाज सर्व बाजूंनीं सुधरला आहे, आतां कांहीं सुधारणा व्हावयाची राहिली नाहीं, असें होणें केव्हांहि शक्य नाहीं. आपली सर्व कांहीं सुधारणा झाली असें आपण कधींहि समजतां कामा नये आणि सुधारण्याचे प्रयत्न सतत चालू ठेविले पाहिजेत. या सुधारणेचा मुख्य मार्ग म्हणजे व्यक्तीव्यक्तींतील कृत्रिम भेद व विषमता नाहींशी करणें, न्याय सर्वांना सारखा मिळण्याची व्यवस्था करणें, नीति—चालीरीती आणि सवयी उच्च प्रतीच्या असणें हा होय. प्रत्येक व्यक्तीला आपली शक्य तितकी सुधारणा करून समाजाचा एक महत्वाचा व उपयोगी घटक होण्याला समर्थ केलें पाहिजे. याचा अर्थ असा नव्हे कीं, सर्व माणसें सारखीं करावयाचीं. तसें होणें शक्य नाहीं. कारण प्रत्येकाची शक्ति व कर्तबगारी वेगवेगळी असते. याचा अर्थ इतकाच कीं, प्रत्येक व्यक्तीला आत्मोन्नति करण्यास सारखी संधि द्यावयाची; अशा संधीच्या अभावीं त्याची अवनति होऊं द्यावयाची नाहीं. समाज मंद गतीनें पुढें चाललेला आहे, प्रत्येक व्यक्तीला आपलें व समाजासंबंधींचें कर्तव्य करण्याला अधिकाधिक संधि मिळत आहे. आणि याच गोष्टींची दिवसेंदिवस सुधारणा होऊन समाजाला हें आदर्शभूत ध्येय गाठता आलें पाहिजे. ध्येय ठरलें म्हणजे तें ताबडतोब गांठलें जातेंच अशांतला भाग नाहीं. पण ध्येय ठरल्याशिवाय तें गांठण्याचे मार्ग कायम होत नाहींत हें विसरतां कामा नये.

## प्रकरण १ लें.

# समाजसेवेची आवश्यकता.

The one Divine Spirit is the same spirit, who dwells in each one of us. Do you see that beggar there? He is God manifest in the flesh: he is the same spirit essentially that is in you and me and God. When you love him, you love God, and when you serve him, you serve God, and through serving God in him, you realise not only God in him, but God in your own self. For the God in you is Adviatam, the undivided, the one without the second. God is in him, God is in you.

SWAMI VIVEKANAND.

आपल्याप्रमाणेंच आपल्या शेजाऱ्यावरहि आपण प्रेम करावें असें सर्व धर्मांत सांगितलेलें आहे. आपल्या धर्मांचेंहि असेंच मत आहे इतकेंच नव्हे तर प्रत्येक मनुष्यमात्रावर प्रेम करावें अशीहि आपल्या धर्माची आज्ञा आहे. पण एखादा स्वार्थाला वाहिलेला मनुष्य असें म्हणेल कीं मला शेजाऱ्यावर प्रेम करण्याचें कारण काय? मला स्वार्थ समजतो. स्वतःवर प्रेम केल्यानें फायदा होतो ही गोष्ट मला पटते आणि दुसऱ्यावर प्रेम केल्यानें माझा स्वार्थ साधेल असें मला वाटत नाहीं; याकरितां दुसऱ्यावर प्रेम करण्याचें मला कारण नाहीं व तशी माझी इच्छाहि नाहीं. पण शिरोभागीं दिलेल्या स्वामी विवेकानंद यांच्या लेखांतील उताऱ्यांत स्वामींनीं स्वार्थी माणसाच्या शब्दांतच याला उत्तर दिलें आहे. तें असें कीं ज्या परमेश्वराचा अंश प्रत्येक माणसांत आहे त्या परमेश्वराचा अंश दारांत आलेल्या भिकाऱ्यांतहि आहे. तो भिकारी बाह्यात्कारीं भिकारी असा दिसला तरी तो अंतर्यामीं परमेश्वराचा अंशच आहे. त्याच्यांतील, माझ्यांतील आणि परमेश्वरांतील ईश्वरी स्वरूप एकच आहे. करितां भिकाऱ्यावर प्रेम करणें म्हणजेच परमेश्वरावर प्रेम करण्यासारखें आहे आणि भिकाऱ्याची सेवा करणें म्हणजेच परमेश्वराची सेवा करण्यासारखें आहे. त्याच्यांतील परमेश्वराची सेवा करणें म्हणजे त्याच्यांतहि परमेश्वर

आहे हें ओळखणें, इतकेंच नव्हे तर आपल्या स्वतांतहि ईश्वर आहे याची ओळख पटणें होय. कारण तुझ्यांतील देव अद्वैत आहे, तो अखंड आहे, त्या एका देवाशिवाय दुसरा देव नाहीं, तो त्याच्यांतहि आहे व तो तुझ्यांतहि आहे. सारांश, ' जनसेवा ही ईश्वरसेवा ' हेंच तत्व शेवटीं खरें ठरतें. आणि या सर्वमान्य तत्वाचा एकदां स्वीकार केला कीं आपलें कुटुंब, आपली जात आणि आपला समाज यांच्यावरच नव्हे तर सर्व मानवजातीवर प्रेम करणें व सर्वांची सेवा करणें हें आपलें कर्तव्य ठरतें.

## समाजाचें ऋण.

स्वार्थी दृष्टि टाकून मनुष्य जर दूरवर विचार करील तर त्याला आढळून येईल कीं, या जगांत तो अनेकांचा अनेक प्रकारें देणेकरी आहे. ज्या कुळांत त्याचा जन्म झालेला असतो त्या कुळांतील लोकांनीं अनेक तऱ्हेनें स्वार्थत्याग करून मिळवलेली संस्कृति, संपत्ति व दुसऱ्या अनेक गोष्टी आपल्या कुळाचा चालक म्हणून त्याच्या स्वाधीन केलेल्या असतात आणि त्यांची साहाजिकच अशी इच्छा असते कीं पुढें त्यानेंहि आपल्याप्रमाणेंच स्वार्थत्याग करून आपली परंपरा राखावी. ज्या वाडवडिलांनीं आपल्यावर इतके अगणित उपकार केलेले असतात त्यांपैकीं कांहींच्या उपकारांची थोडीबहुत फेड करण्याला ते जिवंत असल्यास आपल्याला कदाचित् संधि मिळते. परंतु त्यांपैकीं कांहीं आपला जन्म होण्यापूर्वीच दिवंगत झालेले असतात. जे शिल्लक राहिलेले असतात त्यांनीं आपल्यावर केलेल्या उपकारांचें महत्व जाणून परतफेड करीपर्यंत बहुधा तेहि जिवंत राहात नाहींत. म्हणजे खरें पाहूं गेल्यास ज्यांनीं आपल्यावर उपकार केलेले असतात त्यांचे उपकार फेडण्याला आपल्याला प्रत्यक्ष संधि मिळत नाहीं. आणि वस्तुतः आपल्यावर उपकार करणारे लोक ते परतफेडीच्या आशेनें करीतहि नाहींत. अशा परिस्थितींत या उपकारांची फेड आपण कशी करावी हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. पण याचें उत्तर फारसें अवघड नाहीं. त्याचें सरळ उत्तर इतकेंच आहे कीं, ज्याप्रमाणें आपल्या उपकाराचा मोबदला प्रत्यक्ष मिळेल किंवा नाहीं यासंबंधीं विचार न करितां अनेक लोकांनीं आपल्यावर उपकार करून ठेविले त्याप्रमाणें आपणहि करणें क्रमप्राप्तच आहे.

ज्या कुळांत आपण जन्मलों त्या कुळाचे वंशज म्हणून जशीं त्या कुळासंबंधीं आपलीं कांहीं कर्तव्यें असतात त्याचप्रमाणें ज्या जातीचे किंवा पोटसमाजाचे

आपण घटक असूं त्याचेहि आपल्यावर अनेक तऱ्हेने उपकार झालेले असतात आणि त्या उपकारांची फेड करणें आपलें कर्तव्य असतें. पण कुळ, जात किंवा पोटसमाज यांच्या विषयींचीं आपलीं कर्तव्यें आपण करीत असतां एक गोष्ट आपल्याला सदैव ध्यानांत बाळगावी लागते. ती ही कीं, आपलें कुळ, जात किंवा पोटसमाज हीं एका मोठ्या समाजाचे अत्यंत सूक्ष्म भेद आहेत आणि म्हणून त्यांची सेवा करण्याकरितां जें जें काय आपण करूं तें सर्व समाजाच्या प्रगतीच्या आड येतां कामा नये. वस्तुतः आपल्या लहान समाजाकरितां ज्या ज्या गोष्टी आपण करूं त्या सर्व समाजाच्या हिताच्या असावयाला पाहिजेत. पण त्या कदाचित् तशा नसल्या तथापि त्यांच्यामुळें सर्व समाजाचें अहित होतां कामा नये. जातिविषयक चळवळी करितांना पुष्कळदां असें होतें कीं, आपली जात हेंच सारें जग असा कोता विचार करून सर्व समाजाच्या अस्तित्वाचें पुष्कळांना भान राहात नाहीं. पण तें भान आपण जाऊ देतां कामा नये. आपली चळवळ जर सर्व समाजाच्या ध्येयाला अनुसरून नसेल, ती सर्व समाजाच्या हिताला पोषक होणारी नसेल तर ती आपल्या जातीच्याहि हिताची नाहीं हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. आपली जात किंवा पोटसमाज हीं आपल्याला मोठीं दिसलीं तथापि तीं खरोखरीच एका मोठ्या समाजाचे लहानसे घटक आहेत आणि ज्याप्रमाणें पायाला वेदना होतांच क्षणार्धांत त्या मेंदूपर्यंत जाऊन पोंहचतात त्याप्रमाणें मोठ्या समाजावर होणारे बरेवाईट परिणाम त्या त्या घटकांवर होणें अपरिहार्य असतें. तसेंच लहान लहान समाजाचे बरेवाईट परिणाम थोड्याफार प्रमाणांत मोठ्या समाजावरहि होतात हें मागें एका ठिकाणीं आपण पाहिलेंच आहे. करितां लहान लहान समाजांत होणाऱ्या चळवळी किंवा समाजप्रगतीचे प्रयत्न सर्व समाजाची वाढ खुंटविणार नाहींत किंवा सर्व समाजाच्या स्वास्थ्याचा भंग करणार नाहींत याविषयीं खबरदारी घेणें हें समाजप्रगतीची आस्था बाळगणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य आहे.

कुळानें, जातीनें किंवा पोटसमाजानें व्यक्तीवर केलेल्या उपकारांपेक्षां सर्व समाजानें केलेले उपकार कोणत्याहि तऱ्हेनें कमी नसतात. इतकेंच नव्हे तर व्यक्तीची सर्व बाजूंनीं प्रगति होण्यास सर्व समाजच मुख्यतः कारणीभूत होतो, हें अल्प विचाराअन्तीं आपल्याला दिसून येईल. याला एकच उदाहरण पुरे होईल. आपली भाषा कशी उत्पन्न झाली तिच्यांत कसकसे बदल होत आले, तिला आजची स्थिती कशी आली, व हें भाषा सुधारण्याचें कार्य नकळत कां

होईना किती वर्षें चाललें आहे याचा इतिहास जर आपण पाहिला तर आपल्याला असें दिसून येईल कीं भाषेला आजचें स्वरूप येण्यास कैक पिढ्यांचे परिश्रम कारणीभूत झाले आहेत. अशा रीतीनें शेंकडों वर्षें श्रम करून व भाषेंत वेळोवेळीं फेरफार करून आजची व्याकरणशुद्ध अभिजात भाषा तयार झाली व बिनमेहनतीनें तिचा फायदा आपल्याला मिळूं लागला. तसेंच व्यक्तीचें वैयक्तिक स्वरूप कायम राहावें म्हणून तिला जे हक्क दिले आहेत, व्यक्तीचें व व्यक्तीच्या स्थावर व जंगम मिळकतीचें संरक्षण व्हावें, चोराचिलटांपासून कोणाला कोणत्याही तऱ्हेनें उपद्रव पोहचूं नये म्हणून समाजानें जे कायदेकानू केले आहेत व त्यांची योग्य प्रकारें अम्मलबजावणी व्हावी म्हणून जी व्यवस्था केली आहे तिचा इतिहास आपण पाहिला तर हीच गोष्ट अधिक स्पष्टतेनें आपल्याला दिसेल. सारांश, एक ना अनेक तऱ्हेनें समाजानें आपल्यावर उपकार केलेले आहेत आणि हें परोपकाराचें कृत्य समाजस्थापनेपासून आजतागायत अखंड चालू आहे, इतकेंच नव्हे तर वेळोवेळीं त्यांत तोडजोड होऊन परिस्थित्यनुरूप त्यांत सुधारणा होत आहे. म्हणून या सर्व गोष्टींचा विचार करून समाजांतील प्रत्येक घटकानें—व्यक्तीनें—स्वप्रयत्नानें समाजाच्या संपत्तींत कांहीं तरी भर घालण्याचा निश्चय केला पाहिजे. समाजानें आयत्या तयार केलेल्या गोष्टींचा फायदा मात्र घ्यावयाचा, त्यांत काडीभरहि भर घालण्याचा प्रयत्नसुद्धां करावयाचा नाहीं, ही वृत्ति अमानुष होय. असा मनुष्य समाजभक्षक—समाजाचा शत्रु समजावा लागेल.

देवघेवीचा व्यवहार समाजांत नेहमीं चाललेला आपण पाहतो. कारण देवघेवीशिवाय व्यवहार चालणें शक्य नसतें. कांहींना पैशाची जरूरी लागते आणि तो कर्जाऊ देणार कांहीं लोक असतात. या कर्जाला कांहीं व्याज असतें आणि कर्जाची फेड करण्यास कांहीं मुदतहि असते. व ह्याबद्दल ऋणको धनकोला करार लिहून देतो. पण सर्वच ऋणको कराराप्रमाणें कर्जाची फेड करणारे असतात असें नाहीं. कांहीं कर्जफेडीची मुदत वाढवून घेतात, कांहीं आपल्याला कर्जाचें स्मरण आहे हें दाखविण्याकरितां नुसतें व्याज देतात आणि कांहीं फेडीची टाळाटाळ करीत असल्यामुळें त्याविषयीं समाजानें केलेल्या कायद्याचा फायदा घेऊन कोर्टाच्या साहाय्यानें त्याची फेड करून घ्यावी लागते. इतकें करूनहि आपण कर्ज फेडण्यास असमर्थ असल्याचें कांहीं लोक सांगतात. पैसे नाहींत तर नाहींत, पण अशांची निदान अब्रू तरी साफ जावी म्हणून त्यांना तुरुंगांत बसवून त्यांची

पोटगी आपण भरणें हा या बाबतींतला शेवटचा उपाय असतो. आपल्यावर इतरांनीं केलेल्या उपकारांचें-ऋणाचेंहि असेंच आहे. ह्याबद्दल कोणत्याहि सावकाराला आपण रोखा लिहून दिलेला नसतो ही गोष्ट खरी आहे, पण ह्यामुळेंच या बिनरोख्याचा कर्जाची नैतिक जबाबदारी अधिक असते हें कोणालाहि सांगावयास नको. देणें नियमित देण्यानें देणाराचा प्रामाणिकपणा दिसून येतो आणि आपली कर्जफेड करण्याची जबाबदारी त्याला कळते हें ह्यापासून सिद्ध होतें. पण आपल्या पतीवर इतक्या अल्प प्रयत्नांनीं-आपण मागितल्याशिवाय आपली गरज पाहून-मिळालेल्या कर्जाचें स्मरण ठेवून आपल्या सवडीप्रमाणें जर आपण त्याची फेड केली नाहीं व आपली पत राखिली नाहीं तर वरील कर्जदाराप्रमाणें आपली पत जाईल व प्रसंगीं कोणी आपल्या उपयोगीं पडणार नाहीं. शिवाय समाजात जर सर्वच लोक कर्ज घेऊं लागले व त्याची फेड कोणी करीनासें झालें तर अशा ऋणकोंची संख्या अपरिमित वाढेल, धनको नाहींसे होतील आणि सारेच कर्जबाजारी झाल्यामुळें शेवटीं समाजाचा ऱ्हास होऊं लागेल. उपकारफेडीची गोष्ट अशीच आहे. सर्वच लोक जर आपापलेंच पाहूं लागले, दुसऱ्याला मदत करणें अहिताचें अतएव त्याज्य मानूं लागले तर समाज चालूं शकणार नाहीं. ज्यांना मदतीची अवश्यकता आहे त्यांना ती प्रसंगीं न मिळाल्यामुळें त्यांचे कल्पनातीत हाल होतील. आणि केव्हां ना केव्हां प्रत्येक व्यक्तीला कोणत्या ना कोणत्या प्रकारें दुसऱ्याच्या मदतीची जरूर लागावी अशीच समाजरचना असल्यामुळें आज आपल्याला दुसऱ्याच्या मदतीची जरूरी नाहीं असें कांहींना अज्ञानामुळें वाटत असेल तथापि तसें कदापि चालावयाचें नाहीं, हें विसरतां कामा नये.

पण याचा अर्थ असा नाहीं कीं सारेच ऋणको समाजांतून नाहींसे करितां येतील. तसे थोडे लोक समाजांत राहावयाचेच. त्याला कांहीं उपाय नाहीं. पण अशांची संख्या अपरिमित वाढून समाजांत दिवाळखोरांचें साम्राज्य होणार नाहीं, उलट धनकोंचेंच संख्याधिक्य राहील हें पाहाणें समाजहिताच्या दृष्टीनें महत्वाचें आहे. स्वार्थाविषयीं उदासीन राहून केवळ परार्थांत आयुष्य वेचणारे कांहीं महात्मे असतात आणि तेच समाजांतले खरे धनको-समाजाचे आधारस्तंभ होत. उलटपक्षीं परहिताविषयीं बेफिकीर राहून सदोदित स्वार्थ पाहणारे लोक समाजाचे ऋणको होत. पहिले समाजाला भूषणभूत असतात तर दुसरे समाजाला भारभूत असतात. पण याशिवाय समाजांत एक तिसरा

वर्ग असतो. आणि हा वर्ग बहुसंख्याक असल्यामुळें समाजाची वाढ होणें किंवा वाढ खुंटणें या वर्गाच्या एकंदर वागणुकीवर अवलंबून असत. समाजांतील या सामान्य लोकांचा परार्थाकडे जर अधिक ओढा असला, निदान स्वार्थाबरोबरच परार्थ साधण्याकडे त्याचें लक्ष असलें तर समाज कायम टिकून त्याची दिवसेंदिवस प्रगति होते. पण त्याचें लक्ष स्वार्थाकडे जर अधिक असलें आणि परार्थाकडे—सर्व समाजाच्या हिताकडे ते पाहिनातसे झाले तर समाजाची हळू हळू,वरवर पाहणाराच्या लक्षांत न येण्याइतक्या मंद गतीनें, परागति होते.

**समाजाच्या उत्क्रांतीच्या पायऱ्या.**

अत्यंत रानटी समाज हा मृगयावृत्ति समाज असतो. ह्मणजे या समाजांतील सर्व व्यक्ति रानांतील पशुपक्षी किंवा समुद्रांतील जलचर प्राणी यांच्यावर आपली उपजीविका करितात. याच्या पुढची पायरी म्हणजे गोपालवृत्ति समाज होय. या स्थितींत मनुष्य रानटी जनावरांना आपल्या कह्यांत आणूं लागतो व गाईम्हशींचे किंवा शेळ्यामेंढ्यांचे कळप बाळगून त्यावर आपली उपजीविका करूं लागतो. या दोन्हीं अवस्थांत माणसांना घरेंदारें करण्याची कल्पना नसते. शिकार करणाऱ्या माणसाला शिकार मिळेल तिकडे भटकावें लागतें व गुरेंढोरें बाळगणाऱ्या माणसाला सुद्धां एकच ठिकाण धरून राहतां येत नाहीं. कारण गवतचारा मुबलक आहे तोंपर्यंत त्याला एका ठिकाणीं राहतां येतें, पण तें संपलें म्हणजे तें मिळेल त्या ठिकाणीं त्याला स्थलांतर करावें लागतें. याकरितां या स्थितींतील समाजाची गणना भटकणाऱ्या समाजांत करितात. समाजाची यापुढील पायरी म्हणजे कृषिवृत्ति होय. माणसाला शिकार किंवा दूधदुभतें हीं दोन उपजीविकेचीं साधनें अपुरीं पडूं लागल्यामुळें तो दुसऱ्या साधनांच्या प्रयत्नाला लागतो व मग त्याला शेतीचा शोध लागतो आणि माणसें शेती करून धान्य पिकवूं लागतात. समाज कृषिवृत्ति झाला म्हणजे त्याला स्थायिक व्हावें लागतें. कारण पूर्वीच्या दोन अवस्थांप्रमाणें तो वेळोवेळीं स्थलांतर करूं लागल्यास त्याला जमिनीचें कायमचें उत्पन्न मिळणें शक्य नाहीं. समाज कृषिवृत्ति झाला आणि त्याचें राहण्याचें ठिकाण कायम झालें कीं त्याला राष्ट्राचें स्वरूप येऊं लागलें व त्याला पोषक अशा राष्ट्रीय कल्पना उत्पन्न होऊं शकतात. यापुढील पायरी म्हणजे उद्यमवृत्ति होय. या स्थितींत माणसाच्या गरजांची व वासनांची अतोनात वाढ होते आणि या गरजा व वासना भागविण्यासाठीं हजारों उद्योगधंदे अस्तित्वांत येतात, समाज बहुविध

बनतो आणि श्रमविभागाचें तत्व विस्तृत प्रमाणांत अस्तित्वांत येतें. हीच समाजाची शेवटची व उच्चतम अवस्था होय. या समाजाच्या स्थित्यंतराच्या वेगवेगळया पायऱ्या असल्या तरी याचा अर्थ असा नाहीं कीं समाज दुसऱ्या पायरीवर गेला कीं पहिली अवस्था तो कायमची सोडून देतो. तसें केव्हांहि होत नाहीं. उलट पक्षीं तो उद्यमवृत्ति झाला तरी कृषिवृत्ति किंवा गोपालवृत्ति अजीबात सोडीत नाहीं. थोड्या फार प्रमाणांत तो शेती करितो, गुरेंढोरेंहि बाळगतो आणि प्रसंगविशेषीं शिकारीलाहि जातो. तसेंच प्रत्येक समाज या प्रत्येक अवस्थेंतून जातोच असें नाहीं. विशिष्ट परिस्थितींत व विशिष्ट कारणांनीं एकादा समाज यांतील एकादी पायरी टाकून एकदम वरच्या पायरीवर जाऊं शकतो. पण समाजाचा विकास सामान्यतः सदरील क्रमानें होतो असें म्हणावयास हरकत नाहीं.

माणसाची प्रवृत्ति निसर्गतःच समाज करून राहाण्याकडे असते आणि इतस्ततः भटकणारे लहान लहान रानटी समाज वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें पायरीपायरीनें सुधरत जाऊन त्यांचें शेवटीं प्रबळ राष्ट्र बनण्याला हीच नैसर्गिक प्रवृत्ति मुख्यतः कारणीभूत होते. पण आपण समाज करून राहावें असें तरी माणसांना कां वाटावें ? आपल्याला दुसऱ्याची गरज लागणार नाहीं अशा भ्रामक समजुतीनें जशीं कांहीं माणसें समाजांत बेपरवाईनें वागतात त्याप्रमाणेंच आपल्याला समाजाची गरज नाहीं असें मानून समाजापासून लोक कां दूर राहात नाहींत ? पण या बाबतींत आश्चर्याची गोष्ट अशी कीं, क्वचित् एखादा मनुष्य समाज सोडून गिरिकंदरांत राहावयास जातो पण तेथें सुद्धां त्याच्यानें एकटें राहवत नाहीं. कोणाची ना कोणाची—निदान कुत्र्यामांजराची किंवा पशुपक्ष्यांची तरी सोबत लागतेच. इतका तो संगतिप्रिय आहे. याचें कारण असें कीं समाज करून राहाण्यांत माणूस स्वार्थ साधतो. दुसरें तिसरें कारण त्याला कांहीं नसतें. एकेकटा राहाण्यापेक्षां समाजाच्या आधारानें—माणसांच्या सहवासांत राहिल्यास सुखाचीं साधनें सहज साध्य होतील ही स्वार्थबुद्धि याच्या मुळाशीं असते. कारण मनुष्याला लागणाऱ्या साऱ्याच वस्तु त्याला स्वतः करितां येणें शक्य नसतें. त्याला लागणारी वस्तु एक अमेरिकेंतून येते तर दुसरी जर्मनींत तयार झालेली असते, तिसरीचें मूल स्थान जपान असतें, तर चौथी इंग्लंडशिवाय दुसरीकडे चांगलीशी मिळत नाहीं. सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्याला शेंकडो वस्तूंची गरज लागते आणि ह्या शेंकडों वस्तूंपैकीं कांहीं स्वदेशांत

तयार होणाऱ्या असल्या तरी त्यांना लागणारा कच्चा माल शेंकडों ठिकाणांहून येतो. स्पष्टीकरणाकरितां आपण सांजसकाळ खात असलेल्या भाकरीचेंच उदाहरण घेऊं. गहूं दळण्याकरितां आपण गिरणींत पाठवितों. ती गिरण चालविण्यास लागणारी विद्युच्छक्ति तयार करण्यास शेंकडों माणसें लागतात. गिरणीला लागणारीं यंत्रें अनेक देशांतून व अनेक कारखान्यांत तयार झालेलीं असतात. गव्हाचा एक दाणासुद्धां मुंबईला तयार होत नाहीं. बाहेरगांवांहून गहूं मुंबईस येतो. तो तयार झालेल्या ठिकाणापासून भाकरी तयार करणाऱ्या माणसाला विकला जाईपर्यंत त्याला शेंकडों मध्यस्थ लागतात, शेंकडों वाहनें लागतात, त्याची उचलठेव करण्याला शेंकडो मजुरांची मदत लागते. तो रेल्वेंतून येत असल्यामुळें रेल्वेचा रस्ता तयार करावयास हजारों लोकांचें साहाय्य झालेलें असतें. रेल्वेचीं यंत्रें एका ठिकाणाहून आलेलीं असतात तर कोळसा दुसऱ्या देशांतून आलेला असतो. याशिवाय गहूं पिकून तयार होईपर्यंतहि कैक माणसांची मदत लागते. गव्हाचें पेरण्यालायक बियाणें जमवून ठेवावें लागतें. शेताची मशागत करावी लागते. त्याला अनेक लोक व अनेक प्रकारचीं आऊतें लागतात. पिकाची कापणी होईपर्यंत अनेकदां त्यांतलें रान उपटन काढावें लागतें. शेत तयार झाल्यावर सुद्धां गहूं पोत्यांत पडेपर्यंत त्याच्यावर अनेक प्रकारचे संस्कार होतात. आपल्याला एका वेळेला लागणारी एखादी भाकर अशा प्रकारें असंख्य लोकांनीं साहाय्य केल्यानंतर तयार झालेली असते. शिवाय कांहीं वस्तूंना ठराविक ठिकाणची परिस्थिति विशेष अनुकूल असते. त्यामुळें ती वस्तु तेथें तयार करणें विशेष सोपें जातें. ह्मणून अशा वस्तूंची अदलाबदल करणें अधिक सोईचें असतें. ज्या वस्तु आपल्याला तयार करितां येण्यासारख्या असतात त्या आपण तयार करून दुसऱ्या देशांतील लोकांना द्यावयाच्या व त्याऐवजीं दुसऱ्या देशांतील लोकांनीं तयार केलेल्या वस्तु आपण घ्यावयाच्या. सारांश, ज्या गोष्टींत आपल्याला दुसऱ्या लोकांना मदत करितां येईल त्या गोष्टींत आपण दुसऱ्या लोकांना मदत करावयाची व आपल्याला ज्या गोष्टी दुसऱ्या देशांतून हव्या असतील त्या त्यांच्याकडून घ्यावयाच्या या अदला बदलीच्या —सहकार्याच्या—तत्वावर समाजाचा डोलारा अवलंबून असतो. एतावता दुसऱ्या लोकांच्या मदतीशिवाय आपलें चालावयाचें नाहीं, आपलें जीवित कष्टमय होईल व शत्रूला तोंड देणें आपल्या एकट्याला शक्य नसल्यामुळें आपण केव्हां

संकटांत सांपडूं याचा नेम नाहीं. याकरितां संघ करून राहणें माणसाला अत्यावश्य आहे. पण संघ हवा तर दुसऱ्याला मदतहि करावी लागते. दुसऱ्याला दिल्याशिवाय आपल्याला मिळत नाहीं. या विश्वांतील प्रत्येक गोष्टीला हें सहकार्याचें तत्व लागू आहे, प्रत्येक वस्तु सहकार्याच्या तत्वाप्रमाणें चालली आहे, असें आपल्याला दिसून येईल. मात्र या सर्वच गोष्टी आपण जाणून करितों असें नाहीं; कित्येकदां न जाणून निसर्गसिद्ध नियमांप्रमाणें सहजगत्या त्या आपल्या हातून घडतात. तर मग ह्या साऱ्याच गोष्टी आपण जाणून केल्या तर दुधांत साखर पडेल हें सांगावयास नकोच.

## संस्कृति व व्यक्तीचें परावलंबन.

मनुष्य जों जों रानटी स्थितींत असेल तों तों त्याची राहाणी साधी, कमी खर्चाची व त्याच्या गरजा थोड्या असतात. वाट मिळेल तिकडे सैरावरा भटकणाऱ्या व शिकारीवर उपजीविका करणाऱ्या समाजाच्या गरजा अगदींच कमी असतात, इतक्या कीं त्या त्याच्या त्यालाच भागवितां येतात; यापेक्षां समाज जरा अधिक सुधारला कीं त्याच्या गरजा अधिक वाढतात. आणि तो थोडथोडा पराधीन होऊं लागतो. गोपालवृत्ति समाजहि फारसा परावलंबी नसतो. पण समाज शेतीभाती करून उपजीविका करूं लागला कीं समाजाच्या परस्वाधीन स्थितीला खरी सुरवात होते आणि समाज उद्यमवृत्ति झाला, समाजांतील लहानमोठीं कामें श्रमविभागाच्या तत्त्वावर होऊं लागलीं कीं समाजाला अनेक गोष्टींसाठीं सर्वस्वीं दुसऱ्यावर अवलंबून रहावें लागतें. ही परतंत्रता आज इतक्या थरास जाऊन पोंचली आहे कीं जगांतील सर्व राष्ट्रें कोणत्या न कोणत्या वस्तूंसाठीं परस्परांवर अवलंबून आहेत. यांपैकीं एखाद्या राष्ट्रावर दुर्दैवानें एकादी आपत्ति आली—गेल्या महायुद्धामुळें अनेक राष्ट्रांवर अशी आपत्ति आलेली आहे आणि युद्धाचा शेवट झाल्यास कित्येक वर्षें झालीं तरी त्याचे अनिष्ट परिणाम अजून नाहींसे होत नाहींत—तर तिचा परिणाम दुसऱ्या राष्ट्रावर होतो, दुसऱ्याचा तिसऱ्या राष्ट्रावर होतो आणि शेवटीं या सर्व राष्ट्रांची स्थिति सुधारल्याशिवाय कोठेंच शांतता होऊं शकत नाहीं, हें अनेक गोष्टींवरून आपल्या दृष्टोत्पत्तीस येईल. समाज काय कीं व्यक्ति काय जों जों अधिक परतंत्र होत जाते तों तों तिला दुसऱ्याची अधिकाधिक गरज लागते आणि ही गरज वाढत गेली कीं समाजसेवेचें क्षेत्रहि अधिकाधिक रुंदावत जातें हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

या राहणीच्या बाबतींत दुसरी एक महत्वाची गोष्ट अशी आहे कीं राहाणी जों जों सुधारत जाते तों तों तींत कृत्रिमपणा अधिक येतो. समाजाच्या प्रथमावस्थेंत मनुष्य जेमतेम उन्हापावसापासून आपल्याला फारसा उपद्रव होऊं नये अशा तऱ्हेची झाडांच्या फांद्यांची झोपडी बांधितो किंवा एखाद्या मोठ्या वृक्षाच्या छायेखालींच आ ली तात्पुरती सोय करितो; पण समाजाच्या प्रौढावस्थेंत मनुष्य आपल्या मतें सुधारलेलें पण सृष्टिनियमाच्या दृष्टीनें इतकें घाणेरडें घर बांधतो कीं त्यांत सूर्यकिरणांचा प्रवेश होऊं शकत नाहीं, उघड्या हवेला आंत येण्याला मार्ग राहात नाहीं आणि उजेडाच्या अभावीं दिवसा विजेचे दिवे लावावे लागतात. या परिस्थितीचा माणसावर असा अनिष्ट परिणाम होतो कीं तो जरा उन्हांत गेला कीं लगेच कासावीस होतो, जरा मोकळी हवा लागली तर त्याला सर्दीपडसें होतें आणि एखादे वेळीं चुकून जरा पावसांत भिजला तर लगेच त्याला न्यूमोनिया होतो. उलटपक्षीं, रानटी स्थितींतील माणसाला या सर्व गोष्टींचा सराव असतो त्यामुळें वरील गोष्टींपासून त्याच्या शरिराला अपाय होण्याऐवजीं तें अधिक बळकट होतें, व कोणत्याहि रोगाला सहसा दाद देत नाहीं. कपडालत्त्याच्या बाबतींतहि असेंच स्थित्यंतर झालें आहे. कपडे घालण्याचा मूळ हेतु थंडीवाऱ्यापासून शरिराचें रक्षण करणें हाच आहे. पण कपड्यांची संख्या, तऱ्हा व पद्धत इतकी वाढली आहे कीं डोक्यापासून पायापर्यंत वैद्यकीय दृष्ट्या मुळींच विचार न करितां अनेक प्रकारचे कपडे वापरावे लागतात, इतकेंच नव्हे तर एखाद्या परक्या माणसापुढें उघडें जाणें असभ्यपणाचें मानण्यांत येतें उद्योगधंद्याच्या बाबतींतहि अवनति झाली आहे. श्रम करितांना मनाची करमणूक व्हावी व शरिराचें आरोग्य बिघडूं नये हें उद्योगधंद्याच्या बाबतींतील ध्येय नाहींसें होऊन आज कैक लोकांना केवळ पोटासाठीं भूगर्भांत हजारों फूट खालीं जाऊन जेथें हवा नाहीं, सूर्यप्रकाश नाहीं व पुरेसा उजेड नाहीं अशा भयंकर परिस्थितींत, मनाला अतिशय कंटाळवाणें, केवळ निरुपाय म्हणून काम करावें लागतें. खाद्यपेयादि इतर बाबतींतहि बदल झालेला आहे. आणि त्यामुळें एकंदर राहाणी अगदीं दिखाऊ झाली आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं रानटी समाजांतील माणसाला रोगाचा प्रतिकार करण्याच्या कामीं निसर्गाची जशी वेळोवेळीं मदत होत होती तशी मदत सुधारलेल्या समाजांतील माणसांना न होतां उलट पदोपदीं निसर्गाचे नियम मोडल्याबद्दल रोगांच्या रूपानें शिक्षा होऊं लागली आहे. मनुष्य कोणत्या

[stamp]

भयंकर रोगानें केव्हां आजारी पडेल याचा नियम नाहींसा झाला आहे. निसर्गाच्या रोषामुळें मनुष्य इतका परस्वाधीन होतो कीं त्याला आप्तेष्टांकडून योग्य तऱ्हेची व योग्य वेळीं मदत न मिळाल्यास प्रसंगीं त्याच्या जिवावर बेततें. यामुळें प्रत्येक व्यक्तीला समाजसेवा करणें व आपली सेवा करून घेणें इच्छा नसतांहि भाग पडतें आणि ही परिस्थिति दिवसेंदिवस सुधारण्याएवजीं अधिक बिघडत आहे व त्या प्रमाणांत समाजसेवेचें कार्यहि झपाट्यानें वाढूं लागलें आहे.

व्यक्तीच्या हातून चुकी झाल्यामुळें जशीं व्यक्तीवर संकटें येतात त्याचप्रमाणें समाजाकडून चुक्या झाल्यास—आणि त्या नेहमीं व्हावयाच्याच—त्याचा परिणाम साऱ्या समाजाला भोगावा लागतो. समाजाच्या घटनेंत दोष उत्पन्न झाल्यास त्यापासून अनेक प्रकारचे रोग व व्यसनें उत्पन्न होतात. कंगालपणा, बेकारी, भिक्षेकऱ्यांची अपरिमित वाढ, वेश्याव्यवसाय व दुसऱ्या अनेक प्रकारचीं व्यसनें व दोष समाजरचनेंतील दोषांमुळेंच उत्पन्न झालेले असतात. कधीं कधीं रोगाच्या मोठ्या साथी येतात आणि त्यांचा वेळींच प्रतिकार न झाल्यास त्यामुळें साऱ्या समाजाचा नाश होण्याचा संभव असतो. या रोगांचें व उपरिनिर्दिष्ट व्यसनें व दोष यांचें निर्मूलन करणें एका व्यक्तीच्या हातीं नसतें. साथी व व्यसनें नाहींशीं करण्यास सर्व समाजानें—निदान समाजांतील बहुतेक व्यक्तींनीं प्रयत्न करावे लागतात. सर्व समाजाला ग्रासूं पहाणाऱ्या व्यसनांचा व साथींचा नाश समाजांतील कांहीं व्यक्तींनीं केलेल्या तुटक तुटक प्रयत्नांनीं होऊं शकत नाहीं. त्याकरितां समाजसेवकांचे संघटित प्रयत्न—समाजसेवा-संघ अस्तित्वांत यावे लागतात आणि इतकें करावें तेव्हांच या साथी व व्यसनें कायमचीं नाहींशीं झालीं नाहींत तरी कालांतरानें व प्रयत्नाप्रमाणें पूर्ण आटोक्यांत येतात.

पण याचा प्रतिकार करणें एका व्यक्तीच्या हातीं नाहीं ह्मणून या सर्व भानगडींपासून आपलें अंग काढून घ्यावें असें व्यक्ति मनांत आणील तर तें मात्र शक्य नाहीं. कारण कोणतेंहि संकट सर्व समाजावर आल्यास त्यापासून व्यक्ति सुटूं शकत नाहीं; सर्व समाजाबरोबर व्यक्तीचाहि नाश होण्याचा संभव असतो. ह्मणून निदान स्वतःचा बचाव करण्याकरितां तरी व्यक्तीला वर निर्दिष्ट केलेल्या गोष्टी नाहींशा करण्याच्या कामीं समाजाला साहाय्य करावें लागतें. शरीराचा एखादा अवयव निकामी झाल्यास सर्व शरीर व्यंग होतें. पण सर्व शरिराचाच नाश झाल्यास अवयवांचें अस्तित्वहि नाहींसें होतें, तद्वत् व्यक्ति नाश पावल्यानें समाज निर्बळ

होतो हें खरें, पण सर्व समाजाचाच नाश होण्याचा प्रसंग आला तर व्यक्ति जगूं शकत नाहीं. याप्रमाणेंच व्यक्ति समाज करून राहात असल्यामुळें आणि व्यक्तीचें व समाजाचें हिताहित एक असल्यामुळें समाजावर आलेल्या कोणत्याहि संकटापासून बचाव होण्याकरितां व्यक्तीनें समाजाला व समाजानें व्यक्तीला मदत करावयाची असते. तेव्हांच दोघेहि—समाज व व्यक्ति—जगूं शकतात.

## व्यक्तीवरील समाजाचे हक्क.

व्यक्ति समाजाचा एक घटक असल्यामुळें तिनें समाजाची सेवा करणें व समाजानें व्यक्तीचे वैयक्तिक हक्क संभाळणें हें उभयपक्षीं न्याय्य आहे. पण प्रत्येक व्यक्तीला आपलें कर्तव्य आहे असें वाटतेंच असें नाहीं आणि पुष्कळदां तें वाटलें तरी त्याप्रमाणें कृति घडत नाहीं हें आपण पाहतोंच; परंतु इतकें खरें कीं ज्यांना या आपल्या कर्तव्याची जाणीव नसते त्यांना ती करून देण्याचे सार्वत्रिक व आस्थापूर्वक प्रयत्न फारसे करण्यांत येत नाहींत. आणि असे प्रयत्न झाले तरी ते चिरस्थायी होत नाहींत. असे प्रसंग मुळींच येत नाहींत, असें मात्र नाहीं. राष्ट्राचें संरक्षण करण्याच्या वेळीं—लढाईच्या वेळीं अशा प्रकारची सार्वत्रिक चळवळ करण्यांत येते. अशा प्रसंगीं आपल्या राष्ट्राचें संरक्षण करणें आपलें कर्तव्य आहे असें सांगण्यांत येतें. इतकेंच नव्हे तर शत्रूशीं लढत असतांना रणभूमीवर मृत्यु येणें हें भूषणावह आहे, मोक्षाला जाण्याचें तें एक अत्युत्कृष्ट साधन आहे, असें राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीला कंठरवानें सांगण्यांत येतें. प्रत्यक्ष लढाई करण्यास किंवा कोणच्या ना कोणच्या तऱ्हेनें लढाईच्या कामीं उपयोगीं पडण्यास एकादी व्यक्ति या सामदामाच्या गोष्टी ऐकेनाशी झाली तर तिला सक्तीनें रणांगणावर नेण्यांत येतें. आणि हा रडतराऊ युद्धाच्या वेळीं शत्रूला तोंड देण्याऐवजीं रणभूमि सोडून पळूं लागल्यास प्रथम त्याच्यावरच शस्त्र धरण्यांत येतें. लढाईंत ज्यांना प्रत्यक्ष भाग घेतां येण्यासारखा नसतो त्यांना दारूगोळा तयार करणें, अन्न-सामग्री गोळा करणें, लढाईंत जखमी झालेल्यांची शुश्रूषा करणें वगैरेंसारखीं लढाईला अप्रत्यक्षपणें उपयोगी पडणारीं कामें देण्यांत येतात. आजपर्यंत युद्धांत स्त्रियांचा फारसा उपयोग होत नव्हता. परंतु आतां प्रत्यक्ष नसली तरी अप्रत्यक्ष रीतीनें स्त्रियांची युद्धांत पुष्कळच मदत होते आणि एरव्हीं शांततेच्या वेळीं पुरुषवर्ग मुख्यतः करित असलेलीं कामें युद्धाच्या वेळीं स्त्रियांकडेच संपविण्यांत येऊं लागलीं आहेत. आणि तीं त्यांच्याकडून चांगल्या प्रकारें होतात असा गेल्या महायुद्धांत

अनुभव झालेला आहे. सारांश, युद्धाच्या वेळीं देशांतील प्रत्येक व्यक्ति राष्ट्रकार्य ह्मणून तिच्याकडे देण्यांत आलेलें काम करित असते आणि कोणी कामचुकारूपणा केला तर सक्तीनें त्याच्याकडून काम करून घेण्यांत येतें. पण प्रत्येक व्यक्तींत शिरलेलें हें स्वदेशसंरक्षणाचें वारें अगदींच अल्पायुषी असतें, तें जेमतेम युद्ध संपेपर्यंत टिकतें न टिकतें. यानंतर सर्वत्र शांतता नांदूं लागते, पुनः स्वदेशाभिमानाच्या प्रतिक्रियेस सुरवात होते आणि परस्परांविषयींचीं सामान्य कर्तव्येंहि माणसें विसरूं लागतात. प्रत्येक मनुष्य सामान्यतः आपल्या पोटाच्या मागें लागतो आणि पोटासाठीं धडपड करितांना दुसऱ्याच्या सामान्य हक्कांची पायमल्ली करण्यास तो मागें पुढें पहात नाहीं. यामुळें समाजसेवेची व्याख्या अतिशय संकुचित होते, इतकी कीं स्वतःचें कर्तव्य नीटपणें करणारा मनुष्यहि स्थूलमानानें समाजसेवक मानला जातो. कारण आपल्या स्वतःपुरतें व आपल्या कुटुंबापुरतेंहि न पाहाणारे पुष्कळ लोक असतात. स्वतःच्या बाहेर थोडेंबहुत पाहाणारांना अधिक महत्व येतें. जे स्वतःकडे दुर्लक्ष करून समाजाचें हित पाहूं लागतात त्यांना तर विशेषच महत्व येतें व त्यांचा सर्वत्र बोलबाला होऊं लागतो. पण वस्तुतः आपल्या कर्तव्यापलीकडे तो अधिक कांहीं करित नाहीं हें सूक्ष्मविचारांतीं आपल्या लक्षांत येईल. त्याला इतकें महत्व येण्याचें कारण असें असतें कीं स्वार्थलोलुप माणसांची संख्या समाजांत मनस्वी वाढलेली असते. प्रत्येक जर आपलें कर्तव्य योग्य रीतीनें करूं लागेल तर हल्लींप्रमाणें स्वार्थत्याग करणाऱ्या समाजांतील थोड्या व्यक्तींवर कामाचा मनस्वी बोजा पडणार नाहीं व समाजसेवकांना आजच्या इतकें महत्वहि राहाणार नाहीं, हें वरील विवेचनावरून लक्षांत येईल.

समाज करून राहाण्याकडे—समाजांत राहाण्याकडे ज्याप्रमाणें माणसाची नैसर्गिक प्रवृत्ति असते त्याप्रमाणेंच परोपकार करणें हा माणसाचा उपजत स्वभाव आहे. शेजारच्याला मदत करावी, दुसऱ्याच्या उपयोगीं पडावें हें सर्वांना समजतें आणि पुष्कळांकडून सामान्यतः त्याप्रमाणें कृतिहि घडते. मनुष्याच्या अंतःकरणांत दोन परस्परविरोधी प्रवृत्तींचा नेहमीं लढा लागलेला असतो. एक मन सन्मार्गाकडे जावयास सांगतें व दुसरें मन दुर्मार्गाचा रस्ता दाखवितें आणि या द्वंद्वयुद्धांत ज्याचा वरचष्मा होईल त्याप्रमाणें माणसाच्या हातून कृति घडत असते. माणसामध्यें असलेला ईश्वरी अंश नेहमीं सन्मार्गाचा रस्ता दाखवित असतो. समाजसेवा करण्याऐवजीं स्वार्थसेवाच करणारे पुष्कळ लोक आपण पाहतो. पण ते तसे वागण्याचें खरें कारण त्यांना समाजसेवेचें महत्व कळत नाहीं हें नव्हे, तर त्याप्रमाणें वागण्याची त्यांची इच्छा

नसते हें होय. आपल्याला अनेक प्रसंगीं असा अनुभव येतो कीं एखाद्या माणसाशीं आपला कोणच्याहि तऱ्हेचा संबंध नसतो, त्याची आपली पूर्वीची ओळखहि नसते आणि असा अनोळखी मनुष्य अशा अनपेक्षित रीतीनें व चटकन आपल्यावर उपकार करितो कीं त्याच्या वागणुकीचा कार्यकारणसंबंध आपल्याला कांहींच कळत नाहीं आणि ईश्वरानें आपल्या प्रसंगाला उपयोगीं पडण्याकरितां त्याला पाठविलें किंबहुना ईश्वरच त्या माणसाच्या रूपानें अवतरला असें म्हणून आपण आपल्या मनाचें समाधान करून घेतों. वस्तुतः आपल्या स्वभावगुणाला अनुसरून तो ती गोष्ट सहज करतो. त्याला विशेष कारण घडत नाहीं. कांहीं विशेष कारण असलें तर तें इतकेंच असतें कीं दुसऱ्यावर संकट आलें असतां त्याला साहाय्य करावें अशी त्याला प्रेरणा होते व त्या प्रेरणेप्रमाणें तो वागतो. परंतु विकारवश होऊन कोणतेंहि कार्य करण्यापेक्षां विचारपूर्वक केलेल्या गोष्टीचें महत्व केव्हांहि अधिकच असणार. समाज म्हणजे काय, समाजाचा व आपला कोणत्या प्रकारचा संबंध आहे, समाजसेवेच्या तत्वांत कसकसे बदल होत आले व त्यांचें स्वरूप आज काय आहे, तसेंच समाजसेवा करितांना आपला कोणता हेतु असावा, वगैरे गोष्टींचें ज्ञान होऊन समाजकार्य होऊं लागल्यास, सद्धेतु असून समाजसेवेच्या नांवाखालीं आज ज्या अनेक अनिष्ट गोष्टी होत आहेत त्या पुढें होणार नाहींत आणि समाजसेवेचें कार्य पायाशुद्ध पद्धतीनें होऊं लागेल.

समाजसेवा हें वैयक्तिक दुःखावर एक मोठें रामबाण औषध आहे. व्यक्तिशः आपल्यावर आलेल्या संकटाचा भार कमी व्हावा किंवा दुःखाचा विसर पडावा म्हणून समाजाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करणारीं माणसें सर्वत्र आढळतात. आपल्याकडेहि उदाहरणें आहेत. पण एक विवक्षित उदाहरण द्यावयाचें असल्यास जॉन ब्राईट यांचें घेतां येईल. आपल्या पूर्ववयांत पत्नीच्या निधनामुळें जॉन ब्राइट यांना इतकें दुःख झालें कीं त्यांनीं अंथरूण धरलें व त्यांतून उठण्याची आशा नाहींशी झाली. पण सुदैवानें या वेळीं त्यांचे जिवलग मित्र कॉब्डेन हे त्यांच्या भेटीला आले व जॉन ब्राईट यांची ही केविलवाणी स्थिति पाहून त्यांना ह्मणाले: "मित्रा, जी गोष्ट आपल्या हातची नाहीं त्या गोष्टीबद्दल असें निष्कारण दुःख कां करित बसला आहेस ? विचार कर, धान्यासंबंधींच्या अन्यायकारक कायद्यामुळें आज इंग्लंडांत लक्षावधि स्त्रिया व मुलें अन्नाला मोताद झालीं आहेत. ऊठ, या कामीं मला मदत कर. आपण दोघे मिळून या कायद्यांत दुरुस्ती करण्याचा प्रयत्न करूं आणि दुःखी झालेल्या या लक्षावधि जिवांना

सुखी करूं. धीर धर, बायको मेल्याबद्दल रडत बसण्याऐवजीं मरणाच्या दारीं पडलेल्या हजारों स्त्रियांना जीवदान दे." मरणोन्मुख पडलेल्या माणसाच्या तोंडांत अमृताचा बिंदु पडतांच तो जसा क्षणार्धांत हिंडता फिरता व्हावा तद्वत् ब्राइटची स्थिति झाली. मित्राच्या उपदेशाचा इष्ट परिणाम होऊन त्याची प्रकृति अल्पावधींत सुधरली आणि त्याच्या व कॉब्डेनच्या प्रयत्नांनीं धान्यासंबंधींच्या कायद्यांत सुधारणा होऊन त्यांच्या अपेक्षेप्रमाणें गोरगरिबांना स्वस्त धान्य मिळूं लागलें. त्यामुळें लक्षावधि लोकांनीं त्यांना दुवा दिला इतकेंच नव्हे तर या कृत्यामुळें त्यांचें नांव अजरामर झालें.

व्यक्ति ज्याप्रमाणें वेळोवेळीं आपलें ध्येय ठरवित असते त्याचप्रमाणें समाजहि वेळो वेळीं आपलें ध्येय ठरवितो व त्याप्रमाणें त्याची वाढ होत असते. मनुष्य कोणत्याहि क्षणीं, जाणून वा न जाणून, आपलें ध्येय ठरवून त्या ध्येयाच्या प्राप्तीसाठीं धडपड करित असतो. त्याचप्रमाणें समाजरूपी माणसाच्या मनांत एक ध्येय ठरलेलें असतें आणि त्याक्षणीं समाज ज्या दिशेकडे जात असेल त्या दिशेनें त्या ध्येयाची प्रगति संपुष्टांत येते. समाज तें ध्येय गांठतोच असें नाहीं, पण त्या दिशेकडे तो वळलेला असतो. नंतर कांहीं काळानें ती त्याची दिशा बदलते आणि त्याचें ध्येय बदलून नवीन येतें. करितां समाज कोणच्या दिशेनें जात आहे व तो कोणच्या दिशेनें गेला पाहिजे हें समजणें व त्याप्रमाणें प्रयत्न करणें एका व्यक्तीच्या हातचें नाहीं. त्याला व्यक्तिसमूहाची—संघटित प्रयत्नांची अवश्यकता असते.

वर निर्दिष्ट केलेल्या विवेचनावरून वाचकांच्या सहज लक्षांत येईल कीं व्यक्ति कोणतीहि असो, ती कोणत्याहि स्थितींत असो आणि समाजांत तिचा दर्जा कोणताहि असो, तिला समाजसेवा करण्याला विस्तीर्ण क्षेत्र आहे, समाजसेवा करणें हें प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य आहे आणि बदललेल्या परिस्थितीमुळें समाजसेवेची अवश्यकता सारखी वाढत आहे. पण हल्लींच्या परिस्थितींत समाजांतील सर्वच प्रश्न वैयक्तिक प्रयत्नांनीं सुटण्यासारखे नाहींत हें वरील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. त्याकरितां, समाजसेवा हें एकच ध्येय असणारे अनेक समाजसेवक एकत्र होऊन त्यांच्या संघटित प्रयत्नांनीं चाललेले समाजसेवासंघ ठिकठिकाणीं स्थापन झाले पाहिजेत. तेव्हांच समाजरूपी शरिराला चहूं बाजूंनीं लागलेले अनेक रोग कायमचे नाहींसे झाले नाहींत, तरी आटोक्यांत येतील आणि समाजाच्या प्रगतीला खंड पडणार नाहीं.

## प्रकरण २ रें.

# समाजसेवेचीं मूलभूत तत्वें.

Put the waste labour on the waste land by means of the waste capital and thus convert this trinity of waste into a unity of production.

Commander Booth Tucker.

समाजसेवेच्या मूलभूत तत्वांपैकीं एक तत्व असें आहे कीं, समाजांतील ज्या ज्या व्यक्तींना आपली पूर्ण वाढ व उन्नति करून घेण्यास संधि मिळत नसेल व त्यामुळें त्यांची अवनति होत असेल त्यांना त्यांच्या उन्नतीच्या मार्गांत येणाऱ्या कृत्रिम अडचणी नाहींशा करून ती संधि मिळवून देण्याचा प्रयत्न करणें; ज्या मनुष्यकृत अडचणी त्यांच्या आत्मोन्नतीच्या आड येत असतील त्या दूर करून त्यांना वाढीस लावणें. आतां या दृष्टीनें विचार केल्यास आपली नैसर्गिक वाढ खुंटविण्यास कारणीभूत होणाऱ्या मनुष्यकृत अडचणी आमच्या समाजांत फारच आहेत. आपलें राष्ट्र इतर राष्ट्रांच्या मानानें पुष्कळच मागसलेलें आहे, ही गोष्ट आपल्याला नाकबूल करितां येणार नाहीं; आणि हा मागासलेपणा येण्यास जीं अनेक कारणें आहेत त्यांत वर निर्दिष्ट केलेलें एक मुख्य कारण आहे हीहि गोष्ट तितकीच खरी आहे, हें विसरतां कामा नये. कांहीं समुदायांच्या सभोंवार हें कृत्रिम बंधनांचें जाळें इतकें पसरलें आहे कीं त्यामुळें आज कैक वर्षें त्या पोटसमाजांची सारखी अवनति होत आहे आणि आज मितीला जरी हें समाजांतील विशिष्ट लोकांनीं बुद्ध्या पसरलेलें जाळें दूर केलें तरी त्याचे अनिष्ट परिणाम नाहींसे होऊन हीं बंधनें नसणें हा "आपला जन्मसिद्ध हक्क आहे" असा आत्मविश्वास त्यांच्यांत उत्पन्न होण्यास पुष्कळच कालावधि लागेल.

### शिक्षणप्रसार.

या अनेक कृत्रिम बंधनांपैकीं कांहींचा येथें विचार करूं. आजमितीला समाज सुधारण्याचें मुख्य साधन शिक्षण असें मानण्यांत येतें. कारण आचार हा विचारांचा परिणाम असतो, माणसाचे

विचार सुधारल्याशिवाय आचार सुधरत नाहींत आणि हे विचार सुधारण्याचें काम शिक्षणाच्या योगानें होतें. जगांतील सुधारलेल्या राष्ट्रांचा इतिहास जर आपण पाहिला तर आपल्याला असें आढळून येईल कीं, त्यांच्या समाजसुधारणेच्या कार्यक्रमांतील पहिली बाब शिक्षणप्रसार ही होती. शिक्षणाचा फारसा प्रसार नसून राष्ट्र अतिशय सुधारलेलें आहे असें आपल्याला कोठेंहि आढळणार नाहीं. गेल्या पन्नास पाऊणशें वर्षांत जपानची कल्पनातीत प्रगति झाली आणि जगांतील प्रबळ राष्ट्रांत त्याची गणना होऊं लागली असें आपण पाहातों. पण इतक्या अल्पावकाशांत त्या चिमकुल्या राष्ट्राची सुधारणा होण्याचें कारण काय ? याचें मुख्य कारण शिक्षणप्रसार हेंच आहे असें आपल्याला आढळून येईल. आज तारखेला जपान व हिंदुस्थान या दोन देशांतील शिक्षणप्रसाराची जर आपण तुलना करून पाहिली तर दुर्दैवानें आपल्याला असें आढळून येईल कीं जपानांत शेंकडा जितके निरक्षर लोक आहेत तितकेच बरोबर आपल्या देशांत साक्षर लोक आहेत. पण प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार झाला कीं लोक सुधारलेच असें मात्र म्हणतां येणार नाहीं. देशाची जर खरोखरीच सुधारणा व्हावयास हवी असली तर प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक झाल्यानें ती होईलच असें नाहीं. तर त्याकरितां उच्च शिक्षणाचाहि प्रसार अधिक व्हावयास हवा. समाजांतील सर्व साधारण व्यक्तींना उच्च दर्जाचें शिक्षण मिळून समाज सुसंस्कृत होईल तितका तो प्रगतीच्या वरच्या पायरीवर चढेल. नुसती अक्षर-ओळख झाल्यानें फारसें कार्य होणार नाहीं. ओसाड जागा साफसूफ केल्याप्रमाणें साक्षरतेचा उपयोग होतो. धान्याची पेरणी करणें, शेताची मशागत करणें व उत्तम धान्य पिकविणें या गोष्टी पुढेंच करावयाच्या असतात व त्या उच्च शिक्षणा-शिवाय होत नाहींत. पण जेथें प्राथमिक शिक्षणालाच ठिकाण नाहीं—ज्या जागे-वरचें अजून रानहि निघालें नाहीं—तेथें उच्च शिक्षणाची गोष्टच बोलावयाला नको. जेथें अन्नच खावयास नाहीं तेथें मिष्टान्न कोठचें ? पण या बाबतींत थोडीशी जागृति होण्याला सुरवात झाली आहे. शिक्षणाचें महत्व दिवसेंदिवस लोकांना कळूं लागलें आहे. करितां हें शिक्षणप्रसाराचें कार्य जितक्या अधिक जोरानें करितां येईल तितकें करून समाजसुधारणेच्या मार्गांत येणारा हा प्रचंड अडथळा नाहींसा करणें हें समाजसेवा करूं इच्छिणाऱ्या प्रत्येक नागरिकाचें कर्तव्य आहे. शिक्षण मिळणें हा प्रत्येक व्यक्तीचा हक्क आहे आणि अज्ञानामुळें आपल्या ह्या नैसर्गिक हक्काची जाणीव पुष्कळांना

नसली तरी समाजांत तितकी जागृति होण्याची वाट न पहातां निदान प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करून समाजाच्या प्रगतीच्या आड येणारें हें अज्ञान नाहींसें करणें प्रत्येक सुशिक्षित व्यक्तीचें मुख्य कर्तव्य आहे.

## जातिभेदाची आडकाठी.

यानंतर हिंदुसमाजाच्या हाडींमासीं खिळलेलें दुसरें कृत्रिम बंधन जातींचें होय. खरें पाहूं गेल्यास मी उच्च जातीचा व तूं नीच जातीचा असें दुसऱ्याला म्हणण्याला कोणाहि व्यक्तीला मुळींच हक्क नाहीं. माणसें तेवढीं सर्व सारखींच आणि त्यांचा दर्जाहि एकच. पण या समतेच्या तत्त्वाचें आपल्या लोकांना स्मरणहि राहिलेलें नाहीं. अस्पृश्य मानलेल्या लोकांचीच गोष्ट घ्या. त्यांना अस्पृश्य मानल्यामुळें त्यांची इतकी दुर्दशा झाली व त्यांना इतकें सळो कीं पळो झालें कीं, हिंदु धर्मांत राहून स्वधर्मीयांकडून अशा रीतीनें छळ करून घेण्यापेक्षां धर्मांतर करणें बरें असें त्यांना वाटूं लागलें. कारण परधर्मांत गेल्यानें निदान ते स्पृश्य तरी मानले जातात. या समजुतीमुळें आजपर्यंत हजारों अस्पृश्य मानलेले हिंदु परधर्मांत गेले व अझूनहि जात आहेत. वस्तुतः असें करण्यांत त्यांची कोणत्याहि प्रकारें चूक नाहीं. कारण "आई जेवूं घालीना व बाप भीक मागूं देईना" या म्हणीप्रमाणें त्यांचा कोंडमारा झाला आहे. आणि ह्याला कारण आपल्याला श्रेष्ठ मानणारे वरच्या वर्गांतील लोक होत हें सांगावयास नकोच. यामुळें आपला समाज विस्कळीत होत आहे आणि त्याला ही आंतून कीड लागल्यामुळें दिवसेंदिवस तो अधिकाधिक दुर्बल होत चालला आहे. आणि दुर्बलता म्हणजेच ऱ्हास.

समाजाच्या दृष्टीनें आपण पाहूं लागलों तर आपल्याला असें म्हणावें लागेल कीं समाजांतील कांहीं व्यक्तींनीं दुसऱ्या दुर्बल लोकांना, त्यांची कोणत्याहि प्रकारें चूक नसतां, अशा प्रकारें अस्पृश्य मानण्याचा मुळींच अधिकार नाहीं. त्यांना हस्तपादादि अवयव इतरांप्रमाणेंच आहेत. तींहि माणसेंच आहेत. इतकेंच नव्हे तर स्वामी विवेकानंदांच्या सांगण्याप्रमाणें तेहि परमेश्वराचे अंशच आहेत. अशी वस्तुस्थिति असतांना समाजांतील कांहीं व्यक्तींनीं आपल्याला उच्च समजावें, सोवळे समजावें व इतरांना नीच मानून श्वानशूकरां-इतकीहि त्यांना किंमत देऊं नये, त्यांची सावली देखील घेणें पाप मानावें, हें हास्यास्पद नव्हे काय? कुत्री, मांजरें, किंवा गाईम्हशी आपण बाळगतों. त्यांना बाहेर जाण्याची संधि मिळतांच तीं अभक्ष्यभक्षण करूनहि येतात.

तरी त्यांना आपण दूर ठेवीत नाहीं. तुझा स्पर्श नको, तुझी सावलीहि नको असें आपण त्यांना म्हणत नाहीं. उलटपक्षीं, सोवळ्यांत असतांनाहि आपण त्यांना शिवतों. मग हीं तर माणसें. त्यांना पशूंपेक्षांहि नीच मानणें हें माणसाच्या माणुसकीला खरोखरीच शोभत नाहीं. गाईम्हशींनीं अंगावर घाण उडवून घेतल्यास त्यांना पाण्यांत धुवून आपण ती घाण घालवितों, पण त्यांना अस्पृश्य मानीत नाहीं. आपल्यापैकीं कांहीं लोक अस्वच्छ असले तर त्यांना स्वच्छ करणें आपलें कर्तव्य आहे. त्यांना अस्पृश्य मानणें हें क्षुद्र बुद्धीचें निदर्शक होय. हा मानव जातीचा अपमान नव्हे काय ? समाजसेवेचीं सामान्य तत्वें ज्यांना अवगत आहेत ते हा माणसांमाणसांतील अपमानकारक कृत्रिम भेद कधींहि राहूं देणार नाहींत.

जी पवित्र वस्तु आहे तिचें पावित्र्य कधींहि विटाळलें जात नाहीं. ती स्वतः पवित्र असतेच इतकेंच नाहीं तर ज्या ज्या अपवित्र वस्तु तिच्या सान्निध्यांत येतात त्या सर्व पवित्र करण्याची अद्भुत शक्ति तिच्यांत असते; म्हणूनच तिचें महत्व मानण्यांत येतें. एरवीं स्वतःला पवित्र मानणारे पुष्कळ लोक आढळतील. पण वरीलप्रमाणें त्यांची परीक्षा पाहूं लागल्यास त्यांचा पवित्रपणा तर राहोच, पण उलट ते खरोखरीच अपवित्र असलेले आपल्याला आढळून येतील. पण दुर्दैवानें पवित्रापवित्रेच्या व उच्चनीचपणाच्या खोट्या कल्पना लोकांच्या इतक्या अंगवळणीं पडल्या आहेत कीं त्यांची सत्यासत्यता त्यांना कळेनाशीच झाली आहे. हा उच्चपणा व ही स्पृश्यता त्यांच्याच मताप्रमाणें नीच मानलेले व अस्पृश्य मानलेले लोक दूर ठेवूनहि टिकूं शकत नाहीं. त्यासाठीं अवांतर पुष्कळ धडपड करावी लागते. यावरूनच त्यांचें असत्य व अपवित्र स्वरूप कोणालाहि सहज दिसण्यासारखें आहे.

अशा प्रकारच्या स्पृश्यास्पृश्यतेच्या भेदामुळें स्वतःला स्पृश्य मानणाऱ्या जातींचें फारसें नुकसान होत नाहीं, उलट फायदाच होतो. कारण अगदीं खालच्या प्रतीचीं घाणेरडीं कामें करण्यास या अस्पृश्य मानलेल्या लोकांचा उपयोग होतो आणि याच स्वार्थी बुद्धीनें अस्पृश्य मानलेल्या लोकांना प्रथम अस्पृश्य मानण्यांत आलें असावें असें वाटतें. पण या उच्चनीचपणाच्या भावनेमुळें अस्पृश्य मानलेल्या लोकांची कल्पनातीत हानि झाली आहे. त्यांची स्थिति इसापनीतींतील स्वतःच्या स्वरूपाचें विस्मरण पडलेल्या सिंहाप्रमाणें झाली आहे. त्यांना आपल्या मनुष्यपणाचीहि ओळख नाहींशी झाली आहे. आपण

इतर माणसांप्रमाणेंच माणसें आहोंत, इतरांपेक्षां आपल्यांत कांहींही उणें नाहीं आणि आपल्याला नीच मानण्याचा कोणालाहि अधिकार नाहीं, उलटपक्षीं 'नीचपण बरवें देवा' या तत्वाचा स्वीकार करून परसेवेंत आपण आनंद मानीत असल्यामुळें, आपल्या आपणच उच्च समजून सोवळेंपणाचा आव आणणाऱ्या स्वार्थी माणसांपेक्षां आपली योग्यता सत्याच्या दृष्टीनें खचित मोठी ठरेल, याची त्यांना कल्पनाहि नसते. अशा प्रकारच्या अस्पृश्य मानलेल्या व समाजा· पासून दूर ठेवलेल्या माणसांना शिक्षणादि साधनांच्या साहाय्यानें सुधारणें, स्वावलंबी करणें व त्यांच्यांत आत्मविश्वास उत्पन्न करणें, सारांश मनुष्यपणाला पारखे झालेल्या माणसांत मनुष्यपणा उत्पन्न करणें, यापेक्षां उच्च दर्जाची दुसरी कोणतीहि समाजसेवा नाहीं.

जातींना वर्ण अशीहि संज्ञा आहे. म्हणजे मूळ वर्णावरून–शरिराच्या रंगाव-रून जातीची कल्पना निघाली असावी असें म्हणावयास हरकत नाहीं. पण चातुर्वर्ण्याचें तत्व घटकाभर खरें मानल्यास त्या व्यवस्थेप्रमाणेंसुद्धां पांचव्या अस्पृश्य मानलेल्या वर्गाचा कोठेंच ठावठिकाण लागत नाहीं. म्हणजे अर्थातच वर म्हटल्याप्रमाणें आपलीं घाणेरडीं कामें करून घेण्याकरितां अगदीं अलीक-डील लोकांनीं आपल्या सोईसाठीं हा नवीनच एक व्यक्तिसमूह उत्पन्न केला आणि त्यांची सुधारणा झाल्यास आपलें काम अडेल या स्वार्थबुद्धीनें त्यांना त्याच परावलंबी स्थितींत खितपत ठेवण्याचा अव्याहत प्रयत्न करण्यांत आला असें म्हणावयास हरकत नाहीं. पण चार वर्ण अस्तित्वांत असतांनासुद्धां ते परस्प-रापासून आजच्या इतके तुटक नव्हते व त्यांच्यांत परस्पराविषयीं आजच्या इतकी तेढहि नव्हती. मनूच्या लिहिण्याप्रमाणें ब्राह्मणाचा शूद्र व शूद्राचा ब्राह्मण त्या काळीं होऊं शकत असे. म्हणजे त्या काळीं आजच्यासारखे तीव्र जातिभेद नव्हते. प्रसंग पडेल त्याप्रमाणें परस्परांशीं सर्व प्रकारचा व्यवहार ते करीत असत, इतकेंच नव्हे तर खालच्या वर्णांतील महत्वाकांक्षी माणसाला वरच्या वर्णांत जाण्याची संधि मिळत असे. म्हणजे तेव्हां आजच्यासारखे समाजाचे अलग अलग तुकडे पडलेले नव्हते, यांत मुळींच शंका नाहीं. चार वर्ण अस्तित्वांत असले तरी एकमेकांत मिसळण्याची व प्रत्येकाच्या मगदुराप्रमाणें व अंगच्या गुणांप्रमाणें कमीजास्त मानलेल्या वर्णांत आपला समावेश करून घेण्याची सर्वांनाच सारखी मुभा असे. पण हा काल बदलला आणि कर्मावरून जात ठरण्याऐवजीं

जन्मावरून जात मानण्यांत येऊं लागली. क्षात्रधर्म पाळतो तो क्षत्रिय, ब्राह्मणाला उचित असा धर्म पाळतो तो ब्राह्मण, वैश्यवृत्तीनें चालणारा तो वैश्य आणि शूद्राला योग्य अशीं कामें करणारा तो शूद्र, मग तो कोणच्याहि कुळांत जन्मलेला असो. अशा प्रकारची गुणकर्मविभागशः झालेली चातुर्वर्ण्याची व्यवस्था स्मृतिशेष झाली. वडिलोपार्जित इष्टेटीप्रमाणें वडिलार्जित जात मिळूं लागल्यामुळें वडिलार्जित पैसा वाटेल तसा उधळावा आणि वडिलांच्या नांवावर मोठेपणा गाजवावा अशी स्थिति झाली आणि श्रीमंत बापाचा मुलगा सामान्यतः मूर्खच निघावा तशी स्थिति उच्चवर्णीय लोकांची होऊं लागली. गुण कमी होऊन दोषांचें प्रमाण वाढूं लागलें. पुरातन काळीं ब्राह्मण फक्त ज्ञानप्रसाराचें काम करीत असल्यामुळें त्यांना दान करणें म्हणजे ज्ञानप्रसारालाच मदत करणें होय असें लोक मानीत व त्यामुळेंच त्या काळीं ब्राह्मणाला दान करणें सर्वोत्कृष्ट कृत्य मानण्यांत येई. पण ज्ञानप्रसारांत आपल्याला काळ घालवावा लागत असल्यामुळें चरितार्थकरितां आपण भिक्षा मागत असूं या गोष्टीचें विस्मरण पडून भिक्षा मागणें हाच आपला मुख्य धंदा असें ब्राह्मणांना वाटूं लागलें आणि ज्ञानप्रसाराचें कार्य त्यांचेकडून योग्य प्रकारें होईनासें झालें. जातींना भलतेंच महत्व येऊं लागलें. एका जातीच्या हजारों जाती व पोटजाती झाल्या आणि या बाबतींत आज इतकी अवनति झाली आहे कीं कांहीं जातींची व्याप्ति कांहीं कुटुंबांपलीकडे नाहीं. विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, मोठेपणा गुणांत आहे, जातींत नाहीं, याचा विसर पडून दुसरे आपल्याला उच्चवर्णीय म्हणत नाहींत, ब्राह्मण म्हणत नाहींत, म्हणून भांडणें होऊं लागलीं आणि याच्याशीं अर्थाअर्थी कोणच्याहि प्रकारचा संबंध नसलेल्या गोष्टी मुद्दाम या वादांत आणून हीं भांडणें अनेकदां हातघाईवर आलीं. अशा प्रकारचा राष्ट्रीय हिताला अत्यंत विघातक व लज्जास्पद देखावा आज आपल्याला दिसत आहे. अशा परिस्थितींत समाज निर्बळ होत जावा व त्याला दुसऱ्याचा हुकमतींत राहावें लागावें यांत आश्चर्य कसचें ?

लांकडाच्या मोळींतून एक एक लांकूड कमी केल्यास त्या मोळीची शक्ती कमी कमी होत जावी आणि त्या मोळींत एक एक लांकूड अधिक घातल्यास त्या मोळीची शक्ती अधिकाधिक वाढत जावी हें स्वाभाविक असतें. समाजाचे जितके अधिक तुकडे—जितक्या अधिक जाती—तितका समाज अधिक निर्बळ होत जाणार हें सांगावयास नकोच, आणि समाजांत वावरण्याचें क्षेत्र जितकें संकुचित होत जाणार त्या मानानें व्यक्तीच्या कार्याचें क्षेत्रहि आकुंचित होत

जाणार, म्हणजे तितकी व्यक्तीची वाढ खुंटणार आणि दुःखाची गोष्ट ही कीं, हीं सर्व बंधनें नैसर्गिक नसतात तर माणसांनींच बुद्ध्या उत्पन्न केलेलीं कृत्रिम बंधनें असतात. हीं माणसाला अधोगतीला नेणारीं मनुष्यनिर्मित बंधनें नाहींशीं होऊन व्यक्तीच्या उन्नतीचा मार्ग मोकळा होणें अत्यंत आवश्यक आहे.

या जातिभेदामुळें "मनुष्य अगदीं निरुपयोगी–बिळांतील उंदराप्रमाणें होतो", असें कै. लोकहितवादी यांनीं एका ठिकाणीं म्हटलें आहे तें अक्षरशः खरें आहे. जातिविशिष्ट चळवळींत पडणाऱ्या लोकांची वृत्ति इतकी अदूरदर्शी व स्वार्थी झालेली असते कीं, त्यांना ज्यांत त्यांत आपल्या जातीचा मनुष्य हवा असतो आणि परजातीविषयीं त्यांना इतका हेवा वाटतो कीं एक वेळ परधर्मीय मनुष्य आला तरी त्यांना तो सहन होतो, पण परजातींतील मनुष्य आलेला त्यांना खपत नाहीं. जात्यभिमानामुळें माणसाच्या योग्यतेचें किंवा लायकीचें महत्व नाहींसें होतें. कितीही नालायक असला तरी तो आपल्या जातीचा आहे एवढ्या- करितांच त्यांना तो हवा असतो. पण या वृथा जात्यभिमानामुळें राष्ट्रीयदृष्ट्या आपलें किती नुकसान होत असतें हें त्यांच्या गांवींहि नसतें. ही कूपमंडूकवृत्ति राष्ट्रीय भावनांचा समूळ नाश करिते आणि स्वार्थलोलुपता वाढविते. इंग्रज लोक किंवा त्यांचे जातभाई यांनीं ज्या ज्या देशांत आपलें पाऊल ठेविलें त्या त्या देशांत आपला वैयक्तिक फायदा कसा होईल हें न पाहातां प्रथम आपल्या देशाचा फायदा कसा होईल हें पाहिलें असें इतिहास आपल्याला सांगतो. स्वार्थ सहज साधतां येण्यासारखा असतां त्याचा अव्हेर करून स्वदेशहित पाहाण्याची बुद्धि न होण्याला जात्यभिमान हें अत्यंत घातुक शस्त्र आहे. आपल्या जातीपुरता पहाणारा मनुष्य कोठें गेला तरी त्याला आपली जातच दिसणार. त्याच्यापुढें त्याची दृष्टि पोंचणारच नाहीं आणि ही जात्याभिमानाची जपमाळ तो सदोदित ओढीत असल्यामुळें सर्व समाजाबद्दल जो काय थोडासा अभिमान त्याच्यांत असतो तोहि दिवसेंदिवस लोप पावत जावा हें क्रम- प्राप्तच आहे. प्रत्यहीं घडत असलेल्या गोष्टींविषयीं विचार केला तर ही घातुक वृत्ति दिवसेंदिवस कमी होण्याऐवजीं वाढतच आहे असें दुर्दैवानें म्हणावें लागतें.

आपल्याकडे पुष्कळ लोकांना असा भ्रम आहे कीं, इतर राष्ट्रांतहि इकडच्या- प्रमाणें जाती आहेत. पण वस्तुतः त्या जाती नसून उच्चवर्ग, मध्यमवर्ग, शेत- करीवर्ग, कामगारवर्ग अशा प्रकारचे ते वर्ग आहेत, आणि या वर्गांत व आपल्या- कडील जातींत फरक हा असतो कीं, आपल्याकडील जात कोणाहि माणसाला

बदलून दुसऱ्या जातींत जातां येत नाहीं; परंतु वर निर्दिष्ट केलेल्या वर्गांतील लोकांना आपल्या परिस्थितीप्रमाणें आपला वर्ग बदलून वरच्या किंवा खालच्या वर्गांत जातां येतें. आपल्याकडे एखाद्या शूद्रानें आपली स्थिति सुधारली तरी वरच्या जातींतील लोक त्याला आपल्यांत येऊं देत नाहींत. एखादा ब्राह्मण भ्रष्ट होऊन अगदीं निकृष्ट स्थितीला पोंचला तरी त्याला कमी मानतां कामा नये, कसा झाला तरी तो ब्राह्मण आहे असें म्हणावें, तेव्हां त्यांच्या जातीतील लोकांचें समाधान होतें. खरें पहातां हा शुद्ध जुलूम होय. एका जातींतील लोकांनीं दुसऱ्या जातींतील लोकांना समाजांत मोकळेपणानें वागण्याचा जन्मसिद्ध हक्क नाहींसा करावा ही गुलामगिरी नव्हे तर काय? प्रत्यक्ष गुलामगिरींत आपण दुसऱ्याचे गुलाम आहोंत याची जाणीव तरी असते, पण या अप्रत्यक्ष गुलामगिरींत गुलामगिरीचे अनिष्ट परिणाम मात्र होतात, पण आपण गुलाम आहोंत असें सकृद्दर्शनीं वाटत नाहीं; त्यामुळें ही स्थिति अधिकच हानिकारक होते. अलीकडील सुधारलेला समाज अशा प्रकारचा जुलूम कधींहि सहन करणार नाहीं. अशा प्रकारचे जुलूम नाहींसे करणें व माणसांना आपल्या इच्छेप्रमाणें समाजदृष्ट्या अहितकारक होणार नाहीं अशा रीतीनें वागण्याची मुभा देणें हें समाजसेवेचें एक तत्व आहे. समाजांत सर्व व्यक्तींशीं सारखेपणानें व मोकळेपणानें वागणें हा प्रत्येक व्यक्तीचा ईश्वरदत्त हक्क आहे. तो हिरावून घेण्याचा कोणीहि प्रयत्न करूं नये.

याशिवाय समाजाच्या प्रगतीच्या आड येणाऱ्या दुसऱ्या अनेक चाली व बंधनें आहेत. त्या सर्वांत येथें विचार करण्याची आवश्यकता नाहीं. पण हे सर्व कृत्रिम अडथळे नाहींसे होऊन समाजाची वाढ अप्रतिहतपणें होऊं दिल्याशिवाय समाजाची सर्वांगीण सुधारणा होणें शक्य नाहीं. समाजरूपी शरिराची सर्व बाजूंनीं सुधारणा करावयाची असल्यास त्याच्या प्रत्येक अवयवाची योग्य जोपासना व्हावी लागते. एका अवयवाची शुश्रूषा केली आणि दुसरा नासूं कुजूं दिला तर शरीर निरोगी राहूं शकेल काय? त्याचप्रमाणें समाजाचेंहि आहे. यासाठीं, समाजाची स्वाभाविक वाढ खुंटविणारे जे जे कांहीं कृत्रिम अडथळे असतील ते सर्व एकजात समूळ नाहींसे केल्याशिवाय दुसरा उपाय नाहीं. यांपैकीं कांहीं गोष्टी केक वर्षें अव्याहत चालत आल्यामुळें व रूढीच्या नांवाखालीं बद्धमूल झाल्याकारणानें त्या चटकन् बदलणें कठीण आहे, हें नाकबूल करितां येणार नाहीं. पण एका अवयवाला लागलेल्या विषावर औषधोपचार

करतांना सर्व शरीरभर तें विष पसरूं नये म्हणून अत्यंत निष्ठुर व्हावें लागतें हा आपला नेहमींचा अनुभव आहे.

कोणी असें म्हणेल कीं, समाजांतील सर्व लोक समान स्थितीला यावेत असा आमचा प्रयत्न आहे आणि तो योग्य नसल्यामुळें फलदायी होणार नाहीं. पण तसें करण्याचा आमचा मुळींच प्रयत्न नाहीं. समाजांतील अनेक प्रकारच्या शर्यतींत कांहीं लोक पुढें जावेत, कांहीं मध्यावर असावेत व कांहीं मागें राहावेत हें हमेशा घडणारच. सर्व माणसें समान रेषेंत कधींही राहूं शकणार नाहींत. कारण प्रत्येक व्यक्तींत कांहीं उपजत गुणदोष असतातच आणि जन्मतांच उत्पन्न झालेले हे गुणदोष सारेच बदलणें कोणाच्या हातचें नसल्यामुळें सर्वांना समान स्थितींत आणण्याचा प्रयत्न आजपर्यंत कोठेंच यशस्वी झालेला नाहीं. पण आमचे प्रयत्न याच्यापेक्षां अगदीं निराळे आहेत. प्रत्येक व्यक्तीला आपली शक्य तितकी सुधारणा करून घेण्यास संधि द्यावयाची, तिच्या मार्गांत कोणच्याहि प्रकारचे कृत्रिम अडथळे येऊं द्यावयाचे नाहींत, आणि अशा रीतीनें सर्वांचा मार्ग निष्कंटक केल्यानंतर शर्यतींत पहिला येणें, दुसरा येणें किंवा शेवटीं राहणें हें सर्वस्वीं ज्याच्या त्याच्या हातीं राहील. त्याचें नफानुकसान जें काय व्हावयाचें तें त्याचा तो करून घेईल. दुसऱ्या माणसांना त्यांत ढवळाढवळ करितां येणार नाहीं.

## व्यक्तिस्वातंत्र्य.

कोणत्याहि बाबतींत ढवळाढवळ करण्याचा आपल्याला कितपत अधिकार आहे किंवा त्यापासून दुसऱ्याच्या मनोवृत्तींना कितपत धक्का पोंचतो याचा विचार न करितां स्वार्थासाठीं सर्वच सत्ता आपल्या हातीं घेण्याची हांव आपल्याकडे परमावधीला जाऊन पोंचली आहे. पण आपल्या समाजांत ह्या गोष्टी पूर्वापार चालत आलेल्या आहेत असें वाटत नाहीं. आपल्याकडील विवाहपद्धतीच उदाहरणादाखल घेऊं. प्राचीन काळीं मुलींना आपल्या पतीची निवड करण्याची मुभा असे. परंतु आस्ते आस्ते हा अधिकार आईबापांनीं आपल्या हातीं घेतला व त्याचा शेवट पाळण्यांत लग्नें करण्यांत होऊं लागला. विधवांची संख्या लाखांनीं मोजतां येऊं लागली आणि त्यांची पुनर्विवाह करण्याची तयारी असली तरी त्याला मुख्यतः पुरुषांकडूनच विरोध होऊं लागला. एका काळीं स्त्रियांच्या बाबतींतील हा जुलूम इतक्या थरास गेला होता कीं पत्नीनें पतीच्या

प्रेताबरोबरच स्वतःला जाळून घेऊन आत्महत्या करावी, वैधव्य स्थितींत पतीच्या मागें राहूं नये, अशा प्रकारची कल्पना त्यांच्यांत उत्पन्न करण्यांत आली होती. पण सुदैवानें हिंदु लोकाप्रमाणें इंग्रजाची सदसद्विवेकबुद्धि नाहींशी झालेली नसल्यामुळें त्यांनीं सक्तीनें ही चाल बंद पाडिली व स्त्रियांच्या प्राणांवरचा प्रसंग टळला. पण तत्कालीन विधवांच्या स्थितीचा विचार करितां विधवा राहाण्यापेक्षां सती जाणेंच त्यांना कमी दुःखाचें होतें. गोषापद्धति अस्तित्वांत येण्याला व ती आजपर्यंत टिकण्याला पुरुषांची स्वार्थी बुद्धीच कारणीभूत झाली, अशी इतिहास आपल्याला ग्वाही देत आहे. म्हणजे स्त्रियांचें स्वतंत्र अस्तित्व संपुष्टांत आणून त्यांचें ध्येय काय असावें हें पुरुषांनीं आपल्या सुखसोयींप्रमाणें ठरविलें, इतकेंच नव्हे तर त्यांच्याकडून तें पूर्णपणें अमलांतहि आणिलें. पुरुषांच्या स्वार्थी लहरीप्रमाणें वागतांना स्त्रियांना किती कष्ट सहन करावे लागले असतील, आपल्या आशाआकांक्षा, आवडीनावडी बाजूला ठेवून हरएक गोष्टींत परेच्छेप्रमाणें वागून जणूं काय आपल्याला स्वतंत्र अस्तित्व नाहींच असें दाखवितांना किती त्रास पडला असेल हें एका परमेश्वराला ठाऊक. सर्वांना सारखा न्याय मिळावा असें एक समाजसेवेचें महत्वाचें तत्व आहे. येथें न्याय नाहीं तर नाहींच, पण अन्यायालाहि सीमा नाहींशी झाली आहे. तथापि कोणत्याहि गोष्टीला झाली तरी सीमा ही असतेच. त्या सीमेचें उल्लंघन होऊन अती छळ होऊं लागला कीं निर्बल प्राण्यांनाहि शक्ति येते व ते आत्मसंरक्षण करूं शकतात. स्त्रियांच्या परावलंबीपणाचा कळस झाला आहे आणि स्वावलंबी होण्याकरितां त्या धडपड करूं लागल्या आहेत.

समाजांत पुष्कळदां साधारणपणें सारखीच कमाई असलेले व सारख्याच परिस्थितींतील लोक संसारांत कांहीं यशस्वी तर कांहीं अपयशस्वी झालेले–कांहीं चांगल्या स्थितींत कांहीं गरीब कांहीं दीन स्थितींत असलेले–आपण पाहातों व समान स्थितींतील लोकांची परस्परविरोधी स्थिति कां व्हावी या कोड्याचा उलगडा आपल्याला होत नाहीं. वस्तुस्थिति अशी असते कीं, हें आयुष्यांतील यशापयश त्यांच्या मिळकतीवर अवलंबून नसतें तर त्यांच्या सामाजिक संवयींवर ( Social habits ) वर अवलंबून असतें. पुष्कळ लोक साधारणपणें आपल्या उत्पन्नाची वांटणी ठरवून ठेवितात. आपल्या प्राप्तीपैकीं आपल्या घरगुती खर्चाला किती पैसे द्यावयाचे, आपल्यावर अवलंबून असलेल्या माणसांना किती आदा करावयाचे, वाचनाच्या, करमणुकीच्या, धर्मार्थ संस्थांच्या कामाकडे किती

द्यावयाचे हें ते आपल्या आयाप्रमाणें ठरवून ठेवितात. अशा प्रकारची राहणी एकदां विचारपूर्वक ठरली—राहणीप्रमाणें पुष्कळदां ही वाटणी आपोआप ठरली जाते—व त्याप्रमाणें वागण्याइतका मनाचा निश्चय असला म्हणजे अगदीं अनपेक्षित संकट किंवा अडचण सोडून दिल्यास इतर वेळीं या सर्व गोष्टी त्यांच्या मनाप्रमाणें, अगदीं तंतोतंत नसल्या तरी फारशी तफावत न पडतां, जुळून येतात. असे लोक आपल्या मुलाबाळांना योग्य प्रकारचें शिक्षण देऊं शकतात आणि अनपेक्षित रीतीनें मृत्यूच्या दाढेंत सांपडले तरी आपल्या मुलांची थोडी फार व्यवस्था करून ठेवितात. वरील गृहस्थांइतकीच किंबहुना त्यापेक्षां थोडी अधिक प्राप्ति असूनसुद्धां अगदीं कंगाल स्थितींत असलेले लोक आपल्याला आढळतात. त्यांची कोणत्याहि बाबतींत व्यवस्था नसावयाची. पैसे हातीं येतील त्या दिवशीं ते मोठे उदार असावयाचे आणि त्या घटकेला जी वस्तु दिसेल ती विकत घ्यावयाची, पण त्या वस्तूचा आपल्यास कितपत उपयोग होईल किंवा अशा रीतीनें पैशाची उधळपट्टी झाल्यास उद्यां आपली किंवा आपल्या बायकामुलांची काय स्थिती होईल हा विचार त्यांच्या मनाला शिवत नाहीं. बरें याचें त्यांना कोणी स्मरण करून दिल्यास ते सांगतील कीं, चालत आहे तोंपर्यंत चैन करून घ्यावी; उद्यांचें कोणी पाहिलें आहे ? अशा प्रकारचे विचार व त्याला अनुरूप असा आचार असल्यावर उपर्युक्त दोन व्यक्तींच्या एकंदर स्थितींत कल्पनातीत फरक पडावा, एकाची स्थिति दिवसेंदिवस सुधरत जावी तर दुसऱ्याची स्थिति दिवसेंदिवस खालावत जावी यांत आश्चर्य तें कसचें ? म्हणून व्यक्तीची किंवा व्यक्तिसमूहाची गरिबी असणें किंवा श्रीमंती असणें हें महत्वाचें नाहीं, तर त्यांच्या सामाजिक संवयी महत्वाच्या आहेत. वर निर्दिष्ट केलेल्या दुसऱ्या प्रकारच्या माणसाच्या सामाजिक संवयी सुधारून त्याला उन्नतीच्या मार्गाला लावणें महत्वाचें असलें तरी आत्मविश्वासानें व स्वप्रयत्नानें आत्मोन्नतीचा मार्ग चोखाळणाऱ्या पहिल्या माणसाला समाजांत त्याला उचित असें स्थान मिळेल व त्या स्थानापासून तो पतन पावणार नाहीं हें पहाणें अत्यंत आवश्यक असतें. तेथें त्याला अडथळा करण्याला त्याची किंवा आपल्याला श्रेष्ठ समजणारी दुसरी कोणतीहि जात पुढें येतां कामा नये. म्हणजे जो मनुष्य आपल्या सुकृतीनें चढेल त्याला चढूं द्यावयाचा व जो आपल्या दुष्कृतीनें मागें पडला असेल त्याला हात द्यावयाचा, ज्या ज्या प्रकारची मदत त्याला हवी असेल ती

ती मदत त्याला द्यावयाची. पण कोणाहि माणसाला वरच्या पायरीवरून खालीं ओढावयाचा नाहीं किंवा खालच्या पायरीवरील मनुष्य वरच्या पायरीवर चढत असेल तर त्याला अडथळा करण्याचा प्रयत्न करावयाचा नाहीं, मग त्याची जात, धर्म किंवा देश कोणताहि असो. हें समाजसेवेचें तत्व आहे.

सर्व जातींत कमी दर्ज्याचे लोक आहेत. कदाचित् कांहीं जातींत एकाप्रकारचे लोक थोडे कमी असतील तर दुसऱ्या जातींत दुसऱ्या प्रकारचे कमी असतील इतकेंच. पण खालच्या जातींत वरिष्ठ लायकीचे आहेत त्यांना वर जाण्याची बंदी होते आणि वरच्या जातींत खालच्या दर्ज्याचे लोक आहेत त्यांना खालीं येण्याचा मार्ग मोकळा असला तरी ते वर राहणें समाजाला खपत असल्यामुळें त्यांना मोठेपणाचा वृथा भ्रम होतो व त्यामुळें ते स्वतःच्या व समाजाच्या नाशाला कारणीभूत होतात. पाणी हें जीवन आहे; पण एखाद्या ठिकाणीं साचून, कुजून त्याचें डबकें झालें म्हणजे त्याच्यांतील जीवनशक्ति लोपून जाते. तें अनेक प्रकारच्या प्राणनाशक जंतूंचें जन्मस्थान होतें. पण तें खेळतें झालें म्हणजे पुनः त्याच्यांत जीवन येतें आणि त्याचा ओघ ज्या दिशेला असेल त्या दिशेनें प्रसंग पडेल त्याप्रमाणें डाव्याउजव्या मार्गानें तें मोठ्या प्रवाहाला मिळतें. आपल्या समाजाची स्थिति वरीलप्रकारच्या कुजट व गढूळ पाण्यानें भरलेल्या डबक्याप्रमाणें झाली आहे. त्याचा बंधारा फोडून त्याच्या प्रवाहाच्या आड येणारे दगडधोंडे नाहींसे केले पाहिजेत आणि त्याचा मार्ग स्वच्छ झुळझुळ वाहाणाऱ्या झऱ्याप्रमाणें निष्कटंक झाला पाहिजे.

## 'स्वराज्या'चा खरा पाया.

मनुष्याचा समाजांत जितका दर्जा मोठा असेल त्या मानानें त्याच्या हातून झालेल्या चुकीचा परिणाम नेहमीं अधिक वाईट होतो. यामुळेंच श्रीमंत छाकटा व गरीब छाकटा या दोहोंमध्यें श्रीमंत माणसाच्या दारूबाजीचा परिणाम अधिक वाईट होतो. कारण तो निर्धन माणसापेक्षां अधिक सुशिक्षित असतो. आपल्या चुकीचा परिणाम काय होईल याची जाणीव त्याला गरीब माणसापेक्षां अधिक असते. त्याला परिस्थिति अधिक अनुकूळ असते आणि सदोष परिस्थिति ज्याप्रमाणें गरीब माणसाला दारूच्या दुकानांत जाण्यास पुष्कळ अंशीं भाग पाडते तसें श्रीमंताचें नसतें; तो बहुधा चैनीखातर जाणूनबुजून दारू पितो व त्यामुळेंच त्याच्या दारू पिण्यापासून त्याच्या स्वतःवर व साऱ्या समाजावर अधिक अनिष्ट परिणाम होतो. म्हणून लहानाप्रमाणें मोठ्याच्याहि अवनतीला जपावें लागतें.

या जगांत माणसाचा सर्वांत महत्वाचा हक्क कोणता हें जर आपण पाहूं लागलों तर आपल्याला असें आढळून येईल कीं, जगणें, आपलें अस्तित्व राहूं देणें, हा सर्वांत महत्वाचा निसर्गदत्त हक्क आहे. ह्या मूलभूत हक्काची पायमल्ली कोणालाहि करितां येणार नाहीं. ह्यासाठीं, व्यक्तीचें अस्तित्व अकालींच संपुष्टांत येणार नाहीं हें पाहाणें समाजाचें आद्य कर्तव्य आहे. पण हें कर्तव्य आज बजावलें जातें काय ? मुंबई शहरापुरताच आपण विचार केला तर आपल्याला असें आढळून येईल कीं, मुंबई शहरांत जन्माला येणाऱ्या दर एक हजार मुलांपैकीं सहाशें मुलांना त्यांच्या आयुष्याचें एक वर्ष भरलें न भरलें तोंच परलोकचा रस्ता धरावा लागतो. आपल्याकडे माणसाचा पहिला जन्मसिद्ध हक्क कोणचा असें जर विचारिलें तर 'स्वराज्य', असें बहुतेक लोक आपल्याला उत्तर देतील. पण या लोकांना मित्रत्वाच्या नात्यानें आम्ही असें विचारितो कीं एक वर्ष उणेंपुरें भरलें नाहीं तोंच देहत्याग करणें भाग पडलेल्या एक हजारापैकीं सहाश मुलाना जर तुम्हीं स्वराज्य दिलेंत तर त्याचा त्यांना कांहीं तरी उपयोग होईल काय ? त्यांचे प्राण आधीं वांचवा आणि मग त्यांना स्वराज्य द्या. एखाद्या देशाचें जर कांहीं धन असेल तर तें त्या देशांतील माणसें हे होय. या जीवंत संपत्तीचें संरक्षण करणें, तिचा अपव्यय टाळणें आणि योग्य परिस्थितीच्या अभावीं यांतील जी संपत्ति केरकचऱ्यांत मिळून गेलेली असेल ती शोधून काढून तिचा योग्य कामीं उपयोग करणें, सर्वांना आपली उन्नति करण्याची संधि व साधनें उपलब्ध करून देणें, तशी संधि व साधनें मिळण्याचा समाजांतील प्रत्येक व्यक्तीचा जन्मसिद्ध हक्क आहे हें ध्यानांत ठेवून शक्य तितका समतेचा व न्यायाचा पुरस्कार करणें, हा समाजसेवेचा एक मुख्य उद्देश आहे. समाजसेवेच्या मुळाशीं असलेल्या तत्वांपैकीं हें एक मुख्य तत्व आहे.

उपरिनिर्दिष्ट लिहिण्यावरून कोणीं असा आपला गैरसमज करून घेऊं नये कीं, आह्मांला स्वराज्य नको आहे. उलट पक्षीं आमचें असें मत आहे कीं, व्यक्तीचे जे दुसरे अनेक जन्मसिद्ध हक्क आहेत त्यांपैकींच राजकीय स्वातंत्र्य हाहि एक जन्मसिद्ध हक्क आहे. पण आमचें इतकेंच ह्मणणें आहे कीं, स्वराज्यवाद्यांनीं स्वराज्याची मागणी करण्यापूर्वीं तें चालविण्यास अवश्य लागणाऱ्या गोष्टींची आगाऊ व्यवस्था केलेली नसली तथापि ते मिळण्याचे प्रयत्न करितांना तरी या गोष्टीकडे दुर्लक्ष करूं नये. समाजसेवा हा तिच्या विवक्षित क्षेत्रांतसुद्धां स्वराज्याच्याच चळवळीचा एक भाग आहे,

नव्हे माणसांत स्वराज्य चालविण्याची लायकी आणणारी, व्यक्तीचें आयुष्य वाढविणारी ती एक चळवळ आहे हे कोणीही विसरूं नये. जगांत 'बळी तो कान पिळी' अशी सर्वत्र स्थिति असल्यामुळें या प्रतिकूल परिस्थितींत लहान लहान व्यक्तींनासुद्धां आपला बचाव कसा करून घ्यावा, स्वतःच्या पायांवर उभें राहून हरघडी प्राणघात करण्यास येणाऱ्या रोगादि अनेक शत्रूंशीं यशस्वी रीतीनें तोंड कसें द्यावें, सारांश चांगल्या रीतीनें कसें जगतां येईल हें शिकविणारें शास्त्र म्हणजेच समाजसेवा होय. समाजसेवेचीं तत्वें समाजाच्या गळीं उतरल्याशिवाय स्वराज्य मिळणें कठीण आणि मिळालें तरी पचणें कठीण.

उन्नतीच्या मार्गांत येणारे नानाविध अडथळे नाहींसे करून आत्मोन्नतीचा मार्ग व्यक्तीला मोकळा करून दिला कीं तेथें समाजसेवेचें कार्य संपलें असें मात्र नाहीं. याच्या पुढचेंच काम महत्वाचें व बिकट असतें. तें हें कीं उन्नतीचा मार्ग मोकळा झाल्यावर त्यांना स्वावलंबी करावयाचें. समाजांतील अनेकविध बंधनांच्या जाळ्यांतून मनुष्य सुटला म्हणजे तो गांगरण्याचा फार संभव असतो. अशा परिस्थितींत त्याला आत्मोन्नतीचा मार्ग दाखविणें व तो प्राप्त करून घेण्याची साधनें त्याच्या आटोक्याच्या बाहेर असल्यास तीं आटोक्यांत आणून देणें हें अत्यंत महत्त्वाचें कार्य असतें. तें पुरें होईपर्यंत समाजसेवेची कार्यव्याप्ति संपली असें मानतां येत नाहीं.

प्रत्येक माणसानें हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, आपल्याला जगावयाचें आहे त्याचप्रमाणें समाजांतील प्रत्येक व्यक्तीला जगण्याची इच्छा आहे, आपल्याला आपली उन्नति करून घ्यावयाची आहे त्याचप्रमाणें समाजांतील प्रत्येक माणसाला आत्मोन्नति हवी आहे, आपले न्याय्य हक्क आपल्याला मिळण्याकरितां आपण अधीर झालेले आहों त्याप्रमाणेंच समाजांतील प्रत्येक माणूस आपले कायदेशीर हक्क मिळण्याकरितां धडपड करीत आहे, म्हणून हरएक बाबतींत आपण आपल्याबरोबर समाजांतील सर्व माणसांचे हक्क त्यांना मिळतील हें पाहिलें पाहिजे. म्हणजे आपल्या हक्काच्या आड दुसऱ्याला येऊं देऊं नये व आपण दुसऱ्याच्या हक्कांत अडथळा करूं नये. आपली उन्नति करून घ्यावी; दुसऱ्यांनांहि आपली उन्नति करावयास लावावी.

## प्रकरण ३ रें.

# समाजसेवकाचें शिक्षण.

Of nothing it is more true than it is of social work that the moment you connect any thing, any work, or purpose, or movement, or effort—with God, it immediately becomes sacred, and so becomes great. Social work is work done for man, but not for man only. Man is the material upon which we work, and out of which we seek to achieve our object, the way in which we treat our material will depend upon our conception of the value of the material.

W. EDWARD CHADWICK.

पुष्कळ लोकांना असें वाटतें कीं, समाजसेवकाला समाजसेवेच्या शिक्षणाची मुळींच अवश्यकता नाहीं. त्यांना समाजसेवा इतकी सोपी वाटते कीं, ज्याला कांहीं तरी करावेंसें वाटतें त्याला ती सहज करितां येईल, त्यांत कांहीं विशेष नसतें. अशी त्यांची समजूत असते; मग समाजसेवेच्या शिक्षणाची आवश्यकता कोठें राहिली ? पण समाजसेवेच्या मार्गाची, ध्येयाची व विस्तृत क्षेत्राची ज्याला माहिती आहे व समाजसेवा हें एक नवीन शास्त्रच होऊं पाहत आहे हें ज्याला अवगत आहे तो असें कधींहि म्हणणार नाहीं. इतर व्यवसायांत ज्याप्रमाणें त्या त्या प्रकारच्या धंद्याच्या शिक्षणाची जरूरी असते त्याचप्रमाणें याहि धंद्याचें आहे. किंबहुना इतर सर्व धंद्यांपेक्षां या धंद्याला शिक्षणाची अधिक आवश्यकता आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. कारण या धंद्यांत प्रत्यक्ष माणसांशीं संबंध येतो आणि माणसांशीं वागतांना चूक होणें इतर धंद्यांतील चुकीपेक्षां अधिक हानिकारक असतें हें कोणीहि कबूल करील. पण शिक्षण म्हटलें कीं, नुसतें पुस्तकी शिक्षण असा मात्र याचा अर्थ नाहीं. नुसतें पुस्तकी शिक्षण असल्यानें या धंद्यांत मुळींच चालावयाचें नाहीं. तर पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष ज्ञानाचीहि जरूरी असते. पण येथें हेंहि लक्षांत ठेविलं पाहिजे कीं, नुसतें व्यावहारिक ज्ञानहि असून चालत नाहीं. चांगल्या प्रकारें समाजसेवा करूं इच्छिणाऱ्या समाजसेवकाला पुस्तकी ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव या दोहोंचीहि सारखीच जरूरी असते. अशा प्रकारचें शिक्षण देणाऱ्या संस्था आज आपल्याकडे नसल्या तरी अशा प्रकारचें शिक्षण नको म्हणणें शहाणपणाचें

5029

होणार नाहीं. इंग्लंड अमेरिकेंतसुद्धां तीसपस्तीस वर्षांपूर्वी अशा प्रकारचें समाजसेवेचें शिक्षण देणाऱ्या संस्था नव्हत्या व प्रथम प्रथम तेथील लोकांचीहि समाजसेवकाच्या शिक्षणाविषयीं वरीलप्रमाणेंच समजूत होती. पण आतां इंग्लंड अमेरिकेंतच नव्हे तर कानडा, बेलजम, चिली, झेकोस्लोवाकिया, फिन्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, नेदरलँडस्, साऊथ आफ्रिका, स्वीडन, स्विट्झर्लंड वगैरे ठिकाणीं समाजसेवेचें शिक्षण देण्याच्या शेंकडों संस्था आहेत, लंडन युनिव्हर्सिटीचें सायन्स आणि ॲडमिनिस्ट्रेशनचें रतन टाटा डिपार्टमेन्ट आहे. त्यांत यासंबंधाचा एक किंवा दोन वर्षांचा अभ्यासक्रम असतो व तेथें पुस्तकी ज्ञान व प्रत्यक्ष ज्ञान हीं दोन्ही देतात. विद्यार्थी आठवड्यांतील तीन दिवस वर्गांत जातात व ह्या विषयांवरील व्याख्यानें ऐकतात व पुस्तकें वाचतात, आठवड्यांतील बाकी राहिलेल्या वेळांत कोणच्या ना कोणच्या तऱ्हेचें समाजसेवेचें प्रत्यक्ष काम करितात, कधीं कधीं कांहीं कार्यांत प्रत्यक्ष भाग घेतात व वेळोवेळीं वेगवेगळ्या तऱ्हेचीं कामें पाहून घेतात. त्यामुळें त्यांचें शिक्षण अर्थातच सर्वांगपूर्ण होतें. दुर्दैवानें या विषयाचें स्वतंत्र शिक्षण किंवा दुसऱ्या विषयांना जोडून या विषयाचें शिक्षण देणाऱ्या शाळाकॉलेजें आपल्याकडे नाहींत. परंतु आधुनिक पद्धतीनें होणाऱ्या समाजसेवेची वाढ जोरानें होत असल्यामुळें अशा प्रकारच्या संस्था आपल्याकडेहि हळू हळू निघूं लागतील. मुंबई येथील समाजसेवासंघानें अशा प्रकारचें शिक्षण देण्याचा उपक्रम, अल्प प्रमाणांत का होईना, पण केला आहे.

## सहानुभूति व ज्ञान.

समाजसेवा करूं इच्छिणाराला अवश्य लागणारी पहिली गोष्ट म्हटली म्हणजे ज्यांची सेवा करावयाची त्यांच्याविषयीं पूर्ण सहानुभूति असणें ही होय. समाजसेवा करणारीं माणसें सामान्यतः वरच्या दर्ज्याचीं असतात, त्यांना अनेक गोष्टींची अनुकूलता असते. त्यांची सांपत्तिकस्थिति बहुधा चांगली असते. त्यांना चांगलें शिक्षण मिळालेलें असतें, एकादी गोष्ट हितकारक होईल कीं, अहितकारक होईल हें समजण्या इतके ते सज्ञान असतात आणि त्यांना ह्या सर्व गोष्टी करण्याला फुरसतहि असते. परंतु ज्यांच्यांत त्यांना काम करावयाचें असतें किंवा ज्यांची सुधारणा करण्याचें त्यांनीं पत्करलेलें असतें त्यांना या सर्व गोष्टींची अनुकूलता नसते व ते सर्व बाजूंनीं मागसलेले असतात. याकरितां आपल्या अनुकूल परिस्थितीचा फायदा करून देण्याकरितां पुढें आलेले समाजसेवक या सर्व गोष्टींचा विचार करणारे व त्यांच्याविषयीं सहानुभूति बाळगणारे असल्याशिवाय त्यांच्यानें स्वीकृत कार्य नीटसें होणार नाहीं.

समाजसेवकाला आपल्या कामांत यश येणें वा अपयश येणें हें त्याचे प्रयत्न, ज्या लोकांत त्याला काम करावयाचें असेल त्यांच्याशीं त्याची असलेली वागणूक व त्यांच्या स्थितीविषयींचें ज्ञान यांवर बहुतांशीं अवलंबून राहील. कारण मध्यम व वरिष्ठ वर्गांतील लोक जेव्हां समाजसेवा करूं पाहातात तेव्हां त्यांच्या गरीब वर्गासंबंधींच्या कल्पना कांहीं विलक्षण असतात. त्याचें कारण असें कीं, त्यांनीं जें कांहीं वर्तमानपत्रांतून वाचलें असेल किंवा त्यांना जी ऐकींव माहिती मिळाली असेल—ही माहिती पुष्कळदां एकतर्फीच असते—त्यावरूनच त्यांचीं मतें बनलेलीं असतात. पुष्कळदां ते आपल्या स्वतःच्या स्थितीवरून गरिबांविषयीं काल्पनिक मतें बनवितात, व त्यामुळें तीं अर्थातच वस्तुस्थितीला धरून नसतात. यासाठीं समाजसेवकांनीं आपल्या कामाला सुरवात करण्यापूर्वीं गरीब लोकांची राहाणी व परिस्थिति यांची पूर्ण माहिती प्रत्यक्ष करून घ्यावी व नंतर कामाला सुरवात करून तेथील परिस्थितीला अनुरूप असा आपला कार्यक्रम आंखावा व त्याप्रमाणें वागावें. एखादी गोष्ट केवळ ती आपल्याला करावी असें वाटलें म्हणून ती करूं नये. तशानें अंगीकृत कार्य यशस्वी होणार नाहीं.

काटकसरीनें संसार करून पै पैसा शिल्लक राहील त्याचा संचय करावा अशी मध्यम वर्गांतील कुटुंबांची सामान्य प्रवृत्ति असते व तो एक सद्गुण समजला जातो आणि या सद्गुणाचा फैलाव कनिष्ठ वर्गांत व्हावा व त्यांनीं पैशाची बचत करावी यासाठीं नाना तऱ्हेनें कामगारांना उपदेश करण्यांत येतो. पण तें त्यांच्या स्थितींत कितपत शक्य असतें याचा कोणीहि विचार करीत नाहीं, कारण एक तर आपला नेहमींचा खर्च भागवून शिल्लक टाकण्याइतका, मध्यमवर्गांतील माणसाप्रमाणें, कनिष्ठ वर्गांतील लोकांना रोजमुरा मिळत नाहीं, हें विसरतां कामा नये. दुसरें असें कीं, कदाचित् आपलें पोट बांधून पुढील आयुष्याची तरतूद करण्याकरितां कांहीं पैसे शिल्लक टाकण्याला त्यांनीं सुरवात केली व तें त्यांच्या मालकांना समजलें तर त्यांची मजुरी वाढणें अवश्य असतांनासुद्धां ती कमी होण्याची भीती असते. शिवाय दुसरें कारण असें कीं, मध्यमवर्गांत अर्धपोटीं राहून काटकसर करणें हा गुण समजला जातो, पण कनिष्ठ वर्गांत तो गुण समजण्याऐवजीं त्याला कंजुषपणा हें निंदाव्यंजक नांव दिलें जातें आणि मनाचें औदार्य व हाताचा सढळपणा या गुणांची त्या वर्गांत चहा होते. पुढील महिन्याचा पगार

हातीं येईल किंवा नाहीं याची भ्रांति असतां पगार हातीं पडतांच भिकाऱ्यांना व दीन दुबळयांना भर भर पैसे टाकतांना व इष्टमित्रांना मेजवान्या देतांना आपण कनिष्ठ वर्गातील लोकांना पाहतों व त्यांच्या उधळेपणावर आपण व्याख्यानें देतों. ते आपल्या नातेवाईकांच्या उत्तरक्रियेला फाजील खर्च—स्वतःजवळ पैसे नसले तर दुसऱ्यांचें कर्ज काढून—करितात म्हणून आपण त्यांना दोष देतों. तसेंच त्यांना दुसऱ्या कोणत्याहि मार्गांनीं एकदम पैसे मिळाल्यास ते त्यांच्यापाशीं अल्पकाळहि राहात नाहींत. ते मागचापुढचा विचार न करितां आपलें देणें देण्याच्याहि भरीस न पडतां त्यावेळीं सुचेल त्या गोष्टींत त्यांचा व्यय करितात असा सामान्यपणें गरीब लोकांचा स्वभाव असतो. तसें मध्यम वर्गातील कुटुंबाचें होत नाहीं. त्यांना पगार मिळण्याचा महिन्याचा पहिला दिवस असो, वा पगार संपण्याचा महिन्याचा शेवटचा दिवस असो, सर्व दिवस सारखे. गरिबी असली तर सर्व दिवस गरिबी आणि चांगली स्थिति असली तर महिन्याचे तीसहि दिवस बरी स्थिति. एक दिवस दिवाळी आणि एक दिवस शिमगा अशी स्थिति मध्यम वर्गातील कुटुंबांची बहुधा नसते. पगाराच्या दिवशीं गिरण्या कारखान्यांच्या बाहेर आपल्याला पैपैसा मिळावा म्हणून भिकाऱ्यांची गर्दी असते, पण मध्यम वर्गातील लोकांना पगार कधीं मिळतो त्याची वार्ता ह्या कानाची त्या कानाला लागत नाहीं. या सर्व गोष्टींचें कारण या दोन वर्गातील परिस्थितीचा, शिक्षणाचा, कल्पनांचा व संवयींचा फरक हें होय. यासाठीं निव्वळ उपदेश करून कामगारांची सुधारणा होणार नाहीं. त्यांची परिस्थिति सुधेरल, त्यांच्यांत शिक्षणाचा फैलाव होईल, त्यांच्या कल्पना सुधारतील व त्याच्या संवयी बदलतील असे प्रयत्न झाले पाहिजेत, हें उत्साही समाजसेवकांनीं लक्षांत ठेवावें.

## आढ्यतेचा अभाव.

समाजसेवकानें समाजसेवा करितांना उच्चनीच भावाला कोठेंहि जागा ठेवितां कामा नये. आपण कोणी तरी मोठे गृहस्थ आहोंत, उच्च वर्गातील आहोंत, कामगार लोक अगदीं अडाणी आहेत, त्यांच्या फायद्याकरितां मोठा स्वार्थत्याग करून आपण आलों आहोंत, अशी आढ्यता समाजसेवकांत असतां उपयोगी नाहीं. तसें झालें तर त्याचेकडून काडीइतकीहि समाजसेवा व्हावयाची नाहीं. उलट समाजसेवेच्या मार्गात मात्र तो अडचणी उत्पन्न करील व ज्यांच्यांत काम करावयाचें त्यांचीं मनें मात्र बिथरावील. होतकरू समाजसेवकानें हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, कांहीं बाबतींत तो जसा त्यांच्यापेक्षां मोठा असतो तसा

कांहीं बाबतींत तेसुद्धां त्यांच्यापेक्षां मोठे असतात आणि त्याला कांहीं गोष्टी त्यांना शिकवाव्या लागतील, त्याचप्रमाणें कांहीं गोष्टी त्यांचेकडून त्याला शिकाव्या लागतील. यासाठीं कोणच्याहि बाबतींत अनुभव येण्यापूर्वींच आपण यशस्वी होणार या कल्पनेनेंच उतावीळ होऊन भलत्याच गोष्टी करूं नयेत व मध्यम वर्गाचा दर्जा त्यांना लावून आपल्या उपदेशाप्रमाणें वागत नाहींत म्हणून रागावूं नये. ते आपलेच बांधव आहेत, आपल्याप्रमाणेंच नागरिक आहेत, म्हणून त्यांच्या आशा, आकांक्षा, न्याय, हक्क त्यांना मिळवून देऊन सर्व तऱ्हेनें आपल्या बरोबरीचें करणें हें आपलें कर्तव्य आहे हें मुख्यतः ध्यानांत बाळगावें व त्यांच्याशीं गुण्यागोविंदानें व बरोबरीच्या नात्यानें वागून त्यांच्या अडचणी समजून घेण्याचा प्रयत्न करावा.

कोणच्याहि तऱ्हेच्या लोकांत काम करावयाचें असलें तरी पहिल्या भेटीच्या अनुभवावरून त्यांच्याविषयीं अंदाज बांधूं नये. कारण पहिल्या भेटीचा अनुभव हा नेहमीं खरा नसतो. प्रथम भेटीच्या वेळीं आपले पूर्वग्रह आपल्या डोक्यांत वावरत असतात. ते बदलण्यास बराच अनुभव यावा लागतो. विशेषतः ज्या लोकांत आपण मिसळत नाहीं, ज्यांच्यांत आपलें जाणेंयेणें नसतें, ज्यांना आपण नेहमीं कमी समजता, त्यांच्याविषयींची माहिती काय ती आपल्याला लोकांच्या सांगण्यावरून झालेली असते आणि तींत बहुतकरून अतिशयोक्तीचा भाग फार असतो. याकरितां अशा लोकांत कांहीं काळ काम केल्याशिवाय त्यांच्या स्थितीविषयीं उगाच कांहीं तरी तर्क करूं नयेत. त्यामुळें फार मोठ्या चुका होण्याचा संभव असतो. कधीं कधीं या समाजांतील लोक जे आपल्याकडे कामधंद्याला असतात किंवा ज्यांची आपल्याकडे येजा असते अशांच्या वागणुकीवरून त्या सर्व समाजाविषयीं आपण कल्पना करितों आणि ते उधळे असतात, दारूबाज असतात, त्यांना दुसरीं नानाप्रकारचीं व्यसनें असतात, त्यांना आपली स्थिति कळत नाहीं, असें आपण म्हणतों. पण एखाद्यादुसऱ्या किंवा चारदोन माणसांवरून सर्व समाजाची परीक्षा करणें कधीं तरी शहाणपणाचें होईल काय? तसेंच जेथें भिक्षा किंवा दुसऱ्या कांहीं प्रकारची धर्मार्थ मदत केली जाते तेथें जमणाऱ्या लोकांच्या स्थितीवरूनहि साऱ्या समाजाची स्थिति अजमावणें योग्य होणार नाहीं. स्वाभिमान नाहींसा झाल्याखेरीज खरोखरीच कोणी दान आनंदानें स्वीकारित नसतो. यामुळें दाता व दान घेणारा यांचें परस्परांविषयीं अनुकूल मत असणें शक्य नसतें.

गरीब लोकांत काम करूं इच्छिणारानें त्या लोकांच्या राहाणीकडे लक्ष देऊन वागण्यास विसरूं नये. कारण पुष्कळ वेळां असा अनुभव येतो कीं, कांहीं समाजसेवक बूटस्टॉकिंग, नेकटाय, कॉलर लावून गलिच्छ वस्तींत समाजसेवा करावयास जातात. पण ज्यांना सांजसकाळ पोटभर जेवावयास मिळण्याची पंचाईत त्यांचेकडे अशा लोकांना बसण्याकरितां खुर्च्या असणें संभवनीय नसतें आणि असे लोक तेथें गेले म्हणजे यांना बसावयास देण्यापासून त्यांना तजवीज करावी लागते. त्यामुळें अर्थातच अशा समाजसेवकांना लोकांत मिळून मिसळून काम करणें शक्य होत नाहीं. वेळ पडेल त्याप्रमाणें ओट्यावर, पाटावर किंवा जमिनीवर बसून काम करणारा, लोकांना आपली उठाबस करावयास न लावणारा समाजसेवक असला तरच लोकांनाहि त्याचेविषयीं आपलेपणा वाटतो व त्याचें कार्य सुखकर होतें. गोरगरीबांनाहि मानाची चाड असते हें विसरून कामाला सुरवात करण्यापूर्वींच अरे तुरे करणारे किंवा आपण खुर्चीवर बसून लोकांना तिष्ठत उभें करून त्यांची उलटतपासणी करणारे कांहीं समाजसेवक असतात. पण ज्यांना साधे शिष्टाचारहि कळत नाहींत अशा शिष्ट लोकांनीं समाजसेवेच्या फंदांत पडूं नये हेंच शहाणपणाचें. लोकांशीं अहंपणानें व तुसडेपणानें वागणारे लोक ज्याप्रमाणें समाजसेवा करण्यास नालायक असतात त्याचप्रमाणें लोकांशीं अगदीं मिळून जाऊन सर्व बाबतींत त्यांच्याप्रमाणें झालेले लोकहि समाजसेवा करण्यास योग्य नसतात. कारण लोकांची उन्नति करणें हें समाजसेवेचें ध्येय असतें. म्हणून आपली अवनति करून आपला दर्जा कमी करून घेतलेला मनुष्य लोकांची सुधारणा करून त्यांचा दर्जा कसा वाढवूं शकणार ? यासाठीं समाजसेवकानें समाजसेवा करिते वेळीं लोकांची उन्नति करितांना आपली अवनति न होण्यासाठीं जपलें पाहिजे.

## धिम्मेपणा.

समाजसेवकानें लक्षांत बाळगण्यासारखी एक महत्वाची गोष्ट अशी आहे कीं, हातीं घेतलेलें कोणतेंहि काम धिम्मेपणानें न करितां कामाला सुरवात करतांक्षणींच तें यशस्वी होण्याबद्दल उतावीळ होणें गैर होय. समाजसेवेचीं कामें अशीं असतात कीं, एक तर त्यांचीं इष्ट फळें बहुत करून तत्काळ दिसत नाहींत आणि कदाचित् तीं तशीं दिसलीं तरी तीं इतक्या मंदगतीनें दिसतात कीं, अधिऱ्या माणसाला तीं निराशाजनक वाटल्याशिवाय कधींहि रहात नाहींत.

म्हणून आपल्या कामाचे इष्ट परिणाम दिसत नसले तरी आपलें काम योग्य दिशेनें होत आहे याची खातरजमा करून धिम्मेपणानें, तात्कालिक यशाची अपेक्षा न करितां काम सतत चालू ठेविलें पाहिजे तरच त्याचे हातून चांगलें कार्य होईल. समाजसेवेंत कठीण असतें तें हेंच कीं, काम अखंड चालू ठेवावें लागतें. अपुरें सोडलें तर केलेलेंहि काम फुकट जाण्याचा संभव असतो. उतावळेपणानें कामाचा बिघाडहि होतो.

कांहीं समाजसेवकांना वाटतें कीं, आपण लोकांकरितां इतकें काम करीत असतांहि ते आपल्याविषयीं कृतज्ञता दाखवीत नाहींत. पण एक तर अशा कृतज्ञतेची अपेक्षा करणें म्हणजे आपण कृतज्ञतेच्याच आशेनें काम करीत आहों असें दाखवून आपल्या कामाची किंमत कमी करून घेणें होय. दुसरें, आपण आपल्या मनाशीं असा विचार केला पाहिजे कीं, लोकांनीं आपले उपकृत होण्यासारखें लोकांचें आपण कितपत हित केलें आहे. खरोखरी लोकांनीं आपली इतकी स्तुति करण्याइतकें आपल्याकडून बहुधा कांहीं झालेलें नसतें आणि आपण कांहीं केलें असलें तरी तें इतकें अल्प असतें कीं त्याचा इतका बोलबाला करण्याइतकें त्याचें महत्व नसतें. मग अशा कामाची लोकदृष्ट्या मातब्बरी ती काय राहिली? इतकें करूनहि लोकांनीं स्तुति करण्यासारखें खरोखरीच लोकोपयोगी कार्य आपल्याकडून झालें असलें तर त्याचें महत्व न जाणण्या इतके नादान लोक सामान्यता कोणत्याहि समाजांत नसतात. पण समाजसेवा करण्याचें नुसतें ढोंगच असलें आणि तें समाजाला न रुचून त्याचा स्फोट झाला तर त्यांत दोष कोणाचा ? मात्र बहुरूप्यांनीं अनेकदां फसविल्यामुळें पुष्कळदां खोट्याच्या मापानें खरेंहि मापलें जातें. पण लोकांची खात्री होण्या इतका जर त्यांत खरेपणा असला तर तें शेवटीं यशस्वी व्हावयाचेंच आणि चाळणींत ज्याप्रमाणें धान्य व भूस वेगळें केलें जातें त्याप्रमाणें समाज साव व चोर अलग करूं शकतो. मानाच्या किंवा पैशाच्या आशेनें केलेली समाजसेवा केव्हांहि खरी नव्हे.

समाजसेवा अनेक प्रकारें करितां येत असल्यामुळें समाजसेवसंबंधाच्या प्रश्नांचा शास्त्रीय दृष्ट्या विचार करणारे पुष्कळ लोक असतात. त्यांना त्या विषयांची प्रत्यक्ष माहिती नसली तरी शास्त्रीय दृष्ट्या त्यांनीं त्या विषयावर पुष्कळ विचार केलेला असतो. अशा गृहस्थांनीं थोडेंबहुत प्रत्यक्ष काम करून आपण काढिलेल्या अनुमानांचे प्रयोग करून पाहावे. नुसत्या आंकडेशास्त्रावर अवलंबून राहूं नये. कारण हीं अनुमानें व हे तर्क साफ खोटीं असण्याचा संभव असतो, इतकेंच नव्हे तर कधीं कधीं प्रत्यक्ष अनुभव त्यांच्या अगदीं उलट येतो.

समाजसेवकांचा एक वर्ग असा आहे कीं, त्याला समाजांतील एखादद्दुसराच अन्याय दिसतो आणि त्याच्यामुळेंच सारी संकटपरंपरा समाजावर आली आहे असें त्यांचें मत असतें. दुसऱ्या तिरस्करणीय गोष्टी त्याला दिसत नाहींत, त्याची दृष्टि दूरवर पोचत नाहीं आणि साध्या गोष्टींचा शांत चित्तानें विचार करण्या इतकी स्थिर वृत्ति त्याची नसते. त्यामुळें तो ह्या एकाच गोष्टीचें चिंतन करीत असतो. त्याला त्या गोष्टीचें वेडच लागतें. प्रत्येक गोष्टींत निष्कारण आपल्या आवडत्या विषयाचा संबंध आणून त्याचें ह्मणणें न पटणाऱ्या लोकांना तो नेहमीं शिव्याशाप देत असतो. दुसरे समाजसेवक त्याच्या मतें भलत्याच दिशेनें कामें करीत असल्यामुळें साऱ्या समाजाची ते प्रगति खुंटवीत आहेत असें त्याला वाटतें. अशा विक्षिप्तपणामुळें त्यांचें कोणाशीं पटत नाहीं व आपल्या कल्पना प्रत्यक्ष अंमलांत आणून तेवढेंच कार्य यशस्वी करण्याइतकीहि धमक त्यांच्यांत नसते. अशा वाचस्पतींना शक्य तर प्रत्यक्ष काम करावयास लावणें हाच त्यांच्या विवक्षित रोगावर रामबाण इलाज होय. पण ' करील तो बोलणार नाहीं ' ही म्हण येथेंहि खरी ठरते. मनुष्य प्रत्यक्ष कामाला लागला म्हणजे त्याला बोलण्याला फुरसत मिळत नाहीं आणि फुरसत मिळाली तरी बोलावेंसें वाटत नाहीं. त्याला आपलें काम लोकप्रिय करण्यालासुद्धां एखादा धंदेवाईक वक्ता शोधावा लागतो.

कामाचा अनुभव नसलेल्या माणसांना नेहमीं असें वाटतें कीं साऱ्या अनिष्ट गोष्टी चुटकीसरशा नाहींशा कराव्या. पण सामाजिक अन्याय असे चटदिशीं नाहींसे करितां येण्यासारखे नसतात. कारण त्यांचीं पाळेंमुळें अगदीं दूरवर पोंचलेलीं असतात. कित्येक गोष्टी तर शतकेंच्या शतकें चाललेल्या असतात आणि त्या नाहींशा करण्याला शेंकडों वर्षें लागलीं नाहींत तरी बराच दीर्घकाल लागतो हें विसरून चालणार नाहीं. कांहीं गोष्टी कदाचित् अल्पावधींत नाहींशा करितां येतील पण त्यांचे परिणाम लवकर जाण्यासारखे नसतात. आणि त्यांची प्रतिक्रिया होऊन त्यांतून दुसरेंच एखादें अरिष्ट उत्पन्न होऊं नये म्हणून साऱ्या गोष्टी धीरानें पण निश्चयानें कराव्या लागतात. झटपट रंगाऱ्याची कर्तबगारी येथें अपयशी ठरते.

ज्या लोकांत आपल्याला काम करावयाचें असतें तीं माणसें सुशिक्षित किंवा अधिक समंजस असण्याचा फारसा संभव नसतो. ज्या गोष्टी आपल्याला सहज समजण्यासारख्या असतात त्या त्यांना समजावून देण्यास पुष्कळ प्रयास पडतात. म्हणून पूर्वतयारी करणें, त्यानंतर प्रत्यक्ष कामाला लागणें, पुढें त्या कामाचें

महत्व लोकांना कळून त्याचा इष्ट परिणाम दिसावयास लागणें याला सहाजिकच बराच काळ जावा लागतो आणि हा सारा वेळपर्यंत समाजसेवकाला धिम्मेपणानें काम करावें लागतें. पुष्कळांना हा वेळ फुकट गेल्यासारखें वाटतें, पण वस्तुस्थिति तशी नसते. तसेंच समाज म्हटला कीं त्यांत सर्व तऱ्हेचीं माणसें असावयाचींच. तरुण असतात त्यांना साऱ्याच गोष्टी चुटकीसरशा व्हाव्या असें वाटतें. वयोवृद्ध असतात त्यांचा दमानें घ्या हा महामंत्र वेळीं अवेळीं सारखाच चालू असतो, कांहीं जाणून आपला उर्गीज गैर समज करून घेतात तर कांहीं निव्वळ विघ्नसंतोषी असतात. अशा समाजांत कांहीं थोडे विक्षिप्त लोकहि आढळावयाचे व त्यांना टाकूनहि चालण्यासारखें नसते. अशा अनेक स्वभावाच्या लोकांपैकीं कांहींशीं मी फटकून वागेन असें म्हणून समाजसेवकाचें चालावयाचें नाहीं. त्याला जसा प्रसंग येईल तसें वागणें भाग असतें. याकरितां समाजसेवकांत सोशिकपणा असावा लागतो, न्यायान्याय व प्रसंग पाहून वागावें लागतें आणि सर्वांकरितां व सर्वांपेक्षां जास्त श्रम करण्याची व कष्ट सोसण्याची तयारी असावी लागते.

## तपशीलवार माहितीची आवश्यकता.

समाजसेवकाला ज्या समाजांत काम करावयाचें असतें त्या समाजाची त्याला संपूर्ण माहिती असावी लागते. कारण पुष्कळदां तो ज्या समाजांत लहानाचा मोठा झालेला असतो त्याचीहि त्याला फारशी माहिती नसते किंवा ज्या ठराविक भागांत तो राहातो त्याव्यतिरिक्त त्याला कांहींच माहिती नसते. यांतील पुष्कळशी माहिती पुस्तकांतून मिळण्यासारखी नसते. ती जसजशी मिळेल तसतशी प्रत्यक्ष अनुभवानेंच मिळवावी लागते. एखाद्या गरीब वस्तींत सहा महिने राहिल्यानें तेथील लोकांविषयीं जो अनुभव मिळेल तितकें ज्ञान कैक पुस्तकेंहि वाचून मिळणार नाहीं. पण पुस्तकी ज्ञानाचाहि तिटकारा करून चालणार नाहीं हें वर आलेंच आहे. कांहीं लोकांची अशी समजूत असते कीं, प्रत्यक्ष माहिती मिळाल्यावर पुस्तकी ज्ञानाची अवश्यकता नसते. पण पुस्तकें हें अनेक वर्षांच्या आणि लोकांच्या श्रमाचें व अनुभवाचें भांडार असतें म्हणून त्यांचा जर त्यानें उपयोग करून घेतला नाहीं तर त्याच्यासारखा दुर्दैवी दुसरा कोणी नाहीं असें म्हणावें लागेल. शिवाय निरनिराळीं माणसें व निरनिराळे समाज आपापल्या समजुतीप्रमाणें समाजसुधारणेच्या बाबतींत वेगवेगळाले प्रयत्न व प्रयोग सतत करीत असतात. अशांचा अनुभव व आपला अनुभव

यांच्या तुलनात्मक ज्ञानानें आपलें कोठें चुकत आहे व दुसरा कोठें चुकतो हें कळतें व त्याप्रमाणें आपल्या कार्यक्रमांत सुधारणा करण्याची संधि मिळते हा काय कमी फायदा ? तसेंच सरकारनें व म्युनिसिपालिटयांनीं प्रसिद्ध केलेल्या अनेक प्रकारच्या अहवालांत समाजसेवकाला अवश्य लागणारी पुष्कळ माहिती असते तिचाहि त्याला चांगला उपयोग होतो.

समाजसेवकाला ज्या ठिकाणीं काम करावयाचें असतें तेथें चाललेल्या मुख्य उद्योगधंद्याची माहिती असावी लागते. कारण तेथील गरीब लोकांचा त्या धंद्याशीं संबंध असतो व धंद्याच्या तेजीमंदीवर त्यांचें बहुतेक सुखदुःख अवलंबून असतें. तसेंच तेथील सामाजिक व औद्योगिक स्थितीचा इतिहासहि त्याला अवगत असावा लागतो. कारण समाजांत आज जी आपण अस्वस्थता पाहातों किंवा समाजांत ज्या अनिष्टकारक गोष्टी आपल्याला दिसतात ह्या सर्वांना आजचीच स्थिति कारणीभूत झालेली असते असें नाहीं, तर त्याचीं पाळेंमुळें फार खोलपर्यंत गेलेलीं असतात. आपल्या अनेक पूर्वजांनीं जीं अनेक प्रकारचीं बरींवाईट कृत्यें केलेलीं असतील त्यांत या असंतोषाचें मूळ असूं शकेल. ज्यांना आपण जुन्या पद्धतीप्रमाणें वागतों असें वाटतें व ज्यांना जुन्या पद्धतीचा अभिमान वाटतो त्यांची ती जुनी पद्धत एक दोन पिढ्यांपेक्षां पुष्कळदां जुनी नसते. तेव्हां आपला देश कृषिप्रधान स्थितीपासून बदलत जाऊन आजच्या स्थितीला कोणकोणचीं स्थित्यंतरें होत होत आला याचा विश्वसनीय इतिहास माहीत असल्याशिवाय आज प्रामुख्यानें दिसणाऱ्या कित्येक गोष्टींचें मूळ सांगतां येणार नाहीं. कोण-त्याहि समाजाची खरी प्रगति होण्याला त्याची सर्व बाजूंनीं सुधारणा व्हावी लागते असें सर्वमान्य पुढारी कैक वर्षें सांगत आले असतांहि अजून सामाजिक गोष्टींपेक्षां राजकीय गोष्टींनाच अधिक महत्व दिलें जातें. शाळांत शिकविला जाणारा इतिहास बहुतेक राजकीय बाबींनींच भरलेला असतो. त्यांत सामाजिक गोष्टींचा क्वचित् कोठें उल्लेख असला तरी तो अपुरा, तुटक तुटक आणि राजकीय गोष्टींना धरून असतो. सामाजिक स्थित्यंतराची संगतवार माहिती कोठेंहि दिली जात नाहीं. शिवसंभव, राजसंन्यास, बेबंदशाही अशीं नाटकें वाचलीं कीं अगदीं अलीकडे राजकीय परिस्थितींत लोकांची सामाजिक परिस्थिति कशी असेल याची थोडीबहुत कल्पना येऊन मनांत कालवाकालव होते. पण कल्पना आणि वस्तुस्थिति यांत महदंतर असतें. एखादें पोरकें पोर जसें असावें त्याप्रमाणें समा-जाची सामाजिक इतिहासाच्या बाबतींत स्थिति झाली आहे. त्या मातृपितृहीन

अर्भकाला आपल्या मातापित्याविषयीं माहिती काय ती लोकांनीं सांगितलेल्या खऱ्याखोट्या गप्पांवरून झालेली असते तद्वत्वत्‌च आपल्या सामाजिक इतिहासाविषयीं झालें आहे. यासाठीं अधिकारी माणसानें लिहिलेल्या संगतवार सामाजिक इतिहासाची अत्यंत आवश्यकता आहे.

विशेषतः सामाजिक घडामोडी कशा होत आल्या, अलीकडील मोठमोठे गिरण्याकारखाने अस्तित्वांत येण्यापूर्वीं येथें कशी स्थिति होती, गिरण्याकारखाने सुरू होतांना कशी होती व त्याचे समाजावर कसकसे परिणाम होत आले तसेंच तत्कालीन समाजसेवकांनीं सामाजिक अन्यायाचा प्रतिकार करण्याकरितां कसकसे प्रयत्न केले व त्यांचा तत्कालीन समाजावर काय परिणाम झाला हें आजच्या समाजसेवकाला अवगत असणें जरूरीचें आहे. त्याचप्रमाणें औद्योगिक दृष्ट्या जगाची व आपल्या देशाची काय स्थिति आहे, जगांतील राष्ट्रांपैकीं एक जुनें राष्ट्र या दृष्टीनें आपल्या देशाची आज काय योग्यता आहे, कामगार व कारखानदार यांचे परस्परांशीं संबंध पूर्वीं कसे होते व आज कसे आहेत अशा सारख्या प्रचलित प्रश्नांची माहिती समाजसेवकाला असणें अगदीं जरूरीचे आहे. लोकांच्या राहाणींत कसकसे कमी जास्त फेरबदल होत आले आहेत व होत आहेत हें कळण्यासाठीं अर्थशास्त्राचीहि ठोकळ माहिती समाजसेवकाला असावयास हवी.

प्रांतिक व मध्यवर्ती कायदे मंडळांची रचना कशी आहे, दुष्काळनिवारणार्थ व तशाच प्रकारच्या समाजसेवेच्या कक्षेंत येणाऱ्या दुसऱ्या प्रश्नांसंबंधीं सरकारनें काय केलें आहे व त्या बाबतींत त्याचें काय धोरण आहे याची माहिती समाजसेवा करूं इच्छिणारानें अवश्य करून घ्यावी. तसेंच या प्रश्नांसंबंधीं इतर राष्ट्रांनीं कसकसे प्रयत्न केले आहेत व ते कितपत सफळ झाले याचेकडेहि समाजसेवकाचें लक्ष्य असावें. समाजसेवा करितांना म्युनिसिपॅलिटी, सरकार व दुसऱ्या धर्मादाय संस्थायांच्याशीं समाजसेवकाचा नेहमीं संबंध यावयाचाच म्हणून त्यानें या निरनिराळ्या संस्थाशीं सहकारितेनें वागून त्यांच्या इतिहासाची माहिती घ्यावी. यामुळें सामाजिक प्रश्नांसंबंधीं लोकमत कसें तयार होत आलें हें कळतें इतकेंच नव्हे तर कोणत्या संस्थांनीं कोणतें ध्येय ठेवल्यामुळें किंवा मुळींच ध्येय न ठेवल्यामुळें त्यांना यश वा अपयश आलें आणि म्हणूनच आपण कोणतें ध्येय पुढें ठेवणें हितावह होईल हें ठरविण्यास ठीक पडतें.

## ध्येय व तत्त्वें.

कांहीं लोक असे असतात कीं, ते कोणतें तरी काम करित असतात. पण त्यांच्यापुढें अमुक एक ध्येय असें नसतें. वाऱ्याप्रमाणें वाहत जाण्याचें हें धोरण केव्हांही इष्ट नाहीं. प्रत्येक व्यक्तीला व संस्थेला कांहीं तरी ध्येय हें हवेंच व तें परिस्थित्यनुरूप बदललेंहि पाहिजे. तसें न केलें तर आपण केव्हांच मागें पडूं त्याचा थांगहि लागणार नाहीं. करितां आपल्याला कोंठें जाऊन पोंचावयाचें आहे हें निश्चित केल्याशिवाय मार्गक्रमण करावयास लागणें केव्हांहि धोक्याचें असतें. प्रत्येक व्यक्तीला किंवा संस्थेला मोठें व्यापक ध्येय आपल्यापुढें ठेवितां येईल असें नाहीं. तरी पण आपल्या परिस्थितीप्रमाणें व आपल्या सामर्थ्याप्रमाणें होता होईल तितकें मोठें ध्येय आपल्यापुढें असावें व तें समाजाच्या एकंदर ओघाला अनुरूप किंवा समाज ज्या दिशेनें जावा असें आपल्याला वाटत असेल त्याला पोषक असें असावें. तसेंच आजचा काल हा तज्ज्ञांचा आहे. प्रत्येक बाबीसंबंधीं थोडथोडी माहिती, पण एखाद्या विषयाविषयीं संपूर्ण माहिती असणें हें आजच्या काळाला अवश्यक मानलें जातें. यासाठीं प्रत्येक समाज-सेवकानें आपल्याला जरूर लागणाऱ्या सर्व विषयांची थोडथोडी माहिती करून घ्यावी. पण आपल्याला अवश्यक आणि आवडत्या अशा एका विषयाचा पाया-शुद्ध अभ्यास करावा व त्यांत पारंगत व्हावें.

येथें एक धोक्याची सूचना देणें अवश्य वाटतें. समाजसेवा ही कांहीं तरी करावें म्हणून सामान्यतः कोणी करीत नाहीं. समाजसेवेचीं कांहीं ठराविक तत्वें आहेत व त्यांच्या अनुरोधानें प्रत्येक समाजसेवक आपलें कार्य करीत असतो. करितां ही तत्वें ज्यांच्या स्वार्थाच्या आड येण्याचा संभव असतो ते आपमतलबी लोक समाजसेवक आपलें तत्व सोडून दुसऱ्या दिशेला वळावा म्हणून कधीं बऱ्या तर कधीं वाईट मार्गांचें अवलंबन करतात. स्वार्थलोलुप माणसांचे हे प्रयत्न केव्हां केव्हां दिसण्यांत इतके सरळ व साधे असतात कीं ते धोपट मार्गानें जाणाऱ्या समाजसेवकांच्या लक्षांत येत नाहीं. याकरितां प्रत्येक समाज-सेवकानें आपलें काम म्हणजे प्रत्यक्ष ईश्वरसेवा आहे हें ध्यानांत ठेवून सावध-पणानें पण मानाच्या किंवा वित्ताच्या लोभास बळी न पडतां समाजसेवा करीत राहावें.

पद्धतशीर शिक्षण घेतलेल्या अनुभवी समाजसेवकाला आपलें स्वतःचें काम

करावयाचें असतेंच, त्याशिवाय दुसऱ्यांच्या कामावर त्याला देखरेख करावी लागते. पण या सर्वांपेक्षां त्याचें अधिक महत्वाचें काम म्हटलें म्हणजे नवशिक्या व फुरसतीप्रमाणें काम करणाऱ्या समाजसेवकांना दुसऱ्याला पद्धतशीर रीतीनें मदत कशी करावी हें शिकविणें हें होय. कारण समाजसेवेचें शिक्षण संपादन केलेल्या व समाजसेवेला वाहून घेतलेल्या समाजसेवकांपेक्षां तें न घेतलेले व सवड मिळेल तेव्हांच समाजसेवा करणारे स्वंयसेवक पुष्कळ असतात. आणि कामाचा अनुभव नसल्यामुळें त्यांच्याकडून हमेशा चुका होतात, इतकेंच नव्हे तर महाप्रयासानें जुळवून आणिलेलें काम त्यांच्या चुक्यांमुळें किंवा अनियमितपणामुळें बिघडण्याचा किंवा कायमचें बंद पडण्याचा संभव असतो. करितां त्यांना कामाची समजूत देणें व दिशा लावून देणें हें समाजसेवेच्या दृष्टीनें फार महत्वाचें असतें.

## आवड व तारतम्य.

समाजसेवेच्या कार्यांत अत्यंत महत्वाची बाब जर कोणती असेल तर ती समाजसेवेची आवड ही होय. पुष्कळ गोष्टी अशा असतात कीं त्या करावयाच्या आपल्या मनांत नसतात. तथापि एकदांचें काम पुरें करावयाचें म्हणून त्या कशा तरी आपण पुऱ्या करितों. पण समाजसेवेच्या बाबतींत असें कदापि करितां येत नाहीं. एखाद्या समाजसेवेच्या कामाची जर आपल्याला आवड वाटत नसेल, आपल्यावर लादलेलें आहे एवढ्याकरितांच तें कसें तरी एकदाचें शेवटास पोंचविलें पाहिजे असें जर आपल्याला वाटत असेल तर तें कितीहि महत्वाचें असलें तरी आपल्याकडून कधींही चांगल्या रीतीनें व्हावयाचें नाहीं. समाजसेवा करण्याची प्रबल इच्छा असल्यावांचून समाजसेवा होऊं शकत नाहीं. समाजसेवेचीं अनेक कामें कशीं तरी रडत कढत चाललेलीं आपण पाहातों त्याचें कारण ही अनास्था त्यांच्या मुळाशीं असते हें होय. यासाठीं समाजसेवकाला ज्या कामाबद्दल खरोखर आवड वाटत असेल तेंच काम त्यानें हातीं घ्यावें. नाहीं तर जुलमाचा रामराम म्हणून त्यानें हातीं घेतलेलें काम त्याला अर्धवट सोडावें लागेल किंवा तें अपुरें सोडावयास दुसरे लोक त्याला भाग पाडतील.

समाजसेवा करितांना नेहमीं तरतमभाव राखावा लागतो. कोणचें काम जरूरीचें आहे, कोणचें जरा वेळानें केलें तरी चालेल, तसेंच एक गोष्ट आज केल्यानें तिचे परिणाम पुढें काय होतील, आज चांगलें दिसलें तरी तें समाजाला बाधक होईल

किंवा काय, आज काल थोडी कळ सोसावी लागली तरी चालेल पण पुढें त्याच्या चौपट त्रास होणाचा व पश्चात्ताप करण्याचा प्रसंग येऊं नये, अशा तऱ्हेनें अनेक गोष्टी समाजसेवकाला पाहावयाच्या असतात. आणि त्या साऱ्या धीरानें पण निश्चयानें करणारा समाजसेवक असावा लागतो.

समाजसेवकानें नेहमीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं तो जसा संस्थेत किंवा एका दिशेनें समाजसेवेचें काम करित असतो त्याच प्रमाणें दुसऱ्या संस्थांतील किंवा दुसऱ्या दिशांनीं काम करणारे लोक असतात. आपल्या कामाला ज्याप्रमाणें आपण महत्वाचें समजतों त्याचप्रमाणें इतर लोकहि आपल्या कामाला विशेष महत्व देतात. करितां एकानें दुसऱ्याचा द्वेष करणें किंवा दुसऱ्याचें काम कमी महत्वाचें समजणें कधींहि चांगलें नाहीं. प्रत्येकाला आपलें काम महत्वाचें व अत्यंत अवश्यक वाटणें साहाजिकच असतें व तें एका दृष्टीनें खरेंहि असतें. याकरितां एकमेकाच्या कामाची निंदा व हेवा न करितां दुसरे करित असलेल्या कामाबद्दल त्यांना योग्य मदत देऊन प्रत्येकानें आपलें काम करावें हेंच विचारी माणसाला योग्य व सर्वांच्या फायद्याचें होतें.

ज्या लोकांत किंवा ज्यांच्याकरितां आपण काम करीत असूं त्यांचा विश्वास संपादन करणें हें आपण हातीं घेतलेलें काम यशस्वी करण्याच्या दृष्टीनें फार महत्वाचें असतें. म्हणून तें कार्य सफल होण्याकरितां आपण किती उत्सुक आहों याची खात्री पटवून व आपली वागणून सचोटीची व सरळ ठेवून लोकांचा विश्वास संपादन केल्यास अंगीकृत कार्य करण्यास अगदीं सोपें जातें.

सुशिक्षित समाजसेवक आपलें काम चालचलाऊ करूनच समाधान मानणार नाहीं. साऱ्या संकटपरंपरेचें मूळ कोठें आहे त्याचा छडा लावण्यासाठीं तो हर प्रयत्न करील व त्यानें तसें करावें अशी लोकांची अपेक्षाहि असते.

समाजसेवकाला अवश्य असणाऱ्या बऱ्याच गोष्टींची मालिका वर दिलेली आहे तथापि ती पूर्ण आहे असें कोणीं समजूं नये. समाजसेवकाला दुसऱ्या अनेक गोष्टींची अवश्यकता असते, कारण त्यांना समाजांत सर्व तऱ्हेच्या माणसांशीं वागावयाचें असतें आणि म्हणून सर्व तऱ्हेच्या माणसांचा संबंध येणाऱ्या गोष्टींची त्याला ओळख असावी लागते. तसेंच सर्व समाजसेवकांत या साऱ्या गोष्टी असतील असेंहि नाहीं. मनुष्यस्वभावाप्रमाणें त्या कमी जास्त असावयाच्याच. पण परोपकारी व मनमिळाऊ स्वभाव, कामाची हौस आणि तारतम्य एवढी सामुग्री कोणालाहि समाजसेवेच्या क्षेत्रांत प्रवेश करण्याला पुरेशी होईल असें साधारणपणें म्हणावयास हरकत नाहीं.

---

## प्रकरण ४ थें.

# दान.

Charity is a kind of friendship towards God.

C. S. Loch.

दुःखी प्राण्यांची सेवा करण्यांत ईश्वरसेवा होतच असते. त्या सेवेंत विवेक मात्र पाहिजे. भुकेल्याला अन्न देण्यांत सेवाच होते असें मानण्याचें कारण नाहीं. आळशी मनुष्य दुसऱ्याच्या आश्रयावर बसून राहील आणि अन्नाची आशा राखील तर त्याला अन्न देण्यांत पाप आहे आणि काम करण्यास तो तयार नसल्यास उपाशीं राहूं देण्यांत त्याची सेवा आहे.

**महात्मा गांधी.**

समाजांत अनेक कारणांमुळें लोक विपन्नावस्थेस पोंचलेले असतात. कांहींची मानसिक स्थिति बिघडलेली असते, कोणी शरिरानें व्यंग असतात आणि कोणी सांपत्तिक अडचणींमुळें हीन स्थितीला पोंचलेले असतात. अशा नानाविध दुःखांनीं विव्हळणाऱ्या माणसांना आपापल्या परीनें मदत करणाऱ्या व त्यांचें दुःख हलकें करणाऱ्या अनेक संस्था सार्वजनिक पैशांनीं चाललेल्या असतात. या सर्वांना आपण धर्मार्थ संस्था म्हणतों. या संस्थांचा उपयोग करून घेणाऱ्या लोकांना त्यांच्यावर आपला हक्क आहे असें वाटतें. पण वस्तुतः त्या संस्थांवर त्यांचा मुळींच हक्क नसतो; कारण त्या देणारानें आपखुशीनें दिलेल्या देणग्या असतात. उलट पक्षीं सरकारी कायद्यानें झालेली गरिबांची तरतूद, शाळांतील मुलांना फुकट देण्यांत येणारें जेवण, धर्मार्थ दवाखाने, हॉस्पिटलें वगैरे संस्थांवर लोकांचा हक्क असतो; कारण संघटित समाजानें सर्व लोकांकडून करांच्या रूपानें वसूल केलेल्या समाजांतील पैशांतून दीन दुबळ्या लोकांकरितां मुद्दाम केलेली ती व्यवस्था असते. त्यांना आणि ज्या नागरिकांकरितां ती व्यवस्था केलेली असते तिचा उपयोग हक्कानें करून घेतां येतो. आणि याचा हेतु हा असतो कीं, ज्या लोकांना गरीबीमुळें स्वतः पैसे खर्च करून औषधोपचार करितां येत नाहींत व ज्यांना अशा प्रकारची धर्मार्थ मदत न मिळाल्यास त्यांचेंच नव्हे तर पर्यायानें साऱ्या समाजाचें नुकसान होण्याचा संभव असतो त्यांना मदत व्हावी. कांहीं धर्मार्थ संस्थांच्या बाबतींत

दाते अमुक जातीचा, धर्माचा किंवा लोकांचा या संस्थेवर हक्क आहे असें आपल्या मृत्युपत्रांत लिहून ठेवितात ही गोष्ट खरी, परंतु तो हक्क अगदीं खाजगी स्वरूपाचा असतो. तो सार्वजनिक हक्क नाहीं. कारण तसा राष्ट्राचा कायदा झालेला नसतो, तर फक्त दात्याची तशी इच्छा असते.

## दान व समाजसेवा यांमधील भेद.

दान आणि समाजसेवा यांच्यातील भेद लक्षांत ठेवण्यासारखा आहे. समाजसेवा (social service) म्हणजे जातीनें केलेली सेवा होय; मग त्या वैयक्तिक सेवेशिवाय त्या माणसानें दुसऱ्या कांहीं देणग्या दिलेल्या असोत वा नसोत. पण दान (charity) म्हटलें म्हणजे फक्त पैशाचीच देणगी होय. त्यांत व्यक्तीच्या वेळेचा, श्रमाचा किंवा विचाराचा स्वार्थत्याग नसतो. ती नुसती देणगी असते. समाजसेवेंत कोणतें कार्य करण्याची आवश्यकता आहे याचा विचार करणें व त्या गोष्टी प्रत्यक्ष करणें हें दुसऱ्यावर सोंपवितां येत नाहीं आणि दानांत तें सामान्यतः सोंपवितां येतें. एखादा मनुष्य आजारी पडलेला, दारिद्र्यामुळें गांजलेला किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या एखाद्या आपत्तीमुळें अगदीं निराश झालेला आपण पाहतों व त्याच्या समाचाराला आपण जातों. त्याची केविलवाणी स्थिति पाहून आपल्याला वाईट वाटतें व आपण त्याला कांहीं पैसे देऊन 'आज आपण त्याच्या फार उपयोगी पडलों' असें मनाचें समाधान करून परत घरीं येतों. पण आपण त्याला दिलेली रक्कम त्याच्या कितीशी उपयोगीं पडेल, तिचा तो कशा रीतीनें उपयोग करील व त्याचें खरोखरीच हित होईल अशा रीतीनें तो ती रक्कम खर्चील काय वगैरे विचार आपल्या मनाला शिवतसुद्धां नाहींत. कोणच्याहि दृष्टीनें पाहातां ही समाजसेवा नव्हे. तर नुसतें दान होय; अशा देणगीनें जें काय मिळतें तें मनाचें समाधान. पण समाजसेवा ह्मणजे समाधान नव्हे. स्वतःचें शरीर झिजवून—दुसऱ्याकरितां शारीरिक व मानसिक श्रम करून दुसऱ्याची ऐहिक सुधारणा करण्याकरितां केलेल्या प्रयत्नांना समाजसेवा म्हणतां येईल. म्हणूनच समाजसेवेचें महत्व मोठें मानण्यांत येतें. आपण जें काय जातीनें करूं तें पैसा करूं शकत नाहीं आणि म्हणून समाजसेवेपुढें दानाचें महत्व फारसें नाहीं.

सुशिक्षित समाजांत बहुतेक व्यक्ति स्वावलंबी असतात. तथापि अशा समाजांतसुद्धां कांहीं व्यक्ति केव्हां ना केव्हां परावलंबी होतातच. आणि अशा वेळीं त्या

लोकांचें काय करावयाचें हा मोठा बिकट प्रश्न त्यांच्यापुढें असतो. एक तर त्यांच्याकडे सर्वस्वीं दुर्लक्ष करण्यांत येतें किंवा संघटित समाज त्यांना हक्कानें मागतां येईल अशी कांहीं तरी व्यवस्था करितो किंवा समाजांतील परोपकारी माणसांकडे त्यांची व्यवस्था सोंपविण्यांत येते. रानटी समाजांत आजारी, आंधळे, वयातीत अशा लोकांची कांहींच व्यवस्था नसते. त्यांना प्रसंग येईल त्याप्रमाणें त्याला तोंड द्यावें लागतें. कित्येकदां तशाच स्थितींत ते मृत्यु पावतात किंवा त्यांना बुद्ध्या मारण्यांत येतें. आणि हें कृत्य मोठें परोपकाराचें समजतात. कांहीं सुधारलेल्या समाजांत "ज्यांना परिस्थितीशीं झगडण्याची ताकद आहे तेवढ्यांनींच जगावें, बाकीच्यांनीं मरणाची वाट पाहात राहावें" अशा मताचे लोक असतात आणि तेथें आंधळ्या अनाथांची वरीलप्रमाणेंच स्थिति होते. जेथें सुसंघटित राज्यव्यवस्था नसते तेथें कांहीं परोपकारी व्यक्ति व्यक्तिशः किंवा संघटित प्रयत्नानें या परस्वाधीन लोकांची व्यवस्था करितात. परंतु अलीकडील समाजांत या परोपजीवी माणसांची व्यवस्था करण्याच्या बाबतींत सामान्यतः या तिन्ही पद्धतींचें मिश्रण झालेलें आढळतें. समाजांतील कांहीं लोकांकडे सर्वस्वीं दुर्लक्ष करण्यांत येतें, कांहीं गोष्टी धर्मादाय संस्थाकडे सोंपविल्या जातात व कांहीं बाबींची व्यवस्था सरकार किंवा म्युनिसिपॉलिट्या किंवा दोन्ही मिळून करितात. परंतु निरनिराळ्या प्रकारच्या पराधीन किंवा व्याधिग्रस्त लोकांकरितां चाललेलीं पुष्कळशीं कामें हळूहळू समाजाच्या वतीनें म्हणून सरकारच्या गळ्यांत घालण्याची प्रवृत्ति दिसूं लागली आहे. पण ती इतक्या मंद गतीनें होत आहे कीं तीं सर्व सर्वस्वी सरकारच्या हुकमतीनें चालण्यास अजून पुष्कळ काळ लागेल. हल्लीं समाजांतील विपद्ग्रस्त व पंगु लोकांकरितां होत असलेलीं कामें बहुतेक धर्मार्थ संस्थाच करीत आहेत. कांहीं बाबतींत सरकारच्या किंवा म्युनिसिपलिट्यांच्या मदतीनें तीं होत आहेत. अशा दुर्दैवी लोकांकरितां शेंकडों संस्था चाललेल्या आहेत आणि एखादी राष्ट्रीय आपत्ति इतकी मोठी असली कीं खाजगी प्रयत्नांनीं तिचें निवारण होण्यासारखें नसलें तर सरकार मध्यें पडून मदत करूं लागतें किंवा अशा आपत्तीचें पुनरागमन होऊं नये म्हणून प्रयत्न करूं लागतें.

खाजगी प्रयत्नांनीं चाललेल्या आपल्याकडील अनेक संस्थांत पैशाचा अनाठायीं व्यय होतो असें अन्नसत्रें, सदावर्तें व तशाच दुसऱ्या कांहीं संस्था पाहून मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें. या संस्था अनिष्ट गोष्टींच्या कारणांकडे लक्ष देण्याऐवजीं त्यांच्या परिणामांकडे अधिक लक्ष देतात, त्यामुळें त्यांचे बरेचसे

प्रयत्न शुद्ध हेतूनें केलेले असूनसुद्धां फुकट जातात. याचें अंशतः कारण असें कीं हा पैसा गरिबांच्या स्थितीचा कळवळा येऊन फारसा विचार न करितां भावनावश मनःस्थितींत दिलेला असतो व त्याचा व्ययहि अविचारानेंच करण्यांत येतो.

समाजाच्या बाल्यावस्थेंत लग्न ही संस्थाच मुळीं अस्तित्वांत नसते. रानांत श्वापदांचे जसे लहान लहान कळप असतात तसेच माणसांचेसुद्धां लहान लहान जमाव असतात. तें एक मोठें जंगी कुटुंबच असतें असें म्हणावयास हरकत नाहीं. परंतु त्यांत आजच्यासारखीं लहान लहान कुटुंबें, नवरा-बायको व मुलें-अशीं स्वतंत्र नसतात. अनेक पुरुष, अनेक स्त्रिया व अनेक मुलें एकत्र राहातात. मूल अमुक एका आईबापाचें असें समजलें जात नाहीं तर तें सर्व जमावाचें-सर्व जातीचें असें मानण्यांत येतें. पुढें या स्थितींत बदल होऊन मुलाचा संबंध आईशीं जोडण्यांत येऊं लागला. मूल आईचें झालें, पण बापाचा त्याच्याशीं कांहींसुद्धां संबंध नाहीं असें समजण्यांत येऊं लागलें. पुढें हीहि स्थिति बदलली व आईबापांचा व मुलाचा निकट संबंध जोडण्यांत येऊं लागला. समाजाला इतकें संघटित स्वरूप येईपर्यंत कुटुंबव्यवस्थेला अवश्य लागणारीं नैतिक बंधनें अस्तित्वांत नव्हतीं आणि पुढेंसुद्धां पुष्कळ कालपर्यंत त्यांना निश्चित स्वरूप प्राप्त झालें नव्हतें. समाजसंवर्धनाला नीतितत्वांची अत्यंत अवश्यकता असते याची कल्पनाहि त्या वेळीं कोणाला नव्हती. त्यामुळें परावलंबी माणसांना चरितार्थ चालविण्याकरितां एक तर गुलाम व्हावें लागे किंवा लग्न करावें लागे. म्हणून एखाद्या माणसाला कोणीच पोसणारें नसलें तर त्याला वरील दोन मार्गांपैकीं एकाचें अवलंबन करावें लागे. पुढें वर निर्दिष्ट केलेल्या कुटुंबांत बायकोचा बाप व मुलीचा नवरा यांचाहि समावेश होऊं लागला व या व्यतिरिक्त इतरांना परके ही संज्ञा प्राप्त झाली. पुढें कुटुंबाची व्याप्ति याहीपेक्षां जरा मोठी होऊं लागली. परंतु कुटुंब किती जरी मोठें झालें तरी कोणत्या ना कोणत्या कारणामुळें कोणत्याहि कुटुंबाशीं संबंध नाहीं व कोणचेंहि कुटुंब पोसूं शकत नाहीं अशीं कांहीं निराधार माणसें शिल्लक राहूं लागलींच. आपला म्हणावयाला जगांत कोणीच नाहीं अशा स्थितींतील लोकांना कांहीं कारणानें परागंदा झालेले, उद्योगधंदा न करितां आयतें खाऊं मिळेल अशी अपेक्षा करणारे व दुसरे अनेक प्रकारचे लोक मिळाले आणि या लोकांची संख्या सारखी वाढत चालली. यांना कांहीं परोपकारी लोक

व्यक्तिशः व कांहीं संस्था काढून मदत करूं लागले. अशा रीतीनें एकामागून एक धर्मार्थ संस्था निघूं लागल्या.

## धार्मिक कल्पनांचा दानावर पगडा.

दानाच्या कल्पना धर्माच्या कल्पनेबरोबरच वाढत असतात. समाजाच्या अगदीं रानटी अवस्थेंत मनुष्याच्या ठिकाणीं विचारशक्ति व सयुक्तिकपणाची जाणीव उत्पन्न झालेली नसल्यामुळें त्याला जरा कांहीं कोठें चत्मकारिक दिसलें कीं त्याबद्दल त्याच्यांत आदर उत्पन्न होतो. ' चमत्कार तेथें नमस्कार ' अशी आपल्यांतहि एक म्हण आहे. एखाद्या डोंगराचा किंवा दगडाचा आकार चमत्कारिक दिसला कीं त्याचा परिणाम लोकांवर झालाच म्हणून समजावा. त्याच्याविषयीं नानाप्रकारच्या आश्चर्यकारक दंतकथा लोक बोलूं लागतात. एखादा गुळगुळीत असा दगड दिसला कीं त्याची देव म्हणून लोक पूजा करूं लागतात. कांहीं तरी नेहमींपेक्षां वेगळें दिसलें कीं तें मोठें आहे अशी या मनःस्थितींत लोकांची कल्पना झालीच. अशा रीतीनें अत्यंत रानटी स्थितींतील मनुष्य दगड, माती, नदीनाले, दरीखोरीं इत्यादि निर्जीव व सामान्य पदार्थ; वड-पिंपळ, आंबा फणस इत्यादि सजीव सामान्य वनस्पति; गाय बैल, कोंबडा, कावळा इत्यादि सामान्य पशुपक्षी; सर्पादि विषारी व दुष्ट जीवजंतु; सारांश, नेहमीं दृष्टीस पडणाऱ्या व त्याच्या जवळपास असणाऱ्या सर्व सजीव निर्जीव कोटींतील वस्तुजात तो देव मानूं लागतो. लोकांच्या कल्पनेंतील हीं स्थित्यंतरें धार्मिक दृष्टीनें फार महत्वाचीं मानलीं जातात; कारण माणसांत कांहीं तरी जागृति झाल्याचें, कांहीं तरी आपल्यापेक्षां वेगळें पण मोठें आहे अशी भावना होऊं लागल्याचें तें द्योतक असतें. वस्तुतः तो केवळ दगड किंवा डोंगर असतो. त्यापेक्षां त्यांत कांहीं विशेष नसतें. परंतु त्यांत काहीं तरी विशेष आहे असें मनुष्य समजूं लागतो. ती वस्तु नाहींशी झाली तर तो अस्वस्थ होतो, कांहीं तरी आपलें चुकलें असें त्याला वाटूं लागतें. आपली भरभराट होणें वा न होणें त्या वस्तूच्या हातीं आहे अशी त्याची कल्पना होते. व त्याकरितां तो त्याला नवस करितो आणि शत्रूचें अकल्याण व्हावें अशीहि याचना करण्यास कमी करित नाहीं. कांहीं नफानुकसान झालें तरी त्याचा दोष त्या वस्तुच्याच माथीं मारतो. ती वस्तु अशा रीतीनें त्याच्या दैवाची धनी होते. यामुळें स्वतःच्या व्यतिरिक्त दुसऱ्या वस्तूंच्या शक्तीवर माणसाचा विश्वास बसतो ही गोष्ट सिद्ध

होते. दगडां डोंगरांना देव मानणें म्हणजे आपल्यापेक्षां वेगळें पण आपल्यापेक्षां शक्तिमान् असें कांहीं तरी दुसरें आहे याची जाणीव असल्याची साक्ष होय. निर्जीव वस्तुच्या मागून मनुष्य सजीव वस्तूकडे वळतो. दगडधोंड्यांचा नाद सोडून मनुष्य झाडामाणसांना देव मानूं लागतो. मग त्याला भुतेंखेतें दिसतात. पुढें आपल्या कल्पनेप्रमाणें तो वेगवेगळाले देव मानूं लागतो. सजीव वस्तूंना देव मानतां मानतां तो निसर्गाशीं तादात्म्य पावूं लागतो. त्याच्या विचाराचें याप्रमाणें स्थित्यंतर होतां होतां पुढें त्याला सर्वसाक्षी सर्वव्यापी परमेश्वर एकच असावा असें वाटतें व शेवटीं सर्व शक्तिमान् परमेश्वर व आपण यांत भेद नाहीं, दोघेहि एकच आहों, अशी त्याची खात्री पटते. या धार्मिक कल्पनांचा माणसाच्या नीतीवर व सामाजिक राहाणीवर फार मोठा परिणाम होतो. या विचारांना अनुरूप अशी त्याची वागणूक असते व दानधर्मादि गोष्टी त्या त्या वेळच्या धार्मिक कल्पनांप्रमाणें होत असतात.

बौद्ध धर्माच्या पूर्वीं समाजसेवेचीं कामें चालत असल्याची माहिती उपलब्ध नाहीं. बौद्ध धर्माच्या काळीं विशेषतः अशोकाच्या व त्यानंतरच्या राजांच्या कारकीर्दींत समाजसेवेचीं कामें—शिक्षण, औषधोपचाराची व्यवस्था, धार्मिक शिक्षण वगैरे—भिक्षूंनीं व जैन धर्माच्या यतींनीं ठिकठिकाणीं मठ स्थापन करून चालविलीं. हे तत्कालीन मठ म्हणजे हल्लींच्या समाजसेवकांच्या वसाहतींप्रमाणेंच होते. यानंतर अशा प्रकारचीं कामें चालत असल्याचा उल्लेख कोठें नाहीं. बौद्ध धर्मानंतर अशाच प्रकारचे मठ अस्तित्वांत होते, पण सर्वसंगपरित्याग करून आत्मिक उन्नति करण्याकरितां आलेल्या संन्यासी लोकांची राहाण्याची व खाण्याजेवणाची तेथें व्यवस्था होत असे. परंतु पुढें ह्या मठांची व्यवस्था पहात असलेल्या संन्याशांनींच ती आपली स्वतःची मिळकत आहे असें जाहीर करून ते आपल्या ताब्यांत घेतले आणि यांपैकीं कांहीं मठ अनीतीचीं आगरें झालीं. पुढें हिंदु धर्माची अवनति होऊं लागली. यज्ञयागादि गोष्टींना अभूतपूर्व महत्व देण्यांत येऊं लागलें आणि प्रत्येक जण आपलें उपास्यदैवत वेगळें असें मानूं लागला. आणि लोकहिताकरितां ( social welfare ) खर्च व्हावयाचा पैसा वरील प्रकारच्या धार्मिक बाबींकडे खर्च होऊं लागला. लोकांच्या धार्मिक कल्पना अशा रीतीनें बदलल्यामुळें दानाची दिशाहि बदलली आणि आणि दानधर्महि त्या कल्पनांना अनुसरून होऊं लागला. हल्लींचीं अन्नसत्रें आणि सदावर्तें हीं ह्या धार्मिक बुद्धीनें केलेल्या दानाचा शेष राहिलेला भाग होय.

## दानाच्या आवश्यकतेचीं खोल व व्यापक कारणें.

अशा प्रकारचा दानाचा बराचसा भाग फुकट जाण्याचें कारण असें असतें कीं, पुष्कळ प्रयत्नांअंतीं आणि शोधाअंतीं कोणत्याहि गोष्टीचीं कारणें उघडकीस आलीं तरी त्यांचा प्रतिकार करणें स्वयंस्फूर्तीनें केलेल्या वैयक्तिक प्रयत्नांना शक्य नसतें. आपल्याकडे पुष्कळ आंधळे लोक आहेत. त्यांपैकीं कांहींच्या राहाण्याची, खाण्याची व शिक्षणाची व्यवस्था करून त्यांना स्वावलंबी करणाऱ्या पुष्कळ संस्था आहेत. आंधळ्या मुलांपैकीं बहुतेक मुलें जन्मांध असतात आणि त्याचें मुख्य कारण त्यांच्या आईबापांना उपदंशप्रमेहादि रोग असतात हें होय. परंतु माणसाच्या नाशाला अनेक तऱ्हेनें कारणीभूत होणाऱ्या ह्या रोगांचा नायनाट करणें अत्यंत कठीण काम आहे. त्या रोगांवर सर्व दिशांनीं मोहीम करून कायद्याच्या व सर्व जनतेच्या साहाय्यानेंच त्यांचा नाश करितां येतो. हें सारें खाजगी किंवा वैयक्तिक प्रयत्नांनीं होणें शक्य आहे काय ? हें अंधत्व येण्याचें मूलभूत कारण वरवर पाहाणाराच्या लक्षांत येण्यासारखें नसतें आणि हे रोग समूळ नाहींसे करणें हें मुख्यत: सरकार व समाज यांच्या सहकारितेनेंच शक्य असतें. सरें उदाहरण बेकार झालेल्या लोकांचें घेऊं. बेकार झालेल्या लोकांना मदत करण्याकरितां अनेक फंड निघतात आणि त्यांपैकीं पुष्कळ फायद्याऐवजीं लोकांचें नुकसानच फार करितात. कारण हे फंड जेव्हां उभारण्यांत येतात तेव्हां बेकारीच्या कारणांचा खोल विचार करण्यांत येत नाहीं. लक्षावधि लोक बेकार होण्याला कारण हल्लींची औद्योगिक पद्धति होय हें सूक्ष्मविचार केल्याशिवाय समजण्यासारखें नसतें. बेकार लोकांची असहाय स्थिति पाहून एखादा त्यांच्या मदतीकरितां फंड काढितो आणि त्या फंडाला मदत देणाराहि त्याच्या प्रमाणेंच विकारवश झालेला असतो. पण बेकारी नाहींशी करणें एका व्यक्तीच्या हातचें नसतें, एका संस्थेच्या हातचें नसतें, फार काय ती फार मोठ्या प्रमाणांत असली तर एका राष्ट्रालाहि शक्य नसतें, हें इंग्लडांतील बेकार लोकांच्या संख्येवरून सिद्ध झालें आहे. कारण या बेकारीचीं कारणें साऱ्या जगभर पसरलेलीं आहेत.

वरील विवेचनावरून वाचकांच्या दोन गोष्टी विशेष रीतीनें लक्षांत येतील. पहिली गोष्ट हीं कीं, अनेक प्रकारच्या निराधार लोकांच्या मदतीकरितां पुष्कळ दानशूर लोक पुढें येतात आणि त्यामुळें शारीरिक, मानसिक, नैतिक वगैरे प्रकारच्या

कारणांमुळें व्यथित झालेल्या लाकांना सुधारण्याकरितां व त्यांचें दुःख हलकें करण्या-करितां अनेक धार्मिक संस्था निघतात. पण त्या फक्त रोगांवर तात्कालिक उपाय-योजना करितात. रोगांची चिकित्सा करून त्याची कारणमिमांसा करित नाहींत. दुसरी गोष्ट अशी कीं, अनेक संस्था एकाच प्रकारच्या रोग्यांच्या सोयीकरितां निघालेल्या असल्यामुळें मदत द्विगुणित होऊन पैशाचा पुष्कळदां दुरुपयोग होतो. उदारणार्थ, आंधळ्यांकरितां काम करणाऱ्या अनेक संस्था असतात आणि त्यांपैकीं एक कोणच्या प्रकारचें काम करित आहे हें बहुशः दुसरीला ठाऊक नसतें. पण या दुहेरी मदतीचा काय परिणाम होतो हें यथाक्रम पुढें पाहूं. तूर्त एकाच तऱ्हेनें पण निरनिराळया संस्थांकडून चाललेल्या कामाचा विचार करूं.

## आजारीपणा कमी करण्याचे उपाय.

आजारी माणसांना फुकट औषधोपचार करणें व त्यांच्याकरितां फुकट दवाखाने काढणें हें फार प्राचीनकाळापासून चाललें आहे. आजमितीला सुद्धां फुकट दवाखाने, हॉस्पिटलें व दुसऱ्या अनेक निरनिराळया संस्था, लोक-वस्तीच्या मानानें अगदींच कमी असल्या तरी पुष्कळ आहेत. सर्व प्रकारच्या शास्त्रांत हल्लीं थोडी फार सुधारणा झालेली आहे व दररोज नवीन नवीन शोध लागत आहेत. वैद्यकीय शास्त्रांत तर कल्पनातीत सुधारणा झाली आहे परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, वैद्यकीय शास्त्रांतील या शोधांच्या आणि सुधारणेच्या मानानें लोकांचें आरोग्य कांहीं सुधारलेलें दिसणार नाहीं आणि कधीं काळीं तरी या सुधारलेल्या आरोग्यशास्त्राचा फायदा गरिबाच्या झोपडीपर्यंत जाऊन पोंचेल व गरिबाला त्याची गरिबी आड न येतां त्याचा फायदा घेतां येईल अशी आजच्या स्थितीवरून तरी आशा वाटत नाहीं. याचें कारण असें कीं, वैद्यकीय शास्त्रांत जों जों सुधारणा होत चालली आहे तों तों त्याचा फायदा घेणें महागाईचें होत चाललें आहे. बरें, ज्या कोणाला पैशाच्या अडचणीमुळें योग्य औषधोपचार करितां येत नाहीं त्याला दुसरा मार्ग म्हणजे धर्मार्थ दवाखान्यांत जाणें हा होय. पण येथें सर्वांनाच फुकट औषध मिळण्याची सोय असल्यामुळें ज्यांना निम्मे पैसे देण्याची ऐपत असते तेहि येथेंच औषध घेतात व त्यामुळें फुकट फायदा घेणारांची संख्या सारखी वाढत जाते. जेथें धर्मार्थ संस्थांची संख्या जास्त तेथें इतर ठिकाणांच्या मानानें फुकट फायदा घेणारांची संख्याहि जास्त, या सामान्य नियमाचा येथेंहि अनुभव

ऱ्यावयास लागतो. हा अनिष्ट प्रकार शेवटीं इतका वाढतो कीं, कांहीं दिवसांनीं खरोखर ऐपत नसलेल्या माणसांना त्यांचा फारसा उपयोग होत नाहीं. शिवाय धर्मार्थ दवाखाने काढणारानें ते परोपकारबुद्धीनें काढलेले असले तरी ते प्रत्यक्ष चालविणारीं माणसें परोपकारबुद्धीनें काम करणारीं नसल्यास त्यांच्या हेतूप्रमाणें गरिबांना त्याचा फायदा होत नाहीं हें सर्वश्रुत आहेच. तसेंच, आपली ठराविक फी देण्याची रोग्याला खरोखरीच ऐपत नसल्यास प्रत्येक वेळीं आपल्या फीकरितां अडून न बसतां रोग्याची अडचण जाणून बेताबातानें पैसे घेणारे डॉक्टर फार थोडे सांपडतात. यामुळें मध्यम व गरीब वर्गांतील अनुदार कुटुंबांचे फार हाल होतात व अवश्य ती वैद्यकीय मदत त्यांना वेळेवर घेतां येत नाहीं. अगदीं निरुपाय झाल्यावर रोग्याला तज्ज्ञ वैद्याला दाखवितात. परंतु तोंपर्यंत रोगानें शरीरावर पूर्ण ताबा बसविल्यामुळें त्याचाहि निरुपाय होतो आणि रोग्याला काळाला शरण जाण्याशिवाय अन्य उपाय राहात नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, रोग्याला रोगमुक्त करणें एवढेंच आपलें काम असें सामान्यतः डॉक्टरांना वाटतें. रोग्याला बरें करणें एवढेंच नव्हे तर तो पुनः आजारी पडणार नाहीं अशा प्रकारचे उपाय योजणें हेंहि आपलें कर्तव्य आहे याची बहुतेक डॉक्टरांना कल्पना नसते म्हणा किंवा त्याची कल्पना असली तरी ती गोष्ट त्यांना व्यवहार्य वाटत नाहीं म्हणा, पण ती प्रत्यक्ष अमलांत येत नाहीं येवढी गोष्ट खरी. असें होण्याचें एक कारण असें असावें कीं, त्यामुळें प्रत्यहीं दवाखान्यांत येणाऱ्या रोग्यांची संख्या कमी होईल अशी त्यांना साहाजिकच भीति वाटत असावी. परंतु ही भीति निरर्थक असल्याचा पुष्कळ डॉक्टरांचा अनुभव आहे. कारण जो डॉक्टर आजारी न पडण्यासाठीं काय करावें याची स्वतःच होऊन माहिती देतो, आजारी पडल्यास शक्य तर आपलें औषध न देतां घरगुती औषधोपचार करावयास सांगतो आणि औषध घेणें जरूरच असल्यास रोग बरा होण्यास अवश्य तितकेच दिवस औषध देतो, तो लोकप्रिय व्हावा यांत नवल तें काय ? आणि तसें झालें तर त्याचा धंदा कमी होण्याऐवजीं उलट वाढण्याचाच संभव असतो. दुसरें असें कीं, आपला पोटाचा धंदा करित असतांना त्याबरोबरच सहजगत्या समाजसेवा करितां येण्याजोगे जे कांहीं धंदे आहेत त्यापैकीं डाक्टरचा धंदा मुख्य आहे. पण या परोपकार करण्याच्या संधीचा फायदा फारच थोडे डॉक्टर घेतात हें वरील विवेचनावरून ध्यानांत येण्याजोगें आहे.

## आयुष्य वाढविणाऱ्या संस्था.

वैद्यकीय शास्त्रांत इतकी प्रगति होऊन सुद्धां रोग्यांची संख्या कमी होत नसल्यामुळें व नवेनवे रोग उपस्थित होऊं लागल्यामुळें अमेरिकेंत व दुसऱ्या कांहीं ठिकाणीं आयुष्य वाढविणाऱ्या संस्था ( Life Extension Institutes) स्थापन करण्यांत आल्या आहेत. या संस्थांचा उद्देश हा असतो कीं, सभासद निरोगी राहण्याकरितां शक्य तितकी सर्व प्रकारची माहिती त्यांना पुरवावयाची आणि तेणेंकरून त्यांचें आयुष्य वाढवावयाचें. सभासदांना दीर्घायुषी करणाऱ्या या अमेरिकन संस्थांचे हजारों सभासद आहेत आणि त्यांना ठराविक दिवसांनीं आपली शरीरप्रकृति संस्थेनें नेमलेल्या तज्ज्ञ डॉक्टरकडून तपासून घेण्याची सवई लागलेली असते. या सभासदांची शारीरिक तपासणी फार बारकाईनें करण्यांत येते आणि जे जे शरीराचे भाग रोगानें दूषित होण्याचा संभव असतो ते सारे काळजीपूर्वक तपासून त्यासंबंधीं सूचना करण्यांत येतात. शरीरांत कोठें कांहीं बिघाड दिसला किंवा एखाद्या रोगाचें पूर्वचिन्ह दिसलें तर त्याचें तितक्यावरच निर्मूलन करण्याची खबरदारी घेण्यांत येते. सुदृढ प्रकृतीच्या माणसानें डॉक्टरचा सल्ला घेण्याची ही पद्धति आपल्याला अपरिचित असल्यामुळें, सकृद्दर्शनीं थोडीशी चमत्कारिक दिसली तरी लोकांचें आरोग्य चांगलें राहाण्याच्या दृष्टीनें ती निःसंशय फायद्याची आहे. लोक अधिकाधिक आजारी पडणें व नवीन नवीन रोगाच्या साथी येणें धंद्याच्या दृष्टीनें डॉक्टरांना हितावह असलें तथापि आजार वाढावेत हा कांहीं वैद्यकीय शास्त्राचा हेतु नाहीं. म्हणून आजारी पडलेल्यांना बरे करण्याकरितां डॉक्टरांनीं पैसे मिळविण्यापेक्षां लोक आजारीच न पडण्याकरितां डॉक्टरांना पैसे मिळाल्यास उभयपक्षीं हिताचें होईल. आणि अशा रीतीनें लोक आजारी पडूं नयेत म्हणून प्रयत्न करण्याकरितां पैसे मिळूं लागल्यास लोक आजारी पडावेत अशी आपल्या स्वार्थासाठीं डॉक्टर अपेक्षा करणार नाहींत आणि निरोगी हवा असल्याबद्दल सर्व समाज आनंदित झाला असतां आपला धंदा चालत नाहीं म्हणून ते दुर्मुखलेले असणार नाहींत, इतकेंच नव्हे तर ते आपलें कार्य अधिक दक्षतेनें करितील व साऱ्या समाजाला त्यांचा खरा उपयोग होईल. वरील अमेरिकन संस्थेचा असा अनुभव आहे कीं तिच्या २५००० सभासदांत मृत्युसंख्या शेंकडा तिसांनीं कमी झाली. अनेक विमाकंपन्यांनीं आपल्याकडे विमा उतरलेल्या लोकांकरितां

ही पद्धत सुरू केली आहे आणि त्यांना ती फारच किफायतशीर झाली आहे. विमा उतरलेल्या लोकांचें आयुष्य वाढण्यावर त्यांचा फायदा अवलंबून असल्यामुळें या कामीं खर्च होणाऱ्या पैशापेक्षां त्यांचा फायदा पुष्कळच अधिक असतो. म्हणजे धंद्याच्या दृष्टीनेंसुद्धां ही पद्धत यशस्वी होते असा या कंपन्यांचा अनुभव आहे.

## डॉक्टरहि नकोत!

लोकांनीं निरोगी तर व्हावें, पण त्यांना डॉक्टरच्या मदतीचीहि आवश्यकता लागूं नये, अशा प्रकारची दुसरी एक चळवळ सुरू झालेली आहे. ती अशी कीं, अनेक प्रकारच्या कृत्रिम औषधांचा उपयोग करून शरीरप्रकृति सुधारण्यापेक्षां निसर्गदत्त सहजसाध्य गोष्टींचा उपयोग करून शरीर निरोगी ठेवावयाचें. कारण स्वित्झर्लंड व दुसऱ्या अनेक देशांत प्रयोगांअंतीं असें सिद्ध झालें आहे कीं, सूर्य-किरणांत रोग बरे करण्याची अद्भुत शक्ति आहे आणि क्षयासारख्या अनेक दुसऱ्या रोगांवर दुसरें कोणतेंहि औषध गुणकारी होत नाहीं पण सूर्यस्नानानें (sun-bath) हटकून गुण येतो. शरीराला ऊन इतकें हितकारक आहे कीं त्याची शरीराला अन्नाइतकीच अवश्यकता आहे, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. लहान रोगी मुलांना माशाच्या तेलापेक्षां ( cod liver oil ) तें अधिक गुणकारी होतें. कारण फक्त पशूंच्याच अंगांतील चरबींत मिळणारें व्हिटॅ-मिन नांवाचें द्रव्य—जें शरीराची वाढ होण्याला अत्यंत अवश्यक असतें, नव्हे ज्याच्याशिवाय शरीराची वाढच होत नाहीं तें सूर्यकिरणांपासून विपुल मिळतें. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती ही कीं, मनुष्याच्या अंगाला सूर्यकिरण प्रत्यक्ष लागणें आरोग्यदृष्ट्या अत्यंत अवश्यक असतें आणि म्हणून प्रत्येक लहान थोर माणसानें तें मुबलक मिळण्याची व्यवस्था करावयास हवी. सूर्यकिरणांत जंतुनाशक शक्ति असल्यामुळें सूर्यकिरण लागणाऱ्या माणसाला पुष्कळ रोगां-पासून उपद्रव होऊं शकत नाहीं. सूर्यकिरणांतली ही विलक्षण शक्ति प्रथम हिंदु लोकांनींच जगाच्या निदर्शनास आणिली. पण आतां हिंदुस्थानांतीलच पुष्कळ लोकांनाच ऊन मुबलक असूनहि अनेक कारणामुळें त्याचा फायदा घेतां यावा तितका घेतां येत नाहीं. व पुष्कळांना त्याचें महत्त्वहि कळत नाहीं. ज्या देशांत दुर्दैवानें सूर्यदर्शन फारसें होत नाहीं तेथें तें कृत्रिम रीतीनें तयार करून लोक त्याचा अत्यंत दुर्मिळ औषधीप्रमाणें

[library stamp]

उपयोग करून घेतात. पण येथें वर्षांतून बारा महिने ऊन असूनहि तें लोकांना नसल्यासारखें झालें आहे. तसेंच खाद्यपेयांच्या बाबतींत लोकांची दिशाभूल होत आहे. तांदूळ किंवा गहूं लोकांना स्वच्छ व पांढरा असेल तितका आवडतो. परंतु साफ केलेल्या गव्हांत गव्हांचें एक चतुर्थांश सत्व शिल्लक राहतें व बाकीचें तीन चतुर्थांश सत्व कोंड्यांत जातें हें पुष्कळांना ठाऊकहि नसेल. तांदुळाचेंहि असेंच असतें. तो जों जों साफ करावा तों तों त्याच्यांतील पौष्टिक भाग कोंड्याबरोबर नाहींसा होतो, म्हणजे तांदूळ जितका स्वच्छ तितका निरुपयोगी होतो—आणि शिजतांना जर त्याची पेज काढून टाकिली तर त्यांत कांहींसुद्धां शिल्लक राहात नाहीं. असा तांदूळ चघळण्याचे व पचविण्याचे श्रम अनुक्रमें तोंडाला व पचनेंद्रियाला नाहक पडतात. अज्ञानामुळें व श्रीमंतीच्या खोट्या कल्पनांमुळें आपण उपयोगी भाग तेवढा टाकितों व निरुपयोगी भाग तेवढा घेतों. असेंच बहुतेक खाद्यपेयांच्या बाबतींत आपण करित असल्याचें आढळून येईल. घाणेरड्या वस्तींत राहिल्यानें थोडेसे भाड्याचे पैसे वाचतात; परंतु तितकेच अधिक पैसे डॉक्टरला भरावे लागतात. चांगल्या हवेंत राहिल्यानें भाडें थोडें अधिक द्यावें लागतें पण डॉक्टरकडचे खेटे वांचतात असा पुष्कळ लोकांचा अनुभव आहे. तेव्हां राहाणीच्या व खाद्यपेयांच्या बाबतींत इष्टानिष्टतेचा विचार करून वागल्यास डॉक्टरकडे मुळींच जाण्याचा प्रसंग येणार नाहीं असें होणें सर्वथैव शक्य दिसत नसलें तरी फारच क्वचित् जावें लागेल यांत शंका नाहीं. अशा प्रकारचे प्रयत्न आपल्याकडे व्हावयास हवेत.

नैतिक अधोगति झालेल्या माणसांची सुधारणा करणें हें अत्यंत दुर्घट काम असतें. कारण तेथें लोकांच्या चारित्र्यांत सुधारणा करावयाची असते आणि म्हणून तेथें वैयक्तिक प्रयत्नांना विशेष महत्व असतें. यांत सरकारला फारसें कांहीं करितां येत नाहीं. सर्व प्रकारचे नैतिक गुन्हे कायद्यानें बंद करितां येण्यासारखे नसतात, सर्व समाजाला अपायकारक आहेत असेच नैतिक गुन्हे कायद्यानें बंद करितां येतात. परंतु असे सर्व समाजाला हानिकारक गुन्हे कोणते याबद्दल नेहमीं दुमत असणें शक्य असतें. म्हणून एखाद्या कायद्याबद्दल समाजजागृति चांगली होऊन लोकमत तयार झालेलें नसल्यास कायदा करूनहि त्याची अंमलबजावणी होऊं शकत नसल्यामुळें तो निरुपयोगी होतो.

कायद्यानें लोक नीतिमान् होऊं शकत नाहींत ही गोष्ट सर्वस्वीं खरी आहे. पण अनीतीला आळा घालण्यास कायद्याचा उपयोग होत नाहीं असें मात्र नव्हे.

## नीतिविषयक भ्रामक कल्पना.

नीतितत्वांच्या बाबतींत आपल्याकडे कल्पनातीत अन्याय घडत आहेत. केवळ प्रतिकूळ परिस्थितीमुळें अनीतीची वागणूक पुष्कळ स्त्रियांना विशेषतः विधवा स्त्रियांना सहन करावी लागते आणि तिचा अनिष्ट परिणाम भोगण्याचा प्रसंग आला कीं या कृतीला मुख्यतः कारणीभूत झालेला पुरुष तिला दगा देतो आणि त्या दुष्टाला आपला गुन्हा छपविण्याच्या कामीं समाजाचा पाठिंबा मिळतो. परिस्थितीच्या कैचींत सांपडल्यामुळें अशा प्रकारचे गुन्हे स्त्रियांची इच्छा नसतां त्यांना करावयास पुढारलेल्या समाजांतील नराधमांनीं भाग पाडल्याचीं उदाहरणें भरपूर आहेत. हे लोक इतकें करूनहि उजळ माथ्यानें समाजांत वावरतात. इतकेंच नव्हे तर समाजाचे पुढारीहि होऊं शकतात. पण तोच समाज आपली अब्रु घालविली ह्मणून त्या असहाय स्त्रीच्या हात धुऊन पाठीला लागतो. सनदशीर मुक्ततेचे सर्व रस्ते बंद होऊन लोकापवादाच्या वणव्यांत तिची इतकी बेभान स्थिति होते कीं, एखाद्या भयंकर मार्गाचें अवलंबन केल्याशिवाय दुसरा मार्ग तिला उपलब्ध नसतो. आणि विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं अशा स्त्रियांना प्रसंगीं थोडी फार मदत करण्याचें काम एखाद्या संस्थेनें हातीं घेतल्यास तुम्ही अनीतीला मदत करितां असें निलाजेरपणानें त्या संस्थेला म्हणावयास कांहीं शिष्ट लोक नेहमीं तयार असतात. नैतिक अधोगति टाळण्याकरितां स्थापन झालेल्या संस्थांनीं या दिशेनें लोकमत तयार करण्याचाहि प्रयत्न करावयास हवा.

## गुन्हेगार आणि मुलें यांचें शिक्षण व सुधारणा.

कोणत्या तरी अपराधावरून शिक्षा होऊन तुरुंगांत गेलेल्या लोकांची सुधारणा करण्याकरितां अनेक संस्था स्थापन झालेल्या आहेत. त्यांपैकीं कांहीं अल्पवयी गुन्हेगारांची सुधारणा करितात. कांहीं त्यांच्याकरितां औद्योगिक शाळा काढितात. कांहीं संस्था कैदी तुरुंगांतून सुटल्यानंतर तो पुनः त्या अधोगतीच्या मार्गाला लागूं नये एतदर्थ त्याला उद्योगधंदा मिळवून देण्याची व्यवस्था करितात किंवा त्याला अवगत असलेला लहानसहान धंदा त्यानें स्वतंत्र रीतीनें करावा म्हणून त्याला लागणारें साहित्य पुरवितात किंवा तो आपल्या गांवीं

कायद्यानें लोक नीतिमान् होऊं शकत नाहींत ही गोष्ट सर्वस्वीं खरी आहे. पण अनीतीला आळा घालण्यास कायद्याचा उपयोग होत नाहीं असें मात्र नव्हे.

## नीतिविषयक भ्रामक कल्पना.

नीतितत्वांच्या बाबतींत आपल्याकडे कल्पनातीत अन्याय घडत आहेत. केवळ प्रतिकूळ परिस्थतीमुळें अनीतीची वागणूक पुष्कळ स्त्रियांना विशेषतः विधवा स्त्रियांना सहन करावी लागते आणि तिचा अनिष्ट परिणाम भोगण्याचा प्रसंग आला कीं या कृतीला मुख्यतः कारणीभूत झालेला पुरुष तिला दगा देतो आणि त्या दुष्टाला आपला गुन्हा छपविण्याच्या कामीं समाजाचा पाठिंबा मिळतो. परिस्थितीच्या कैचींत सांपडल्यामुळें अशा प्रकारचे गुन्हे स्त्रियांची इच्छा नसतां त्यांना करावयास पुढारलेल्या समाजांतील नराधमांनीं भाग पाडल्याचीं उदाहरणें भरपूर आहेत. हे लोक इतकें करूनहि उजळ माथ्यानें समाजांत वावरतात. इतकेंच नव्हे तर समाजाचे पुढारीहि होऊं शकतात. पण तोच समाज आपली अब्रु घालविली ह्मणून त्या असहाय स्त्रीच्या हात धुऊन पाठीला लागतो. सनदशीर मुक्ततेचे सर्व रस्ते बंद होऊन लोकापवादाच्या वणव्यांत तिची इतकी बेभान स्थिति होते कीं, एखाद्या भयंकर मार्गाचें अवलंबन केल्याशिवाय दुसरा मार्ग तिला उपलब्ध नसतो. आणि विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं अशा स्त्रियांना प्रसंगीं थोडी फार मदत करण्याचें काम एखाद्या संस्थेनें हातीं घेतल्यास तुम्ही अनीतीला मदत करितां असें निलाजेरपणानें त्या संस्थेला म्हणावयास कांहीं शिष्ट लोक नेहमीं तयार असतात. नैतिक अधोगति टाळण्याकरितां स्थापन झालेल्या संस्थांनीं या दिशेनें लोकमत तयार करण्याचाहि प्रयत्न करावयास हवा.

## गुन्हेगार आणि मुलें यांचें शिक्षण व सुधारणा.

कोणत्या तरी अपराधावरून शिक्षा होऊन तुरुंगांत गेलेल्या लोकांची सुधारणा करण्याकरितां अनेक संस्था स्थापन झालेल्या आहेत. त्यांपैकीं कांहीं अल्पवयी गुन्हेगारांची सुधारणा करितात. कांहीं त्यांच्याकरितां औद्योगिक शाळा काढितात. कांहीं संस्था कैदी तुरुंगांतून सुटल्यानंतर तो पुनः त्या अधोगतीच्या मार्गाला लागूं नये एतदर्थ त्याला उद्योगधंदा मिळवून देण्याची व्यवस्था करितात किंवा त्याला अवगत असलेला लहानसहान धंदा त्यानें स्वतंत्र रीतीनें करावा म्हणून त्याला लागणारें साहित्य पुरवितात किंवा तो आपल्या गांवीं

जाऊन शेतीभाती करण्यास तयार असल्यास त्याला प्रवासाला लागणारें भाडें व पोटगी पुरवितात. कांहीं संस्थांचे प्रचारक कैदी तुरुंगांतून मुक्त होतांच त्यांना उपदेश करितात तर कांहीं संस्थांचे उपदेशक तुरुंगांत जाऊन कैदमुक्त झाल्यानंतर कैद्यांनीं आपली वागणूक सुधरावी म्हणून उपदेश करितात. परंतु या सर्व प्रयत्नांविषयीं आपण जरा अधिक विचार केल्यास आपल्याला असें दिसून येईल कीं हे वरवरचे प्रयत्न होतात. ते मुळापर्यंत जाऊन पोंचत नाहींत. ज्यांच्या योगानें मनुष्य गुन्हेगार होतो किंवा मनुष्य गुन्हेगार होण्यास ज्या गोष्टी कारणीभूत होतात त्या नाहींशा करण्याकडे या प्रयत्नांचा रोख नसतो. गुन्हा करणारे पुष्कळ लोक मुळचे तशा प्रवृत्तीचे नसतात तर परिस्थितीमुळें ते गुन्हेगार होतात. गुन्हेगार प्रवृत्तीचे लोक सुद्धां तसे होण्यास कांहीं गोष्टी कारणीभूत झालेल्या असतात. हीं कारणें व गुन्हेगारीला अनुकूल असलेली परिस्थिति नाहींशी केल्यास आणि गुन्हेगार लोक म्हणजे मानासिक स्थिति बिघडलेले रोगी होते हें लक्ष्यांत ठेवून त्यांना सुधारण्याचे प्रयत्न केल्यास गुन्हेगारांची पुष्कळ संख्या कमी होईल व सांपत्तिक दृष्ट्याहि देशाचा पुष्कळ फायदा होईल.

राष्ट्राची भावी आशा मुलांवर अवलंबून असते. तीं कर्तृत्ववान् झाल्यास राष्ट्राच्या प्रगतीचें पाऊल पुढें पडतें यांत शंका नाहीं. परंतु तशीं न झाल्यास राष्ट्राचें पुढें काय होईल हेंहि सांगणें फारसें कठीण नसतें. सामान्यतः राष्ट्राची एकंदर स्थिति जशी बरी वाईट असेल त्या मानानें बहुतेक कुटुंबें आपल्या मुलांना शिक्षण मिळण्याची व्यवस्था करितात. कारण उच्चप्रतीचें शिक्षण देणें सर्वांनाच शक्य नसलें तरी आपळीं मुलें चांगलीं व्हावीं अशी सर्वांची साहाजिक इच्छा असते. परंतु ज्या मुलांचे आईबाप निवर्तलेले असतात, परागंदा झालेले असतात, किंवा ते दुर्वर्तनी असल्यामुळें त्यांचा संबंध मुलांना सुखावह होण्यासारखा नसतो अशा अनाथ, पोरक्या मुलांची व्यवस्था पहाणें पाळकांच्या अभावीं साहाजिकच सर्व समाजावर येऊन पडतें आणि प्रत्यक्ष नसला तरी अप्रत्यक्ष रीतीनें अशा मुलांपासून त्यांच्या मुलांना उपसर्ग पोंचण्याचा संभव असल्यामुळें इतरांनींहि या कार्याला मदत करणें भाग पडतें. दुर्दैवानें या गोष्टीला जितकें महत्व द्यावयास हवें तितकें अझून आमच्या समाजांत दिलें जात नाहीं व त्याचे अनिष्ट परिणाम अझून सर्व साधारण लोकांना कळत नाहींत. या मुलांची गोष्ट तर राहोच, पण अस्पृश्य मानलेल्या लोकांचीं

मुलें सुद्धां आपल्या शाळांत घ्यावयास वरिष्ठ वर्गांतील लोक तयार नाहींत. त्यांना वाटतें कीं, यांच्यापासून दूर राहिल्यानें आपण काय ते सोवळे राहूं. पण कोणताहि समाज सुशिक्षित आहे कीं अशिक्षित आहे हें मूठभर लोकांच्या शिक्षणावरून समजलें जात नाहीं, तर सर्व समाजांतील सर्वसाधारण लोकांच्या शिक्षणावरून अजमावलें जातें. आपल्याला जर आपला देश सुधारावयाचा असेल तर सर्व प्रकारच्या मुलांची आपण काळजी घ्यावयास हवी. निरनिराळ्या जातींनीं आपापल्या जातींतील पोरक्या मुलांकरितां अनेक बालकाश्रम काढिले आहेत व कांहीं सर्व साधारण लोकांकरितांहि आहेत. परंतु रस्त्यांत भटकत फिरणारें पोरकें पोर पाहून, तें समाजाचा एक घटक म्हणून वाटणाऱ्या जबाबदारीची जाणीव नसल्यामुळें, त्याचें कोणालाच कांहीं वाटत नाहीं. मुलां-संबंधींचा कायदा नुकताच पास होऊन अमलांतहि आला आहे. आतां या बाबतींत कांहीं सुधारणा होईल अशी आशा आहे.

मनुष्याला स्वावलंबी करणें आणि एकदां दान घेतल्यावर पुनः दान घेण्याची अवश्यकताच नाहींशी करणें हा दानाचा मुख्य उद्देश असल्यामुळें व तो शिक्षणानें सर्वस्वीं सफळ होण्यासारखा असल्यामुळें शिक्षणप्रसारार्थ दान करणें हा सर्वोत्तम मार्ग होय. या कल्पनेचा प्रसार आपल्याकडे अजून सार्वत्रिक झालेला नाहीं. शिक्षण देणें विशेषतः प्राथमिक शिक्षण देणें हें सरकारचें कर्तव्य आहे असें हल्लीं लोकमत होत चाललें आहे. पण नमुनेदार शिक्षण देणाऱ्या संस्था नेहमीं खाजगी पैशानेंच चाललेल्या असतात. म्हणून शिक्षणासाठीं पैशाची केव्हांहि अवश्यकता असणारच. शिवाय प्राथमिक शिक्षण सरकारी खर्चानें झालें तरी गरीब मुलांना दोन प्रहरीं फुकट अन्न मिळण्याची आणि आंधळीं, मुकीं, पोरकीं अशा मुलांना त्यांच्या गरजा भागविणारें विशिष्ट प्रकारचें स्वतंत्र शिक्षण देण्याची व्यवस्था व्हावयास हवी. आणि हेंच शिक्षण विशेष महत्वाचें व महागाईचें असतें. दुय्यम प्रतीचें शिक्षण कांहीं सरकारी पैशानें व कांहीं खाजगी पैशानें चाललेलें असतें. या संस्थांनाहि पैशाची अतोनात जरूरी असते. याशिवाय उच्च शिक्षण व वेगवेगळ्या प्रकारचें शास्त्रीय शिक्षण हवेंच असतें. आपला देश शिक्षणाच्या बाबतींत अगदींच मागसलेला आहे. इंग्लंडअमेरिकेंतील शिक्षणसंस्थांशीं आपली तुलनाच करितां येण्यासारखी नाहीं. त्या देशांत विशेषतः अमेरिकेंत सरकारापेक्षां खाजगी पैशानेंच चाललेल्या संस्था मोठ्या आहेत आणि तिकडे कोणत्याहि प्रकारच्या शिक्षणाला

पैशाची कधीं वाण पडत नाहीं. यावरून शिक्षणाचें महत्व त्या देशांत किती समजलें जातें याची कल्पना येईल. आमच्याकडे शिक्षणाकरितां मिळावा तितका पैसा मिळत नाहीं याचें मुख्य कारण आमच्याकडे पैसा नाहीं हें नव्हे तर दानाचा ओघ शिक्षणाकडे नसून धार्मिक कल्पनांचा पगडा बसल्यामुळें अविचारीपणानें अनाठायीं खर्च करण्याकडे आहे. परंतु ही स्थिति थोडथोडी सुधरेल अशी आशा वाटूं लागली आहे.

याशिवाय दुसऱ्या अनेक धर्मादाय संस्था आहेत व धर्मादायाचे दुसरे अनेक प्रकार आहेत. यांच्यापैकीं पुष्कळ संस्थांचे उद्देश चांगले असले किंवा दान करण्याऱ्या त्यांचा हेतु शुद्ध असला तरी तो पैसा बहुतांशीं फुकट जातो. कारण दान सत्पात्रीं व्हावें व ढोंगी लोकांना त्याचा फायदा मिळून दुरुपयोग होऊं नये. तसेंच एकाच कार्याकरितां वेगवेगळ्या संस्थांनीं स्वतंत्र रीतीनें प्रयत्न केल्यामुळें पुष्कळ पैसा व अंगमेहनत व्यर्थ जाते. त्याला आळा घालावयाचा असल्यास या दान करणाऱ्या संस्थांचीं चांगली व्यवस्था होऊन त्यांनीं परस्परांशीं सहकार्य केलें पाहिजे. इतकेंच नव्हे तर त्या सर्वांनीं आपला एक संघ करून आपल्या कामाची दिशा व मार्ग कायम ठरवावे लागतात आणि त्या धोरणाला अनुसरून वागावें लागतें.

ग्रंथ संग्रहालय नं. ... ता. ... ठाणे.

## प्रकरण ५ वें.

# धर्मादाय संस्थांची संघटना.

राजकीय, धार्मिक व सामाजिक स्थित्यंतरें, आपल्या समाजाची पुराणप्रियता, वृत्तिच्छेदाची भीति, धर्मादायाची कल्पना, धोताळ कारभार आणि मागणाराची चिकाटी, स्वाभिमानशून्यता, व सतरा सोंगें करून धान्य, पैसा अगर वस्त्र उकळण्याची शिताफी ज्यांना माहित आहे, त्यांना हें सांगण्याची गरज नाहीं कीं, गांवें उकळून खाणारांची संख्या कित्येक शतकांपासून सारखी वाढतच आहे.

### गांव–गाडा.

धर्मादायसंस्थांच्या कार्याची व्याप्ति किती विस्तृत आहे, धर्मादाय करणाऱ्या संस्था कशा अगणित आहेत, एकच कार्य अनेक संस्था स्वतंत्र रीतीनें करित असल्यामुळें व त्यांचा परस्परांशीं संबंध नसल्यामुळें कांहीं ठिकाणीं कशी अनवश्यक मदत केली जाते, कांहीं ठिकाणीं ती हवी असते त्यापेक्षां उगाच अधिक मदत दिली जाते आणि कांहीं बाबतींत कायमची मदत हवी असतां तात्पुरती दिली जाते हें मागिल भागांत आलेलें आहे. धर्मादायाचा हा अनाठायीं विनियोग कैक वर्षें असाच चाललेला आहे. याशिवाय कोणत्या ना कोणत्या रीतिनें दान करणाऱ्या शेंकडों जातिविशिष्ट संस्था आहेत. आणि या संस्था परस्परांशीं फटकून वागत असल्यामुळें दानाच्या बाबतींत जो कांहीं गोंधळ माजलेला आहे तो सांगण्याची सोय नाहीं. कोणत्याहि दृष्टीनें मदतीला अपात्र अशी व्यक्ति आपल्या जातींतील दोनदोन तीनतीन संस्थांकडून परस्परांची परस्परांना माहिती न देतां मदत घेते, इतकेंच नव्हे तर पुनः सार्वजनिक संस्थांतूनहि तिला सहज मदत मिळते, अशीं कैक उदाहरणें आढळतील. आणि मूठभर लोकसंख्या असणाऱ्या जातींत जर हा सांवळा गोंधळ आणि पैशाचा अपात्रीं व्यय, तर मग सार्वजनिक संस्थांनीं काय करावें ?

आधुनिक दानाचा हेतु दान घेणारांची संख्या वाढावी हा नसून उलट पक्षीं ती कमी व्हावी असा असतो. दानानें दान घेणारांची संख्या कमी होण्याऐवजीं जर वाढत असेल तर हल्लींच्या विचारसरणीप्रमाणें तें खरोखरी दानच

नव्हे, उद्योगी माणसांना आळशी करण्याकरितां ती लालूच आहे, असें म्हणावें लागेल. दान घेणाऱ्या विपद्ग्रस्तांची संख्या जर कमी करावयाची असेल तर त्यांना विपन्नावस्था येण्याचें कारण काय, ती नाहींशी करण्याकरितां कोणते उपाय चालू आहेत, त्यांचा इष्ट परिणाम होत आहे किंवा नाहीं आणि होत नसल्यास त्यांत कोणत्या प्रकारची सुधारणा झाली पाहिजे याचा विचार व्हावयास हवा. अशा प्रकारच्या चौकशीच्या अभावीं अपात्रीं दान होत असल्याचें एकच ढोबळ उदाहरण द्यावयाचें असल्यास अन्नसत्रांचें आणि सदावर्तांचें घेतां येईल. वस्तुतः या संस्थांच्या उत्पादकांचा हेतु निरुद्योगी लोकांना अधिक आळशी करण्याचा होता असें ह्मणतां येणार नाहीं. परंतु दानाच्या तत्कालीन कल्पनेप्रमाणें त्या वेळीं हा मार्ग योग्य दिसला, तथापि आज व्यसनी, आळशी, भामट्या लोकांना अधिक दुर्व्यसनी करण्याला या संस्था कारणीभूत होत आहेत यांत मुळींच संशय नाहीं. मुंबई शहरांत अशीं अन्नसत्रें व सदावर्तें दहावीस आहेत आणि काशीपासून रामेश्वरापर्यंत सर्व हिंदुस्थानभर प्रत्येक क्षेत्रांत त्या क्षेत्राच्या माहात्म्याप्रमाणें कमी जास्त अन्नसत्रें व सदावर्तें आहेत. मुंबईच्या अन्नसत्रांत डोकीवरील केंस वाढवून साधू झालेले ढोंगी लोक राहोतच परंतु वाटसरू, मारवाडी, गुजराथी लोक सुद्धां कधीं कधीं सहकुटुंब बेलाशक शिरून जेवतात व आंधळे, पांगळे, व्याधिग्रस्त लोक जागेच्या अभावीं बाहेर राहून या लोकांचीं उष्टी चाटतांना नेहमीं दिसतात. येथें आणखी एक विशेष गोष्ट दिसते ती हीं कीं, ह्या अन्नसत्रांचें व सदावर्तांचें काम यंत्राप्रमाणें चालतें. तेथें आपंगांची कींव येऊन विकारवशतेनें केलेलें दानहि दिसत नाहीं, तर नुसती दानाची क्रिया दिसते. तेथें स्वकष्टानें चरितार्थ चालविण्याचें त्राण न राहिल्यामुळें पराधीन झालेल्या भिकाऱ्यांना दोन प्रहरच्या वेळीं अन्नाचे दोन घास घालण्याची इच्छा न दिसतां सशक्त आणि मदतीला अपात्र अशा लोकांना सरसकट अन्न वाढिलेलें दिसतें. शिवाय कोणत्याहि प्रकारची देखरेख नसल्यामुळें अन्नसत्रांच्या व सदावर्तांच्या व्यवस्थेंत दुसरे अनेक प्रकारचे घोटाळे असतात ते वेगळेच.

### अपात्रीं दानाचा परिणाम.

या अपात्रीं दानाचा परिणाम असा होतो कीं, राष्ट्रांतील पराधीन लोकांची संख्या कमी करण्याचा व असहाय लोकांना मदत देण्याचा जो दानाचा मुख्य हेतु तो तर तडीस जात नाहींच, पण उलट दानपात्र लोकांस दान न मिळतां

तें दानास सर्वस्वीं अपात्र अशा लोकांना मिळतें व त्यायोगें उद्योग करून उपजीविका करण्यासारखे पुष्कळ लोक कामधंदा करितनासे होतात व अशा धर्मादाय संस्थांचे कायमचे आश्रित होतात. यामुळें परोपजीवि माणसांची संख्या थोडथोडी वाढतच जाते व भिक्षा मागणें हा एक धंदाच होतो. पात्रापात्रतेचा विचार न करितां अशा प्रकारें दान एकदां सरास मिळूं लागलें म्हणजे आळशी, निरुद्योगी लोकांची संख्या समाजांत सारखी वाढूं लागते आणि कालांतरानें हें अरिष्ट साऱ्या समाजाच्या नाशाला कारणीभूत होतें. याला उत्तम उदाहरण म्हणजे रोमचें देतां येईल. रोममध्यें धान्याची महागाई झाल्यामुळें गरीब लोकांचे हाल होऊं नयेत म्हणून गरिबांना प्रथम स्वस्त भावानें धान्य देण्यांत येऊं लागलें. पुढें फुकट धान्य देण्यांत येऊं लागलें आणि यानंतर धान्याबरोबर तेल व दारूहि फुकट देण्यांत येऊं लागली, इतकेंच नव्हे तर सरकारी पैशानें गरीबांना सरकशी व नाटकेंतमाशेहि दाखविण्यांत येऊं लागले. याचा परिणाम असा झाला कीं, फुकट खाणारांची संख्या अपरिमित वाढली आणि रोमन साम्राज्याच्या ऱ्हासाला तें एक मुख्य कारण झालें असें म्हणतात. फुकट खाणारांचा सुळसुळाट इतका होण्याला एक असें कारण झालें कीं, हें सर्व दान परोपकार बुद्धीनें करण्यांत येत होतें असें नाहीं, तर जो राजकीय पक्ष सत्ताधिकारी असेल तो लोकांनीं बंड करून आपली सत्ता उलथून पाडूं नये व आपली लोकप्रियता वाढावी, याकरितां राष्ट्राच्या किंवा गरिबांच्या हिताहिताचा विचार न करितां अविचारानें हा पैसा खर्च करित असे.

## धर्मादाय संस्थांची संघटना करण्याचे प्रयत्न.

आपापल्या राजकीय पक्षाची सत्ता अबाधित राहण्याकरितां दान होत नसलें तथापि दानाच्या बाबतींत वरील सारखीच परिस्थिति असतांना धर्मादाय संस्थांची संघटना करून दानपद्धतींतील दोष नाहींसे करावे, विपन्नावस्थेस पोंचलेल्या लोकांची स्थिति सुधारावी, धर्मादायासंबंधींच्या योग्य कल्पनांचा फैलाव करावा, पात्रापात्र पाहून दान करणारा एक स्वतंत्र वर्ग उत्पन्न करावा आणि योग्य विचार करून प्रत्येकाला शक्य तितकी चांगली मदत मिळावी व दान मागणाऱ्या भिक्षेकऱ्यांची संख्या कमी कमी करित जावी, म्हणून एक धर्मादाय संस्थांची संघटना करणारी संस्था (Charity Organisation Society) इंग्लंडमध्यें इ. स. १८६९ मध्यें स्थापन झाली. या संस्थेच्या संस्थापकांच्या लक्षांत लवकरच असें आलें कीं, या धर्मादाय संस्थांत मुख्य वाईट गोष्ट

ही आहे कीं त्यांना शिस्त नाहीं आणि परस्परांशीं स्पर्धा करणाऱ्या अनेक संस्था असल्यामुळें दान जरूरीपेक्षां अधिक दिलें जातें. इंग्लंडांत त्या काळीं नुसत्या दानावर उपजीविका करणारे हजारो लोक होते. कारण एखाद्या माणसानें एका संस्थतून खर्चाकरितां रोख पैसे घ्यावेत, दुसरीकडून वैद्यकीय मदत घ्यावी, तिसरीकडून कपडा घ्यावा, चौथीकडून कोळसा घ्यावा आणि यांपैकीं एकाहि संस्थेला आपल्याला दुसरीकडून मदत मिळत असल्याची बातमीहि लागूं देऊं नये व त्यासंबंधीं त्यांनींहि चौकशी करूं नये असें सर्वत्र चाले. याला उपाय म्हणजे इतकाच होता कीं, या परस्परांपासून दूर राहाणाऱ्या पण एकाच दिशेनें कार्य करणाऱ्या संस्थांचें संघटन करावयाचें म्हणजे त्या सर्व संस्था एकत्र करावयाच्या कीं त्या सर्वांची मिळून एक संस्था करावयाची असें नव्हे, तर धर्मार्थ मदत मागणारांचे अर्ज एकत्र करावयाचे, अर्जदारांची, त्यांच्या कुटुंबांची व त्यांच्या परिस्थितीची इत्थंभूत माहिती मिळवावयाची व त्यांच्यापैकीं प्रत्येकाला कोणच्या प्रकारची व किती मदत करणें जरूर आहे तें ठरवून ते अर्ज त्या त्या संस्थेकडे पुढील मदत करण्याकरितां पाठवावयाचे. दरम्यान अर्जदाराला अन्नाची किंवा कपड्यालत्याची अतिशयच जरूर आहे असें वाटल्यास ती त्याच्या अर्जाचा निकाल होई तोंपर्यंत द्यावयाची हें या संस्थेचें काम.

वरील संस्था निघण्यापूर्वीं इंग्लंडमध्यें सुद्धां दान मागणारांची फारशी विचारपूस न करितां निमूटपणें दान करण्याची सरसहा पद्धति होती. पण या संस्थेचें पहिलेंच तत्व असें होतें कीं, भिकाऱ्यांच्या स्थितीची सर्व प्रकारची खडान् खडा माहिती मिळाल्याशिवाय पैचीहि मदत करावयाची नाहीं. फारच झालें तर इतकी माहिती मिळेपर्यंत त्याचे मनस्वी हाल होतील अशी भीति वाटूं लागल्यास अगदीं तात्पुरती अन्नपाण्याची मदत करावयाची. या संस्थेच्या चालकांनीं आरंभींच लोकांची खातरजमा केली कीं, दानासाठीं खर्च होणारा बहुतेक सारा पैसा फुकट जात आहे, उद्योग करून सहज पोट भरण्यासारख्या हजारों माणसांना मदत केली जात आहे आणि मदतीला सर्वस्वीं पात्र असलेलीं माणसें मदतीविना मरणाच्या दारीं पडलेलीं आहेत; करितां ढोंगी लोकांना दान मिळण्याचें बंद होऊन त्या पैशाचें सत्पात्रीं दान झाल्यास सर्व प्रकारच्या असहाय लोकांची सोय होऊन लक्षावधि रुपयांची बचत होईल, व त्यांतून दुसरीं अनेक प्रकारचीं कामें करितां येतील. पण कैक वर्षें मन मानेल

त्याप्रमाणें दान करण्याची संवय झाल्यामुळें वरील सल्ला लोकांना प्रथम रुचेना व त्यांच्यावर अनेक दिशांनीं टीकेचा भडिमार होऊं लागला. पण आस्ते आस्ते या नूतन पद्धतीचे फायदे दिसूं लागल्यावर हा विरोध कमी झाला व ही संस्था जगन्मान्य झाली.

## दानांतले स्वार्थी हेतु.

वरील संस्थेला आपल्या हेतूप्रमाणें धर्मादाय संस्थांची संघटना करितांना असा अनुभव आला कीं, धर्मदाय करणाऱ्या सर्वच संस्था केवळ विपन्नावस्थेस पोंचलेल्या लोकांनाच मदत करण्याच्या सदिच्छेनें स्थापन झालेल्या असतात असें नाहीं, तर त्यांपैकीं कांहींचा अंतःस्थ हेतु अगदीं वेगळा असतो. तो हा कीं, आपल्या धर्मपंथाचा प्रसार करणें. त्या गरीब लोकांच्या गरिबीचा फायदा घेऊन त्यांना आपल्या धर्मपंथाची दीक्षा देण्याचा प्रयत्न करितात. ते क्षुधितांना फुकट चहा देतात तो ते भुकेनें व्याकूळ झालेले असतात ह्मणून नव्हे तर त्यांनीं एकत्र जमून आपलें धार्मिक पुराण ऐकावें ह्मणून. दुसरे कांहीं लोक आपण कोणत्या तरी जागयाकरितां उमेदवार ह्मणून उभे राहून त्याकरितां लोकांचीं मतें मिळविण्याकरितां कांहीं तरी धर्मादाय करण्याचें ढोंग करितात. दान करण्यांत असे अनेक स्वार्थी हेतु असल्यामुळें वरपांगीं दान करण्याचें ढोंग नाहींसें करण्याच्या दृष्टीनें या सर्व धर्मादाय संस्थांची संघटना होणें अत्यंत महत्वाचें असतें.

या संस्थेचें काम अपेक्षेप्रमाणें यशस्वी न होण्याला दुसरींहि कांहीं कारणें झालीं. विपद्ग्रस्त लोकांच्या बाबतींत या संस्थेचें असें मत होतें कीं, हे सर्व लोक आपल्या आपणच अशी पराधीन स्थिति करून घेतात; त्याला समाज कोणत्याहि प्रकारें कारणीभूत झालेला नसतो. हें ह्मणणें कांहीं बाबतींत खरें असलें तथापि सर्व साधारणपणें खरें नसतें. कारण सामाजिक परिस्थितीमुळेंच यांतील पुष्कळशा अनिष्ट गोष्टी उत्पन्न झालेल्या असतात. त्यांना आणखी असेंहि वाटे कीं, आज चालू असलेली समाजरचना व समाजव्यवस्था न्याय्य आहे, संपत्तीची वांटणी योग्य प्रमाणांत होत आहे व प्रत्येकाच्या योग्यतेप्रमाणें प्रत्येकाला मोबदला मिळत आहे. तसेंच ह्मातारपणीं मिळणारें वेतन, आजारीपणांत व बेकार झाल्यावर मिळणारी मदत हीं त्यांच्या मतें गैर होतीं आणि त्याला कारण दुसरें तिसरें कांहीं नसून श्रीमंतांना आपल्या फायद्यांतून हा

खर्च करावा लागतो हें होय. गरिबांना दान देऊन त्यांची दानत सुधारतां येईल अशी त्यांची कल्पना होती. गरीब लोकांचा आपल्यापेक्षां अगदीं वेगळा असा स्वतंत्र वर्ग आहे असें ते म्हणत. कामकरी वर्गाच्या झोपडींत बारीकसारीक चैनीच्या वस्तु दिसल्या तरी तें असह्य होऊन पायाची तिडीक त्यांच्या मस्तकाला झोंबे. कामगारांचें वेतन कमी करणाऱ्या चळवळीला त्यांची सहानुभूति असे. कामगारांना अधिक मजुरी मिळाल्यास त्यांची राहाणी सुधेरल आणि थोड्या चैनीच्या वस्तु त्यांच्या घरांत दिसल्या तरी त्यामुळें ते न बिघडतां उलट त्यांचीं दुसरी व्यसनें कमी होतील हें त्यांना खरेंहि वाटत नसे. ह्या व दुसऱ्या अनेक कारणांमुळें त्यांची मूलभूत कल्पना चांगली असूनहि ती व्हावी तशी यशस्वी झाली नाहीं.

खाजगी रीतीनें कसें तरी दान होण्यापेक्षां त्याला संघटित स्वरूप येणें चांगलें आणि याच दृष्टीनें वरील संस्थेचें महत्व आहे. गेल्या शेंपन्नास वर्षांत वरील प्रकारच्या संस्था युरोपांतील व अमेरिकेंतील सर्व मुख्य मुख्य शहरांत काढण्यांत आल्या. मदत द्विगुणित होऊं नये, कामाची बरोबर वांटणी व्हावी व सर्वांना सारखी मदत मिळावी अशा प्रकारचे प्रयत्न तिच्या चालकांकडून झाले. या प्रयत्नांमुळें दोन दोनदां मदत मिळणें बंद झालें. इतकेंच नव्हे तर बहुतेक ढोंगी लोकांची डाळ शिजेनाशी झाली. या कामाला देणग्या देणाऱ्या लोकांचें कामहि सोपें झालें. आपला पैसा कोठें जातो व कशा रीतीनें खर्चला जातो, हें त्यांना कळूं लागलें व त्यामुळें पैशाचें साहाय्य अधिकाधिक मिळूं लागलें. धर्मादाय संस्थाची संघटना ह्मणजे खरोखरीच धंद्याच्या तत्वांवर धर्मादाय करणें होय. पण या पद्धतींत त्यांबरोबर कांहीं दोषहि येतात. या पद्धतीला यांत्रिक स्वरूप येतें. पण एकंदरींत या संघटनेमुळें हें धर्मादायाचें कार्य अधिक सुयंत्रित चालतें यांत संशय नाहीं. अशा प्रकारें धर्मादाय संस्थांची संघटना झाल्यामुळें खाजगी रीतीनें अव्यवस्थितप्रमाणें होणाऱ्या दानांत पुष्कळच सुधारणा झाली असें मानण्यास हरकत नाहीं. अशा प्रकारच्या दानानें दान घेणारांशीं थोडा फार प्रत्यक्ष संबंधहि येतो आणि दान करितांना सारासार विचार करण्याची संधि मिळते. या पद्धतीमुळें आपण आपल्या धर्मादाय संस्थांत नेहमीं पाहातों त्याप्रमाणें कोणालाहि या संस्थेवर आपला हक्क सांगतां येत नाहीं. एकंदरींत खाजगी रीतीनें दान करण्याच्या बाबतींत धर्मादाय संस्थांची संघटना करणें हाच सर्वोत्तम मार्ग आज समजला जातो.

धर्मादायाच्या बाबतींत परंपरागत चालत आलेल्या कांहीं अनिष्ट गोष्टी उपरिनिर्दिष्ट संस्थेनें नाहींशा केल्या ही गोष्ट खरी. परंतु त्याबरोबरच दुसऱ्या कांहीं गोष्टींची शक्याशक्यता न पहातां त्या खऱ्या आहेत असें या संस्थेच्या चालकांनीं गृहित धरलें. ही वाण भरून काढण्याकरितां कालांतरानें दुसऱ्या संस्था स्थापित झाल्या व त्याचें कामहि यशस्वी रीतीनें होऊं लागलें.

## एल्बरफेल्ड पद्धति.

धर्मादायाची संघटना करण्याचा दुसरा प्रकार म्हणजे एल्बरफेल्ड पद्धति ( The Elberfeld System ) होय. ही पद्धति युरोपखंडांतील बहुतेक सव ठिकाणीं अमलांत आलेली आहे, इतकेंच नव्हे तर धर्मादाय संस्थांची संघटना उत्तम पायावर करण्याकरितां आजपर्यंत जे जे प्रयत्न झाले त्यांत ही सर्वोत्कृष्ट मानण्यांत येते. ही इ. स. १७६५ च्या सुमाराला जर्मनीमध्यें एल्बरफेल्ड नांवाच्या संस्थानांत सुरू करण्यांत आली. त्या काळीं दारिद्र्य व विपन्नावस्था यांचा साऱ्या युरोपभर कळस झालेला होता. आणि एल्बरफेल्ड संस्थानाची भरभराट असल्यामुळें हजारों भिक्षेकरी रस्त्यावर रांगेनें बसलेले तेथें दिसत व घरोघरीं मदतीची याचना करीत. अशा परिस्थितींत प्रोफेसर बुश ( Professor Bush ) यांना ही कल्पना सुचली. शहराचे वेगवेगळाले भाग करण्यांत आले व त्या प्रत्येक भागावर देखरेख करण्याकरितां एक एक मनुष्य नेमण्यांत आला व या देखरेख करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांनीं आपल्या कामाचे अहवाल मुख्य कचेरींत कळवावे असें ठरलें. भिक्षेकऱ्यांना व्यक्तिशः कोणी कांहींहि देऊं नये असें ठरविण्यांत आलें. मुलांकरितां धंदेशिक्षणाच्या शाळा स्थापन करण्यांत आल्या व आजाऱ्यांकरितां हॉस्पिटलांची व्यवस्था करण्यांत आली. पण या सर्वांत विशेष महत्वाची गोष्ट त्यांनीं केली ती ही कीं, भिक्षेकऱ्यांनीं आपल्या पायांवर उभें राहाण्यास शिकविलें. या पद्धतीमुळें लौकरच त्या संस्थानांत भिक्षेकरी दिसेनासे झाले आणि लोकांची अन्नान्न दशा नाहींशी झाली. व या संस्थेची पुढें अवश्यकताच नाहींशी झाली. पुढें इ. स. १८५२मध्यें त्या पद्धतींत थोडाफार बदल करून या संस्थेची पुनर्घटना करण्यांत आली. ही संस्था आजमितीपर्यंत चालत आहे. प्रत्येक भागावर देखरेख करण्याकरितां जो अधिकारी असतो त्याला त्या भागाची व त्या भागांतील लोकांची पूर्ण माहिती असते. तो आपल्या भागांतील भिक्षेकऱ्यांची व्यवस्था करितो. त्याला या कामाबद्दल कांहीं वेतन देण्यांत येत

नाहीं; पण हें काम मात्र त्याचेकडून सक्तीनें करून घेण्यांत येतें, इतकेंच नव्हे तर त्यानें आपल्या कामांत चुकारूपणा केल्यास त्याबद्दल त्याच्यावर जादा कर बसाविण्यांत येतो आणि त्याचा निवडणुकींत मत देण्याचा अधिकारहि कांहीं दिवस काढून घेण्यांत येतो. परंतु ही जागा सर्व दृष्टींनीं मोठ्या मानाची समजण्यांत येत असल्यामुळें ती सहसा कोणी नाकारीत नाहीं. उलट चांगले कर्तृत्ववान् लोक ती मुद्दाम स्वीकारितात. हे भाग फार लहान असल्यामुळें या देखरेख करणाऱ्या माणसाकडे फार थोडीं माणसें येतात. त्यामुळें त्याला व्यक्तिशः त्यांची चांगली विचारपूस करितां येते व आपलेपणा दाखवून जरूर ती योग्य मदत करितां येते. हें काम मानाचें व परोपकाराचें आहे असा अभिमान वाटत असल्यामुळें तें सामान्यतः उत्कृष्ट रीतीनें होतें. अशा प्रकारचे अनेक लहान भाग मिळून एक मोठा भाग करण्यांत येतो. आणि त्या सर्वांवर देखरेख करणारे लोक पंधरा दिवसांनीं एकदां एकत्र जमतात व या सभांचा अध्यक्ष सर्व सभेची हकीकत मुख्य कचेरीकडे पाठवितो. मुख्य कचेरीचे नऊ सभासद असतात व त्यांच्याकडे सर्व शहरांतील धर्मादायाची व्यवस्था असते. या मुख्य कचेरींत या संबंधींचें शिक्षण घेतलेला पगारी कार्यकारी अधिकारी असतो व त्याला दुसरे पगारी मदतनीस असतात. देखरेख करणारांना व भागाच्या मुख्य अधिकाऱ्यांना ही कमिटी वेळोवेळीं निरनिराळ्या बाबींसंबंधीं सूचना देते, कामाची वांटणी करून देते, देखरेख करणारीं माणसें नेमते, विपन्नावस्थेचीं कारणें शोधून काढिते, कायद्यांत दुरुस्ती करण्याची खटपट करिते आणि दारिद्र्य कमी होऊन अशा प्रकारच्या लोकांची स्थिति सुधारण्याकरितां ज्या ज्या कांहीं गोष्टींची जरूरी असते त्या सर्व करिते. आपल्या देशांतील परिस्थितीप्रमाणें अवश्य ते फेरफार करून ही पद्धति आपल्याकडे सुरू करण्यासारखी आहे.

अपुरी व तात्पुरती मदत फार विचारानें करावी लागते. कारण ती संपली म्हणजे दान घेणारांची स्थिति अधिक वाईट होण्याचा संभव असतो. तसेंच दान घेणाराला अवश्यक असेल तितकेंच दान करावें. त्यापेक्षां अधिक केल्यास त्यामुळेंहि त्याचें अहित होण्याचा संभव असतो. एकाला हवें त्यापेक्षां जास्त देण्यापेक्षां जरूरीप्रमाणें पुष्कळांना देणें अधिक हितकारक होईल. करितां दान करण्यापूर्वी आपल्या दानाचा काय परिणाम होईल याचा विचार करणें महत्वाचें असतें. दान करण्याची प्रवृत्ति होणें हा एक मनोविकार आहे आणि म्हणून इतर मनोविकारांप्रमाणें यालाहि स्वैर संचार करूं न देतां योग्य वळण लाविलें पाहिजे.

## दान व सामाजिक बंधनें.

द्वेषानें द्वेष वाढतो त्याचप्रमाणें भिक्षेनें भिक्षेकऱ्यांची संख्या वाढते असा अनुभव आहे. पुरवठा जास्त होऊं लागल्यानें केव्हां केव्हां मागणीहि वाढते; त्याप्रमाणें जे अर्ध्या भाकरींत संतुष्ट राहात असतात ते भिक्षा मिळूं लागल्यानें तीहि सोडून देतात. भिक्षेनें सामाजिक बंधनें शिथिल होऊं लागतात. एखादा मनुष्य उपाशी असला व त्याला धर्मार्थ संस्थेंतून मदत मिळत असली तर शेजारी पाजारी किंवा त्याचे नात्याचे लोक त्याला मुळींच विचारीनातसे होतात. आणि हीं सामाजिक बंधनें—आपल्या शेजाऱ्याला किंवा आपल्या आप्तेष्टाला आपल्या शक्तीप्रमाणें मदत करणें हें आपलें कर्तव्य आहे ही जाणीव एकदां नाहींशी झाली कीं ती कायमची नाहींशी होते, एवढेंच नव्हे तर अशा आपत्काळीं सर्व लोक त्याला धर्मार्थ संस्थेचें नांव सांगतात. आणि मनुष्य एकदां स्वाभिमान सोडून दानावर पोट भरूं लागला म्हणजे स्वकष्टानें चरितार्थ चालविण्याची अंगीं कुवत आल्यावर सुद्धां तो धर्मार्थ संस्थांचा आश्रय सोडीत नाहीं, उलट तो बंद होऊं नये म्हणून नाना तऱ्हेचीं सोंगें करितो. हा दानाचा खरोखरीच हेतु नव्हे. मनुष्य उपाशी तर राहूं नये, पण दान घेण्यापूर्वी शेजाऱ्यापाजाऱ्याकडून व नातेवाईकांकडून मिळण्याजोगी मदत त्याला प्रथम मिळावी. याकरितां मोठ्या प्रमाणांत धार्मिक संस्था असणें व त्याशिवाय दुसरी किरकोळ अल्पस्वल्प मदत ( Allowances ) मिळणें वरील कारणामुळ फारसें हितावह नाहीं. सामाजिक बंधनें बळकट होतील व शक्य तोंपर्यंत धर्मार्थ संस्थांची अवश्यकताच राहाणार नाहीं, तशांतूनहि धर्मार्थ संस्थांची जरूरी लागली तरी ती उपरिनिर्दिष्ट हेतु तडीस जाईल इतक्या बेतानें असावी हें दानाच्या बाबतींतील उच्चतर ध्येय मानतां येईल.यासाठीं दुसरी कोणतीहि अवांतर मदत, कारखानदार, नातेवाईक व मित्र यांनीं दिलेल्या मदतीला पुरवणी म्हणून द्यावी. त्या मदतीच्या ऐवजीं म्हणून कधींही देऊं नये. यांत योग्य चौकशीची व देखरेखीची भर पडली म्हणजे ती योजना उत्तम रीतीनें फलदायी होते. तसेंच सरसकट सर्वांना मदत करणें, वेगवेगळ्या वयाच्या लोकांना त्यांच्या कुटुंबांकडे किंवा स्थितीकडे लक्ष न देतां व्यक्तिशः निरनिराळ्या लोकांनीं मदत करणें याचा थोड्या फार प्रमाणांत अवनतिकारक परिणाम होतो असा अनुभव आहे. याकरितां साऱ्या कुटुंबाचीच स्थिति लक्षांत घेऊन त्याला मदत केल्यास त्याचा परिणाम साऱ्या कुटुंबालाच अधिक फलदायी होतो. कौटुंबिक व्यवस्थेच्या ध्येयाला अनुरूप असा हा प्रयत्न होतो

व त्यामुळें साऱ्या कुटुंबाची शक्ति वाढते. यामुळें, कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीचें सुखदुःख परस्परावर अवलंबून असतें, या तत्वाकडे डोळेझांक होत नाहीं आणि साऱ्या कुटुंबाची परिस्थिति पाहून तें सुधरेल, मोडलें जाणार नाहीं, अशी योजना करितां येते.

## दानानें हित तसें अहितहि होतें.

धर्मादाय (Charity) म्हणजे काय असा कोणीं प्रश्न विचारिल्यास त्याचें उत्तर देणें जरा कठीण असतें. कारण धर्मादाय म्हणजे पैसा, अन्नपाणी, कपडालत्ता, औषध व दुसऱ्या अनेक तऱ्हेनें दिलेलें दान असें लोक म्हणतांना आपण नेहमीं ऐकतों. परंतु खरें पाहातां विचारी माणसाचें त्यानें समाधान होत नाहीं. कारण त्यापासून माणसाचें हित वा अहित दोन्ही होऊं शकतात. यासाठीं याचा जरा विस्तृत विचार करणें जरूर आहे.

दानामुळें आईबापांच्या अभावीं पोरकीं झालेल्या मुलांना शिक्षण मिळून व सर्व प्रकारें त्यांची योग्य जोपासना होऊन आपल्या सुदैवी मित्रांप्रमाणें तीं जगांतील संसार थाटण्यास सर्वतोपरी लायक होतात. संसारांत नानाविध संकटांशीं झगडतांना वृद्धापकाळाची तरतूद करितां न आल्यामुळें किंवा भरभराटीच्या दिवसांत भावी संकटांचें विस्मरण पडून म्हातारपणीं निराधार व परावलंबी झालेल्यांना आपल्या आयुष्यांत अन्नाचे दोन घास सुखानें मिळतात. वेडे झालेल्या लोकांना त्यांच्या स्थितीच्या मानानें जितकें सुखांत ठेवितां येईल तितकें ठेवण्याची व्यवस्था करण्यांत येते. मनुष्य आजारी पडला व पैशाच्या अभावीं त्याला वैद्यकीय मदत मिळेनाशी झाली तर अल्प पैशानें किंवा निवळ फुकट सुद्धां औषधोपचाराची व्यवस्था करण्यांत येते किंवा हॉस्पिटलमध्यें जाऊन बरें वाटेपर्यंत राहातां येतें. बेकार लोकांना काम शोधून देऊन त्यांन कायमचे स्वावलंबी करितां येतें. शरिरानें व्यंग असल्यामुळें जे आपलें पोट भरूं शकत नाहींत पण ज्यांना अनुरूप असें काम दिल्यास ते अर्धेमुर्धे पोट भरूं शकतील अशांना धर्मार्थ संस्थेकडून बाकीची मदत मिळाल्यास किंवा धर्मार्थ संस्थेंत राहतां आल्यास त्यांची पराधीन स्थिति जाऊन ते स्वावलंबी होऊं शकतात आणि त्यामुळें त्यांची अधोगति टळते. सांपत्तिक अडचणींमुळें बापाबरोबर आईलाहि कारखान्यांत काम करणें भाग पडल्यामुळें त्यांच्या गैरहजेरींत उनाडत फिरणाऱ्या मुलांची योग्य जोपासना करून, त्यांना दूध देऊन, त्यांच्या स्नानाची

व कपड्यालत्त्याची व्यवस्था करून त्यांना गरीब पण कर्तृत्ववान् नागरिक करण्याचें श्रेय धर्मार्थ संस्थांनाच असतें. या व दुसऱ्या नानाविध गोष्टी कीं ज्यांच्यामुळें असहाय माणसांचें आयुष्य सुखावह होतें व तीं अधिक सुशील व कर्तबगार होतात, त्या साऱ्या दानामुळेंच शक्य होतात. गोरगरिबांकरितां चाललेलीं हॉस्पिटलें व आंधळे, पांगळे, वेडे व दुसऱ्या अनेक प्रकारचे व्यंग लोक यांच्याकरितां चाललेल्या अनेक संस्था व त्यांच्या पायीं होत असलेला लाखों रुपयांचा खर्च—मानवी प्राण्याच्या सुखासाठीं परोपकाराच्या भावनेनें चाललेल्या या संस्थांचें, दान देण्याची प्रवृत्ति अस्तित्वांत नसती तर काय झालें असतें ही नुसती कल्पनाच दुःखद होते.

पात्रापात्रतेचा विचार करून योग्य दिशेनें जर दान करण्यांत आलें तर वर निर्दिष्ट केलेले फायदे होऊं शकतात. पण दुर्दैवानें त्याचा जर अनाठायीं उपयोग करण्यांत आला तर त्यापासून अपरिमित अहित होण्याचा संभव असतो. अल्प प्रयत्नांनीं दान मिळूं लागल्यास मनुष्य आळशी, परावलंबी आणि अदूरदर्शी हाण्याचा संभव असतो. स्वतः निरुद्योगी राहून पोटासाठीं दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याची सवय जडल्यामुळें मनुष्याचा स्वाभिमान नाहींसा होतो आणि त्याची पाशवी वृत्ति कमी होऊन त्याच्यांत मनुष्यपणा येण्याऐवजीं तो मनुष्यकोटींतून पशुकोटींत जाऊं लागतो, त्याच्यांतील सारे सद्गुण नाहींसे होतात आणि महासागरांत सांपडलेला एखादा ठोकळा जसा इतस्ततः हेलकावे खात असतो त्याप्रमाणें निराशेनें बेभान होऊन, सैरावैरा भटकत मन मानेल त्याप्रमाणें तो वागत असतो आणि शेवटीं एखादें अघोर कृत्य करून बहुधा तुरुंगांत जातो किंवा रस्तोरस्तीं भटकत असतां तेथेंच त्याचा अंत होतो. अशा रीतीनें परावलंबीपणामुळें आयुष्य कवडीमोल होतें आणि हाहि प्रताप दानाचाच असतो हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे.

गरीब ( Poor ) आणि विपन्न–नादार ( Paupers ) या दोन स्थितींत फरक फारच थोडा आहे. पण स्वतः श्रम न करितां दुसऱ्याच्या श्रमावर नाहक माणसानें राहण्यास कांहीं कारण आहे असें आम्हांस वाटत नाहीं. आणि म्हणून धर्मादाय संस्था व दानशूर लोक जें दान करितात त्यांतील बहुतेक भाग गरिबाला आळशी आणि परावलंबी करण्यांत खर्च होतो असें म्हणणें भाग आहे. विशेषतः आजमितीला जो खाजगी व सार्वजानिक पैसा

धर्मादायांत खर्च होतो त्यांतला निमेपेक्षां अधिक भाग पहिल्या प्रतीचे लबाड व ढोंगी मनुष्य लुटतात. यावरून सहजच असें सिद्ध होतें कीं, हल्लींची दानाची पद्धति चुकीची आहे व तिच्यापासून मागणेकरी लोक कमी न होतां वाढतच आहेत. कारण योग्य विचारपूस केल्याशिवाय आपल्या मदतीनें त्या माणसाची गरज भागून तो स्वावलंबी होईल किंवा नाहीं, याचा विचार केल्याशिवाय प्रामाणिक भिकाऱ्याला सुद्धां मदत करणें योग्य नाहीं. रस्त्यांत किंवा दारावर नुसती हृदयद्रावक हकीगत ऐकून एखाद्या निढावलेल्या भिकाऱ्याला रोकड पैशाची मदत करणें तर अगदींच वाईट. कारण जो कोणत्या ना कोणत्या प्रकारचें काम करून पोट भरण्यास सर्वस्वी लायक आहे त्याला अशी मदत करणें म्हणजे तूं काम करण्यास लायक असलास तरी काम न करितां मी दिलेल्या मदतीवरच रहा असें अप्रत्यक्ष रीतीनें सांगणेंच होय. अशानें त्याच्या आयुष्याचा नाश होतो, पण त्याबरोबर राष्ट्राचाहि ऱ्हास व्हावयास लागतो. दान करण्याची पद्धत मूळ कशी निघाली याचा जर आपण विचार करावयास लागलों तर आपल्याला असें आढळून येईल कीं कोणच्याहि देशांत आणि कोणत्याहि समाजांत सर्वच लोक सुदृढ आणि सशक्त असतात असें नाहीं. अगदीं अल्प प्रमाणांत कां होईनात पण कांहीं आजारी व अशक्त–मनानें किंवा शरीरानें असावयाचेच. जगण्यासाठीं धडपड ही सर्वांसच सारखी करावी लागते, पोटाला व शरीराला अवश्य लागणाऱ्या वस्तु मिळवून आणाव्या लागतात, त्या मिळविण्याकरितां श्रम करावे लागतात. श्रमानें माणसाला विश्रांतीची अवश्यकता भासते आणि श्रम करितांना कधीं कधीं संकटेंहि येतात. शिवाय ये रे दिवसा आणि भर रे पोटा असेंहि करून माणसाचें चालत नाहीं, तर आपल्या म्हातारपणाकरितां व मुलांबाळांकरितां कांहीं तरी तरतूद करून ठेवावी लागते. याचा परिणाम असा होतो कीं, या जीवनकलहाच्या धामधुमींत जगण्याला लायक असेल त्याचें आयुष्य वाढतें आणि या परिस्थितीशीं स्वतः-च्या दोषामुळें किंवा नैसर्गिक अडचणीमुळें टक्कर देण्याचें ज्यांच्यांत त्राण नसतें त्यांचें आयुष्य अर्थातच कमी होतें.

## मनुष्य आणि मनुष्येतर प्राण्यांमधील फरक.

खालच्या दर्जाच्या प्राण्यांच्या आयुष्यक्रमाचें आपण सूक्ष्म निरीक्षण केल्यास आपल्याला असें आढळून येईल कीं, आजारीपणांत किंवा दुसऱ्या

कांहीं अपघाताच्या प्रसंगीं त्यांना परस्परांना मदत करून त्या संकटांतून वांचवितां येत नाहीं. त्यामुळें लहान सहान अपघात किंवा तात्पुरता आजारीपणा त्यांना नेहमीं प्राणनाशक होतो. कारण त्यांना स्वतःला किंवा त्यांच्या सहकाऱ्याला या संकटांना तोंड देण्याचें उपजतच सामर्थ्य नसतें. यांपैकीं प्रत्येकाला जगण्याला अवश्य लागणारी अनुकूल परिस्थिति सुदैवानें नसल्यास जन्माला येतांक्षणींच मरणाची वाट पाहावी लागते.

पण मनुष्यप्राण्याची स्थिति अशी नाहीं. मनुष्यांना समाज करून राहावें लागतें, परस्परांबद्दल सहानुभूति वाटते व ती कृतींत आणण्याची संधि मिळते. त्याचें कारण त्यांचें सुख व सुरक्षितता परस्परावलंबी असते. खालच्या दर्जाचे प्राणी ज्याप्रमाणें हरएक बाबतींत स्वतःवरच अवलंबून असतात व दुसऱ्याशीं तुटकपणानें वागणें निसर्गतःच त्यांना प्राप्त असतें तसें माणसांविषयीं आपण पाहात नाहीं. माणसाला स्वतःच्या हिताकरितांच समाज करून व समाजाला धरून राहिल्याशिवाय गत्यंतर नसतें. अगदीं रानटी जातींत सुद्धां अगदीं अशक्त, अगदीं लहान, शरिरानें व्यंग असलेल्या अशा माणसाला त्याच स्थितींत असलेल्या खालच्या जातीच्या प्राण्यापेक्षां पुष्कळच कमी दुःख सहन करावें लागतें. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते, ती ही कीं, मनुष्य समाज करून आणि सहकारितेनें राहिल्यानें ज्या अनेक गोष्टी सहकारितेच्या अभावीं मनुष्येतर प्राण्यांच्या नाशाला कारणीभूत होतात त्यांचें माणसांच्या बाबतींत कांहीं चालेनासें होतें. सारांश, मनुष्य सहकारितेनें आणि समाज करून राहिल्यानेंच या जगांत टिकाव धरूं शकतो आणि परिस्थितीशीं झुंजण्याची ज्याच्या अंगीं अधिक शक्ति आहे तोच अधिक काळ जगतो हा जो सृष्टीचा सामान्य नियम त्याचाहि पाडाव करूं शकतो. नाहींपेक्षां समाजाशीं तुसडेपणानें वागून एकटा राहिल्यास इतर प्राण्यांसारखीच त्याची स्थिति होते.

सारांश, मनुष्य एकटा राहिल्यानें ज्या अडचणी येतील त्या टाळण्याकरितां समाज करून राहिल्यामुळेंच समाजांत स्वतःचें पोटहि भरतां येणार नाहीं अशीं शरिरानें व मनानें दुबळीं असलेलीं माणसें जिवंत राहूं लागलीं आणि धर्मार्थ हॉस्पिटलें, दवाखाने, अनाथ बालकाश्रम, अन्नसत्रें, सदावर्तें व दुसऱ्या अनेक प्रकारच्या धर्मार्थ संस्था सहकार्यानें सृष्टीचा उपरिनिर्दिष्ट नियम धाब्यावर बसविण्याकरितांच उत्पन्न झाल्या. मनुष्य एकटा राहात असता—समाज करून

परस्परांच्या मदतीनें राहाण्याचें त्यानें ठरविलें नसतें, तर या संस्था काढण्याचें कांहींच प्रयोजन राहिलें नसतें. ज्याला आपलें स्वतःचें संरक्षण करितां आलें नसतें तो सृष्टिनियमांप्रमाणें जगताचना. मनुष्याच्या आपलेपणाच्या प्रवृत्तीमुळेंच सर्व माणसांत अगदीं अशक्त दुबळ्या अशा लोकांनाहि या जगांत सुखानें जगण्याची संधि मिळूं लागली आणि त्यांना पोसण्याची जबाबदारी समाजांतील इतर सशक्त व सामर्थ्यवान् व्यक्तींवर अंशतः किंवा सर्वतोपरी पडूं लागली.

## दुर्बलांना साहाय्य न मिळतां ढोंग्यांचा सुळसुळाट.

सुशिक्षित समाजांत अशक्त, व्यंग, पराधीन अशा माणसांनाच समाजांतील सशक्त व स्वावलंबी लोकांनीं मदत केली असती तर दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा करणारे वरच्या सारखेच लोक समाजांत दिसते. जे कोणच्याहि प्रकारें दुबळे नाहींत व स्वतःचें पोट भरण्याला सर्वस्वीं लायक आहेत असेहि लोक भिक्षेची याचना करितांना दिसतेना व त्यामुळें ज्या अनेक प्रकारच्या आपत्ति व पैशाचा दुरुपयोग समाजांत दिसतो त्यांचा मागमूस लागताना. परंतु दुर्दैवाची व आश्चर्याची गोष्ट ही कीं, अशाच लोकांचा समाजांत सुळसुळाट झाला, इतकेंच नव्हे तर त्या लोकांचा एक स्वतंत्र वर्गच उत्पन्न झाला. याचें कारण असें कीं खरोखरीच ज्याला गरज असेल त्यालाच दान करावें हें धोरण दान देतांना ठेवण्यांत येईनासें झालें. त्यामुळें सुशिक्षित ह्मणविणाऱ्या समाजांत आज खऱ्या भिकाऱ्यांपेक्षां ढोंगी भिकाऱ्यांची संख्या कैक पटीनें वाढली आहे व त्यामुळें साऱ्या समाजाची अपरिमित हानि होत आहे. परिस्थिति अशा प्रकारची असल्यामुळें आतां असा प्रश्न उद्भवतो कीं, याला आळा कसा घालावा ? या ढोंगी भुतांचा स्वैर संचार संपुष्टांत कसा आणावा ? संघटित समाज करून वैयक्तिक प्रयत्नांत असलेले दोष कांहीं अंशीं आपण नाहींसे करूं ही गोष्ट खरी आहे, पण तेवढ्यानें या अन्यायाचें निर्मूलन होणें शक्य नाहीं.

संघ स्थापावयाचे व संघ करून राहाण्यांतच सुख मानावयाचें, हा माणसाचा स्वभावधर्म आहे. तशी माणसाची नैसर्गिक प्रवृत्ति आहे. या निसर्गतः थोर गुणामुळेंच सशक्त तेवढा ठेवावयाचा व अशक्त तेवढा मारावयाचा या सृष्टीच्या नियमावर मनुष्य कुरघोडी करूं शकला व अगदीं अशक्तांतील अशक्तालासुद्धां समाजांत गुण्या गोविंदानें जगतां येईल अशा प्रकारची ध्येयभूत परिस्थिति उत्पन्न करून आपल्या प्रेमाचें, आपल्या दयेचें व मनुष्यमात्राविषयींच्या

आपल्या कळकळीचें अति उच्च ध्येय त्यानें गांठलें. ज्या शक्तीच्या साहाय्यानें मनुष्य वरील गोष्टी करूं शकला त्याच शक्तीच्या जोरावर, सद्गुणांचा अतिरेक झाल्यामुळें जे अनेक प्रकारचे अनिष्ट परिणाम झाले आहेत त्यांचा नायनाट करितां येईल. ह्मणजे अशक्त, आजारी वगैरे दुर्बळ लोक एकाच समाजाचे घटक आहेत असें मानून सर्वांच्या संमतीनें आणि मदतीनें त्यांचे कष्ट कमी करण्यांत येतात. व त्यांचें आयुष्य होतां होईल तितकें सुखावह करण्यांत येतें; त्याच प्रमाणें हें सार्वजनिक ओझें घेण्यास कोणी चुकवीत असेल, कांकूं करीत असेल किंवा दुसऱ्याचें ओझें घेण्याऐवजीं आपलेंच ओझें बुद्ध्या समाजावर लादून सर्व समाजाला लांच्छन लावीत असेल तर आपलें सर्व सामर्थ्य एकत्र करून त्याच्या त्या अन्यायकृतीचा निषेध करणें व इतरांप्रमाणें त्याला राबावयास लावणें समाजाला शक्य आहे व अवश्यकाहि आहे. असे प्रयत्न होतील तेव्हांच समाजाची अधोगति थांबेल. धर्मादाय संस्थांची संघटना करण्याचा मूलभूत हेतु हाच. ढोंग्याचें ढोंग काढून टाकण्याचा सिधा मार्ग हाच. या मार्गानींच धर्मार्थ दिलेल्या द्रव्याचा योग्य रीतीनें विनियोग करितां येईल व जे खरोखरीच दुर्बळ असतील त्यांची स्थिति अधिक सुधारतां येईल.

सुसंघटित समाजांत सशक्त अशक्तांना पोसतात, इतकेंच नव्हे तर त्या समाजाची घटनाच अशी केली जाते कीं, समाजाचे सबळ व दुर्बळ सांधे अशा रीतीनें एकजीव होऊन त्यांत परस्परांची सोय आपोआप केली जाते. लंगडा डोळस असतो पण त्याचा पाय अधू असल्यामुळें त्याला चालतां येत नाहीं आणि आंधळा चालण्यांत पटाईत असतो पण त्याला मार्ग दिसत नाहीं. या दोघांची मैत्री जमते. ते एकमेकांचें व्यंग काय आहे तें समजून घेतात व एकमेकाला साहाय्य करून दोघांचाहि फायदा कसा करून घेतां येईल हें परस्परांच्या विचारानें ठरवितात. लंगडा आंधळ्याच्या खांद्यावर बसतो व लंगडा दाखवील त्या मार्गानें आंधळा चालूं लागतो. अशा रीतीनें त्या शरिरानें व्यंग असलेल्या माणसांची जोडी जमून ते व्यक्तिशः जें करण्यास असमर्थ असतात त्या गोष्टी परस्परांच्या साहाय्यानें सहज करूं शकतात. हें मनुष्येतर प्राण्यांना शक्य नसतें. जें ह्या दोन माणसांना करतां येतें तें सर्व समाजालाहि करतां येण्यासारखें असतें आणि संघटित समाजाचें हेंच ध्येय असावयास पाहिजे. पण समाज इतका सुसंघटित होईल तेव्हांच ह्या साऱ्या गोष्टी होऊं शकतील.

कोणतेंहि सुधारलेलें राष्ट्र पहा, त्याला लागणारें अन्नवस्त्र व दुसऱ्या सहस्रावधि वस्तु तेथले लोक आपल्या देशांतच तयार करितात असें नाहीं तर त्या देशांतील परिस्थितीप्रमाणें ज्या वस्तु अधिक सुलभ रीतीनें तयार करितां येण्यासारख्या असतील त्या ते स्वतःकरितां व दुसऱ्या देशाकरितांहि तयार करितात व त्याच्या मोबदला दुसऱ्या वस्तु इतर देशांतून घेतात. अशा रीतीनें श्रमविभागाच्या तत्वावर हें सारें चालतें. मनुष्येतर प्राण्यांना अवश्य लागणाऱ्या साऱ्या वस्तु–त्यांच्या गरजाहि थोड्या असतात ही गोष्ट खरी—दुसऱ्याच्या मदतीशिवाय त्यांच्या त्यांनाच मिळवाव्या लागतात; पण माणसालासुद्धां सर्वच गोष्टी कराव्या लागत नसल्या तरी ज्या त्याला अधिक यशस्वी रीतीनें करितां येण्यासारख्या असतात त्या कराव्या लागतातच. निव्वळ आळशी राहून त्याची उपासमार होण्याचा संभव असतो. आजारी, अशक्त, व्यंग यांना सुद्धां हाच कायदा लागू करितां येईल. त्या प्रत्येकाच्या परिस्थितीप्रमाणें किंवा मगदुराप्रमाणें व सोयीप्रमाणें थोडेफार श्रम हे त्यांनीं केलेच पाहिजेत. एखाद्या शेतकऱ्याप्रमाणें किंवा मजुराप्रमाणें दिवस भर काम करून आपल्या पोटापुरतेंहि कदाचित् त्यांना मिळवितां येणार नाहीं. पण स्वतःला लागणारा अर्धामुर्धा खर्च तरी त्यांना मिळवितां येईल व बाकी राहिलेला खर्च त्यांनीं समाजाकडे मागणें व समाजानें आनंदानें देणें उभय पक्षीं न्यायाचें व योग्य होईल.

श्रमविभागाच्या तत्वाप्रमाणें आपण चाललों तरच या जगांत आपला टिकाव लागेल हें जर खरें, तर दान अनाठायीं करून समाजांत परोपजीवि माणसांची संख्या वाढविण्यापेक्षां प्रत्येक माणसाला आपल्या चरितार्थाकरितां जितके श्रम करणें अवश्य आहे तितके करावयास लावून, प्रत्येक माणसाचा दर्जा वाढविणें, स्वावलंबी लोकांवर पडणारें इतर लोकांचें ओझें कमी करणें व ज्यांना ज्या मदतीची आवश्यकता असेल ती देणें हें आपलें कर्तव्य नव्हे काय ?

## प्रकरण ६ वें.

# समाजसेवकांच्या वसाहती.

In whatever country of the world, in whatever social condition thou art placed, it is with the oppressed thou must live, for one-half of ideas and feelings are lacking in those who live only with the great and happy.

विपन्नावस्थेला पोंचलेल्या लोकांना प्रत्यक्ष दान करण्यापेक्षांसुद्धां संकट-प्रसंगीं उपदेश करणें व कोणता मार्ग हितकर होईल याविषयीं सल्ला देणें हें त्यांच्या अधिक उपयोगाचें असतें. पण हें नुसतें चांगल्या वस्तींत व्याख्यानें दिल्यानें किंवा गरीब लोकांच्या वस्तींत सवडीप्रमाणें जाऊन होण्याजोगें नसतें. त्याला गरीब लोकांच्या वस्तींत राहून तेथील परिस्थितीचा अभ्यास प्रत्यक्ष करून त्यांचे शेजारी व मित्र या नात्यानें तें करावें लागतें. तसेंच एकाच ठिकाणीं काम करणारे पण वेगवेगळ्या जातींचे किंवा पंथांचे लोक निरनिराळ्या ठिकाणीं पसरलेले असतात त्यांना एकत्र करून त्या सर्वांच्या हिताच्या प्रश्नांचा विचार करणें जरूर असतें. अशा गोष्टी ते लोक स्वतः करूं लागत तोंपर्यंत सुशिक्षित वर्गातील लोकांनींच केल्या पाहिजेत; आणि कामगार वस्तींत काम-गारांच्या शेजारीं राहूनच त्या करणें शक्य असतें. लोकांच्या अनेक अडचणी असतात, अनेक तऱ्हेचीं गाऱ्हाणीं असतात, अनेक तऱ्हेच्या मदतीची त्यांना अवश्यकता असते आणि अनेक तऱ्हेनें आपली सुधारणा व्हावी असें त्यांना वाटत असतें. हें सर्व करण्यास त्यांच्यांत मिळून मिसळून, आपण त्यांच्याच-पैकीं एक आहों अशा भावनेनें वागून त्यांची मैत्री संपादन करावी लागते. वरील हेतूनें कामगार लोकांच्या वस्तींत राहणाऱ्या समाजसेवकांच्या ठिकाणाला ‘ समाजसेवकांची वसाहत ’ असें म्हणतात.

औद्योगिक युगाला सुरवात होण्यापूर्वीं प्रत्येक खेड्यांतील समाजसेवेचें काम तेथील लोक आत्मस्फूर्तीनेंच करीत. गांवांतील सार्वजनिक स्वरूपाचीं कामें मोफतच होत. हीं कामें करून घेणारे किंवा करावयास लावणारे अधिकारी गांवानेंच निवडलेले व कोणत्याहि प्रकारचा मोबदला न घेतां गांवकीचें म्हणून

काम करणारे असत. यामुळें दुसऱ्या गांवचे लोक या गांवची चौकशीहि करित नसत व ती करण्याची अवश्यकताहि नसे. आपल्या गांवांतील सार्वजनिक कामांची तक्रार दुसरीकडे जाऊं द्यावयाची नाहीं व दुसरीकडील तक्रारींचा आपण विचार करावयाचा नाहीं अशा तऱ्हेनें प्रत्येक खेड्यांतील सार्वजनिक कामें बिनबोभाट होत. कांहीं गांवांचें मिळून कार्य असलें तरी त्या गांवचे पुढारी मिळून तें करीत. आणि शहरांतील कामेंहि अशींच पण थोड्याबहुत फरकानें चालत.

या सर्व गोष्टी बदलण्याला एकोणिसाव्या शतकांत आरंभ झाला. यांत्रिक युगाला सुरवात झाली, यंत्रें वाफेच्या साहाय्यानें चालूं लागलीं, मालाची पैदास कल्पनातीत मोठ्या प्रमाणांत करण्याची कल्पना निघाली आणि त्याकरितां हजारों माणसें शहरांत येऊं लागलीं. अर्थात्‌च हीं माणसें एका ठिकाणाहून येत नसत तर अगदीं दूरदूरच्या–कधीं कधीं परस्परांची भाषा परस्परांना कळतहि नसे इतक्या एकमेकांपासून दूरच्या वस्तींतून तीं येत असत. त्यामुळें ज्याप्रमाणें चार ठिकाणचे चार वाटसरू एकत्र झाले म्हणजे पूर्वपरिचयाच्या अभावीं कुतूहलपूर्वक परस्परांकडे पाहतात, पण एकमेकांच्या संगतीनें तात्पुरते कां होईना पण राहावयाचें असल्यामुळें त्या घटकेपासूनच ते एकमेकांची ओळख करून घेऊं लागतात. त्याचप्रमाणें या लोकांचेंहि झालें. ते भिन्न परिस्थितींत पडले व त्यांचीं पूर्वींचीं सर्व बंधनें नाहींशीं झालीं. या स्थलांतराचा आणखी एक असा अनिष्ट परिणाम त्यांचेवर झाला कीं, ज्या खेड्यांतून हे लोक आले तेथें त्यांना वरच्या दर्ज्यांच्या, सुस्थितींतील लोकांच्या शेजारींच राहाण्याचा, प्रसंगविशेषीं त्यांच्यांत मिसण्याचा योग येई व चांगल्या राहणीचा, चांगल्या परिस्थितीचा व चांगल्या शिक्षणाचा परिणाम काय होतो हें प्रत्यक्ष पाहाण्याची त्यांना संधि मिळे. परंतु या नवीन ठिकाणीं त्यांच्या शेजारीं त्यांच्याच सारख्या मजूरवर्गाशिवाय दुसरें कोणी रहावयाचें नाहीं; हें ठिकाण चांगल्या वस्तीपासून अगदीं दूर कारखान्यांच्या शेजारीं घाणेरड्या वस्तींत असावयाचें. शिवाय कारखाने सर्वत्र पसरलेले असल्यामुळें व मजुरी कांहीं कारखान्यांत कमी व कांहींत जास्त असल्यामुळें, अडीअडचणीलासुद्धां कामावरून गैरहजर राहिल्यास नोकरी जाण्याचा संभव असल्यामुळें, आणि कामगार व कारखानदार यांना परस्परांविषयीं आपलेपणा वाटण्यास कांहींच साधन नसल्यामुळें कामगारांचें राहाण्याचें ठिकाण नोकरीबरोबरच वरचेवर बदलत असतें. कामगार आपलें खेडें सोडून ज्या शहरांत येतो तेथें कसेंबसें पोट भरतें

यापरतें त्याला आकर्षित करणारें दुसरें कांहींच साधन नसल्यामुळें त्याचें प्रेम आपल्या गांवावर राहावें व संधि मिळेल तेव्हां त्यानें आपल्या मुलुखाचा मार्ग धरावा यांत गैर तें काय? सारांश, इतर समाजापासून अगदीं अलग राहाण्याचा प्रसंग कामगारवर्गावर हा प्रथमच येऊं लागला होता. हा समाज कोणत्याहि प्रकारें संघटित नव्हता आणि मूलतः पंगू असलेल्या या वर्गाला इतर लोकांच्या संगतीचा कांहीं थोडा बहुत फायदा होईल म्हणावा तर तीहि आशा या नवीन घडामोडीनें नाहींशी झाली होती. या नवीन परिस्थितींत कामगार-वर्ग अधिक खालावत जाण्याचा संभव होता. ही कामगार वर्गाची अधोगति कशी थांबवावी या विचारांनीं आज मितीला सुद्धां कामगारांच्या हितचिंतकांना भांबावून सोडलें आहे. अमूक एका भागांत कामगार लोक राहातात असें म्हणावयास आज आपल्याला बरें वाटतें. परंतु निरनिराळ्या वर्गांचे लोक परस्परांपासून दूरदूर राहून समाजाचे असे तुकडे पडूं लागल्यास एकंदर समाजाची अवनति होऊं लागते. एकंदर समाजापासून अलग राहावें लागल्यामुळें कामगार-वर्गांत किती अनिष्ट गोष्टी शिरल्या आहेत याचा विचार केल्यास हें समाजाचें वर्गीकरण किती घातूक आहे हें ध्यानांत येईल. याचें विशेष उग्र स्वरूप मुंबई सारख्या शहरांत पाहावयास मिळतें. समाजांतील बहुसंख्याक वर्ग पिढ्यान्‌पिढ्या राहात आलेलें आपलें खेडें सोडून शहरांत आल्यामुळें, परिस्थितीमुळें कां होईना पण इतर वर्गापासून दूर राहिल्यामुळें व स्वतःची सुधारणा करण्याइतकें स्वतःमध्यें सामर्थ्य नाहीं व दुसऱ्याच्या संगतीनें सुधारणा करून घ्यावी तर कैक पिढ्या शेजारी राहिलेल्या शेजाऱ्यांचा शेजार सुटलेला अशा परिस्थितींत या वर्गाची शारीरिक, बौद्धिक व नैतिक अवनति दिवसेंदिवस व्हावी यांत आश्चर्य तें कसचें?

बरें, कोणी असें म्हणतील कीं वस्तुस्थिति जर अशी आहे तर त्याच लोकांपैकीं ज्यांना अनुकूल परिस्थिति असेल त्यांनीं आपल्या बांधवांची उन्नति करण्याचा प्रयत्न करावा. पण सद्यःस्थितींत अशी अपेक्षा करणें म्हणजे कामगारांच्या स्थितीविषयींचें आपलें अज्ञान प्रदर्शित करणें होय. कारण ते आशिक्षित असल्यामुळें आपल्याला काय हवें व आपली सुधारणा कोणत्या दिशेनें झाली पाहिजे हेंहि त्यांना सांगतां येत नाहीं. त्यांची सांपत्तिक स्थिति इतकी हलाकीची असते कीं, नवऱ्याची मजुरी कुटुंबाला पुरेशी होत नाहीं म्हणून बायकोलाहि कारखान्यांत कामाला जावें लागतें व तेवढ्यानेंहि पुरें पडत नाहीं म्हणून हिंडतें फिरतें मूल होतांच त्यालाहि कामाला लावण्याची त्यांची तयारी असते. पैशा-

न्यायीं मुलांच्या शरीरहानीचीहि ते परवा करीत नाहींत, म्हणून सरकारला कायद्यानें कारखान्यांत काम करण्याच्या बाबतींत मुलांची वयोमर्यादा ठरवावी लागते. कामगाराची शारीरिक अवनति इतकी झालेली असते कीं ऊस रगाड्यांतून पिळून निघाल्यानंतर ज्याप्रमाणें त्याचें चिपाड शिलक राहतें तद्वत् हीं माणसें कारखान्यांतून बाहेर येतांना दिसतात. त्यानंतर आपल्या सुधारणेचे प्रयत्न करण्याऐवजीं कामाची शीण घालविण्याकरितां त्यांना अनेक प्रकारच्या व्यसनांचा आश्रय धरणें भाग पडतें.

## समाजसेवकांच्या वसाहती.

वरीलप्रमाणें परिस्थिति असल्यामुळें व राष्ट्राची खरी संपत्ति पैसा नसून राष्ट्रांतील माणसेंच होत हें लक्षांत ठेवून कामगारांची त्यांच्या वस्तींत राहून व त्यांच्याशीं मिळून मिसळून सुधारणा करण्याकरितां समाजाच्या कांहीं हितचिंतकांनीं समाजसेवकांच्या वसाहतींची चळवळ सुरू केली. निरनिराळ्या वर्गांतील लोकांनीं विशेषतः विश्वविद्यालयांत अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनीं आपले लहान लहान संघ करून सुटींत किंवा एरव्हींसुद्धां गरीब लोकांच्या वस्तींत राहून त्यांच्या उपयोगीं पडावें, त्यांच्यांत किंवा त्यांच्या जवळपास राहून त्यांच्या स्थितीचा प्रत्यक्ष अभ्यास करावा व त्या लोकांच्या परिस्थितीचें जातीनें ज्ञान मिळवावें हा या चळवळीचा हेतु होता. कारण येथें अनेक ठिकाणांहून अनेक प्रकारचे लोक आलेले असतात, ते निरनिराळे धंदे करणारे असतात व त्यांच्या निरनिराळ्या सामाजिक व धार्मिक चळवळी चाललेल्या असतात. म्हणून त्यांची राहाणी, त्यांचे विचार व त्यांच्या अडचणी समजण्यास त्यांच्यांतच राहाणें अवश्यक असतें. कामगारांच्या वस्तींत राहिल्यानें सर्व लोकांना स्वच्छतेचें महत्त्व कळत नसल्यामुळें एखाद्या कुटुंबाला स्वतःपुरती कां होईना स्वच्छता ठेवणें कसें अशक्य असतें, जागेच्या अभावीं गचडी करून आपल्या सर्व कुटुंबाचा व्यवहार एका लहानशा खोलींत कसा चालवावा लागतो, लोकांच्या आरोग्यासाठीं, राहाण्यासाठीं, शिक्षणासाठीं आणि करमणुकीसाठीं कोणत्या सोयी कराव्या; वाचनालयें, व्यायामशाळा, क्रीडांगणें, आंघोळीच्या जागा, धुण्याच्या जागा कोठें व कशा असाव्यात हें समाजसेवेनें समजतें व या गोष्टी प्रत्यक्ष अमलांत येण्यासाठीं सरकार, म्युनिसिपॅलिटी व जनता यांचें साहाय्य कसें मिळवावें तेंहि तो शिकतो.

परंतु येथें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, समाजांत रूढ असलेल्या कल्पनांत क्रांति घडवून आणून नवीन कल्पनांचा फैलाव करण्याची कोणचीहि चळवळ अमुक वेळीं सुरू झाली असें आपण म्हटलें तथापि ती त्यापूर्वीं पुष्कळ काळ सुरू झालेली असते. कारण त्याकरितां प्रास्ताविक गोष्टी पुष्कळ करावयाच्या असतात आणि ही पूर्वतयारी फारसा गाजावाजा न करितां करण्यांत येत असल्यामुळें तिची फारशी प्रसिद्धी होत नाहीं. समाजसेवकांच्या वसाहती काढण्याच्या बाबतींत असेंच झालें. त्या अस्तित्वांत येण्यापूर्वीं पुष्कळ दिवस त्यांची रूपरेषा तयार झालेली होती. इतकेंच नव्हे तर एडवर्ड डेनिसन आणि आर्नोल्ड टॉयन्बी या उभयतां समाजसेवकांनीं या कल्पनांप्रमाणें गरीब लोकांच्या वस्तींत स्वतः राहावयास जाऊन या कल्पनांना मूर्तस्वरूप दिलें होतें. तथापि वरील कल्पनांप्रमाणें पहिली वसाहत स्थापण्याचें भाग्य कॅनन बार्नेट यांनाच लाधलें. पण रे. बार्नेट यांनासुद्धां पूर्वतयारी करावी लागली. त्यांनीं इ. स. १८७५. च्या सुटींत गरीब लोकांच्या वस्तींत एक खोली भाड्यानें घेतली होती व तेथें शाळा काढिली होती. आणि त्या शाळेंतील मुलांच्या आईबापांची ओळख करून घेऊन सणावारीं ते त्यांच्यांत मिळूं मिसळूं लागले होते. त्यांनीं त्यांच्या स्थितीविषयीं माहिती गोळा केली आणि घरोघर फिरून त्यांनीं गरीब लोकांच्या स्थितीची प्रत्यक्ष ओळख करून घेतली. इतकेंच नव्हे तर त्यांनीं त्यांच्या क्लबांत जाऊन त्यांच्या राजकीय मतांचीहि चाचणी करून पाहिली आणि त्यावरून त्यांनीं असा सिद्धांत बांधला कीं, लोक सुशिक्षित झाले नसल्यास लोकशाहीची चळवळ त्यांना खात्रीनें हानिकारक होईल. या कामीं मिसेस बार्नेट यांची त्यांना पुष्कळ मदत झाली.

## टॉयन्बी हॉल.

टॉयन्बी हॉल नांवाची पहिली वसाहत इंग्लंडमध्यें वर म्हटल्याप्रमाणें कॅनन बार्नेट यांनीं टॉयन्बी यांच्या पहिल्या पुण्यतिथीच्या दिवशीं ता. ९ मार्च इ. स. १८८४ रोजीं स्थापन केली. गरीब लोकांच्या स्थितीविषयीं सांगोपांग विचार करून त्यांची स्थिति सुधारण्यासाठीं अशा प्रकारच्या वसाहती काढण्याची मूळ कल्पना टॉयन्बी यांचीच असल्यामुळें व या बाबतींत त्यांनीं सर्व तयारी करूनहि अल्पायुत्वामुळें त्यांना या कल्पनांना मूर्त स्वरूप देतां आलें नाहीं, याकरितां त्यांच्या स्मरणार्थ त्यांचें नांव या वसाहतीला द्यावें असें मिसेस बार्नेट यांनीं सुचविलें व ही कल्पना सर्वांना मान्य झाली. यानंतर, इंग्लंडांत व इंग्लंड

देशाच्या बाहेर ज्या ज्या वसाहती स्थापन झाल्या त्या सर्वांत आजपावेतों टॉयन्बी हॉल हीच वसाहत नमुनेदार मानण्यांत येते. या वसाहतीनें विशेष गोष्ट ही केली कीं, केंब्रिज येथील विश्वविद्यालयांत अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना—अर्थातच आपला अभ्यास क्रम पुरा झाल्यानंतर आपल्या हातून कांहीं तरी समाजसेवा व्हावी अशी ज्यांची प्रबळ इच्छा होती त्यांना कामगारवस्तींत स्वतः राहून तेथील लोकांच्या स्थितीचें सूक्ष्म निरीक्षण करण्याची व त्यासंबंधींच्या प्रश्नांचा विचार करण्याची संधि दिली. हे विद्यार्थी ह्या वसाहतींतच राहत, तेथेंच जेवणखाण करीत आणि फुरसतीप्रमाणें कामगारांना हितकारक अशीं नाना प्रकारचीं कामें करीत. ही संस्था अद्यापि उत्कृष्ट रीतीनें चालत आहे. या संस्थेचा मुख्य अधिकारी पगारी मनुष्य असतो. तो ह्यांना नेहमीं प्रोत्साहन देऊन या लोकसेवेच्या पूर्व तयारींत त्यांचा उत्साहभंग होऊं नये असे प्रयत्न करितो. आपल्या आवडीप्रमाणें व सवडीप्रमाणें कोणीं कोणतें काम करावें तें तो सांगतो व दरएक गोष्टींत तो त्यांना मार्गदर्शक होतो. या संस्थेच्या उपयुक्ततेबद्दल इतकें सांगितलें म्हणजे पुरे कीं, इंग्रजी राज्याचे धुरावाहक आज जे नामांकित मंत्री आहेत त्यांपैकीं बहुतेकांनीं आपल्या विद्यार्थीदशेंत या संस्थेचा लाभ घेतलेला आहे आणि आजसुद्धां अशा प्रकारें नांवालौकिकास चढलेल्या पण एका काळीं या संस्थेंत राहिलेल्या लोकांकडून मिळत असलेल्या देणग्यांतून या संस्थेचा बहुतेक खर्च चालतो.

दुर्दैवानें याच सुमाराला कामगार लोकांत आपल्या धर्मपंथाचा प्रसार करणाऱ्या, परपंथीय लोकांना आपल्या पंथांत आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या व धर्मोपदेशकांना समाजसेवेचें शिक्षण देणाऱ्या नाना प्रकारच्या धार्मिक वसाहती स्थापन होऊं लागल्या. या दोन प्रकारच्या वसाहतींत वरवर पाहाणाराला फारशी तफावत दिसणार नाहीं. पण वस्तुतः या दोन प्रकारच्या संस्थांत महदंतर आहे. बाहेरून समाजसेवेचें ढोंग करून येनकेन प्रकारेण आपल्या धर्मपंथाचें घोडें पुढें ढकलण्याचा एका प्रकारच्या संस्थेच्या अंतःस्थ हेतु होता तर कोणत्याहि प्रकारें धर्माचा, जातीचा किंवा देशाचा भेद न ठेवतां आपल्याला इष्ट दिसेल त्या मार्गांनीं समाजाची उन्नति करण्याकरितां उत्सुक झालेल्या तरुणांना जातीनें समाजसेवा करण्याची संधि द्यावयाची व समाजाचें ऐहिक सुख वाढवावयाचें हा दुसरीचा अंतर्बाह्य हेतु होता. आणि विशेष आनंदाची गोष्ट ही कीं, या चढाओढींत कोणत्याहि प्रकारच्या विशिष्ट

धर्मपंथाचें अंकित न होतां समाजसेवा हाच आपला धर्म असें मानणारी वरील संस्था इतर संस्थांप्रमाणेंच आपल्या कामांत यशस्वी झाली इतकेंच नव्हे तर तिचें मतच सांप्रत विशेष मान्य झालें आहे. या सर्व संस्थांच्या कामाची दिशा सामान्यतः एकच असली तरी त्यांचे प्रयत्न मात्र एकाच दिशेनें होत असतात असें नाहीं. कांहीं तर एखाद्या कामांतच निष्णात झालेल्या असतात. उदाहरणार्थ, कांहीं लहान मुलांच्या करमणुकीच्या बाबतींत तरबेज झालेल्या असतात, कांहींची वयातीत लोकांना मुशाहिरा मिळावा म्हणून चळवळ चाललेली असते, कांहीं फक्त मुलांसंबंधींच्याच बाबी हातीं घेतात, कांहीं विपद्ग्रस्त लोकांचें दुःख कमी करणें आणि त्या विवक्षित भागांतील लोकांना अडीअडचणीच्या वेळीं मदत करणें एवढेंच काम आपल्याकडे घेतात. दुसऱ्या कांहीं वसाहती कामगार लोकांच्या स्थितीसंबंधीं माहिती गोळा करितात. अशा एक ना अनेक तऱ्हांनीं या वसाहती समाजसेवेचीं कामें करितात. पण धर्मप्रसाराची चळवळ यशस्वी करण्याकरितां समाजसेवेचीं कामें हातीं घेणाऱ्या समाजसेवकांच्या वसाहतींचे प्रयत्न व त्यांचें धोरण सतत सारखें राहाणें जितकें सोपें असतें तितकें आपल्या बांधवांची उन्नति करण्याच्या एकाच हेतूनें प्रेरित होऊन अशा प्रकारचीं कामें हातीं घेणाऱ्या वसाहतींच्या बाबतींत सोपें नसतें. त्यांचे मार्ग व ध्येय हीं नेहमीं एकसूत्री राहूं शकत नाहींत. कारण पहिल्या प्रकारच्या वसाहतींचें ध्येय कधींच बदलण्याजोगें नसतें. फार झालें तर तें गांठण्याच्या मार्गांत परिस्थितीप्रमाणें थोडा फार बदल होण्याचा संभव असतो. उलटपक्षीं दुसऱ्या प्रकारच्या वसाहतींचें ध्येय कधींच कायम राहूं शकत नाहीं. त्यांनीं हातीं घेतलेल्या प्रश्नासंबंधीं जसजसें लोकमत बदलत जाईल तसतसे त्यांचे मार्ग व प्रश्नांसंबंधींचें धोरण बदलत जाणें अपरिहार्य असतें. समाजसेवकांची वसाहत म्हणजे त्या भागांत होणाऱ्या सर्व प्रकारच्या समाजसेवेच्या चळवळींचें केंद्रस्थान होय. म्हणून तेथें राहणाऱ्या समाजसेवकांचें ध्येय हें असावयास पाहिजे कीं, समाजाची किंवा समाजांतील कांहीं व्यक्तींची निरनिराळया प्रकारें सेवा करणाऱ्या अनेक व्यक्तींशीं व संस्थांशीं सहकार्य करून त्यांना हरएक बाबतींत साहाय्य करणें अर्थात् समाजसेवा—भूतदया हें अशा वसाहतींचें ब्रीदवाक्य असतें. पहिलीला स्वार्थ साधावयाचा असल्यामुळें हें काम तिच्याकडून नीटसें तडीस जात नाहीं; पण दुसरी निरपेक्ष बुद्धीनें अंगीकृत कार्य करित असल्यामुळें ती यशस्वी होणें क्रमप्राप्तच असतें. या दोन प्रकारच्या वसाहतींतील हा महत्वाचा फरक ध्यानांत ठेवण्यासारखा आहे.

## धार्मिक संस्थांची समाजसेवा.

धार्मिक संस्थांनीं चालविलेल्या वसाहती कोणच्या तरी एका धर्ममताच्या पक्षपाती असतात. त्या धर्ममतांचा प्रसार व्हावा, त्या धर्मांच्या अनुयायांची संख्या वाढावी म्हणून नाना प्रयत्नांनीं इतर धर्मांच्या किंवा पंथाच्या लोकांना त्या धर्मांची दीक्षा द्यावी व त्या धर्मांचीं मतें प्रमाण मानणाऱ्या लोकांचें सर्व प्रकारें हित व्हावें व त्यांना साहाय्य करावें हें या वसाहतींचें मुख्य पाहाणें असतें. म्हणून या संस्थांनीं आपण उदार मताचे आहोंत म्हणून बहाणा केला तरी तें सारें औपचारिक असतें आणि त्यांची या बाबतींतील कोती बुद्धि व स्वार्थ लपला जात नाहीं. यदाकदाचित् या वसाहतींतील समाजसेवक उदारबुद्धि असेल तथापि त्या वसाहती चालविण्याकरितां ज्यांनीं पैसा दिलेला असतो ते तितके उदारबुद्धि असणें मुळींच शक्य नसतें. त्यांनीं तो पैसा आपल्या विवक्षित धर्ममतांचा प्रसार होण्याकरितां व त्या मताच्या लोकांच्या हिताकरितांच दिलेला असतो. त्यामुळें प्रत्यक्ष काम करणारांनाहि या गोष्टी बंधनकारक झालेल्या असतात. आणि एका विवक्षित धर्ममताचे हे लोक आहेत अशी एकदां प्रसिद्धी झाली कीं, दुसऱ्या मतांचे लोक मदतीकरितां या संस्थांकडे सहसा येत नाहींत. या संबंधीं दूरवर विचार करून इंग्लंडांतील टॉयन्बी हॉल नांवाच्या जगत्प्रसिद्ध समाजसेवकाच्या वसाहतीचा मूलसंस्थापक स्वतः एका मिशनरी संस्थेचा मुख्य चालक असूनसुद्धां त्यानें आपल्या वसाहतींत प्रवेश करण्याला कोणाहि माणसाला कोणत्याहि प्रकारचें धार्मिक बंधन ठेविलें नाहीं. यासंबंधीं त्यानें एकदां असे उद्गार काढिले कीं, मी जर या वसाहतींत धार्मिक बंधनें ठेविलीं असतीं तर माझ्या कित्येक जिवलग सहकारी समाजसेवकांना मला मुकावें लागलें असतें. समाजसेवेच्या चळवळींत या वसाहतीचें उच्चस्थान आज मितीलाहि कायम आहे याचें मुख्य कारण तिच्या संस्थापकाचें हें दूरदर्शी धोरणच होय. इंग्लंडांतील सर्व वसाहतींत टॉयन्बी हॉलनें आपली परंपरा उत्तम रीतीनें राखिली आहे. समाजोन्नतीचें उच्चतर ध्येय पुढें ठेवून ती जन्मास आली आणि तिची ही ध्येयदृष्टि आजलाहि बदललेली नाहीं. ज्यांना समाजसेवेची हौस होती त्यांना येथें प्रत्यक्ष शिक्षण मिळून घरीं बसल्या देणग्या देऊन आपण समाजसेवा करितों असें समाधान मानण्यापेक्षां आपला देह प्रत्यक्ष जनतेच्या सेवेला लावून त्यांच्या सुखदुःखाचा अंशभागी होणें हीच खरी लोकसेवा हें त्यांनीं जगाच्या निदर्शनाला आणिलें.

समाजसेवा करणाऱ्या प्रत्येक संस्थेनें आपल्या कामांत कोणत्या तरी धर्माचें साहाय्य घ्यावें अशा प्रकारचा ध्वनि आपल्याकडेहि नेहमीं ऐकूं येतो. पण येथें हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, समाजसेवा कोणत्याहि एका धर्ममताच्या लोकांची करावयाची नसते. इतकेंच नव्हे तर खऱ्या समाजसेवेंत धर्मभेद, वर्णभेद, जातिभेद, राष्ट्रभेद, किंवा दुसऱ्या कोणच्याहि प्रकारचा भेद मानला जात नाहीं. ज्याला खरोखरी समाजसेवा करावयाची आहे तो ती करितांना हा मनुष्य आपल्या धर्माचा आहे कीं परधर्मीय आहे, आपल्या जातीचा आहे कीं परजातीचा आहे, आपल्या राष्ट्रांतील आहे कीं परराष्ट्रांतील आहे अशा प्रकारचें वर्गीकरण कधींही करणार नाहीं. जनसेवा हाच त्याचा धर्म. भूतदया आणि भ्रातृभाव हें त्याच्या धर्माचें सारसर्वस्व. या व्यतिरिक्त कोणत्याहि धर्माचें श्रेष्ठत्व तो मान्य करणार नाहीं. मदतीची याचना करणाऱ्या व्यक्तीची परिस्थिति समजावून घेण्यासाठीं वरील गोष्टीची तो बारकाईनें चौकशी करील, पण त्यामुळें त्याच्या कामांत कोणत्याहि प्रकारें उणेपणा येणार नाहीं.

धर्म म्हटला कीं त्याबरोबर स्वधर्मवेड आणि परधर्मद्वेष हीं आलींच. आणि त्यांच्या पायीं जगाची जितकी अवनति झाली आहे तितकी दुसऱ्या कशानेंहि झाली नसेल. सर्व धर्मसंस्थापक महात्मे असले तरी एका धर्माचे अनुयायी दुसऱ्या धर्माच्या अनुयायांना पाण्यांत पाहातात यांत विशेषसें आश्चर्य नाहीं, पण एकाच धर्माचे अनुयायी आपल्या देवाची पूजा किंवा प्रार्थना त्याच धर्माच्या पण त्यांच्या मतें कमी मानलेल्या लोकांना करूं देत नाहींत. हिंदुधर्माचे अभिमानी त्यांनींच अस्पृश्य मानलेल्या लोकांना आपल्या देवळांत येऊं देत नाहींत. महमदीधर्माच्या अनुयायांतील एका पंथाच्या लोकांना आपल्या मशिदींत दुसऱ्या पंथाचे लोक आलेले खपत नाहींत. आणि जगांतील सर्वश्रेष्ठ धर्म म्हणून वटवट करणाऱ्या ख्रिस्तानुयायी लोकांची धर्माच्या बाबतींत या आपसांतील उच्चनीचपणाच्या भांडणांत एकमेकांना जिवंत जाळण्यापर्यंत मजल गेली आहे. ‘जनसेवा ही ईश्वरसेवा’ असें मानणाऱ्या माणसानें अशा परिस्थितींत कोणत्याहि एका धर्माचा पक्षपाती होऊन कसें चालेल? फार झालें तर आपला धर्म आपल्या घरीं पाळावा; सार्वजनिक कार्यांत त्याचा उपसर्ग इतरांना पोंचूं देऊं नये हें उत्तम. शिवाय समाजसेवेच्या गोड नांवाखालीं धर्मप्रसार करण्याची ही कृप्ति मागसलेल्या राष्ट्रांतच यशस्वी होते. सुधारलेल्या

राष्ट्रांत ती मूळ धरूं शकत नाहीं. हें इतर राष्ट्रांतील समाजसेवेच्या चळवळीचें निरीक्षण करणाराच्या सहज ध्यानांत येईल.

## विद्यार्थी व समाजसेवा.

सदरील वसाहतींचा मुख्य उद्देश असा होता कीं, कॉलेजांमध्यें शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनीं सुटींत किंवा एरवींसुद्धां कामगारांच्या वस्तींत येऊन राहावें, अभ्यास करून राहिलेल्या वेळांत या लोकांत मिळून मिसळून त्यांच्या अडचणी समजावून घ्याव्या व या अनुभवाचा उपयोग आपली विद्यार्थी दशा संपल्या-नंतर आपल्या पुढील आयुष्यांत लोकहिताचीं कामें हातीं घेऊन करावा. अशा प्रकारच्या उद्देशामुळें या वसाहतींत काम करणारीं माणसें सामान्यतः विद्यार्थीच असतात व त्यामुळें त्यांचें तेथील राहाणें व त्यांनीं चालविलेलीं कामें हीं अगदीं अल्पकाळ टिकणारीं असतात. याचा परिणाम असा होतो कीं, या वसाहतींतील कामें पूर्ण विचारानें व आगाऊ ठरवून त्याबरहूकूम तीं होतातच अशांतला भाग नाहीं. ज्याला जशी फुरसत असेल व ज्या प्रकारच्या कामाची आवड असेल तशा प्रकारचीं कामें तो हातीं घेतो व कांहीं दिवस तीं मोठ्या हौसेने चालवून मग तीं तशींच अर्धीं टाकून स्थलांतर करितो. पुढें तशाच प्रकारच्या मनोवृत्तीचा दुसरा विद्यार्थी आला तर तो तीं पुढें चालू करितो. तसा कोणी नसल्यास तीं आपोआप बंद पडतात. येथील रहिवाशी असे उपरी असल्यामुळें येथील कामेंहि अशींच अल्पायुषी होतात. यामुळें या वसाहतींचा कार्यक्रम कायम स्वरूपाचा नसतो व तसा तो करणेंहि शक्य नसतें. स्थूल मानाने वस्तुस्थिति अशी असली तरी कांहीं कामें ठराविक स्वरूपाचीं असतात. लोकांची शारीरिक, बौद्धिक, नैतिक, सामाजिक व शैक्षणिक उन्नति करण्याचा या संस्था प्रयत्न करितात. आपल्या मतांच्या द्वारें, अर्जांच्या द्वारें, आपल्या भागाच्यातर्फे कायदेमंडळांत असलेल्या प्रतिनिधींवर वजन पाडून आपल्या हक्काची दाद लावून घेण्याचे व आपलें मत प्रदर्शित करण्याचे मार्ग सुधारलेल्या देशांत जनतेला मोकळे झाले आहेत. पण नागरिक या दृष्टीनें आपलीं कर्तव्यें व आपले हक्क समजण्याला व आपल्या देशाची किंवा प्रांताची काय स्थिति आहे, त्यांना कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे व त्या प्राप्त करून घेण्याचे मार्ग कोणते हें समजण्यास साधारण जनतेंत शिक्षणाचा फैलाव व्हावा लागतो व तें शिक्षणाहि इष्ट दिशेनेंच मिळावें लागतें. माणसाचें बहुतेक यशापयश अशा रीतीनें शिक्षणावर अवलं-

बून असल्यामुळें नाना उपायांनीं शिक्षणप्रसार व शिक्षणसुधारणा करून वैयक्तिक व सामुदायिक सुख वाढविणें आणि व्यक्तीच्या अप्रतिहत वाढीच्या व समाजाच्या सुखाच्या आड ज्या गोष्टी येत असतील त्या दूर करणें हें अशा संस्था आपलें आद्य कर्तव्य समजतात. ज्या मुलांना प्राथमिक शिक्षण मिळालें नसेल किंवा ज्या प्रौढ माणसांना तें संपादन करण्याची संधि मिळाली नसेल त्यांच्याकरितां प्राथमिक शिक्षाणाचे वर्ग काढून, ज्यांना दुय्यम प्रतीचें शिक्षण अर्धवट मिळालें व तें पुरें व्हावें अशी ज्यांची मनीषा आहे त्यांना त्या प्रकारच्या शिक्षणाची व्यवस्था करून, ज्यांना कॉलेजमध्यें प्रवेश करण्याची संधि मिळाली, पण तेथील अभ्यासक्रम पुरा करतां आला नाहीं आणि अभ्यासक्रम पुरा करितां आला नाहीं तरी कांहीं आवडत्या विषयाची पुरी माहिती करून घेण्याची बळकट इच्छा आहे त्यांच्याकरितां पुरवणी वर्ग काढून, रात्रींचीं कॉलेजें स्थापून किंवा वेगवेगळ्या विषयावर त्या त्या विषयाच्या तज्ज्ञांचीं व्याख्यानें करवून त्यांची महत्वाकांक्षा पुरी करितात. या कामीं त्यांना दुहेरी प्रयत्न करावे लागतात. मुख्यतः पैशाच्या किंवा दुसऱ्या कांहीं अडचणींमुळें ज्यांना इच्छा असूनहि शिक्षण मिळालें नाहीं किंवा अर्धें मुर्धें मिळालें त्यांचे मनोरथ फलद्रूप झाले नसल्यामुळें अगदीं निराशा झालेली असते व ते चरितार्थापलीकडे मुळींच पाहीनासे होतात. अशांच्या आयुष्याचें मातेरें करणारी नैराश्यवृत्ति घालवून त्यांच्यांत पुनः महत्वाकांक्षा उत्पन्न करावी लागते आणि ती उत्पन्न झाल्यावर तिच्या पूर्णतेसाठीं लागणाऱ्या साधनांची जमवाजमव करावी लागते. हें दुर्घट कार्य बहुतेक वसाहती यशस्वीपणें करितात. परंतु कांहीं ठिकाणीं केवळ शिक्षणालाच वाहिलेल्या स्वतंत्र संस्था निघालेल्या असल्यामुळें आणि शिक्षणप्रसाराचें सर्व कार्य त्यांनीं आपल्या हातीं घेतल्यामुळें कांहीं वसाहतींनीं आपण चालविलेलीं शिक्षणविषयक कामें या संस्थांच्या स्वाधीन केलीं आहेत आणि समाजसेवेच्या दुसऱ्या कार्यक्रमाकडे आपलें लक्ष अधिक लाविलें आहे.

## मुलांकरितां करावयाचीं कामें.

मुलांचें शीलसंवर्धन शाळेपेक्षां क्रीडांगणावरच सहजगत्या होतें ही गोष्ट आज सर्वमान्य झालेली आहे. म्हणून यांतील बहुतेक वसाहती शिक्षणाप्रमाणेंच लोकांच्या शारीरिक सुधारणेला व करमणुकीला अधिक महत्व देतात. कांहीं कांहीं वसाहती तर एवढें एकच कार्य करितात. गरीब लोकांच्या गलिच्छ

राहाणीच्या दृष्टीनें विचार करितां अल्पवयी मुलें घरीं राहाण्यापेक्षां शाळेंत गेल्यानेंच चांगल्या हवेंत राहतात असें म्हणावयास हरकत नाहीं. परंतु हें शाळा सुरू असल्या म्हणजेच शक्य असतें. शाळांना रजा पडली म्हणजे या गलिच्छ वस्तींत इतस्ततः फिरण्यापलीकडे मुलांना दुसरें गत्यंतर नसतें. व त्याचा त्यांच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होतो. या रजेच्या दिवसांत मुलांना घाणेरड्या वस्तींत फिरण्याचीं बंद करण्याकरितां यांतील कांहीं वसाहतींनीं रजेच्या दिवसांत मुलांकरितां वर्ग काढिलेले असतात. त्यांना रजेंतील शाळा ( Vacation Schools ) असें म्हणतात. अशा प्रकारची पहिली शाळा पॅसमोर एडवर्डस् वसाहतीमध्यें ( Passmore Edwards Settlemeut ) मिसेस वॉर्ड यांनीं प्रथम इ. स. १८९७ मध्यें काढिली. त्यांना असें दिसून आलें कीं, हे रजेचे दिवस मुलांना व त्यांच्या पालकांना सुखाचे जाण्याऐवजीं साऱ्या वर्षात ते अत्यंत वाइट जातात. कारण मुलें शाळेंत असलीं म्हणजे त्यांचा तेवढा तरी वेळ स्वच्छ, चांगल्या हवेंत जातो. परंतु त्यांना शाळा नसली म्हणजे तीं सारा दिवस पालकांच्या दृष्टीआड घाणेरड्या बोळांतून खेळत असतात. व आईबापांच्या धाकदपटशालाहि भीक घालीत नाहींत. म्हणून वरील प्रकारची शाळा स्थापून हा रजेचा काळ मुलांना शक्य तितका आनंददायी व उपयोगी कामांत घालवितां यावा अशी त्यांनीं योजना केली. मुलांनीं मोकळ्या हवेंत मनसोक्त खेळावें, फेरफटका करावा व एका दिवसांत करितां येतील अशा मोकळ्या हवेंतील सहली कराव्या, मुलींनीं सोपें शिवण व कशिद्याचें काम करावें, आणि मुलांनीं आपले कपडे विशेषतः आपले बूट दुरुस्त करावे. कांहींनीं कागदावर किंवा मातीचीं चित्रें काढावीं, स्वयंपाक वगैरे करावयास शिकावा, इत्यादि अनेक गोष्टींचा या शाळेंतील अभ्यासक्रमांत अंतर्भाव झालेला असतो. याशिवाय निरनिराळ्या प्रकारचे खेळ व हस्तकौशल्याचीं कामें यांचीहि माहिती देतात. पण मुख्य हेतु हा असतो कीं, मुलांना भरपूर खेळण्याला व आपली करमणूक करण्याला मिळावी व त्याबरोबरच व्यवहारांत उपयोगी पडेल असें कांहीं तरी शिक्षण मिळावें. ह्या शाळेंत दररोजच्या हजेरीचें प्रमाण सरासरी १००० वर असतें. ही शाळा सुटीच्या दिवसांत आठवड्यांतून पांच दिवस दररोज संध्याकाळीं व शनिवारीं सकाळीं भरते. हा सुटींतील शाळेचा प्रयोग यशस्वी झाल्यामुळें पुढें दुसऱ्या शाळा निघूं लागल्या आणि आतां तर अशा कैक शाळा इंग्लंडांत आहेत.

याशिवाय कांहीं वसाहती मुलांचे क्लब किंवा मेळे काढितात. बालवृत्तीला योग्य वळण द्यावें हा मुलांच्या क्लबांचा–मेळयांचा मूलभूत हेतु आहे. लहान मुलांच्या हुल्लडखोर टोळीला ताळयावर आणण्याला हा एकच उपाय आहे. या क्लबांत नेहमींच्या टोळींत ज्या गोष्टी ते करितात त्याच त्यांना करूं द्याव-याच्या, मात्र कायदा व नीति यांच्या नियमांचा भंग होणार नाहीं व मुलांच्या प्रागतिक वृत्तीला खंड पडणार नाहीं, इतकेंच त्यांत पाहावयाचें. याशिवाय त्यांच्या क्लबांत त्यांना वाटेल तें करूं द्यावयाचे. "मी माझें वर्तन सरळ ठेवीन, प्रत्येक गोष्टींत शिकस्तीचा प्रयत्न करीन आणि केव्हांहि कपटाचा खेळ खेळणार नाहीं; कारण कांहीं तरी मोठ्या कार्याकरितां ईश्वरानें मला जन्मास घातलें आहे." हें या क्लबांचें ब्रीदवाक्य असतें. या क्लबाचें महत्त्व आणि ते चालविण्याची शक्यता हीं सार्वत्रिक अनुभवानें इतकीं खरीं ठरलीं आहेत कीं, पाश्चात्य राष्ट्रांत समाजसेवेच्या कार्यांत कोणत्या ना कोणत्या रीतीनें त्यांचें महत्त्व गायिलेलें आपल्याला आढळेल. या क्लबांची आवश्यकता फक्त गरीब लोकांच्या मुलांनाच असते असें नाहीं, तर गरीब आणि श्रीमंत या दोघांनाहि ते सारख्याच महत्त्वाचे असतात. क्लब मोठा असल्यास त्याच्या स्वतःच्या माल-कीचें घर असतें. त्यांत तालीमखाना, पोहण्याकरितां पाण्याची तळीं, निरनि-राळ्या प्रकारचे खेळ खेळण्याकरितां सर्व प्रकारच्या साधनसामुग्रीनें सज्ज अशा त्या त्या प्रकारच्या खेळाला योग्य अशा जागा, अशा प्रकारच्या मुलांकरितां मुद्दाम प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकांचें वाचनालय व पुस्तकालय, धंदेशिक्षण देणाऱ्या औद्योगिक शाळा व त्याला लागणारीं अनेक प्रकारचीं उपकरणें, व्याख्यानां-करितां व वादविवादांकरितां स्वतंत्र खोल्या व सभासदांना आवडतील व अवश्य लागतील अशा दुसऱ्या अनेक वस्तु या इमारतींत संग्रहित केलेल्या असतात. धंदेशिक्षणाकडे मुलांचा स्वाभाविक कल असतो. म्हणून या क्लबांतून वेगवेगळ्या प्रकारच्या धंदेशिक्षणाची सोय केलेली असते. त्यानें एक तर मुलांची आजची हौस भागते आणि दुसरें असें कीं, त्यांच्या भावी आयुष्याला एक प्रकारची ठराविक दिशा लागते. या क्लबांतून धार्मिक शिक्षण देण्याचा फारसा प्रयत्न करीत नाहींत. नैतिक शिक्षण मात्र बेताबातानें आणि अप्रत्यक्ष रीतीनें देतात. हे क्लब चाल-विण्याचें काम अत्यंत अवघड असतें. तें धीरानें आणि निराश न होतां करावें लागतें. या प्रयत्नावर भावी पिढीचा उत्कर्ष वा अपकर्ष अवलंबून असतो आणि तो यशस्वी झाल्यास त्यापासून कल्पनातीत फायदे होतात. ज्यांना मुलें अत्यंत प्रिय

असतात, ज्यांना मुलांत काम करण्याची हौस असते अशा माणसांना हा क्लब म्हणजे एक कल्पतरू होय. ते यांला सद्यःफलदायी करितात व पुढेंहि तो फलद्रूपच होतो.

चौदा पंधरा वर्षांपेक्षां लहान वयाचीं मुलें असलेल्या क्लबांत त्यांच्या सभा वगैरे दुसऱ्यांच्या साहाय्यानें चालतात; पण यापेक्षां जास्त वयाचीं मुलें असलेल्या क्लबांत सभा वगैरे सर्व स्वतः मुलेंच अगदीं पार्लमेन्टच्या धर्तीवर चालवितात. त्यांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटनीस, खजीनदार, कार्यकारी मंडळी आणि पोटकमिट्या या सर्वांची निवड मुलांतूनच करितात. नेहमीं सभा, व्याख्यानें, वादविवाद होतात आणि सर्व पार्लमेन्टरी पद्धतीनें चालतात. अध्यक्षापासून तों कमिटीच्या सभासदापर्यंत प्रत्येकाला आपल्या हुद्याप्रमाणें आपापलीं कामें पूर्णपणें माहीत असतात. त्यांच्या सभांची सर्व हकीगत व्यवस्थित रीतीनें लिहिलेली असते, त्यांचे अहवाल नियमितपणें तयार होतात आणि त्यांचीं नियतकालिकें ठराविक वेळीं प्रसिद्ध होतात. बाळपणापासून अशा प्रकारचें शिक्षण असल्यावर मोठेपणींहि कर्तबगार माणसें निपजावीं यांत आश्चर्य नाहीं.

## कामगारवर्गाकरितां काम.

गरीब लोकांची स्थिति सुधारण्यासंबंधीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण वगैरे बाबतींत सरकारनें किंवा म्युनिसिपॅलिटीनें सामान्यतः सर्व प्रकारच्या तजविजी केलेल्या असतात, परंतु गरीब लोकांच्या वस्तीकडे स्वभावतःच कोणाचें फारसें लक्ष नसल्यामुळें या सर्व गोष्टी नीट रीतीनें अमलांत येत नाहींत. म्हणून हें देखरेख करण्याचें काम गरिबांच्या वतीनें कोणीं तरी करावें लागतें आणि तें मुख्यतः या वसाहतींतील कामगारांवर पडतें. या हलगरजीपणाची तक्रार वरिष्ठ अधिकाऱ्याकडे करावी लागते. तोहि लक्ष देईनासा झाल्यास म्युनिसिपॅलिटीमध्यें किंवा कायदेमंडळांत त्या भागाच्या वतीनें जे प्रतिनिधी गेले असतील त्यांच्या कानावर त्या गोष्टी घालाव्या लागतात आणि त्यांनीं या बाबतींत लक्ष घालण्याचें आश्वासन दिलें तरी ती गोष्ट त्यांचेकडून करून घ्यावयाची असल्यास त्या बाबतींतील सर्व साक्षीपुरावा त्यांना गोळा करून द्यावा लागतो. त्या लोकवस्तींतील नागरिकांना एखाद्या घाणीपासून उपसर्ग पोंचत असेल, भरपूर पाण्याचा पुरवठा होत

नसेल, किंवा दुसऱ्या कोणत्या तरी गोष्टीमुळें अतिशय गैरसोय होत असेल तर अशा बाबतींत दाद लावून घेण्यासाठीं जोराची चळवळ करावी लागते आणि इतक्या प्रयत्नाअंतीं आपल्याला अवश्य ती गोष्ट घडून आली कीं ती लोकप्रिय करण्याच्या बाबतींतहि अंमलदारांना साहाय्य करावें लागतें; नाहींपेक्षां कित्येक गोष्टी अमलांत येऊनहि त्यांचा लोकांना फारसा उपयोग होत नाहीं. हें सर्व करण्याला किती श्रम, विशेषतः शारीरिक श्रम करावे लागत असतील याचा विचार वाचकांनींच करावा.

कामगारांचीं घरें, कामगारांची राहाणी, कामगारांचें खाणेंपिणें, मजुरी व दुसऱ्या अनेक गोष्टी यांसंबंधीं लोक नेहमीं नाना प्रकारचे तर्कवितर्क करीत असतात. यांतील कांहीं बाबींची थोडी फार माहिती परिश्रमपूर्वक मिळाविलेली असते, पण दुसऱ्या कांहीं बाबतींत अशी माहिती मुळींच गोळा केलेली नसते. करितां कामगारांच्या राहाणीवर प्रकाश पाडणाऱ्या या नाना प्रकारच्या प्रश्नांसंबंधीं विश्वसनीय माहिती गोळा करून ती प्रसिद्ध केल्यास त्या बाबतींत वस्तुस्थिति काय आहे व ती सुधारण्याचे मार्ग कोणते हें समजतें. पुष्कळ वसाहती हें माहिती गोळा करण्याचेंच काम हातीं घेतात.

या समाजसेवासंघांच्या वसाहतींत ज्याप्रमाणें संघटित प्रयत्नांनीं पुष्कळ कामें होण्यासारखीं असतात त्याचप्रमाणें वैयक्तिक प्रयत्नानेंहि पुष्कळ गोष्टी करण्यासारख्या असतात. समाजांत अशीं पुष्कळ माणसें असतात कीं, त्यांना एखाद्या कलेचा नाद असतो किंवा एखाद्या कलेविषयीं विशेष आवड उत्पन्न करितां येण्यासारखी असते. कोणी गाण्याबजावण्याचे शोकी असतात त्यांना गाण्याबजावण्याचा क्लब हवा असतो, कांहींना नाटकांचा नाद असतो त्यांना नाट्यकलोत्तेजक समाज पाहिजे असतो, कोणाला वाङ्मयाची विशेष गोडी असते ते वाङ्मयविषयक क्लबासाठीं तळमळ करित असतात. कांहींना तालमीची आवड असते त्यांना तालमीचा आखाडा हवा असतो. याशिवाय दुसऱ्या अनेक प्रकारच्या क्लबांची आवश्यकता असते. यामुळें त्या कलेंत लोकांची प्रगति तर होतेच. पण त्याशिवाय कामगारांची योग्य तऱ्हेनें करमणूक होऊन त्यांचा काळ उपयुक्त कार्यांत खर्च होतो, व त्यांची त्या त्या कलांविषयींची आवड वाढते. दिवसेंदिवस कामगारांच्या कामाचे तास कमी करण्याची चळवळ वाढत आहे व तिचा मुख्य उद्देश कामगारांना आत्मोन्नति करण्यास अधिक फुरसत मिळावी हाच आहे. अशा वेळीं त्यांना सर्व दृष्टींनीं हितप्रद होतील अशा वर निर्दिष्ट केलेल्या गोष्टींचा

उपक्रम करून त्यांच्या कामाव्यतिरिक्त इतर बाबतींतील आवडींना उत्तेजन दिलें पाहिजे. कामगारांच्या उन्नतीला पोषक होतील अशा वर निर्दिष्ट केलेल्या गोष्टी अमलांत आल्यास त्यांचा कामगारांचीं मनें अनेक प्रकारच्या अनिष्ट गोष्टींपासून परावृत्त करण्याला चांगला उपयोग होतो असा अनुभव आहे. आज समाजसेवकांच्या अनेक वसाहती अशा प्रकारचीं कामें यशस्वी रीतीनें करित आहेत.

कामगार लोकांच्या वस्तींत राहावयाचें ह्मणजे त्यांच्याशीं शेजारधर्मानें वागून, त्यांच्या अडीअडचणी व सुखःदुखें समजावून घेऊन त्यांना योग्य वेळीं सल्ला देण्याचें काम करावें लागतें. पुष्कळ वसाहती हीं कामें करितात. ज्या भागांत अशी वसाहत नसेल त्या भागांतील लोक कांहीं कमी जास्त झालें, शेजाऱ्या शेजाऱ्यांत भांडण झालें, कुटुंबांतल्या कुटुंबांतच बाचाबाच किंवा बेबनाव झाला किंवा दुसरी कोणचीहि अडचण आली किंवा संकट उत्पन्न झालें तर या बाबतींत सल्ला विचारण्याकरितां जवळपासच्या वसाहतींत हेंच काम पहाणाऱ्या बाईकडे जातात आणि त्यांच्या मनासारखा सल्ला मिळून हीं भांडणें ती बाई पुष्कळदां मिटविते. याशिवाय बहुतेक सर्व वसाहतींत गरिबांना कायद्याचा सल्ला फुकट किंवा माफक पैसे घेऊन देण्यांत येतो. अनेक कायदेपंडित आठवड्यांतून एक दोन दिवस येऊन फुकट सल्ला देतात. वकील बॅरिस्टरांची मोठी फी भरण्याला पैसे तर जवळ नाहींत आणि कायद्याचा सल्ला तर मिळाला पाहिजे अशा दुहेरी अडचणींत सांपडलेल्या गरजू कामगारांना यापासून चांगलाच फायदा होतो हें सांगावयास नको.

मोठ्या लोकवस्तीच्या शहरांत विशेषतः कामगारांच्या वस्तींत अशीं पुष्कळ माणसें व कुटुंबें असतात कीं त्यांच्या जातीपातीचा किंवा गांवचा तेथें कोणी नसतो. बरें, या नव्या ठिकाणीं येऊन त्यांना फारसे दिवसहि झालेले नसतात. त्यांना शिक्षण नसतें, त्यांना ध्येय असें कांहीं नसतें व त्यांना जातीचीं किंवा समाजाचीं कांहीं बंधनेंहि नसतात. त्यामुळें ते अगदीं उपरी रहिवाशी झालेले असतात. ते ज्या वस्तींत राहतात तीबद्दल त्यांना आपलेपणा मुळींच वाटत नाहीं, आणि नागरिक या दृष्टीनें आपलीं कांहीं कर्तव्यें आहेत हें त्यांच्या गावींहि नसतें. अशा अस्थिर लोकांना स्थिर करण्याच्या व त्या स्थळाबद्दल आपलेपणा उत्पन्न करण्याच्या कामीं या वसाहतींचा फार उपयोग होतो. आपण कोठेंहि असलों व तेथें आपल्याला तात्पुरतें राहावयाचें असलें तथापि

समाजाचे घटक या नात्यानें आपल्याला कांहीं गोष्टी करावयाच्या असतात त्या कधीं चुकत नाहींत हें समजावून देण्याचें काम या वसाहती करितात व त्या कामीं त्यांना अवश्य ती मदत करितात.

जातीजातींत, पक्षापक्षांत, समाजासमाजांत, धर्माधर्मांत, राष्ट्राराष्ट्रांत भांडणें होऊं लागल्यानें सर्व समाजाची संघटित घटना विस्कळीत होते व सत्यनिष्ठ लोक मागें राहून दांभिक व भांडखोर लोकांचें स्तोम माजतें. म्हणून हे परस्परांपासून अलग झालेले व एकमेकांना शत्रुत्वानें लेखणारे लोक एकत्र व्हावेत, बंधुभावानें वागावेत, आपल्या पायावर उभे राहून त्यांनीं आपलीं कर्तव्यें व आपली जबाबदारी ओळखावी आणि सर्व मानवजातीची उन्नति व्हावी हा या वसाहतींचा उद्देश असतो. यासाठीं या वसाहती लहानापासून थोरापर्यंत व दुर्बलापासून समर्थापर्यंत सर्वांच्या मदतीची याचना करितात. हेतु हा कीं, या कार्यांत सर्वांना आपलेपणा वाटावा, सर्वांनीं मनःपूर्वक साहाय्य करावें व व्यक्तिशः व संघशक्तीनें हें सर्वतोपरी सहकार्यावर अवलंबून असलेलें कार्य सुयंत्रित चालावें.

आजपावेतों, मध्यम व श्रीमंत लोकांची अशी समजूत होती कीं, कामगार लोक हे अगदीं रानटी स्थितींतील लोक आहेत, ते दूर ठेवण्यालाच लायक आहेत आणि त्यांच्या वस्तींत जाणें म्हणजे एखाद्या भयंकर ठिकाणीं जाण्यासारखें आहे. अशा परिस्थितींत या वस्तींत जाण्याचा किंवा राहाण्याचा हिय्या केल्यास ते मोठें धैर्याचें व परोपकाराचें कार्य मानलें जात असे व कांहीं अंशीं हें खरेंहि होतें. परंतु आतां ही स्थिति बदलत चाललेली आहे. कामगार दिवसेंदिवस सुशिक्षित होत आहेत. त्यांची राहणी, त्यांचीं घरें व त्यांचे विचार यांत प्रत्यहीं सुधारणा होत आहे आणि त्यामुळें कामगार वस्तीला पूर्वींचें भयप्रद स्वरूप राहिलेलें नाहीं. पण कामगारांच्या स्थितींत बदल होत चालला आहे त्याप्रमाणें समाजसेवकांच्या वसाहतींच्या धोरणांतहि बदल होत चालला आहे. कामगारांच्या वस्तींत पण स्वतंत्रपणें एखादी इमारत बांधून तेथें राहिल्यानें कामगारांच्या राहाणीचा अनुभव यावा तितका येत नाहीं; त्यांच्या राहाणीची बरोबर कल्पना येण्यास त्यांच्या घरांतच राहिलें पाहिजे, असें पुष्कळांना वाटूं लागलें आहे व त्याप्रमाणें कांहीं समाजसेवक राहूं लागले आहेत. कामगारांची स्थिति अशीच दिवसेंदिवस सुधरत जाईल व इतर वर्गांतील लोकांना त्यांच्यांत मिसळणें अधिक सोपें होईल आणि कालांतरानें या वर्गावर्गांतील फरकांची तोंडमिळवणी होईल अशी आशा आहे. यांतच समाजाचा तरणोपाय आहे.

या बाबतींत अनुभव घेतलेल्या लोकांचें मत असें आहे कीं, अशा वसाहती तरुणांनीं तरुणांकरितां चालवाव्या. कारण येथील समाजसेवकांचा उत्साह नेहमीं कायम ठेवावा लागतो आणि नवीन नवीन प्रश्न उपस्थित होतील त्याप्रमाणें आपल्या कामाच्या पद्धतींत बदल करावा लागतो. यासाठीं हीं कामें तरुणांच्या हातीं असणें हितावह असतें. कारण कोणच्याहि परिस्थितीचा परिणाम तरुणांवर लवकर होतो व आपलीं मतें योग्य वाटतील तेथें बदलण्यास, इष्ट वाटतील तीं दुसऱ्याचीं स्वीकारण्यास किंवा दुसऱ्याच्या फायद्याकरितां क्षणभर आपलें स्वतःचें मत बाजूला ठेवण्यास तरुण लवकर तयार होतात. वयातीत माणसें अशा प्रकारची तोडजोड करण्यास सामान्यतः तयार होत नाहींत. तरुणाचें लक्ष नेहमीं भविष्य कालाकडे असतें तर वृद्ध नेहमीं भूतकालासंबंधीं विचार करीत असतो. अशा वसाहतींत नेहमीं भविष्यकालाकडे दृष्टि ठेवून कामें करावीं लागतात. फार झालें तर एकदम धोरण बदलूं नये व सल्लामसलत देण्यास उपयोगीं पडतील इतकाच वृद्ध माणसाचा अशा वसाहतीशीं संबंध असावा. तसेंच या वसाहतींत राहणाऱ्या लोकांनीं तेथें येण्याचा आपला हेतु काय याची पूर्ण ओळख करून घ्यावी. त्याच्या अभावीं त्यांचें राहाणें त्यांना व लोकांना उभयपक्षीं निरुपयोगी होण्याचा संभव असतो.

## स्त्रियांनीं चालविलेल्या वसाहती.

कामगारांच्या वस्तींतील पुरुषांची व मुलांचीच सुधारणा करूं लागल्यास त्यापासून फार झालें तर अर्धा समाज सुधरेल. पण घर आणि राहाणी हीं स्त्रियांवर अवलंबून असल्यामुळें त्यांची सुधारणा झाल्याखेरीज सर्व समाज सुधारणें शक्य नाहीं. यासाठीं पुरुषांनीं चालविलेल्या वसाहती स्थापन झाल्यानंतर स्त्रियांनीं चालविलेल्या वसाहतींची आवश्यकता भासूं लागली आणि स्त्रियांच्या स्वतंत्र वसाहती व कांहीं ठिकाणीं स्त्रीपुरुषांच्या मिश्र वसाहती स्थापन झाल्या. स्त्रियांनीं चालविलेल्या वसाहती व पुरुषांनीं चालविलेल्या वसाहती यांत कामाच्या बाबतींत फारसा फरक असतो असें नाहीं, पण कामगारांच्या वस्तींत प्रवेश करितांना पहिल्या वसाहतींतील माणसें मुली व स्त्रिया यांच्या मार्फत प्रवेश करितात तर दुसऱ्या वसाहतींतील लोक मुलगे व पुरुष यांच्या मार्फत करितात, म्हणजे या वसाहती परस्परांच्या साहाय्यानें सर्व समाजांत प्रवेश करूं शकतात. स्त्रियांच्या वसाहतींत काम करण्यास स्त्री समाजसेवक पुष्कळ मिळत असल्यामुळें व कामगार कामावर गेल्यानंतर स्त्रियांना घरीं भेटून पुष्कळ

कार्य करितां येण्यासारखें असल्यामुळें स्त्री समाजसेवकांच्या वसाहतींना पुष्कळ काम असतें. यामुळें, अशा प्रकारच्या वसाहती स्थापण्याची चळवळ मागाहून सुरू होऊन-सुद्धां त्यांची संख्या व त्यांत काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या पुरुषांनीं चालविलेल्या वसाहतींच्या संख्येपेक्षां पुष्कळच जास्त आहे. शिवाय स्त्रीपुरुषांनीं चालविलेल्या वसाहती आहेत त्या वेगळ्याच. पण समाजाची सर्वांगीण सुधारणा होण्याच्या दृष्टीनें पाहतां स्त्रीपुरुषांच्या मिश्र वसाहती असणेंच श्रेयस्कर आहे असें तज्ज्ञांचें मत आहे.

# प्रकरण ७ वें.

## व्यक्तिगत समाजसेवा.

ईश्वराची पूजा करण्यासाठीं जर एकादी प्रतिमा शोधून काढावयाची तुमची इच्छा असेल तर त्या भरीस तुम्हीं पडूं नका. तुमच्या कल्पनेंतून निघणाऱ्या सर्वोत्कृष्ट प्रतिमेपेक्षांहि चांगली अशी ईश्वराची प्रतिमा अगोदरच अस्तित्वांत आहे. सजीव मनुष्य ही ती प्रतिमा होय. देवाची पूजा करण्यासाठीं एकादें देऊळ बांधावें असें तुम्हांला वाटत असेल तर त्या देवळाचा नकाशा तयार करण्याचें कारणच नाहीं. तुमच्या कल्पनेचें देऊळ चांगलें असेल, पण त्याच्याही-पेक्षां चांगलें—त्याहून अतिशय उच्च प्रतीचें देऊळ अगोदरच अस्तित्वांत आहे. हें देऊळ म्हणजे ' आत्मारामाचें मंदिर ' जें मानवी शरीर तेंच होय.

**—स्वामी विवेकानंद.**

सर्व साधारण जनतेच्या सुखासाठीं व सुधारणेसाठीं संघटित समाजांत पुष्कळ गोष्टी केलेल्या असतात. त्या करितांना सर्वसाधारण नियमांना जे अपवाद असतात त्यांचा फारसा विचार करण्यांत येत नाहीं. बहुसंख्याक लोकांना ह्यांचा सरसकट उपयोग व्हावा अशा प्रकारें ह्यांची योजना केलेली असते; परंतु समाजाची सर्वांगीण सुधारणा होण्यास त्यांतील अपवादात्मक व्यक्तींच्या गर-जांकडे डोळेझांक करून कधींहि चालत नाहीं. एकाद्या दवाखान्यांत येणारे बहुतेक रोगी एकाच रोगानें पछाडलेले असतात म्हणून त्या सर्वांना उपयोगीं पडेल अशा प्रकारचें एक औषध वैद्य तयार करून ठेवितो. पण याशिवाय कांहीं रोगी असे असतात कीं, त्यांच्या रोगांचा उपरिनिर्दिष्ट लोकांच्या रोगाशीं कांहींएक संबंध नसतो व त्यामुळें सर्वसाधारण रोग्यांकरितां तयार करून ठेवलेलें औषध त्यांना गुणावह होण्यासारखें असतें; उलट त्यापासून त्यांचा रोग दुणावण्याचा मात्र संभव असतो. यासाठीं अशा प्रकारच्या रोग्यांकरितां औषधयोजना अगदीं वेगळी करावी लागते. तव्हांच ते रोगमुक्त होतात.

कोणताहि एखादा कारखाना आपण घेतला तरी त्यांत मुख्यतः ज्या प्रका-रच्या मालाची पैदास होते त्याच्यावरच त्याचें यशापयश अवलंबून असतें असें

नाहीं, तर त्यांत मुख्य मालाशिवाय जो मोडतोड वगैरे टाकाऊ माल निघतो त्याचा सदुपयोग करण्यावरच त्या कारखान्याची मुख्य किफायत अवलंबून असते. राष्ट्राचेंहि याप्रमाणेंच आहे. त्यांतील बहुसंख्याक लोकांची सारखी सुधारणा होईल अशा प्रकारच्या योजना तर कराव्या लागतातच, पण त्याशिवाय जे सर्वसाधारण लोकांच्या उपयोगाकरितां केलेल्या साधनांचा फायदा घेण्यास असमर्थ असतात अशांकरितां त्यांच्या विशिष्ट परिस्थितीला अनुरूप अशा योजना कराव्या लागतात आणि अशा रीतीनें वर निर्दिष्ट केलेल्या कारखान्याप्रमाणें समाजांतील गाळीव, टाकाऊ माणसांचीसुद्धां सुधारणा झाल्याशिवाय समाज भरभराटीला येत नाहीं. सर्व समाजांत किंवा राष्ट्रांत महात्मा पदाला चढलेल्या एक दोन व्यक्ति असतातच. पण त्या चार दोन मोठ्या माणसांमुळें सर्व समाज सुधारलेला आहे असें मानलें जात नाहीं. समाजाची खरी उन्नति होण्याला समाजांतील बहुसंख्याक लोकांची सुधारणा व्हावी लागतेच, पण त्याबरोबरच ज्या थोड्या लोकांची विशिष्ट परिस्थितीमुळें वाढ खुंटलेली असते किंवा ज्यांची वाढ होण्याला मार्ग मिळेनासा होतो त्यांच्या विशिष्ट गरजा भागवून त्यांना सुधारणेच्या मार्गावर आणून सोडावें लागतें. या दिशेनें समाजसेवेच्या क्षेत्रांत चाललेल्या प्रयत्नांना व्यक्तिगत समाजसेवा ( social case work ) असें म्हणतात.

## व्यक्तिगत गुणांचा विकास.

व्यक्तिगत समाजसेवा म्हणजे व्यक्तिगत गुणांचा ( Personality ) विकास असें म्हणतां येईल. व्यक्तिगत गुण म्हणजे व्यक्तीचें शरीर व त्याचें व्यक्तिवैशिष्ट्य ( Individuality ) इतकेंच नव्हे तर शिक्षणानें, अनुभवानें, समाजाच्या संगतीनें उत्पन्न झालेले गुण. म्हणजे यांत त्याच्या आनुवंशिक व स्वसंपादित अशा दोन्ही प्रकारच्या गुणांचा अंतर्भाव होतो. हे गुण सदोदित बदलत असतात. त्यांना अनुकूल परिस्थिति मिळाल्यास त्यांची वाढ होते. ती न मिळाल्यास त्यांची वाढ खुंटते, इतकेंच नव्हे तर कालांतरानें त्यांचा क्षयहि होतो. यासाठीं एकेक व्यक्ति आणि तिच्या सभोंवारची सामाजिक परिस्थिति ( social environment ) यांच्यांत सहेतुक जरूर ती तोंडमिळवणी करण्याकरितां जे मार्ग योजावे लागतात ती व्यक्तिगत समाजसेवा होय. व्यक्ति आणि तिची परिस्थिति यांच्यामध्यें जी अनुकूल क्रिया प्रतिक्रिया घडत असते तिच्यावर

व्यक्तिगत गुणांची वाढ अवलंबून असते. यासाठीं व्यक्तीच्या गुणांत फरक करण्यास परिस्थितीचें साहाय्य घ्यावें लागतें. कितीहि सद्गुणी मनुष्य झाला तरी त्याच्यांत जसे थोडे तरी दुर्गुण असतातच त्याप्रमाणें कितीहि जरी दुर्गुणी मनुष्य झाला तरी त्याच्यांत थोडे सद्गुणहि असतातच. चांगल्या गुणांत नेहमीं प्रकाशमान होण्याची शक्ति असते आणि या गुणांवर भर देऊन,त्यांची प्रकाश देण्याची शक्ति वाढवून, त्यांच्याच साहाय्यानें दुर्गुण नाहींसे करण्याचा प्रयत्न समाजसेवक करितो. या कामीं त्याला मानसिक व शारीरिक रोग बरे करणारे डॉक्टर, शिक्षक, धर्मगुरु, नातेवाईक, मित्र, सामाजिक संस्था, औद्योगिक शिक्षण देणाऱ्या संस्था, बागा, क्रीडांगणें वगैरे अनेक संस्थांचें व व्यक्तींचें साहाय्य घ्यावें लागतें. व्यक्तिगत समाजसेवा करणाऱ्या माणसाच्या ताब्यांत जी व्यक्ति दिलेली असेल तिला त्याचें अशील म्हणतात. आणि आपल्या अशिलाला सर्वोत्कृष्ट वैद्यकीय सल्ला मिळाला आहे व त्याबरहुकूम तो वागत आहे अशी प्रथम खात्री करून घ्यावी लागते.

व्यक्तिगत समाजसेवा करणाऱ्या माणसाचें मुख्य काम मध्यस्थपणा करावयाचें असतें. आरोग्य सुधारण्यासंबंधींच्या नियमांत जी प्रगति झाली आहे व ज्या संघटित सार्वजनिक संस्था आहेत त्यांचा योग्य तऱ्हेनें उपयोग करून घेतां आल्यास समाजसेवकाचें हें काम पुष्कळच हलकें होतें. टेलिफोनच्या मध्यवर्ती यंत्राजवळ बसून जरूरीप्रमाणें एका यंत्राचा सांधा दुसऱ्याला जोडणें व काम संपतांच पूर्ववत् तें जाग्यावर ठेवणें अशासारखें हें असतें. यामुळें जो समाज अत्यंत संघटित असतो, ज्यांत अनेक प्रकारें समाजसेवा करणाऱ्या खाजगी व सार्वजनिक संस्था असतात, अनेक प्रकारचे तज्ज्ञ असतात, तेथें व्यक्तिगत समाजसेवा करणें अत्यंत सोपें असतें. पण जेथें या गोष्टींचा अभाव असतो तेथें व्यक्तिगत समाजसेवेला अवश्य लागणाऱ्या अनेक प्रकारच्या संस्थांची उणीव भरून काढणें फारच कठीण पडतें. कांहीं कांहीं बाबतींत तर तें अशक्य असतें. कारण व्यक्तिगत समाजसेवा करणाराचें अशील व त्याची परिस्थिति यांची नुसती तोंडमिळवणी करून कित्येकदां भागत नाहीं, तर कधीं कधीं ती परिस्थिति साफ बदलावी लागते. आणि हा बदल कधीं कधीं तात्पुरता असतो तर केव्हां केव्हां कायमचा असतो. कारण व्यक्तिगत गुणांची वाढ होण्यास परिस्थिति मुख्यतः कारणीभूत होते. करितां ती अशिलाच्या व्यक्तिगत गुणांना

पोषक होण्यासारखी नसल्यास कायमची बदलणें अपरिहार्य असतें. शिवाय नवीन ठिकाणीं नवीन संवयी लागणें सोपें असतें.

आपल्या अशिलाचें कोठें चुकतें आहे हें समजून घेण्यासाठीं त्याची प्रथम शारीरिक व मानसिक तपासणी करून घ्यावी लागते; पण एवढ्यानेंच त्याचें काय बिघडलें आहे तें आपल्याला समजतेंच असें नाहीं. यासाठीं त्याची घरची राहाणी, धंद्याच्या ठिकाणची वागणूक, आप्तमित्रांशीं वर्तन व दुसऱ्या अनेक गोष्टी यांचा विचार करावा लागतो. आणि या गोष्टींची माहिती झाल्यास कार्य सुकर होतें. तसेंच, इष्ट दिशेनें प्रयत्न झाल्यास मनुष्य कोणत्याहि स्थितींतून सुधरूं शकतो, या तत्वावर हें काम हातीं घेणाराचा पूर्ण विश्वास असावा लागतो. लहान मूल जें जें कांहीं पाहातें त्याचा त्याच्यावर मोठ्या माणसापेक्षां जास्त परिणाम होतो व त्याच्या स्वतःविषयींच्या कल्पना सारख्या बदलत असतात आणि त्यामुळेंच त्याच्यांतील गुणांचा विकास होत असतो. तसें नसल्यास हा विकास होणें शक्य नसतें. म्हणजे क्षणोक्षणीं कोणती तरी गोष्ट त्याच्या डोक्यांत असते, दुसऱ्या कोणत्या तरी वस्तूशीं तें तादात्म्य पावलेलें असतें, जणूं त्या वस्तूचा तें भागच झालेलें असतें आणि त्या भावना त्याच्या विकासाला कारणीभूत होतात. मनुष्येतर प्राणी जन्मतः सर्व गोष्टींनीं पूर्ण असतात. पण मनुष्य प्राणी अनेक दृष्टीनें अपूर्ण असतो. आणि त्यानें स्वतःच्या प्रयत्नांनीं आपल्यांतील उण्या गोष्टींची पूर्तता करावी असा सृष्टीचा उघड हेतु दिसतो. यासाठीं व्यक्तिगत समाजसेवा करणारा आपल्या अशिलाचीं सामाजिक बंधनें ( social relationships ) कोणच्या तऱ्हेचीं आहेत हें शोधून काढण्यांत यशस्वी झाल्यास त्याला त्यांच्याविषयीं पुष्कळ माहिती मिळाली व त्यांच्या अडचणी कोणत्या आहेत व त्यांची सुधारणा होणें कितपत शक्य आहे हें समजण्याचें साधन त्याला उपलब्ध झालें, असें मानावयास हरकत नाहीं. त्याच्या घरांतील माणसें त्याच्याशीं कशीं वागतात व तो त्यांच्याशीं कसा वागतो, त्याच्या मित्रांना त्याच्यांत कोणते गुणदोष दिसतात, कारखान्यांत त्याच्याबरोबर काम करणारे व त्याचे वरिष्ठ यांचें त्याच्याविषयीं काय मत आहे, तो कोणच्या क्लबाचा सभासद आहे, धार्मिक बाबतींत तो कोणत्या मताचा आहे; सारांश त्याची राहाणी, त्याचें काम, करमणुकीचीं ठिकाणें, उठण्या बसण्याच्या जागा, जातीच्या संस्था व एकंदर देशाविषयींच्या कल्पना यांचा त्याच्या सामाजिक बंधनांत अंतर्भाव होतो.

## व्यक्तिवैशिष्ट्य.

एकादा मनुष्य अगदीं निराश झाला असला, त्याला आपल्या जीविताचाहि कंटाळा आला असला, तर नुसत्या उपदेशाचा त्याच्यावर कांहींसुद्धां परिणाम होत नाहीं. उलट उपदेशानें तो अधिक वैतागी बनतो. आपलें अशील अशा विषण्ण मनःस्थितींत असतां, त्याचा ओढा कोणत्या गोष्टीकडे आहे—कोणती गोष्ट त्याला स्थितीचा विसर पाडूं शकेल हें शोधून काढण्याची कला समाजसेवकाला अवगत असावी लागते आणि त्या गोष्टीच्या सहाय्यानें त्याची नैराश्यवृत्ति नाहींशी करावी लागते. दुर्गुणानें दुर्गुण वाढतात तसे सद्गुणानें सद्गुण वाढतात, पण तसा योग घडवून आणण्याची शक्ति समाजसेवकांत असावी लागते. मेरी ई. रिचमॉंड यांनीं आपल्या या विषयावरील पुस्तकांत याचें एक उदाहरण दिलें आहे. तें असें. त्यांच्या दोन मैत्रिणींनीं आपलें कॉलेजांतील शिक्षण पुरें झाल्यावर आपापल्या शहरीं कुटुंबहितवर्धक संस्थांत काम करण्याचें ठरविलें. त्यांपैकीं एकीची लवकरच नवऱ्यानें टाकलेल्या एका बाईशीं गांठ पडली. तिला लहान लहान तीन मुलें होतीं, व त्यांची गृहस्थिति कल्पनातीत वाईट होती. यासाठीं या असहाय कुटुंबाची शारीरिक व सांपत्तिक स्थिति सुधारण्याचें व त्या कुटुंबाच्या चालकाचा शोध लावण्याचें काम तिनें हातीं घेतलें. सुदैवानें तिची मैत्रीण राहात असलेल्या शहरींच लवकरच त्याचा तपास लागला. तो तेथें धंदा शोधण्यासाठीं गेला होता; परंतु काम मिळाल्यावर हळुहळू आपल्या कुटुंबाकडे दुर्लक्ष करूं लागला आणि कुटुंबाच्या पोटाला पैसे पाठविण्याऐवजीं स्वतःच्या चैनीला ते खर्च करूं लागला. या उभयतां मैत्रिणींनीं त्यानें आपली जबाबदारी ओळखावी व आपल्या निराधार झालेल्या बायकोमुलांची दैन्यावस्था नाहींशी करावी म्हणून अनेक तऱ्हेनें प्रयत्न करून पाहिले, पण त्यांपैकीं एकहि प्रयत्न यशस्वी झाला नाहीं. शेवटीं अप्रत्यक्ष रीतीनें त्याला समजावयाचा त्यांनीं प्रयत्न केला तो फलद्रूप होऊन तें कुटुंब पूर्ववत् गुण्यागोविंदानें नांदूं लागलें. इतकेंच नव्हे तर त्यांची पूर्वींपेक्षांहि अधिक भरभराट झाली. तो एका कामगारसंघाचा सभासद होता आणि संघाच्या कामांत तो अतिशय मन घाली. वरील बाईची मैत्रीणहि या संघाची सभासद होती व तिला त्या चळवळीची इत्थंभूत माहिती होती. त्यामुळें त्यांची मैत्री जमली, एकमेकांच्या खाजगी गोष्टींचीहि चर्चा होऊं लागली आणि मुलांच्या शिक्षणाविषयीं व भवितव्यतेविषयीं प्रश्न निघा-

त्यावर आपण आपल्या स्वतःच्या मुलांच्या बाबतींत फार मोठी चूक करीत आहों हें त्यानें कबूल केलें. पुढें आपल्या कुटुंबाचें पोषण करण्याचें त्यानें आश्वासन दिलें आणि त्याप्रमाणें तो वागूंहि लागला.

मनुष्याचें एकंदर चारित्र्य बनण्याला ज्याप्रमाणें शिक्षण व परिस्थिति हीं कारणीभूत होतात त्याचप्रमाणें आनुवंशिक संस्कारहि कारणीभूत होतात. परंतु यांपैकीं प्रत्येक किती प्रमाणांत कारणीभूत होतें हा प्रश्न अजून वाद-ग्रस्त आहे. तथापि कांहीं तज्ज्ञांचें मत असें आहे कीं, मनुष्याचें हित वा अहित बहुतांशीं त्याच्या स्वतःच्याच हातीं असल्यामुळें परिस्थितीचा व शिक्षणाचा परिणाम मनुष्येतर प्राण्यापेक्षां माणसावर अधिक होतो आणि स्वतःची उन्नति करून घेण्याचीं साधनें मनुष्येतर प्राण्यांना फारशीं उपलब्ध नसल्यामुळ आनुवंशिक संस्कारांचा परिणाम त्यांच्यावर अधिक होतो.

प्रत्येक माणसाला आपापली सुधारणा करून घेण्याला अवश्य ती संधि मिळावी, किंबहुना तशी संधि मिळण्याचा प्रत्येकाचा हक्कच आहे, असें आपण म्हणतों आणि तें कांहीं खोटें आहे अशांतला भाग नाहीं. परंतु सारख्या परिस्थितींतील माणसें नेहमीं सारख्या स्थितींत असतात असें तरी कोठें आहे ? 'व्यक्ति तितक्या प्रकृति' असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. जगांतील कोणत्याहि एका व्यक्तिचा चेहरा दुसऱ्या व्यक्तीशीं जुळण्यासारखा नसतो, त्याप्रमाणेंच कोणत्याहि एका माणसाचा स्वभाव तंतोतंत दुसऱ्या माणसाच्या स्वभावाशीं कधींहि जुळण्यासारखा नसतो. याकरितां व्यक्तिगत समाजसेवेंत जर कांहीं विशेष असेल तर तें हेंच आहे कीं, प्रत्येक व्यक्तींत जो कांहीं विशेष असेल त्याचा छेडा लावावयाचा व त्याच्या आधारानें व्यक्तीची उन्नति करावयाची. दुसऱ्याबद्दल भ्रातृभाव–प्रेम व तज्जन्य परहितबुद्धि हीं अशा प्रकारच्या विधायक भावनेला प्रेरणा देतात आणि म्हणून व्यक्तिगत समाजसेवा करणारांत हा गुण उपजतच असावा लागतो. त्यांत विशिष्ट प्रकारच्या शिक्षणाची व अनुभवाची भर पडली म्हणजे तो आपल्या कामांत पूर्ण तरबेज होतो. सर्वांकरितां एक साचा तयार करण्याची अवश्यकता असली तथापि तें या विवक्षित कार्याचें ध्येय नाहीं. जे या साच्यांत जात नसतील, गेले तरी कोणच्याहि प्रकारें संस्कार न होतां जशाचे तसे निसटून बाहेर पडत असतील त्यांपैकीं प्रत्येकाची परिस्थिति समजून घेऊन त्या एकट्यालाच सोईस्कर होईल अशा प्रकारची साधनसामुग्री तयार करणें व तिचा आपल्या अशिलाचें शीलसंव-

र्धन करण्याच्या कामीं उपयोग करणें हें अत्यंत नाजूक व दुर्धर काम व्यक्तिगत समाजसेवा करणाराचें असतें.

## स्वावलंबी होण्याची आवश्यकता.

इच्छाशक्तीच्या प्रयोगांत एक गोष्ट विशेष दिसते ती ही कीं, त्यांत प्रयोग करणाराची शक्ती जितकी बलवत्तर दिसते तितकाच ज्यांच्यावर ते प्रयोग केले जातात त्यांच्या इच्छाशक्तीचा पराधीनपणा दिसतो. अंधता नाहींशी करण्याकरितां आणि आंधळ्यांची स्थिती सुधारण्याकरितां ज्यांनीं जिवापाड प्रयत्न केले आहेत त्यांचें असें ठाम मत आहे कीं, आंधळ्यांची पराधीनता वाढविण्याला सद्बुद्धीनें कां होईना पण त्यांच्या कुटुंबांतील लोक, इष्टमित्र व सर्वसाधारण जनता हीच मुख्यतः कारणीभूत होतात. सर ऑर्थर पिअर्सन हे स्वतः आंधळे असल्यामुळें त्यांचा या बाबतींतील अनुभव विशेष महत्वाचा आहे. ते लिहितात कीं, "एकाद्या माणसाला जर तुम्हीं सांगितलें कीं, अमूक अमूक रोगानें तुला पछाडलें आहे तर त्या रोगाच्या कल्पनेचा परिणाम त्याच्यावर इतका कल्पनातीत होतो कीं स्वतः निरोगी असूनसुद्धां आपण रोगी आहोंत असें त्याला वाटूं लागतें आणि कांहीं दिवसांनीं तो रोग त्याला खरोखरीच जडतो. माझी दृष्टि कायमची नाहींशी झाली अशी जेव्हां माझी खात्री झाली तेव्हां अधिक परतंत्र न होण्यासाठीं पहिली गोष्ट मीं केली ती ही कीं, कैक वर्षें माझी व्यक्तिशः सेवा करण्याकरितां ठेवलेल्या माझ्या सेवकाला मी माझ्यापासून दूर केलें. आंधळेपणांत जर कोणती अत्यंत महत्त्वाची व अंतीं उपयोगीं पडणारी गोष्ट असेल तर ती ही कीं, जें जें कांहीं आपल्याला स्वतःला करतां येण्यासारखें असेल तें आपल्या आपण स्वतः केलें पाहिजे, दुसऱ्याकडून कधींहि करून घेतां कामा नये." आंधळा तर पराधीनच असतो पण डोळस माणसें तरी सर्वच कोठें स्वावलंबी असतात ? वस्तुतः वरील नियम आंधळ्याच्या दृष्टीनें जितका महत्वाचा आहे तितकाच तो किंबहुना त्याहीपेक्षां जास्त डोळस माणसाच्या दृष्टीनेंहि महत्वाचा आहे. हरएक गोष्टींत दुसऱ्यावर अवलंबून राहाण्यापेक्षां ज्या कांहीं गोष्टी आपल्या स्वतःला करितां येण्यासारख्या असतील त्या केल्यानें त्यांत एक प्रकारचा आनंदच वाटतो, शरिराला वळण लागतें आणि कायमचा स्वावलंबीपणा येतो. उलट पक्षीं, आपलें काम दुसऱ्यावर सोपवावें तितका मनुष्य अधिक परावलंबी होतो. व्यक्तिगत समाज-

सेवेच्या दृष्टीनें आपल्या अशिलांतील अशा प्रकारचा परावलंबीपणा नाहींसा करणें हें अत्यंत महत्वाचें असतें.

प्रकृति बरी नसली, एखाद्यानें फसविलेलें असलें, जावें तिकडे यश येईनासें झालें, कांहीं करण्याला कोठें संधि मिळेनाशी झाली कीं, मनुष्य अगदीं निराश व्हावा हें अगदीं साहाजिकच असतें. अशा विषण्ण मनःस्थितींत त्याच्या भावी उत्कर्षाचें कितीहि भडक चित्र रंगविलें तरी तें परिणामकारक होत नाहीं. अशा वेळीं त्याच्या मार्गांतले अडथळे दूर करणें व त्याला हताश करणाऱ्या गोष्टींपासून परावृत्त करणें हें जरूर असतेंच, पण त्याशिवाय त्याच्या त्याला भागवितां येतील अशा त्याच्या गरजा वाढविणें हाहि या बाबतींत त्याला सुधाण्याचा एक मार्ग आहे.

आपण जें जें काय सांगूं त्याला आपलें अशील होकार देईल आणि त्याबर-हुकूम वागेल असे प्रयत्न करणें हा समाजसेवेचा खरा मार्ग नव्हे. प्रसंगविशेषीं कांहीं बाबतींत आपल्या अशिलाला त्याच्या हिताच्या कांहीं गोष्टी करावयास लावणें व त्या तो करीत नसल्यास त्याबद्दल त्याला पुनः पुनः स्मरण देणें हें वेगळें, पण आपली प्रत्येक गोष्ट त्यानें मान्य करावी व आपलें मत तें त्याचेंहि मत असावें अशी अपेक्षा करणें उभयतांनाहि अहिताचें व उभयतांनाहि हानिकारक असतें.

## तीन उदाहरणें.

मेरी ई. रिचमॉंड यांनीं आपल्या " व्यक्तिगत समाजसेवा म्हणजे काय ? " या पुस्तकांत कांहीं उदाहरणें दिलीं आहेत. व्यक्तिगत समाजसेवेची यथार्थ कल्पना येण्यासाठीं त्यांतील तीन उदाहरणें खालीं देत आहें:—

मेरिया बिलोस्की ( Maria Bielowski ) ही मुलगी पंधरा वर्षें वयाची असतांना कारखान्यांत कामाला जाऊं लागली. आपल्या मजुरीपैकीं किती पैसे घरीं द्यावयाचे व किती पैसे आपल्या स्वतःच्या खर्चासाठीं ठेवावयाचे याबद्दल ती व तिची सावत्र आई यांच्यामध्यें नेहमीं भांडण चालत असे. मेरिया फार अपरात्रीं घरीं येत असे हेंहि एक त्यांच्या भांडणाला कारण झालें होतें. शेवटीं हें भांडण विकोपास जाऊन मेरियानें घर सोडलें व ती एका हॉटेलमध्यें राहूं लागली. परंतु लवकरच आपल्या खोलींतील दुसऱ्या मुलीचे कांहीं पैसे चोरल्याच्या आरोपावरून तिला कोर्टांत खेंचण्यांत आलें. त्या वेळीं तिची स्थिति

कोणालाहि कींव येण्यासारखी होती. तिचा वर्ण थोडा काळसर होता व तिच्या डोळ्यांवर थोडी धुंदी दिसे. अंगावरील सारे कपडे फाटलेले, घाणेरडे आणि अनेक प्रकारचे डाग जागोजागीं पडलेले असे होते. तिच्या केंसांना कैक दिवस फणी लागलेली नव्हती आणि केसांवरून उवा चालतांना स्पष्ट दिसत होत्या. तिची जास्त अधोगति शक्य तर टाळावी म्हणून न्यायाधिशानें तिला शिक्षा न देतां सुधारण्याची संधि देण्याचें ठरविलें व तिला या कार्याला वाहिलेल्या समाजसेवकाच्या ( probation officer ) ताब्यांत दिलें. तिच्या सामाजिक इतिहासांत असें उघडकीस आलें कीं, पूर्वी काम करित असलेल्या दोन ठिकाणीं ती अगदीं अनियमित होती. तिची शारीरिक व मानसिक तपासणी केली तेव्हां असें आढळून आलें कीं, ती बुद्धिवान् आहे पण तिची नैतिक अधोगति झालेली आहे. तिच्या कौटुंबिक स्थितीविषयीं अशी माहिती लागली कीं हें कुटुंब–बाप, त्याची दुसरी बायको व चार मुलें–पांच वर्षांपूर्वी पोलंडमधून अमेरिकेंत आलीं. नंतर तीन वर्षांनीं बाप वारला. आणि सावत्र आईचें मुलें ऐकेनाशीं झालीं. पुढें दोन मोठे मुलगे परांगदा झाले, धाकट्या दोघांना 'उनाड मुलांना सुधारणाऱ्या शाळेंत ठेवण्यांत आलें. मुलीचीहि तीच गत होणार होती. ही मुलगी कामकाजाला जाऊं लागेपर्यंत चांगली होती. शाळेंतील तिची वागणूक व अभ्यासक्रम यांत नांव ठेवण्यासारखें कांहीं नव्हतें. म्हणूनच उनाड मुलांना ताळ्यावर आणणाऱ्या शाळेंत तिला पाठविण्याची आवश्यकता न्यायाधिशाला वाटली नाहीं. पण त्याच कुटुंबांत तिला राहूं दिल्यास ती सुधेरल असेंहि वाटेना. करितां जेथें व्यक्तिशः तिच्यावर लक्ष ठेविलें जाईल अशा एकाद्या खाजगी कुटुंबांत तिला ठेवण्याचा निश्चय ठरला व तिचा कायदेशीर पालक कोर्ट झालें. हा परिस्थितींत फरक पडल्यामळें तिची सावकाशानें पण सारखी सुधारणा होऊं लागली. प्रथमतः तिच्या शारीरिक सुधारणेकडे लक्ष देण्यांत आलें. तिचे केंस साफ धुऊन त्यांतील उवा नाहींशा करण्यांत आल्या. त्याचप्रमाणें तिचे दांतहि साफ करण्यांत आले व तिला जे अनेक प्रकारचे विकार होत होते व कांहींचीं पूर्वचिन्हें दिसत होतीं ते सारे तिला हॉस्पिटलमध्यें शारीरिक तपासणीसाठी सतत दोन वर्षें पाठवून बरे करण्यांत आले व तिची प्रकृति निकोप राहील अशी व्यवस्था करण्यांत आली. तिला ज्या शाळेंत ठेवण्यांत आलें होतें तेथें स्वतःची सर्व स्वच्छता राखणें, आपली खोली साफसूफ करणें, आपले कपडे धुणें शिवणें व दुरुस्त

करणें, आपल्याबरोबर इतरांचीहि निगा राखणें वगैरे गोष्टींचें शिक्षण देण्यांत येई. प्रत्येकीला आपल्या खर्चापुरते पैसे मिळत आणि कोणापासूनहि पैसे उसने घेण्याची सक्त मनाई असे. येथील स्वयंपाकघरांतून एके दिवशीं दोन केक चोरीला गेले व ते नेल्यांचें कोणीहि मुलगी कबूल करीना म्हणून सर्व मुलींनीं मिळून शहरांत सहल करावयास जावयाचें ठरलें होतें तोहि कार्यक्रम रहित करण्यांत आला; पण चोरीचा थांग लागेना. परंतु अशा प्रकारच्या शुद्ध वातावरणाचा परिणाम असा कांहीं विलक्षण होतो कीं, पुढें तीन दिवसांनीं मेरियानें आपण ते केक चोरून खाल्ल्याचें आपल्या मुख्य शिक्षकिणीला स्वतः होऊन सांगितलें. या लहानशा गोष्टीचा परिणाम तिच्यावर इतका झाला कीं, त्या वटकेपासून तिनें चोरी करण्याचें सोडलें इतकेंच नव्हे तर पुढें ती ज्या ज्या कुटुंबांत राहिली त्यांनीं तिच्या प्रामाणिकपणाची फारच शिफारस केली.

उपर्युक्त शाळेंत आठ महिने राहिल्यावर तिला निरनिराळ्या वेळीं पांच कुटुंबांत ठेवण्यांत आलें. त्या त्या घरचें काम सांभाळून ती आपला अभ्यासहि नियमितपणें करित असे. तिला ठेवावयाच्या कुटुंबाची निवड मोठ्या काळजीपूर्वक करण्यांत येत असे. शिवाय तिच्यावर व्यक्तिशः नजर ठेवण्याचें काम पत्करलेली समाजसेविका आपल्या कामांत फार वाकबगार होती. या दुहेरी प्रयत्नामुळें तिची सारखी प्रगति होत होती. तिची मैत्री संपादन करणाऱ्या वरील समाजसेविकेचे या मुलीच्या बाबतींतील अनुभव ऐकण्यालायक आहेत. ती लिहिते कीं, "एखादी गोष्ट निश्चयपूर्वक तिच्या अहिताची असल्याशिवाय ती तूं करूं नकोस असें मी तिला कधींही सांगत नसें. हेतु हा कीं प्रत्येक गोष्ट आपल्या हिताची आहे वा अहिताची आहे हें तिचें तिला अनुभवानें कळावें व ठरवितां यावें. तसेंच होतां होईल तों कोणतीहि गोष्ट तिच्यापासून चोरून ठेवावयाची नाहीं अशी माझी सवय असे. एखादी गोष्ट करूं नको म्हणून आपण कां सांगतों याची कारणेंहि मी तिला स्पष्ट सांगत असें आणि त्या बाबतींत तिच्या ज्या कांहीं शंका कुशंका असत त्यांचेंहि निवारण मी करीत असें. बरें, एखादे वेळीं माझी स्वतःची चूक झाली असली तर ती प्रांजलपणें कबूल करण्यास मी कधींहि माघार घेत नसें. एके दिवशीं तिचे फाटलेले पायमोजे शिवावयास मीं तिला सांगितलें, पण इतक्यांत माझ्या स्वतःच्या फाटक्या पायमोज्याकडे माझें लक्ष गेलें. घाई घाईनें पायांत घालतांना त्याच दिवशीं ते फाटले होते. मला याचें हसूं आलें आणि फार काम

असल्यामुळें रात्र थोडी आणि सोंगें जास्त अशी माझी स्थिति कशी होते तें मीं तिला सांगितल. तिला त्या गोष्टी पटल्या. प्रत्येक प्रश्नाचें खरें आणि सरळ उत्तर मी देत असल्यामुळें ती माझ्याशीं इतक्या मोकळ्या मनानें वागे कीं, कोणतीहि गोष्ट मग ती क्षुल्लक असो का महत्वाची असो मला सांगितल्याशिवाय तिच्यानें राहावत नसे. आई बाहेरून घरांत येतां क्षणींच घरांत घडलेल्या बारीक सारीक गोष्टीसुद्धां मूल अगदीं उताविळपणानें आईला सांगतें तशी ती माझ्याशीं वागे. त्यामुळें कोणत्या वेळीं कोणते विचार तिच्या मनांत चालले आहेत त्याचा ठाव मला बरोबर लागे व त्यामुळें माझें कार्य सुलभ होई." आपल्या अशिलाशीं एकजीव होऊन त्याचें प्रेम इतक्या विलक्षण रीतीनें संपादन करणें ही गोष्ट अत्यंत कठीण आहे हें सांगावयास नकोच. ही हातोटी बेमालूम साधण्याला या कामांतील अनुभव व शिक्षण हीं थोडींबहुत उपयोगीं पडतात हें खरें, पण याला लागणारे कांहीं गुण उपजतच अंगीं असावे लागतात; ते शिक्षणानें किंवा अनुभवानें येत नाहींत, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. वरील प्रयत्नांमुळें मेरिया निर्दोष झाली, तिच्यांत दुर्गुण म्हणून कांहीं राहिले नाहींत, अशी कोणीं समजूत करून घेऊं नये. तसें होणें शक्य नाहीं व तशी अपेक्षाहि कोणीं करूं नये. पण चोरी केल्याबद्दल शिक्षा होऊन ती कायमची गुन्हेगार होणार होती व अधोगतीच्या मार्गाला लागणार होती तें न होतां तिनें उत्तम शिक्षण संपादन केलें, ती उत्तम नागरिक झाली आणि स्वतःची व समाजाची उन्नति करण्यास लायक झाली हा कोणत्याहि दृष्टीनें कमी फायदा नव्हे.

अमेरिकेंतील एका शहरांत कांहीं वर्षांपूर्वीं मिस्टर आणि मिसेस रुपर्ट यंग (Rupert Young) नांवाचें, अनुक्रमें पंचवीस व वीस वर्षें वय असलेलें एक जोडपें राहात होतें. त्यांना दोन वर्षांचें एक मूल होतें. एके दिवशीं या पतिपत्नीचें भांडण विकोपास गेलें आहे असा टेलिफोन त्या भागांतील कुटुंबहितवर्धक संस्थेच्या चिटनिसाला आला. त्यानें लगेच आपला प्रतिनिधि पाठविला तों त्याला असें आढळून आलें कीं घरांतील सामानसुमान विकत आणिलेल्या व्यापाऱ्याचा हप्ता ठरल्याप्रमाणें न दिल्यामुळें तो घरांतील सर्व खुर्च्या टेबलें परत घेऊन गेला. मिसेस यंग आपल्या मुलासह माहेरीं निघून गेल्या. मिस्टर यंग हे बेहोष होईपर्यंत दारु प्याल्यामुळें अगदीं गलित होऊन एका मेजावर पडलेले होते. शेवटीं या उभयतां नवराबायकोनीं दुसऱ्या दिवशीं उपरिनिर्दिष्ट चिटनिसांना एक तासाच्या अंतरानें भेटावें असें ठरलें. या बाईच्या

मुलाखतींत असें आढळून आलें कीं, तिला तीन महिने गेलेले आहेत आणि ह्या एकंदर प्रसंगामुळें ती अगदीं गांगरून गेलेली आहे. कारण आप्तेष्टांनीं या छाकट्या नवऱ्याशीं इतःपर संबंध ठेवूं नको व त्याच्यावर कोर्टांत फिर्याद करून अन्नवस्त्राची मागणी कर असा सल्ला दिला होता. तिची सर्व हकीगत ऐकून नवऱ्याची मुलाखत झाल्यावर पुढील कार्यक्रम ठरवूं असें चिटनिसानें सांगितलें. मिस्टर यंग यांनीं आपल्या गैरवर्तणुकीबद्दल आपल्याला अनुताप होत आहे असें सांगितलें, दारूला पुनः शिवणार नाहीं असें आश्वासन दिलें, आणि हिल्डाला—बायकोला दारूच्या निशेंत मारहाण केल्याची कबुली दिली. पण प्रत्येकजण आपल्या उलट आहे, बायको आपल्याला फार छळते तथापि ती अगदीं साध्वी आहे, घरच्या कोणत्याहि बाबतींत आपल्याला पहावें लागत नाहीं, आपल्या मुलीवर आपला अत्यंत जीव आहे व तिच्याबद्दल आपल्याला अभिमान वाटतो असें सांगितलें. या सर्व संकटपरंपरेला बहुतांशीं आपण कारण असलों तथापि आपली सासू तोंडाळ असल्यामुळें तिचाहि यांत दोष आहे असें तो म्हणाला. त्याच्या जेवणाखाणाची तेथेंच व्यवस्था करण्यांत आली व शारीरिक तपासणी करण्याकरितां डॉक्टरकडे पाठविण्यांत आलें. दुसरे दिवशीं वरील संस्थेचे चिटनीस व तीं उभयतां नवराबायको यांनीं एकत्र भेटण्याचें ठरविलें. दुसऱ्या दिवशीं आपण कॅथोलिक पंथाचे अनुयायी असल्यामुळें इत-उत्तर दारूला स्पर्शहि करणार नाहीं अशी धर्मगुरूकडे आपण स्वतः होऊनच शपथ घेतल्याचें यंग यांनीं सांगितलें. यानंतर त्यांचा कार्यक्रम असा ठरविण्यांत आला कीं ( १ ) त्या उभयतां नवराबायकोनीं कांहीं दिवसपर्यंत परस्परांपासून दूर राहावें; ( २ ) मिसेस यंग यांनीं आपल्या मुलीसह महिनाभर बाहेरगांवीं जाऊन विश्रांति घ्यावी; ( ३ ) मिस्टर यंग यांनींहि शक्य तर कांहीं आठवडे हवापालट करावा; ( ४ ) उभयतांनींहि वरील संस्थेच्या चिटनिसाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि माणसाशीं किंवा आप्तेष्टाशीं घरगुती गोष्टीबद्दल एक ब्रहि काढूं नये; आणि ( ५ ) मिसेस यंग यांनीं आपल्या पतीशीं हटवादीपणा कर-ण्याचें टाळावें. चोवीस तासाचे आंतच चौथी आणि पांचवी अट मिसेस यंग यांनीं मोडली व मिस्टर यंग यांच्याहि बारक्या सारख्या गोष्टीबद्दल तक्रारी चालूच होत्या. त्या दिवशीं कुटुंबहितवर्धक संस्थेच्या कचेरींतील खिडक्यांची तावदानें धुऊन साफ करण्याचें काम त्यांना देण्यांत आलें होतें. त्यांच्या खाण्यापिण्याची यथास्थित व्यवस्था करण्यांत आली होती. त्यांची मानासिक

तपासणी करण्यांत येऊन डॉक्टरच्या सल्ल्याप्रमाणें थंड व ऊन पाण्याची आळीपाळीनें आंघोळ, खाण्याला पातळ पदार्थ, मित प्रमाणांत धूम्रपान पण दारू दृष्टीसमोरहि येतां नये, अशी व्यवस्था करण्यांत आली होती. पुढें एक दोन आठवड्यांतच त्यांना दारुड्यांना सुधरावयाच्या एका आश्रमांत ठेवण्यांत आलें. दारूबाजीचे परिणाम साफ नाहींसे झाल्यावर मिस्टर रूपर्ट यांच्यांत दारूचें व्यसन हा एकच दोष नाहीं तर दुसरेहि कांहीं स्वभावदोष असल्याचें दिसून आलें. त्यांचा स्वभाव पोरकट, कानभरू व अस्थिर असल्याचें आढळलें. या आश्रमांतील फळें वेंचून तो तीं उपर्युक्त चिटनिसाच्या मातुःश्रीला पाठवी व तीं सुरक्षित पोंचल्याचें उत्तर लगेच गेलें नाहीं तर तो अगदीं उतावळा होई. दोन महिन्यांनीं तीं उभयतां पुनः शहरांत आलीं. त्यांना लहानसें घर पाहून देण्यांत आलें व त्यांचें सामानसुमानहि परत मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली. रूपर्ट यांना तात्पुरतें कामहि मिळालें. कांहीं दिवसांनीं त्यांना पूर्वी परिचित असलेल्या कामावर ते कायम झाले व तीं दोघेंहि आपला संसार पुनः थाटण्याचा उत्साहानें प्रयत्न करूं लागलीं. तरी पण अजून पुष्कळ गोष्टी व्हावयाच्या होत्या. त्यांची सुधारणा योग्य दिशेनें होण्याला नुकतीच कोठें सुरवात झाली होती. क्षुल्लक बाबीसंबंधीं वादविवाद वाढवून तो विकोपास जाऊं नये म्हणून लहानसहान गोष्टींकडे दुर्लक्ष केल्याशिवाय आणि सहनशीलतेनें व सहकारितेनें वागल्याशिवाय कोणतेंहि कुटुंब नांदूं शकत नाहीं याची मिसेस यंग यांना वेळोवेळीं आठवण द्यावी लागे. मिस्टर यंग यांची वागणूक केव्हां केव्हां तर अगदीं पोरासारखी असे. दुसऱ्या मुलीच्या खेपेला बायकोच्या आजारीपणाचें निमित्त करून तो वरचेवर घरीं राहूं लागला; त्यामुळें त्याची पुनः नोकरी गेली. परंतु कुटुंबसुखवर्धक संस्थेच्या चिटनिसांनीं नेहमीं सल्ला देऊन, संकटप्रसंगीं धीर देऊन, आपलीं सुंदर दोन मुलें चांगल्या तऱ्हेनें वागविणें, त्यांना चांगला कपडालत्ता घालणें, त्यांना चांगलें शिक्षण मिळण्याची तजवीज करणें यांत उभतांचेंहि सुख आहे, मुलांकरितां वाटेल तो स्वार्थत्याग करणें हें मातापित्याचें कर्तव्य आहे वगैरे प्रकारच्या गोष्टी सांगून त्यांना मार्गावर आणिलें. क्वचित् प्रसंगीं या नवरा बायकोची बोलाचाली होई व ते प्रसंग अपवाद म्हणून सोडून दिल्यास त्या कुटुंबाची उत्तरोत्तर भरभराट होत गेली, असें म्हणावयास हरकत नाहीं. तो नोकरीवर स्थिर झाला आणि तें कुटुंब मोडण्याची एका काळीं वाटत असलेली भीति साफ नाहींशी झाली. पुढें सहा वर्षांनीं हें कुटुंब दोन खोल्यां ऐवजीं चार खोल्यांत सुखानें नांदत असल्याचें वरील संस्थेच्या चिटनिसांना दिसलें.

मिसेस ॲलिग्री ( Allegri ) या बाईला वैधव्यस्थिति प्राप्त झाल्याला सुमारें नऊ वर्षें झालीं होतीं. हिच्या नवऱ्याची प्राप्ति चांगली असल्यामुळें हें कुटुंब एका काळीं मोठ्या सुखांत आणि चैनींत राहात होतें. परंतु हा सुखाचा काळ कायम टिकणारा नसतो या गोष्टीचें त्यांना विस्मरण पडलें व भावी संकटें टाळण्याकरितां त्यांनीं कोणत्याहि प्रकारें तरतूद करून ठेविली नाहीं. पुढें कुटुंबाची अत्यंत दैन्यावस्था झाली. मोठीं चार मुलें लग्नें होतांच एका मागून एक त्या शहरापासून दूर राहावयास गेलीं. त्यांपैकीं एकहि आईची किंवा आपल्या धाकट्या बहिणीची विचारपूस करीनासें झालें. त्यांचा ठाव ठिकाणहि आईला कळेनासा झाला. त्यामुळें मिसेस ॲलिग्री आणि तिची अल्पवयी मुलगी टेरेसा ( Teresa ) यांची स्थिति अत्यंत केविलवाणी झाली. शिवाय त्या बाईला इंग्रजी भाषा समजत नसल्यामुळें मुलीच्या साहाय्याशिवाय तिच्याशीं कोणाला बोलतां येत नसे. पण मुलगी शाळेचें निमित्त करून कोठें तरी भटकूं लागली होती. एका काळीं ऐषआरामांत कालक्षेप करणाऱ्या या बाईला घाणेरड्या वस्तींत ओलसर व काळोखाच्या जागेंत राहाण्याचा प्रसंग आला. अन्न कधीं मिळालें तर कधीं मिळालें नाहीं, अशा स्थितींत संधिवातानें ती अंथरुणाला खिळली. सुदैवानें अशा प्रसंगीं या बाईची स्थिति कुटुंबसुखवर्धक संस्थेला कळली आणि त्या संस्थेनें क्षणाचाहि वेळ न लावितां साहाय्य केलें. पुढें तिची कोणत्या तऱ्हेनें व्यवस्था करावयाची हें निश्चित होईपर्यंत तिला तात्पुरती मदत देण्यांत आली. या संस्थेच्या वतीनें काम करणाऱ्या समाजसेविकेनें तिच्या सर्व मुलांचा पत्ता शोधून काढण्याचा निश्चय केला आणि मोठ्या मुलाशिवाय बाकीच्यांचा पत्ता मोठ्या शिकस्तीनें तिला मिळाला. मोठा मुलगा उनाडच आहे असें मागाहून समजलें. प्रत्येकाला या बाईची इत्थंभूत माहिती सांगून या बाईची पुढें काय व्यवस्था करावयाची तें ठरविण्याकरितां तिच्या मोठ्या जांवयाच्या घरीं तिच्या साऱ्या जवळच्या नातेवाईकांची सभा करण्याचें ठरलें. या सभेला वरील समाजसेविकेशिवाय दुसरें कोणीहि बाहेरचें मनुष्य हजर नव्हतें आणि तिनेंसुद्धां या वादविवादांत प्रत्यक्ष भाग घ्यावयाचा नाहीं, जें काहीं होईल तितकें ऐकावयाचें असें ठरविलें होतें. मिसेस ॲलिग्री या सभेला हजर होत्याच. सभेंत पुष्कळ गोष्टींचा खल झाला व समाजसेविकेला पूर्वी माहिती नसलेल्या अशा पुष्कळ गोष्टी उजेडांत आल्या व त्यांच्या सत्यासत्यतेबद्दल पुष्कळ वाद झाला. शेवटीं असें ठरलें कीं, या

बाईची मोठी मुलगी कारमेला ही तिची स्थिति फारशी चांगली नसतांहि आईला वेळोवेळीं मदत करीत असल्यामुळें व परस्परांचें परस्परांवर विशेष प्रेम असल्यामुळें मिसेस ॲलिग्री यांनीं कारमेलाकडेसच रहावें व टेरेसा हिनें आपल्या दुसऱ्या बहिणीकडे राहावें. या व्यवस्थेंत दोन्ही मुलांवर कोणच्याहि प्रकारची जबाबदारी पडली नाहीं याचें कारण असें कीं कोणतीहि जबाबदारी घेण्याची त्यांची तयारी नव्हती. उलट, या जबाबदारींतून निसटण्याकरितां ते सारखे पळवाटा शोधीत होते. अशा स्थितींत त्यांचेवर कोणचीहि जबाबदारी टाकल्यास ती त्यांनीं कधींही पत्करली नसती, म्हणून झाली यापेक्षां दुसरी अधिक चांगली व्यवस्था करणें शक्य नव्हतें. या व्यवस्थेंतहि पुढें पुढें कांहीं वांधे निघाले परंतु ते विकोपास न जातां तीं दोन्हीं माणसें सुखानें राहूं लागलीं.

## अनुकूल गृहस्थितीची आवश्यकता.

कौटुंबिक स्थिति बिघडली कीं तिचा अनिष्ट परिणाम साहजिकच त्या कुटुंबांतील व्यक्तींवर होतो. मूल बरें वाईट निपजणें बहुतांशीं आईबापावर अवलंबून असतें. याचा अर्थ असा कीं, मुलाची सर्व तऱ्हेनें सुधारणा होण्यास आई व बाप या उभयतांच्या साहाय्याची आवश्यकता असते. कांहीं दिवसांपूर्वीं मुंबईतील एका मोठ्या रस्त्यावर मालाच्या पेट्यांनीं भरलेला एक खटारा बाजूला उभा होता व त्या पेट्यांच्या ढिगावर ५।६ वर्षांचा एक मुलगा झोपीं गेला होता. झोंपेंत तो मुलगा एकदम दुसऱ्या कुशीवर वळला आणि तो पेट्यांच्या अगदीं कडेवर निजलेला असल्यामुळें तोल जाऊन एकदम रस्त्यावर पडला.रस्ता रहदारीचा असल्यामुळें अनेक लोक त्याचे सभोंवार गोळा झाले व त्याचे डोक्यावर बर्फ वगैरे ठेवून त्याला सावध करण्याचा प्रयत्न करूं लागले. कांहींनीं त्याला उचलून जवळच्या डॉक्टरकडेहि नेलें. पण इतकें झालें तरी गाडीवाल्याचा पत्ता लागेना. अंमळशानें मालाच्या मालकाचा पत्ता शोधण्याकरितां आजूबाजूला फिरत असलेला गाडीवाला आपल्या गाडीपाशीं हा काय प्रकार आहे हें पाहाण्यासाठीं परत आला व मुलाची अत्यवस्थ स्थिति पाहून रडूं लागला. तेव्हां मुलाला आपल्या बरोबर कां फिरवितोस, घरीं कां ठेवीत नाहींस असें लोकांनीं त्याला पुनः पुनः विचारून भंडावून सोडलें. गाडीवाला म्हणाला त्याची आई वारली त्यामुळें त्याला घरीं पाहणारा कोणी नाहीं म्हणून मी

त्याला आपल्याबरोबर फिरवितों. मी घरीं राहीन तर पोट कसें भरणार ? पूर्वीं एक दोन वेळां तो असाच गाडीवरून पडला आणि आतां तर तो जगण्याची आशाच दिसत नाहीं. हें गाडीवाल्याचें उत्तर ऐकून मुलगा बरोबर फिरवितो म्हणून त्याला मूर्ख ठरविणारे प्रेक्षकहि निरुत्तर झाले. आई नसल्यामुळें ही जशी मुलाची आबाळ होते तसेंच बाप नसल्यानेंहि मुलाचें अपरिमित नुकसान होतें. परंतु आईबाप नुसते जिवंत असल्यानेंच मुलांचें संगोपन व शिक्षण उत्तम तऱ्हेनें होतें असें मात्र नाहीं. तर मुलाची सर्वांगीण सुधारणा होण्याला आईबापांचा परस्पराशीं संबंध अत्यंत जिव्हाळ्याचा असावा लागतो. आईबापांचें परस्परावर प्रेम असलें आणि त्या उभयतांचें मुलावर प्रेम असलें तर मुलाच्या वाढीला अत्यंत आवश्यक असणारी अनुकूल परिस्थिति उत्पन्न होते. मुलाच्या सुखाकरितां वाटेल तो स्वार्थत्याग करण्यास तीं मागेंपुढें पाहात नाहींत. परंतु असें कुटुंब असण्याला दोघेंहि सारख्या दर्ज्यांचीं असावीं लागतात. त्यांत विषमता फारशी असून चालत नाहीं. लग्नाला अयोग्य अशा व्यक्तींचे विवाह झाल्यास, दोन व्यक्तींच्या संस्कृतींत महदंतर असल्यास किंवा जुलमानें विवाह घडून आणल्यास कुटुंबांत अंधाधुंदी, बंडाळी आणि जुलूम हा असावयाचाच. याकरितां विवाहाला सर्वतोपरी लायक अशा माणसांच्या लग्नाला शक्य तितके अडथळे कमी करण्याचे पण वयानें अगदीं अल्प अथवा ज्यांच्यावर लग्नाचा जुलूम होत असेल किंवा विवाह झाल्यास कोणता तरी शारीरिक किंवा मानसिक रोग पुढील पिढींत शिरण्याचा संभव असेल तर असे विवाह न होण्याबद्दलचे प्रयत्न झाले पाहिजेत असें सर्व विचारी लोकांचें मत आहे.

आजारी मुलें, खोडकर मुलें, उशिरां येणारीं मुलें, अनियमित येणारीं मुलें व ज्यांची घरीं अगदीं वाईट स्थिति आहे अशीं मुलें यांची व्यक्तिशः चौकशी करून त्यांची सुधारणा करण्याकरितां अमेरिकेंत घरीं भेटणाऱ्या ( visiting ) शिक्षकिणी नेमण्यांत येतात. यांना शिकविण्याचाहि चांगला अनुभव असतो आणि त्या प्रत्येकीच्या ताब्यांत ठराविक मुलें देऊन त्यांपैकीं प्रत्येकाचा मुख्यतः कशानें बिघाड झाला आहे तें पाहून कोणत्या उपायांनीं ते दोष नाहींसे करितां येतील तें पाहाण्याचें व ते उपाय अमलांत आणण्याचें काम दिलेलें असतें. या कामीं ती आपलें स्वतःचें वजन खर्च करिते, पालकांशीं सहकारिता करिते, शारीरिक व मानसिक तपासणी करणाऱ्या डॉक्टरांची वेळोवेळीं सल्ला व प्रत्यक्ष मदतहि घेते, वेगवेगळ्या सामाजिक संस्थांचा उपयोग करून घेते, निरनिराळ्या खेळांचा

व क्रीडांगणांचा फायदा घेते आणि त्या मुलांची जरूर तेथें परिस्थिति बदलते. सारांश, व्यक्तिगत समाजसेवेला अवश्य लागणाऱ्या सर्व साधनांचा उपयोग करून ती त्या मुलांची सुधारणा करिते.

## व्यक्तिगत समाजसेवेपासून विशेष फायदे.

वरील प्रकारच्या शिक्षकिणींच्या ताब्यांत दिलेल्या एका नऊ वर्षांच्या मुलाची तो अत्यंत बुद्धिवान् असून सुद्धां शिक्षणांत फारशी प्रगति होईना असें दिसून आलें. चौकशी अंतीं या बाईला असें आढळून आलें कीं रात्रीं अकरा अकरा वाजेपर्यंत तो वाचीत असतो आणि अगदीं क्वचित् बाहेर जातो, शेजारीं पाजारीं-सुद्धां फारसा जात नाहीं. असें असतां तो अभ्यासांत इतका मागें कां राहावा ? या शिक्षकिणीनें त्याच्या आईच्या मदतीनें त्याला उघड्या हवेंत दररोज खेळावयास लाविलें आणि त्याचा कार्यक्रम अशा रीतीनें तयार केला कीं सायंकाळीं तो शरीरानें अगदीं दमून जावा पण त्याच्या मनाला ताजें तवानें वाटावें आणि तो लवकर झोंपीं जावा. यामुळें त्या मुलांत अल्पावधींत इतका बदल झाला कीं अपेक्षेबाहेर त्याचा अभ्यास होऊं लागला. तो नेहमीं झोंपाळू व आळशी दिसावयाचा तें नाहींसें झालें आणि तो अगदीं उत्साहपूर्ण दिसूं लागला. सदोष मुलांची व्यक्तिगत सुधारणा करूं लागल्यास मुलांत अशा प्रकारचे दोष उत्पन्न होण्याची सर्व साधारण कारणें कोणतीं व तीं नाहींशीं करण्याला कोणते उपाय योजावेत हें कळूं लागतें. असा न्यूयार्क सार्वजनिक शिक्षणसंस्थेचा अनुभव आहे. शिवाय कोणत्याहि परिस्थितीचा इष्ट वा अनिष्ट परिणाम मुलांवरच प्रथम होतो. कारण त्यांची ग्राहकशक्ति मोठ्या माणसांपेक्षां अधिक असते. त्यामुळें एकंदर समाजांत कोणत्या गोष्टींचा कसा परिणाम होत आहे हें अजमावण्याचें व्यक्तिगत समाजसेवा हें एक साधन झालें आहे. प्रत्येक शाळेंतील प्रत्येक मूल कर्तव्यतत्पर होण्याकरितां इतके प्रयत्न करण्यांत आल्यावर सर्व राष्ट्र कर्तृत्ववान् व्हावें यांत आश्चर्य नाहीं. आपल्याला अनेक राष्ट्रें सुधारणेच्या शिखराला पोंचलेलीं दिसतात. पण ती स्थिति प्राप्त करून घेण्याकरितां त्यांची कशी अविश्रांत धडपड चाललेली असते याचा आपल्या मागसलेल्या राष्ट्रांत मागमूसहि लागत नाहीं.

घर, शाळा, कारखाना, हॉस्पिटल, तुरुंग या ठिकाणींच व्यक्तिगत समाजसेवेची आवश्यकता असते व याच ठिकाणीं ती यशस्वी होते, अशांतला भाग नाहीं; तर दुसऱ्या अनेक स्थळीं व अनेक प्रसंगीं तिची जरूरी लागते व राष्ट्राची भवितव्यता ठरविण्यांत तिची मदत होते.

व्यक्तिगत समाजसेवा करणारांचा अनेक व्यक्तींशीं व कुटुंबांशीं संबंध येत असल्यामुळें व त्यांना अगदीं जवळून सूक्ष्म निरीक्षण करण्याची संधि मिळत असल्यामुळें सामाजिक सुधारणा कोणत्या दिशेनें झाली पाहिजे, कोणते सामाजिक कायदे अमलांत आले पाहिजेत, अस्तित्वांत असलेल्या कायद्यांमुळें कोणते अन्याय होत आहेत व कोणत्या प्रकारें त्यांची सुधारणा झाली पाहिजे, हें ते स्वानुभवानें सांगूं शकतात व त्याच्या पुष्टयर्थ भरपूर पुरावाहि त्यांच्यापाशीं तयार असतो. जनतेच्या सामाजिक परिस्थितीचें निरीक्षण करण्याची अशी संधि दुसऱ्या कोणालाहि मिळत नाहीं. व्यक्तिगत समाजसेवा करितांना ज्या ज्या गोष्टी घडतात त्यांची क्रमशः नोंद ठेवण्यांत येते. त्यामुळें त्यांत ज्या व्यक्तीचा संबंध येतो तिचा पुढील कार्यक्रम ठरविण्यास त्या माहितीचा उपयोग होतोच, पण त्याशिवाय दुसऱ्या समाजसेवकांना शिक्षण देण्याच्या कामीं व दुसऱ्या अनेक तऱ्हेनें तिचा उपयोग होतो.

व्यक्तिगत समाजसेवा झाली तरी ती एकंदर समाजसेवेचें एक अंग आहे आणि म्हणून एकंदर समाजसेवेचें महत्व केव्हां झालें तरी तिच्या एका भागापेक्षां अधिकच असणार. एकंदर समाजसवेचें ध्येय व्यक्तिगत गुणांची वाढ करणें हेंच आहे, पण तिच्या प्रत्येक भागाचें कार्य क्षेत्र निराळें असतें. व्यक्ति आणि तिची सामाजिक परिस्थिति यांचा मेळ घालण्याचें काम व्यक्तिगत समाजसेवेचें असतें. सामुदायिक समाजसेवेचे प्रयत्न व्यक्तिसमूहाची सुधारणा करण्याकरितां चाललेले असतात. ते एकेकट्या व्यक्तीसाठीं नसतात. एकंदर समाजाची सुधारणा करण्याकरितां सामाजिक कायदे व अन्य तऱ्हेनें चळवळ करण्यांत येते आणि सामाजिक शोधा ( social research ) मुळें समाजाच्या स्थितीचें संशोधन होऊन अश्रुतपूर्व माहिती उपलब्ध होते आणि तिचा एकंदर समाजावर काय परिणाम झाला व पुढें काय होईल हें दाखविण्यांत येतें. हें संशोधन समाजसेवेच्या दुसऱ्या अंगांना अत्यंत आवश्यक असतें. व्यक्तिगत समाजसेवा करणाराला या सर्व प्रकारच्या समाजसेवेच्या कामाची थोडी फार माहिती असावी लागते. जितकी अधिक माहिती असेल तितकी चांगलीच. आपलें विवक्षित कार्य सुद्धां त्याला अशा रीतीनें करावें लागतें कीं, त्या योगें त्याचें स्वतःचें कार्यहि होईल व वर निर्दिष्ट केलेल्या इतर प्रकारच्या समाजसेवकांनाहि त्याची मदत होईल आणि

अशा रीतीनें समाजसेवेचें एकंदर कार्य सुकर होईल. कारण एकंदर समाजसेवेपासून व्यक्तिगत समाजसेवा जर अलग केली तर तें कार्य अगदींच अपुरें दिसेल. परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं, हे समाजसेवेचे प्रकार परस्परापासून वेगळे करितांच येत नाहींत; ते परस्परावलंबी आहेत. एक प्रकार दुसऱ्याला पूरक आहे आणि प्रत्येक प्रकारच्या कामाची वाढ होईल तेव्हांच एकंदर समाजसेवेचें कार्यक्षेत्र वाढेल व सर्व समाज कार्यक्षम होईल.

पहिलें हॉस्पिटल निराश्रित आजाऱ्यांकरितां निघालें व पहिली सेव्हिंगस् बँक परावलंबी लोकांकरितां निघाली, तद्वत् परावलंबी झालेल्या माणसांची सुधारणा करण्याकरितां व्यक्तिगत समाजसेवा अस्तित्वांत आली. आणि आतां तिची जरूरी कोणत्या ना कोणत्या रूपानें कोर्टांत, तुरुंगांत, शाळांत, हॉस्पिटलांत, कारखान्यांत आणि दुसऱ्या शेंकडों ठिकाणीं भासत आहे. व्यक्तिगत समाजसेवेचें हें क्षेत्र असेंच सारखें वाढत जाणार यांत मुळींच शंका नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ना.
ता.

## प्रकरण ८ वें.

# कामगारवर्ग आणि समाजसेवा.

A trade is not worth a farthing if it must be held at the cost of underpaid labour.

Henry Ford.

माणसाची सर्वांत महत्वाची जर कोणती संपत्ति असेल तर ती त्याचें जीवित ही होय. त्याचा जीव हीच त्याची मुख्य संपत्ति, म्हणून प्रथम जीव जगण्याकरितां तो नाना तऱ्हेनें धडपड करितो आणि जीवापलीकडे दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीची त्याला पर्वा वाटत नाहीं. आणि जीव जगण्याचीं साधनें प्राप्त झाल्यानंतर तो दुसऱ्या संपत्तीकडे हळुहळू लक्ष्य देऊं लागतो. माणसाला या जिंदगीचें संरक्षण करण्याला—सुखानें जगण्याला—शुद्ध हवा, राहाण्याला भरपूर आणि हवाशीर घरें, खावयाला पथ्यकर आणि पोटभर अन्न, ऋतुमाना-प्रमाणें अंगभर कपडे, करमणुकीचीं भरपूर साधनें एवढ्या गोष्टींची किमानपक्षीं जरूरी असते. म्हणून या गोष्टींवर त्याचा जन्मसिद्ध हक्क आहे असें ह्मणाव-यास हरकत नाहीं. दिवसभर भरपूर श्रम केल्यानंतर जीविताचें संरक्षण कर-ण्याला आवश्यक असलेल्या वरील गोष्टी जर त्याला प्राप्त झाल्या नाहींत, तर त्याची कर्तृत्वशक्ति हळुहळू नाहींशी होऊं लागते आणि तो अधोगतीच्या मार्गाला लागतो. म्हणून त्याच्या श्रमानें जी संपत्ति उत्पन्न होईल तींतून त्याची कर्तृत्वशक्ति कायम राहाण्याकरितां जरूर असलेला भाग—त्याचा स्वाभाविक हक्क असलेला भाग—प्रथम त्याला मिळाला पाहिजे हें निर्विवाद आहे. परंतु तत्वतः हें खरें असलें तरी त्याची अंमलबजावणी अद्यापि चांगल्या रीतीनें होऊं लागली नाहीं आणि कामगारवर्ग पूर्णपणें संघटित झाल्याशिवाय ती होऊं शकेल हेंहि शक्य नाहीं. पण या तत्वाचा प्रसार दिवसेंदिवस अधि-काधिक होत आहे यांत मात्र संशय नाहीं. आणि ज्या गोष्टींवर ज्यांचा न्याय-सिद्ध हक्क आहे त्यांना त्या मिळूं न देणें, त्यांना त्या मिळण्याच्या आड येणें हा जर अन्याय आहे तर आपला न्याय्य वांटा घेऊन शिवाय दुसऱ्यांचे न्याय्य वांटे त्यांना मिळूं न देतां तेहि आपण बळकावणें, आपल्याला ती संपत्ति पुरून उरत असली तरी तिचा लोभ न सुटणें हें न्यायाचें कसें होईल ? दुसऱ्याच्या

मिळकतीवर अशा रीतीनें श्रीमंत होणें म्हणजे काम न करण्याबद्दल तो एक प्रकारचा लांचच घेणें होय असें म्हणावयास हरकत नाहीं. श्रम करणाराला त्याचा योग्य मोबदला मिळूं लागला कीं ज्याप्रमाणें श्रम करणारांची संख्या वाढूं लागते त्याचप्रमाणें श्रम केल्यावांचून पैसा मिळूं लागल्यास आळशी लोकांची संख्या वाढूं लागते, निरुद्योगी माणसांना आळसांत राहातां येतें, आळशी होण्याचा त्यांना मोह पडतो आणि आळशी होण्याकडे त्यांची प्रवृत्ति होते. याचें मुख्य कारण पैशाचा मोबदला म्हणून त्यांना श्रम करावे लागत नाहींत हेंच होय. पण सखेदाश्चर्याची गोष्ट ही कीं, श्रीमंत लोक भिकाऱ्यांना दान देतांना या गोष्टीची त्यांना आठवण देतात; पण स्वतःचा पैसा कोठून आला किंवा येतो याचा ते या दृष्टीनें विचार करीत नाहींत. श्रमाशिवाय पैसा मिळविणें जर वाईट तर तें तत्त्व सर्वांनाच लागू व्हावयास पाहिजे. पण तसें आपल्याला कोठेंहि दिसत नाहीं. संघटित समाजांत प्रत्येक व्यक्तीला भरपूर काम मिळणें व त्याच्या आवश्यक गरजा भागतील इतका तरी त्याच्या कामाबद्दल किमान मोबदला त्याला मिळणें अत्यंत आवश्यक असतें. असें न झाल्यास समाजांत अनेक प्रकारें असंतोष व आपत्ति उत्पन्न होतात व त्या समाजाला निर्बल करण्याला कारणीभूत होतात.

आज कामगारांना अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत जिवापाड श्रम करावे लागतात. इतकेंच नव्हे तर आज त्यांच्या मनुष्यपणाकडेहि दुर्लक्ष करून त्यांना नुसतीं यंत्रें बनविण्याचे प्रयत्न चालू आहेत. तेंच तें काम एकसारखें यंत्रांप्रमाणें करावें लागत असल्यामुळें या यंत्रांच्या सान्निध्यांत राहून दुर्दैवाने या माणसांनाहि या यंत्रांचे गुण लागूं लागले; आणि ज्यांच्यामुळें माणसाला जगावेंसें वाटतें व त्यांच्यांत मनुष्यपणा येतो त्या व्यक्तिविशिष्ट व स्वाभाविक गुणांचा याच्यामुळें लोप होऊं लागला. अशा प्रकारें कामगारवर्गाला एक प्रकारच्या यंत्रसमुदायाचें स्वरूप आलें. यंत्रांमुळें आणि यंत्रांकरितां अस्तित्वांत आलेल्या शहरांतच यांना वास्तव्य करणें अपरिहार्य झालें. त्यामुळें, समाजाचें सुख व स्थैर्य वाढविण्याचे कामीं यांचा उपयोग होण्याऐवजीं समाजाच्या अस्वस्थतेला ते कारणीभूत होऊं लागले.

## समाजसेवकाची राष्ट्रीय दृष्टि.

समाजसेवेची ज्याला यथार्थ कल्पना आलेली आहे त्याला आपल्या समाजाचा भाग्योदय व्हावयाला आपला समाज कोणत्या विवक्षित स्थितींत असा-

वयास पाहिजे याची बरोबर कल्पना आलेली असते आणि इमारत तयार होण्यापूर्वी तिचा मालक ज्याप्रमाणें प्रथम तिचा एक नकाशा तयार करीत असतो आणि त्या नकाशाबरहुकूम आपलें घर तयार होत आहे किंवा नाहीं व होत नसल्यास त्यांत कोठें चूक होत आहे हें तो लक्ष्यपूर्वक पाहतो व एकाद्या जागीं मालमसाला किंवा दगडधोंडा वाईट वापरला असल्यास किंवा मागेंपुढें झाला असल्यास तो काढून त्या ठिकाणीं लगेच दुसरा लावावयास लावितो, तद्वत् हा समाजसेवक आपल्या देशाच्या आदर्शभूत स्थितीचा नकाशा आपल्या मनःचक्षूंपुढें तयार ठेवितो आणि आपल्या कार्याला सहायभूत होईल अशा प्रत्येक चळवळींत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें भाग घेत असतो आणि त्याबरोबरच ज्या चळवळी राष्ट्रहिताला पोषक होण्यासारख्या नसतील त्यांना इष्ट वळण लागण्याचा प्रयत्न करीत असतो. तो कोणत्याहि पक्षाचा, जातीचा, धर्माचा, किंवा पोटसमाजाचा पक्षपाती होत नाहीं. जेथें अन्याय दिसेल तेथें तो नाहींसा करण्याचा प्रयत्न करावा; श्रीमंत किंवा गरीब, सबल किंवा निर्बल, उच्च किंवा नीच, स्पृश्य किंवा अस्पृश्य, अशा प्रकारचे भेदभाव आपल्या मार्गांत येऊन आपली सत्यनिष्ठा ढळण्यास ते सहायभूत होऊं नयेत, अशाबद्दल तो काळजी घेत असतो. परंतु उपरिनिर्दिष्ट यांत्रिक युगामुळें आज समाजांत जी अभूतपूर्व संकटें उत्पन्न झालीं आहेत तीं सारीं नाहींशीं करणें तर राहोच, पण जीर्ण वस्त्राला ठिगळी लावण्याचा प्रयत्न केल्यास तें जसें अधिक फाटत जातें त्याप्रमाणें या वरचेवर नवीन जन्मास येणाऱ्या अरिष्टांचा प्रतिकार करण्याचा जों जों प्रयत्न करावा तों तों त्यांचें संख्याबळ अधिकच वाढत आहे. यांत्रिक युगानें समाजांत संकटपरंपरा उत्पन्न केली, समाजाला अत्यंत हानिकारक असें त्याचें वर्गीकरण केलें, समाजांतील एका वर्गाला इतक्या नीच स्थितीला पोंचविलें कीं त्याचे सर्व न्याय्य हक्क धाब्यावर बसवून त्याला मरणाच्या पंथाला लाविलें; उलटपक्षीं, दुसऱ्या एका वर्गाच्या हातीं अनियंत्रित सत्ता दिली आणि त्याचाहि दुसऱ्या तऱ्हेनें नाश आरंभिला. अशा परिस्थितींत वर निर्दिष्ट केलेल्या समाजसेवकानें सर्व तऱ्हेनें पीडलेल्या व असहाय अशा कामगारवर्गाच्या मदतीला प्रथम धावावें यांत वावगें असें काय आहे ?

हिंदुस्थानांतील कामगारवर्ग संघटित होण्याला नुकतीच कोठें सुरवात झालेली आहे. त्यामुळें त्याविषयीं आज आपल्याला अधिक कांहीं लिहितां

येत नाहीं. तथापि इंग्लंडांतील कामगारवर्गाच्या संघटनेकडे जर आपण पाहिलें तर आपल्याला असें दिसून येईल कीं, समाजसेवेचीं मूलभूत तत्वें तेथील कामगारांनीं स्वतः अमलांत आणून आपली सुधारणा योग्य दिशेनें चालविली आहे आणि या कामीं ते इतके तरबेज झाले आहेत कीं त्यांना आज दुसऱ्या वर्गातील लोकांच्या मदतीची फारशी अवश्यकता लागत नाहीं, इतकेंच नव्हे तर कामगारांना अत्यंत उपयोगी अशा अनेक प्रकारच्या संस्था लोकशाहीच्या तत्त्वांवर चालून लोकशाहीच्या शिक्षणाचा सामान्य कामगारांत इतका प्रसार झाला आहे कीं तितका दुसऱ्या कोणत्याहि वर्गांत—श्रीमंत वर्गांतसुद्धां लोकशाहीच्या तत्वांचा प्रसार झालेला नाहीं. दुसऱ्या वर्गांतील लोक लोकशाहीच्या गोष्टी बोलतात, पण त्यांना तशा प्रकारचें प्रत्यक्ष शिक्षण नाहीं. लोकशाहीच्या तत्वांचा सदोदित पुरस्कार करणाऱ्या कामगारांच्या पुढाऱ्यांच्या हातीं प्रसंगीं राज्यसूत्रें आल्यास त्या कामींहि ते दुसऱ्या कोणत्याहि वर्गापेक्षां कमी कर्तृत्वशाली ठरत नाहींत याची प्रतीति कांहीं दिवस कां होईना पण इंग्लंडचीं राज्यसूत्रें प्रत्यक्ष आपल्या हातीं घेऊन जगाच्या निदर्शनाला त्यांनीं आणिली आहे. कामाचे तास, मजुरीचे दर व दुसऱ्या कांहीं बाबतींत सर्व साधारण कारखानदार दाखवीत असलेल्या अमानुष्य स्वार्थलोलुपतेला पायबंद घालण्याकरितां कामगारवर्गाला निर्वाणीचा प्रसंग म्हणून कधीं कधीं आपल्या शेवटच्या अस्त्राचा—संपाचा उपयोग करावा लागतो आणि राष्ट्रहिताची किंवा जनहिताची कोणत्याहि रीतीनें पर्वा न करितां स्वार्थापायीं अंध झालेल्या मालकवर्गाला समजुतीवर आणण्याचा प्रयत्न करितांना कधीं कधीं सामान्य जनतेलाहि त्रास होतो आणि अशा वेळीं कामगारवर्ग अन्याय करित आहे असेंहि त्यांना वाटण्याचा संभव असतो. परंतु याला कामगारांचा इलाज नसतो. आम्ही सांगूं तो वेळ, देऊं ती मजुरी, आणि करूं तो न्याय, हा मालकवर्गाचा चढेलपणा नाहींसा होईपर्यंत हें असें होणारच. कारण त्यापासून एका कामगारवर्गाचीच नव्हे तर पर्यायानें साऱ्या राष्ट्राची हानि होते. आतां कामगारवर्गाच्या अंगीं इतकी कर्तृत्वशक्ति व शिस्त येण्याला कोणत्या संस्था कारणीभूत झाल्या हें पाहूं. या संस्थांसंबंधी एक गोष्ट विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे ती ही कीं, या संस्था मुख्यत्वेंकरून कामगारांनींच स्थापिल्या, त्यांनींच त्या नांवारूपास आणिल्या आणि आज त्यांचाच त्या संस्थांवर सर्वस्वीं ताबा आहे. यावरून त्यांची आत्मनिष्ठा, आपल्या व्यवसायबंधूंची स्थिति सुधारण्याची प्रबळ इच्छा, समाजसेवेची हौस हीं तर दिसतातच,

पण त्याशिवाय कामगारवर्गांच्या खऱ्या गरजा कोणत्या आहेत याचेंहि बरोबर अनुमान काढतां येतें.

## मित्रमंडळें.

या संस्थांत सर्वांत जुनी संस्था म्हणजे मित्रमंडळें (Friendly Societies) होत. आजाऱ्यांकरितां क्लब व उत्तरक्रियेकरितां मदत देणाऱ्या संस्था यांची वाढ होतां होतां त्यांचें रूपांतर या मित्रमंडळांत झालें. मोठमोठ्या राष्ट्रीय मित्र-मंडळांशिवाय आज लहान लहान मंडळें कैक आहेत. एकंदर लोकवस्तीचा बराच मोठा भाग यांनीं व्यापिला आहे आणि यांच्या सभासदांची संख्या लाखांनीं आहे. समाजसेवेच्या क्षेत्रांत या मित्रमंडळांना फार महत्वाचें स्थान मिळालें आहे. सभासदांत विश्वबंधुत्व उत्पन्न करण्याचें कार्य हीं मंडळें करितात. अठराव्या शतकाच्या शेवटीं आणि एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं इंग्लंडांत जी औद्योगिक क्रांति झाली तिच्यामुळें जुनी समाजव्यवस्था मोडून साफ नाहींशी झाली आणि नवीन परिस्थितीला अनुरूप असे लहान लहान क्लब अस्तित्वांत आले व ते अतिशय लोकप्रिय होऊन त्यांचें कार्यक्षेत्र सारखें वाढत गेलें. इतकें कीं, पुढें त्यांच्या मोठमोठ्या शाखा निघाल्या आणि त्यांचा सर्वत्र प्रसार झाला. या स्थित्यंतरांत लोक आपलीं खेडीं सोडून शहरांत जाऊं लागले होते. लहान लहान खेड्यांचीं मोठमोठीं शहरें होण्यास नुकताच आरंभ झाला होता आणि त्याबरोबरच शेजारधर्माचें नातें तुटल्यामुळें लोकांतला आपलेपणाचा भाव नाहींसा होत होता. मूळच्या गांवीं कैक पिढ्यांचे रहिवासी असल्यामुळें वाण्याउदम्याकडे त्यांची पत असे आणि म्हणून त्यांचेकडून दाणागोटा उधार मिळण्याला त्यांना केव्हांहि अडचण पडत नसे. अडीअडचणीला गांवांतील कोणीहि मनुष्य—प्रसंगीं वैरीसुद्धां—उपयोगीं पडत असे आणि कोणत्याहि वेळीं कस-लीहि अडचण आली तरी ती या शेजारधर्मामुळें निभावून नेण्यास फारसें कठीण पडत नसे. गांव सोडतांच हे सारे स्नेहसंबंध नाहींसे होतात आणि परगांवीं व वेगळ्या परिस्थितींत संकट आल्यास—अशा परिस्थितींत संकटांची संख्या कमी होण्याऐवजीं नेहमीं वाढतच असते—त्यांतून निभावणें माणसाच्या शक्तीच्या बाहेरचें होतें. अशा वेळीं मित्रमंडळांची किंवा कामगारसंघांची मदत म्हणजे खरोखरीच आकाशांतून पडल्याप्रमाणें असते. पूर्वपरंपरा तुटल्यामुळें मनुष्य अगदीं निराधार झालेला असतो; परंतु या नवीन ठिकाणीं त्याला आवश्यक असलेलें मित्रमंडळ व प्रसंगीं उपयोगीं पडणारे शेजारी या मित्रमंडळामुळें मिळतात.

हें मित्रमंडळ म्हणजे खरोखरीच मित्रांचा पुरवठा करणारी संस्था असते आणि हे सारे लोक सामान्यतः सारख्याच परिस्थितींतले असल्यामुळें हा स्नेहसंबंध चिरस्थायी होतो. हीं मित्रमंडळें म्हणजे जरा मोठ्या प्रमाणांत कुटुंबेंच असतात. याशिवाय या संस्थांपासून दुसरा प्रत्यक्ष फायदा हा असतो कीं, विमा कंपन्यांच्या तत्वाप्रमाणें दर आठवड्याला थोडे पैसे ठेवून आयुष्याच्या विम्याप्रमाणें आकस्मिक येणाऱ्या पैशाच्या अडचणींचा विमा या मंडळांत उतरतां येतो. म्हणजे हे पैसे नियमित देत गेल्यानंतर घरांतील एकादें मनुष्य मृत्यु पावल्यास त्याच्या उत्तरक्रियेकरितां, अथवा आजारीपणाकरितां किंवा अशाच प्रकारें अनपेक्षित रीतीनें येणाऱ्या खर्चाकरितां या संस्थेंतून पैसे मिळतात आणि ते धर्मार्थ किंवा उसने म्हणून मिळत नाहींत तर आपले स्वतःचे—आपल्या हक्काचे म्हणून मिळतात. अगदीं अल्पमजुरी मिळविणाऱ्या कामगाराला एकदम दत्त म्हणून उभ्या राहाणाऱ्या मोठ्या खर्चाकरितां आगाऊ पैसे साठवून ठेवणें शक्य नसतें. त्याच्या ओढगस्त स्थितीमुळें त्याची अशी स्थिति असणें अपरिहार्य असतें. परंतु आठवड्याची मजुरी हातीं पडतांच तींतून भावी संकटाची तरतूद करण्याकरितां लहानशी रक्कम अशा संस्थेकडे भरणें फारसें कठीण जात नाहीं. आणि दर आठवड्याला लक्षावधि लोकांकडून अशा रकमा नियमितपणें येत असल्यामुळें अडचणींत पडलेल्या थोड्या लोकांना सांपत्तिक मदत देणें संस्थेलाहि फारसें जड जात नाहीं. अशा संस्था सुरळीत चालण्यास व लोकप्रिय होण्यास आस्थेवाईक, स्थिर बुद्धीचीं व संस्थेच्या सभासदांच्या विश्वासास पात्र अशीं चालक माणसें असावीं लागतात. इंग्लंडांतील कामगार-वर्गाच्या सुदैवानें अशा स्वार्थत्यागी पण विश्वासू माणसांची त्यांना वाण पडत नाहीं. हीं माणसें या आपल्या संस्था उत्तम रीतीनें चालवितात यांत कांहीं आश्चर्य नाहीं; पण याच नमुन्यावर सरकारद्वारें विमा उतरण्याचा कायदा ( National Health Insurance Act ) सरकारनें जेव्हां पास केला, तेव्हां तो यशस्वी करण्याला कामगारांचेंच सरकारला मुख्यतः साहाय्य झालें. यावरून या संस्थांकडून इंग्लंडांत आज समाजसेवेचें केवढें कार्य होत आहे याची कल्पना येईल. शिवाय अशा प्रकारच्या संस्था चालविल्यानें, त्यांच्या कमिट्यांत व पोटकमिट्यांत कामें केल्यानें, त्यांच्या कार्यकारी मंडळांचे सभासद झाल्यानें लोकशाहीच्या तत्वावर संस्था चालविण्याची माहिती होते ती वेगळीच. हा लाखो रुपयांचा द्रव्यनिधि अगदीं सामान्य कामगार स्त्रीपुरुषांच्या

हातीं देण्यांत यावा; त्याची त्यांनीं बिनबोभाट, यथानियम विल्हेवाट लावावी; यावरून कामगारांची कार्यक्षमता निःसंशय दिसून येते. पण याशिवाय एवढ्या-तेवढ्याकरितां दुसऱ्यावर—दुसऱ्या वर्गांतील लोकांवर—अवलंबून न राहतां आपला कारभार आपण स्वतःच पाहावयाचा हें त्यांच्या आत्मविश्वासाचें व जनतेच्या त्यांच्यावरील विश्वासाचें खचित द्योतक होय.

या मित्रमंडळांशिवाय कामगारांच्या हिताकरितां याच नमुन्यावर निघालेल्या दुसऱ्या अनेक संस्था आहेत. सेव्हिंग्स क्लब आहेत, त्यांत सभासद लहान-लहान रकमांची ठेव ठेवितात आणि जरूर पडेल तेव्हां त्या क्लबांतून कर्जाऊ रकम घेतात. त्यामुळें इकडील पठाणांप्रमाणें शिलिंगाला महिना एक ते चार पेन्सपर्यंत व्याज घेणाऱ्या सावकारांच्या धंद्याला चांगलाच शह बसला आहे. सावकार इतकें जबर व्याज घेतात त्याचें एक कारण असें असतें कीं, त्यांच्या पैशाला तारण म्हणून त्यांना कांहीं मिळत नाहीं. पुष्कळ कामगार पुरुष व स्त्रिया यांच्यापाशीं त्यांच्या वैयक्तिक पतीपलीकडे सावकाराला तारण म्हणून देण्यासारखें कांहीं नसतें. आणि त्यांच्याशीं पुष्कळ दिवसांची ओळख असल्या-शिवाय त्यांच्यावर कोणीहि भरंवसा ठेवण्यास तयार होत नाहीं. म्हणून अशा कामगारांना अडचणीच्या वेळीं वरील क्लबांचा कल्पनातीत उपयोग होतो. कारण पाहाणाराला ह्या रकमा अगदीं अल्प दिसतात; तथापि त्या लोकांच्या ऐपतीच्या मानानें फार मोठ्या असतात. कैक कामगार केवळ या क्लबांचे सभासद असल्यामुळेंच त्यांची अगदीं आणीबाणीच्या प्रसंगीं अब्रु वांचते. कांहीं दुसऱ्या प्रकारचे क्लब आहेत ते लहान लहान रकमा गोळा करितात आणि विशेष प्रसंगीं किंवा सणावाराला पुनः त्या रकमा परत वाटून देतात. त्यामुळें हे प्रसंग कामगारांना विशेष आनंदानें साजरे करितां येतात. उपरिनिर्दिष्ट मित्रमंडळांचा कामगारांत आत्म-विश्वास उत्पन्न करण्याच्या व काटकसरीची सवय लावण्याच्या कामीं फार चांगला उपयोग होतो. या संस्थांसंबंधीं विशेष गोष्ट ही आहे कीं, त्यांच्या खजिनदारांच्या हातीं पैशाच्या मोठमोठ्या रकमा असूनसुद्धां त्यांनीं पैशाची अफरातफर केल्याचें उदाहरण अगदीं विरळ घडतें. त्याचप्रमाणें सभासदांना कर्जाऊ दिलेल्या रकमांची परत फेड झाली नाहीं असेंहि अगदीं क्वचित् होतें.

**मजूरसंघ.**

आपल्या स्वतःच्या सुधारणेबरोबरच राजकारणांत व राज्यकारभार चाल-विण्यांत कामगार वाकबगार व्हावेत म्हणून कामगारवर्गानें ज्या संस्था चाल-

विल्या त्यांत मजूरसंघांची चळवळ मुख्य होय. लोकशाहीच्या तत्वाप्रमाणें राज्यकारभार चालविण्याचें प्रत्यक्ष शिक्षण जें शाळेंत किंवा विश्वविद्यालयांतहि मिळणें शक्य नसतें तें या चळवळीमुळेंच कामगारांच्या आवाक्यांत आलें आहे.

सुदैवानें म्हणा वा दुर्दैवानें म्हणा आपल्याकडे सार्वजनिक बाबतींत जर कोणती अत्यंत सोपी गोष्ट असेल तर ती पुढारी होणें ही होय. आणि त्यांतल्या त्यांत कामगारांचा पुढारी होणें हें तर इतकें सोपें असतें कीं सांगण्याची सोय नाहीं. ज्यांना मुंबईतील कामगारवस्तीची थोडीबहुत माहिती आहे त्यांना हें ठाऊकच असेल कीं, संपासारख्या प्रसंगीं अशा उपटसुंभ पुढाऱ्याचें तेथें नुसतें पीक येतें. इतर बाबतींत पुढारी होण्याला निदान कांहीं दिवस तरी उमेद्वारी करावी लागत असेल, पण हा आमचा कामगारांचा पुढारी त्या पदवीला एका घटकेंत चढूं शकतो. कारण पुढारीपण मिळविण्याला उमेद्वाराच्या अंगीं एकच गुण असावा लागतो; तो हा कीं, त्या घटकेला लोकांना रुचेल तें बोलणें. मग तें राष्ट्राच्या किंवा लोकांच्या हिताचें असो वा नसो आणि हा औट घटकेचा पुढारी कामगारांना न आवडेल असें बोलेल हें शक्यच नसतें. कारण तो तसें बोलूं लागल्यास त्याचें पुढारीपण त्या घटकेलाच संपुष्टांत आलें म्हणून समजावें. आणि उत्पत्ति जितकी अधिक तितका तिचा संहाराहि लवकर या प्राणिशास्त्राच्या नियमाप्रमाणें हे पुढारीहि अल्पकाळांतच दृष्टीआड होतात हें सांगावयास नकोच. पण इंग्लडांत कामगारांचा पुढारी होणें हें इतकें सोपें नसतें. त्याला प्रथम कोणत्या तरी मजूरसंघाच्या शाखेंत उमेद्वारी करावी लागते. नंतर जिल्हा–शाखेंत काम करावें लागतें आणि त्यानंतर त्याचा मुख्य कचेरींत प्रवेश होतो. आणि ही उमेद्वारी करितांना आत्मविश्वासाची महती त्याला कळते, जबाबदारी म्हणजे काय चीज आहे याचे धडे त्याला मिळतात आणि ही जबाबदारी पत्करली कीं प्रसंगीं कामगारांना अंतीं हितकारक होणाऱ्या पण त्या घटकेला अप्रिय वाटणाऱ्या अशा गोष्टीहि सांगाव्या लागतात हेंहि तो शिकतो. एखाद्या मजूरसंघाचा पुढारी होणें ही फार मानाची गोष्ट असते हें खरें, पण तितकीच ती जबाबदारीची जागा असते. तें एक प्रकारचें दिव्यच असतें. कारण जनतेचें व कदाचित् सर्व राष्ट्राचें नुकसान होईल व कामगारांनाहि हाल अपेष्टा सोसाव्या लागतील, अशा वेळीं कामगारांना संप करा म्हणून सांगणें किती जबाबदारीचें असतें हें सांगावयास नकोच. कामगारांच्या माताधिक्यामुळेंच तो या पदवीला

चढलेला असतो म्हणून कामगारांना मार्गदर्शक होण्याच्या बाबतींत आपण नालायक ठरलों तर आपलें पुढारीपण तेव्हांच काढून घेण्यांत येईल याची त्याला पूर्ण जाणीव असावी लागते. कारण अशा गुंतागुंतीच्या प्रश्नांसंबंधीं योग्य धोरण ठेवणें व आणीबाणीच्या प्रसंगीं तात्कालिक निकाल देणें याच्यावरच वरच्या दर्ज्यांचा पुढारीपणा अवलंबून असतो. याला एकंदर परिस्थितीचें पर्ण ज्ञान, आत्मविश्वास व लोकहितबुद्धि हींच मुख्यत्वें लागतात.

संघाच्या पैशाची अफरातफर केल्याचीं उदाहरणें तिकडे अगदीं क्वचित्‌च घडतात आणि संघाचा अधिकारी असून सरकारला किंवा कारखानदारांना संघाच्या बातम्या आंतून पोंचविणारा समाजद्रोही कामगार तिकडे नाहींच म्हटला तरी चालेल. संघाच्या अधिकाऱ्याला सामान्यपणें काम फार असतें, पगारहि अगदीं बेताबाताचाच मिळतो आणि त्या मानानें जबाबदारी फार असते. पण संप झाला कीं, त्याची धांदल कांहीं विचारावयास नको. दिवसेंदिवस राजसत्ता कांहीं ठराविक लोकांच्या हातांत न राहातां ती सर्व साधारण जनतेच्या हातीं जात आहे. करितां सामान्य लोकांचे पुढारी ही जबाबदारी घेण्यास तयार झाले पाहिजेत. सुदैवानें कामगारसंघांचा या कामीं चांगलाच उपयोग होत आहे. या चळवळीच्या अंगीं कामगार लोकांना एकत्र करण्याची शक्ति आहे आणि ते एकत्र झाल्यावर त्यांना आपल्या कारखान्याच्या प्रश्नांबरोबरच इतर राजकीय प्रश्नांसंबंधींहि वाटाघाट करावीशी वाटते, आपलें राजकीय धोरण ठरवावें लागतें आणि बऱ्या वाईट गोष्टींची शहानिशा करावी लागते. आधुनिक समाजांत अशा प्रकारें मत तयार करणें व त्या मताचा जय होण्यासाठीं खटपट करणें हें लोकशिक्षणाच्या दृष्टीनें फार महत्वाचें समजलें जातें. एक काळ असा होता कीं, गरिबांचें हिताहित पाहाण्याचा मक्ता आपणच घेतला आहे असें वरिष्ठ वर्गांतील लोकांना वाटे व त्यामुळें गरिबांचा संबंध असलेल्या कोणत्याहि कायद्यावर त्यांचें मत मिळविण्याची खटपट न करितां आपल्याच मतानें वर निर्दिष्ट केलेले लोक तो पास करित; परंतु तो मनु आतां साफ बदलला आहे. आतां कामगारवर्ग आपल्या संबंधींचा कोणताहि प्रश्न आला तरी त्याचा विचार करितांना आपले पुढारी त्यांत असावेत अशी मागणी करितो आणि इतकें करून तो थांबत नाहीं तर कामगारांची बाजू उत्तम रीतीनें मांडली जाईल याबद्दल तो हरतऱ्हेनें प्रयत्न करितो. कामगारांच्या वतीनें अशा प्रकारची मागणी करणें, कोणत्याहि प्रश्नासंबंधीं

कामगारांचें मत तयार करणें, आणि आपली बाजू योग्य रीतीनें मांडतील अशीं माणसें वेगवेगळ्या ठिकाणीं पाठविणें ह्या गोष्टी संघांच्या वतीनें करण्यांत येतात. कामाचे तास व मजुरीचा दर यांची कमाल व किमान मर्यादा किती असावी हें ठरविण्याचा प्रयत्न हे संघ अगदीं आरंभापासून करीत आहेत. कारण प्रत्येक कामगाराला हा प्रश्न अगदीं जिव्हाळ्याचा असा वाटत असतो. आणि या प्रयत्नांना यशहि कल्पनातीत आलेलें आहे. परवांपर्यंत या चळवळीला दुसऱ्या वर्गांची सहानुभूति मिळत नव्हती ती आतां मिळूं लागली आहे, इतकेंच नव्हे तर या बाबतींत सरकारच आतां पुढाकार घेऊं लागलें आहे. शिवाय हा प्रश्न आतां एका राष्ट्रापुरताच आहे असें नाहीं, तर तो आतां सर्व-राष्ट्रीय झाला आहे. प्रत्येक सुधारलेल्या राष्ट्राला अशा प्रकारें कामगारांचें संरक्षण करणारे कायदे आवश्यक वाटूं लागले आहेत व त्यामुळें वाटेल तितकी कमी मजुरी देऊन वाटेल तितके तास कामगारांना राबवून घेणें कारखानदारांना दिवसेंदिवस अशक्य होऊं लागलें आहे.

अजून पुष्कळ लोकांची अशी समजूत आहे कीं, हे संघ कामगारांनीं संप करावे, शक्य तितकें कमी काम करावें आणि शक्य तितकी अधिक मजुरी मागावी, याकरितां चळवळ्या लोकांनीं चालविलेले आहेत; पण हा नुसता भ्रम आहे. कामगार संपाला हपापलेले असतात असें ह्मणणें म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास करणें होय. अगदीं निरुपाय झाला, बाकीचे सर्व उपाय हरले कीं शेवटीं केवळ निर्वाणीचा प्रसंग म्हणून कामगार संप करितात. कारण संपांतील दिवसांच्या पगाराला त्यांना सामान्यतः मुकावें लागतें. कामगारसंघ आणि त्याचे पगारी अधिकारी आज जर नसले तर हीं औद्योगिक भांडणें कोणच्या थराला जाती व त्यांची शेवटीं काय स्थिति झाली असती हें निदान आपल्या-कडील लोकांना तरी आज सांगण्याची आवश्यकता नाहीं. कारण असे प्रकार वेळोवेळीं आपल्याकडे होतच आहेत. कामगार आणि कारखानदार यांच्या-मधील मतभेद शक्य तितका नाहींसा करावा, शक्य तेथें सलोख्यानें मिळतें घ्यावें आणि कारखानदार व कामगार यांच्यामध्यें जे करारमदार झाले असतील त्यांची अंमलबजावणी पूर्णपणें होत आहे किंवा नाहीं हें पाहावें हें संघाच्या अधिका-ऱ्यांचें मुख्यतः काम असतें. कामगारांची मजुरी ठरवितांना विशेषतः मालाच्या पैदाशीवर मजुरी ठरवितांना—त्यांत अनेक गोष्टींचा संबंध येतो—त्याला कारखा-न्यांच्या यांत्रिक गुंतागुंतीची पूर्ण माहिती असावी लागते. अशा प्रकारच्या वैयक्तिक

तक्रारी हे अधिकारी परस्परांच्या विचारानें अल्पावकाशांत मिटवूं शकतात. कामगारांच्या हिताकरितां व सुरक्षितपणाकरितां कारखान्यांत मोकळी हवा व जागा किती असावी, यंत्रें कशीं असावीं, अपघात कमी होण्याकरितां कोणती व्यवस्था करावी, अपघात झाल्यास त्याची भरपाई म्हणून कामगारांना काय मिळावें, पगार किती दिवसांनीं व कोणत्या पद्धतीनें मिळावा वगैरे बाबींसंबंधीं सरकारनें कांहीं कायदे केलेले असतात. त्यांची अंमलबजावणी योग्य रीतीनें होते किंवा नाहीं हें पाहणें नुसत्या सरकारी अधिकाऱ्यांकडून होत नाहीं. त्याला कामगारांचेंहि सहकार्य असावें लागतें. या कामीं या संघाच्या अधिकाऱ्यांचा फार चांगला उपयोग होतो. शिवाय कामगारांच्या—कामगारांकरितां व कामगारांनींच चालविलेल्या—या लहानशा राज्याच्या अस्तित्वामुळें कामगारांची सत्ता समाजांत अधिकाधिक प्रस्थापित होऊं लागली आहे. कामगार-संघांची ही चळवळ अशा रीतीनें समाजाच्या स्थैर्याला अत्यंत आवश्यक झाली आहे आणि या चळवळीचें टीकात्मक स्वरूप जाऊन तिला विधायक स्वरूप जों जों अधिकाधिक प्राप्त होत जाईल तों तों तिचें महत्व अधिकाधिक वाढत जाईल हें सांगावयास नकोच. आजपर्यंत आणि अझूनसुद्धां कारखाने म्हणजे आपली खाजगी मालमत्ता आहे, तिच्यावर समाजाचा किंवा सरकारचा कोणच्याही प्रकारें हक्क नाहीं व आपण कसेंहि वागलों, कामगारांना कसेंहि वागविलें, कारखाना वाटेल तशा रीतीनें चालविला, एकंदरींत वाटेल तो सावळा गोंधळ घातला तरी त्याबद्दल आपल्याला बोलण्याचा कोणालाहि अधिकार नाहीं, अशी कारखानदारांची समजूत आहे. परंतु कामगारांची चळवळ जों जों बळावत चालली आहे तों तों कारखानदारांची दृष्टि निवळत चालली आहे. वस्तुतः निरुपायास्तव तसें करणें त्यांना भागच पडत आहे आणि सरकारलाहि कामगारांच्या न्याय्य मागण्यांची सत्यता पटूं लागली आहे. सारांश, नाखुषीनें कां होईना पण कारखानदारांना कामगारांच्या संघशक्तीच्या पुढें आपलें पाऊल थोडथोडें मागें घ्यावें लागत आहे आणि त्यांच्या एकछत्री राज्याला ग्रहण लागूं लागलें आहे. कारखाने अव्यवस्थितपणानें चालवून किंवा पैसे खाण्याच्या आडवाटा मोकळ्या ठेवून, अधिक मजुरी द्यावयास आम्हाला आतां परवडत नाहीं, असें जर कारखानदार सांगूं लागले तर ती बालिश सबब आज कामगार तर ऐकून घेणार नाहींतच पण सामान्य जनता व सरकार यांनाहि ती पटणार नाहीं. लोकमतांत अशा रीतीनें क्रांति घडून येण्यास कामगारांचीच चळवळ सर्वस्वीं कारणीभूत झाली हें कोणालाहि कबूल करावें लागेल. कार-

खान्यांत यंत्रसामुग्री नवीन पद्धतीची असली, कारखान्यांत सर्व प्रकारें व्यवस्था असली, तयार झालेल्या मालाला वाहतुकीचीं साधनें चांगलीं मिळून तो कसोशीनें विकला जात असला, पैसे खाण्याचे वाम मार्ग कोठेंहि नसले, कारखान्यांत जरूरीपेक्षां जास्त भांडवल गुंतविलेलें नसलें आणि इतकें करूनहि कारखाने तोट्यांत चालू लागले तर कामगारहि कमी पगार घेण्यास खचित तयार होतील. पण इतक्या गोष्टी झाल्यावर कारखाना तोट्यांत चालेल हें स्वप्नांतसुद्धां आणूं नका आणि तो खरोखरीच जर तोट्यांत चालत असेल तर तो चालविणें इष्ट नाहीं, असें अमेरिकेंतील हेन्री फोर्ड या जगत्प्रसिद्ध मोटरच्या कारखान्यांच्या मालकाचें मत आहे. आणि तें साधार आहे. कामगारांची या मार्गानें ही नवीनच चळवळ आहे. परंतु त्यांत सत्यांश फार मोठा असल्यामुळें या कामीं त्यांना सर्वांचें अर्थात्च कारखानदार व त्यांच्यावर अवलंबून असलेले दुसरे लोक याव्यतिरिक्त सर्वांचें साहाय्य मिळत आहे. कारण कारखाने वैयक्तिक फायद्यापेक्षां समाजाच्या हिताकरितां, समाजसेवेच्या दृष्टीनें चालवावयाचे असतात, या मताचा प्रसार दिवसेंदिवस अधिक होत आहे.

कामगारांच्या चळवळींत अनेक प्रकारच्या लोकांचा समावेश झालेला असल्यामुळें त्यांपैकीं कांहींची दृष्टि तात्पुरत्या फायद्यापलीकडे जाऊं नये हें साहजिक आहे. आणि त्यांतील क्वचित् थोड्या लोकांना संपासारख्या धामधुमीची हौस असते हेंहि खरें. कित्येकदां त्यांच्या मागण्या स्वार्थी किंवा अयोग्यहि असतात. तथापि या सर्व चळवळींचें एक ध्येय ठरलेलें असतें आणि त्यांतील विचारी लोक त्या ध्येयसिद्धीकरितां सनदशीर मार्गानीं प्रयत्न करित असतात, यांत मुळींच संशय नाहीं.

## सहकारी चळवळ.

कामगारसंघांची चळवळ ज्याप्रमाणें समाजाला लागणाऱ्या वस्तूंची पैदास करणाऱ्या नागरिकांनीं आपली राहाणी अधिक वाईट होऊं नये व सर्व दिवसभर श्रम केल्यानंतर भर दिवसाचा योग्य मुशाहिरा मिळावा म्हणून चालविलेली असते त्याचप्रमाणें सहकारी चळवळहि चांगला माल मिळावा, चांगल्या परिस्थितींत तो तयार केला जावा व माफक दरानें मिळावा म्हणून गिऱ्हाईकांनींच चालविलेली असते. मालाचा नाश होऊं नये, त्यांत कोणच्याहि प्रकारची भेसळ होऊं नये आणि संघशक्ति, सचोटी आणि व्यापारी स्वातंत्र्य यांच्या अभावीं असंतोष उत्पन्न होतो तो होऊं नये म्हणून कांहीं प्रामाणिक लोकांनीं

आपली सांपत्तिक स्थिति सुधारावी व सांपात्तिक स्वातंत्र्य मिळावें म्हणून संघशक्तीच्या जोरावर हा प्रयत्न—ही चळवळ सुरू केली. यांतहि मालाची पैदास करणाऱ्या लोकांचे कांहीं संघ आहेत, परंतु तो या चळवळीचाच एक भाग आहे. मालाचा पुरवठा करितांना शक्य तितके मध्यस्थ नाहींसे करावयाचे हें या चळवळीचें मुख्य ध्येय आहे. या जगाचा सर्व व्यवहार अदलाबदलीवर चाललेला असतो आणि अदलाबदलीला मुख्यतः पतीची जरूरी असते. करितां मालाची पैदास करणारा व तिचा उपभोग घेणारा या उभयतांची पत वाढवून त्यांचे संबंध दृढतर करणें हाहि या चळवळीचा एक मुख्य उद्देश आहे.

या चळवळीचे उत्पादक रॉबर्ट ओवेन यांचें या चळवळीच्या बाबतींत काय ध्येय होतें, ह्या चळवळीनें मूळ धरण्याच्या पूर्वी यासंबंधीं कसकसे प्रयत्न झाले, रॉकडेल येथील मूठभर कोष्ट्यांनीं ही चळवळ प्रथम कशी सुरू केली, माल जितका विकत घेईल त्या प्रमाणांत गिऱ्हाईकाला फायदा वांटून देण्याची युक्ति काढिल्यामुळें सभासदांनीं दुकानाशीं कसें इमान राखलें, ही चळवळ अल्प प्रमाणांत सुरू होऊन व्यापारी दृष्ट्या यशस्वी झाल्यामुळें तिचें पाऊल कसें जोरानें पुढें पडत गेलें व तिला आजची स्थिति कशी आली; हजारों सभासद, भव्य इमारती, मोठमोठे कारखाने, शिलाई खातीं, कोळशाच्या वखारी वगैरे गोष्टींचा इतिहास येथें देण्याची अवश्यकता नाहीं. इतकें सांगितलें म्हणजे पुरे कीं, या चळवळीचा प्रसार एका इंग्लंड देशांतच झाला आहे किंवा विशेषतः पतपेढ्यांच्या रूपानें हिंदुस्थानांतच झाला आहे असें नाहीं, तर जगांतील सर्व लहान मोठ्या देशांत तेथील परिस्थित्यनुरूप थोड्या फार प्रमाणांत झालेला आहे. कांहीं देशांत कांहीं विशिष्ट बाबतींतच तिचा प्रसार फार झाला आहे. इंग्लंडांतील सहकारी तत्वावर घाऊक विक्री करणाऱ्या संस्थेची (Co-operative Wholesale Society) स्थिती तर इतकी भरभराटीची आहे कीं तिच्या स्वतःच्या जमिनी, स्वतःच्या इमारती, स्वतःचे कारखाने, स्वतःच्या वखारी, स्वतःचीं वाहतुकीचीं साधनें इंग्लंडांत तर आहेतच, पण इतर देशांतहि आहेत. हिंदुस्थानांत तिच्या स्वतःच्या मालकीचे चहाचे मळे आहेत, आणि तिचे लक्षावधि सभासद असून कोट्यावधि रुपयांचा व्यापार चालत आहे. या चळवळीचीं सूत्रें तिकडे बहुतेक कामगारांच्याच हातीं आहेत आणि याचा फायदाहि मुख्यतः कामगारांनाच मिळत आहे. या एकाच गोष्टीवरून कामगारांची कार्यक्षमता आणि समाजसेवेबद्दल आस्था दिसून येईल. पुष्कळ लोकांची अशी समजूत

आहे कीं, व्यापारधंद्यांत लागणारीं नोकर माणसें मोठ्या पगाराची लालूच असल्याशिवाय चांगलीं मिळत नाहींत व मिळालीं तरी तीं टिकत नाहींत. परंतु वरील संस्थेचा अनुभव तसा नाहीं. यांतील कामदारांचा पगार अगदीं बाताबेताचाच असतो; तथापि दुसरीकडे अधिक पगार मिळण्याचा संभव असतांहि या संस्थेंतील नोकरांना आपली नोकरी सोडण्याची बुद्धि सहसा होत नाहीं. यांतील वेगवेगळ्या खात्यांच्या मुख्याधिकाऱ्यांना तर दुसरीकडे त्याच हुद्द्यावर असलेल्या माणसांच्या पगाराच्या दृष्टीनें फारच थोडा पगार मिळतो. पण तेवढ्यांतच ते संतुष्ट असतात. कारण या चळवळीच्या मुळाशीं असलेलें समाजसेवेचें तत्त्व त्यांच्या दृष्टीसमोर असतें. शिवाय पैसा न घेतां या चळवळीला अनेक तऱ्हेनें मदत करणारे कैक कामगार आहेत. ते सर्व दिवसभर कारखान्यांत कष्ट करून आपल्या गृहकार्यांत लक्ष घालण्याकरितां जो थोडासा वेळ मिळतो तो या कामीं खर्च करितात.

या चळवळीचें मूलभूत तत्व असें आहे कीं व्यापार हा वैयक्तिक फायद्याकरितां करावयाचा नसून समाजाच्या गरजा भागविण्याकरितां—समाजाच्या उपयोगाकरितां करावयाचा असतो. सार्वजनिक उपयोगाच्या वस्तूवर सार्वजानिक ताबा असावा हें या चळवळीचें ध्येय आहे. कोणाहि माणसाला दररोज उपयोगीं पडणाऱ्या वस्तूंचाच—अन्न, वस्त्र, सर्पण यांचा—मुख्यतः या संस्था व्यापार करितात. दररोजच्या उपयोगाच्या वस्तूंवर स्वतःची तुमडी अमानुषपणानें भरणारांचा ताबा नसावा अशाकरितां हा प्रयत्न चाललेला असतो. जनतेच्या प्रत्यहीं उपयोगीं पडणाऱ्या वस्तु योग्य मोबदला घेऊन पुरविणें, स्वतःला बेसुमार फायदा मिळावा म्हणून मागणीपेक्षां पुरवठा बुद्ध्या कमी न करणें, ही एक समाजसेवाच आहे. मालाची पैदास करणारा व त्याचा उपभोग घेणारा या उभयतांच्याहि तोंडाला पानें पुसून आणि दोघांच्याहि परस्वाधीन स्थितीचा फायदा घेऊन मधल्यामध्यें आपण गबर होणें हें समाजद्रोह करण्यासारखें आहे. करितां हे मध्यस्थ शक्य तितके नाहींसे करावे व अन्नवस्त्रादि माणसाच्या अस्तित्वाला अत्यावश्यक असलेल्या वस्तूंचा पुरवठा समाजसेवेच्या तत्वावर करावा, या थोर आकांक्षेनें ही चळवळ अस्तित्वांत आली व तिच्या हेतूला अनुसरून तिचें कार्य दिवसेंदिवस अधिकाधिक यशस्वी होत आहे.

परस्पर—साहाय्यकारी पेढी किंवा भांडार हें अनेक चळवळींचें केंद्र असतें, अनेक प्रकारच्या चळवळी तेथें केंद्रीभूत झालेल्या असतात. या पेढीचे किंवा

भांडाराचे सर्वच सभासद या चळवळींत मन घालणारे असतात किंवा सर्वी-नाच या चळवळीचें रहस्य कळलेलें असतें असें नाहीं. मनुष्यस्वभावाप्रमाणें कांहीं लोक आपल्या स्वतःच्या फायद्यापुरतेच या चळवळीकडे पाहाणारे असतात. तथापि ज्या मूलभूत तत्वावर या चळवळीची उभारणी झाली तीं तत्वें अझूनहि ही चळवळ करणारांच्या दृष्टीआड झालेलीं नाहींत. शिक्षणप्रसाराला शक्य तितकी मदत करावयाची हें या चळवळीचें प्रथमपासून धोरण आहे. शिक्षणप्रसाराकडे लक्ष्य देण्याकरितां सामान्यतः प्रत्येक पेढीची किंवा भांडाराची एक पोटकमिटी नेमलेली असते.वार्षिक सभेच्या वेळीं नफ्याची वांटणी करितांना शिक्षणप्रसाराप्रीत्यर्थ म्हणून कांहीं रकम प्रत्येक संस्थेंतून वेगळी काढण्यांत येते. शिवाय कांहीं पेढ्यांचीं व भांडारांचीं स्वतःचीं वाचनालयें असतात आणि सभासदांची बौद्धिक उन्नति व करमणूक करण्याकरितां दुसऱ्या अनेक प्रकारच्या सोयी करण्यांत येतात. सभासदांकरितां व्याख्यानें, वर्ग, सहली, संमेलनें वेळोवेळीं करण्यांत येतात आणि या संधीचा फायदा घेऊन, ही चळवळ बाल्यावस्थेंत असतांना तिच्या पुरस्कर्त्यांनीं कसे अविश्रांत श्रम केले व कशीं संकटें सहन केलीं आणि निरा-धार व निर्धन कामगाराला किंवा शेतकऱ्याला स्वतःच्या पायांवर उभा कर-णाऱ्या या चळवळीचें ध्येय कायम राहण्याकरितां तदनंतर कसे प्रयत्न करण्यांत आले हें सांगण्यांत येतें आणि या चळवळीचा अधिक प्रसार होण्याकरितां प्रयत्न करणें आपलें कसें कर्तव्य आहे याचीहि आठवण सभासदांना देण्यांत येते.

सहकारी भांडारांतून सभासदांना जो माल विकला जातो तो बाजारभावा-पेक्षां कमी दरानें कधींहि विकला जात नाहीं. अशा रीतीनें झालेला फायदा वर्षअखेरीला प्रत्येक गिऱ्हाईकानें जितका माल खरेदी केला असेल त्या प्रमाणानें त्याला देण्यांत येतो. त्यामुळें गिऱ्हाइकाच्या पैशाचीहि बचत अगदीं न जाणून होते व पैसा अनपेक्षित प्रसंगीं उपयोगांत आणतां येतो किंवा भांडारांत ती त्या सभासदाची ठेव म्हणून राहाते; आणि सहकारी घर किंवा अशाच कोणत्या तरी दुसऱ्या सहकारी कार्याकडे पण स्वतःचे पैसे म्हणून ह्या सभासदाला त्या रकमेचा उपयोग करितां येतो. अशा रीतीनें दर एक गोष्ट जेथें सहकारी चळवळीच्या तत्वाप्रमाणें चाललेली आहे अशीं कांहीं गांवें व शहरें आहेत. तेथें सभासदांना लागणारी प्रत्येक गोष्ट सहकारी तत्वावरच पैदा केली जाते व विकली जाते.

या चळवळीचा प्रसार जगांतील साऱ्या देशांत थोड्या फार प्रमाणांत झालेला

आहे. परंतु प्रत्येक देशांतील परिस्थिति वेगळी असल्यामुळें या चळवळीचीं जीं अनेक अंगें उपांगें आहेत त्यांपैकीं कोणतें तरी एक परिस्थितिवैशिष्ट्याप्रमाणें विशेष यशस्वी झालेलें आहे. आपल्याकडे परस्पर-साहाय्यकारी पतपेढ्या, इंग्लंडांत सहकारी भांडारें, आयर्लंडमध्यें व डेन्मार्कमध्यें शेतकऱ्यांची सहकारी चळवळ अधिक लोकप्रिय झाली आहे. कांहीं विशेष कारणांमुळें आपल्याकडे पतपेढ्यांचा प्रसार अधिक झाला आहे. पतपेढ्या हा सहकारी चळवळींतला ओनामा आहे. तो सहकारी चळवळीचा पाया आहे. आपला देश शिक्षणांत व दुसऱ्या अनेक गोष्टींत मागसलेला असल्यामुळें सहकारी चळवळ सुरू करितांना ती पायापासून करावी हें क्रमप्राप्तच होतें. शिवाय अशिक्षित वर्गांत सहकार्याचा प्रसार करण्याचा सोपा मार्ग म्हणजे पतपेढ्या स्थापन करणें हा होय. हिंदुस्थान हा इतर देशांच्या मानानें अत्यंत दरिद्री देश आहे, आणि यांतील बहुसंख्याक लोक अत्यंत कर्जबाजारी आहेत. त्यामुळें मांजरानें उंदराला पकडलें कीं त्याला पूर्णपणें न मारतां अर्धमेला करून त्याला खाण्यापूर्वीं तें जसें त्याचा पुनः पुनः चावा घेऊन आपली स्वतःची करमणूक करून घेतें तद्वत् देणेकरी अर्धमेल्या स्थितींत राहावा, तो पुरा मरूंहि नये व जगूंहि नये याकरितां सावकार ऋणकोकडून नेहमीं फक्त व्याज मिळण्याची खटपट करित असतो. तो ऋणको मुद्दल देऊन ऋणमुक्त व्हावा अशी त्याची कधींच इच्छा नसते. मुद्दल देण्याबद्दल धनकोचा तगादा नसला तथापि कर्जबाजारीपणामुळें मनुष्य विवेकशून्य व निरुत्साही होतो; त्याच्यांतील जिवंतपणाच नाहींसा होतो. हिंदुस्थानांतील रयतेची कर्जबाजारी स्थिति सारखी वाढत असल्यामुळें तिच्या बरोबरच लोकांची दुर्बलताहि वाढतच आहे. अशा निराशाजनक परिस्थितींत या साऱ्या संकटपरंपरेला कारणीभूत झालेला कर्जबाजारीपणा नाहींसा केल्याशिवाय तरणोपाय नाहीं. याला सहकारी पतपेढ्यांचा प्रसार हा एक उपाय आहे आणि या दिशेनें योग्य ते प्रयत्न होत आहेत. ही चळवळ दिवसेंदिवस वाढत आहे. आणि शेतकरी व कामगार वर्ग यांना अनेक मार्गांनीं ऋणमुक्त करण्याचे प्रयत्न होत असल्यामुळें त्यांची स्थिति सुधरूं लागली आहे. अशा रीतीनें ते कर्जमुक्त झाल्याशिवाय सहकारी चळवळीचे दुसरे प्रकार यशस्वी होणें शक्य नसतें. इंग्लंडांत सहकारी भांडारांच्या द्वारें, कामगारांना प्रत्यहीं लागणारा माल अनुत्पादक मध्यस्थ नाहींसे झाल्यामुळें निर्भेळ, चांगला व चांगल्या परिस्थितींत तयार झालेला, स्वस्त असा मिळूं लागला आहे व

त्यामुळें त्यांची राहाणी सुधरली आहे. शेतकऱ्यांना आपल्या स्वतःच्या बळावर भांडवल गोळा करून सर्वांकरितां एकत्र घाऊक मालाची खरेदी करितां येऊं लागली आहे व त्यापासून उत्पन्न झालेल्या जिनसा किफायतशीर रीतीनें एकत्र विकतां येऊं लागल्या आहेत. आणि कांहीं ठिकाणीं तो माल विकत घेणाऱ्याहि सहकारी संस्थाच असल्यामुळें माल तयार करणारांचें व गिऱ्हाइकांचें सहकार्य होऊन सर्व तऱ्हेनें हित होऊं लागलें आहे.

या चळवळीपासून बंधुभाव, शील, स्वाभिमान, परस्परांबद्दल अभिमान व परस्परांच्या हिताची जाणीव, काटकसर, आपला व्यवहार चोख ठेवण्याची सवय, आपल्याबरोबरच आपल्या शेजाऱ्याची जबाबदारी सांभाळण्याची आवश्यकता वगैरे गुणांची वाढ होते. जगाची एकंदर रचना सहकार्याच्या तत्वावरच झालेली असल्यामुळें समाजस्वास्थ्याला अनुकूल असें वातावरण ही चळवळ तयार करिते. त्याचप्रमाणें स्पर्धा नाहींशी करणें हें या चळवळीचें ध्येय असल्यामुळें समाजांत कोणत्याहि प्रकारचें वैमनस्य किंवा लढा या चळवळीच्या पुरस्कर्त्यांना स्वभावतःच नको असतो. आत्मसंरक्षणाकरितां स्थापन झालेल्या मजूरसंघांचें एक सर्वराष्ट्रीय मंडळ तयार करण्याचे प्रयत्न जसे चालू आहेत, तसेच या सहकारी चळवळीचेंहि एक सर्वराष्ट्रीय मंडळ स्थापण्याचे प्रयत्न होत आहेत. हे प्रयत्न पूर्णपणें फलद्रूप झाल्यास त्यापासून जगाची प्रगति निःसंशय होईल.

## कामगारांचे क्लब.

दिवसभर भरपूर श्रम करून थकल्याभागल्यानंतर, घरच्या व कामधंद्याच्या विवंचना घटकाभर नाहींशा होऊन, गप्पागोष्टी, विचारविनिमय, ओळखीपाळखी करण्याच्या दृष्टीनें हे कामगारांचे क्लब फार महत्वाचे असतात. संघ करण्याकडे माणसाची मनःप्रवृत्ति असल्यामुळें या साहजिक तयार होणाऱ्या संस्थांना चकाट्या पिटण्याचीं ठिकाणें असें पुष्कळ लोक उपहासानें म्हणतात. पण हे क्लब कांहीं दृष्टीनें सदोष असले तथापि कामगारांची राहणी व कारखान्यांतील परिस्थिति यांचा विचार करितां या क्लबांची त्यांना अत्यंत जरूरी असते असेंच म्हणावें लागेल. बसण्याची खोली, निजण्याची खोली, अभ्यासाची खोली, स्वयंपाकाची खोली, पाहुण्यांची खोली, अशा माणसांपेक्षां खोल्यांचीच संख्या ज्यांच्या घरीं जास्त आहे अशा लोकांना एखाद दुसऱ्या

—सामान्यतः एकाच खोलींत सर्व प्रकारचा व्यवहार करणाऱ्या कामगारांच्या स्थितीची कल्पना कशी यावी? एका खोलींत एकच कुटुंब राहात असतें असेंहि नाहीं. तथापि एकच कुटुंब राहातें असें गृहीत करून चाललें, तरी एकीकडे स्वयंपाक चाललेला असावयाचा, खिडकी बंद असल्यामुळें किंवा खिडकी उघडी असली तरी अगदीं लहान असल्यामुळें धुरानें सारी खोली भरलेली असावयाची, लहान मोठीं मुलें रडत किंवा धांगडधिंगा घालीत तेथेंच असावयाचीं, पाहुणा पै आला तरी तो तेथेंच बसावयाचा; याशिवाय त्या लहानशा खोलींत दुसऱ्या शेंकडों गोष्टी व्हावयाच्या. अशा स्थितींत दिवसभर कष्ट करून दमलेल्या कामगारानें राहावें तरी कसें? अशा स्थितींतील लोक आपल्याकडे रस्त्यावर किंवा पिठ्यांत बसून गोष्टी सांगतांना दिसतात. लोकांना दररोज लागणाऱ्या आवश्यक वस्तूंच्या देवघेवीला व्यापारी स्वरूप न देतां त्याचें सहकारी चळवळीमुळें जसें समाजसेवेंत रूपांतर झालें त्याप्रमाणें हे क्लब उच्च ध्येय पुढें ठेवून सहकारी चळवळीच्या तत्वावर चालविले तर त्यापासून कामगारवर्गाला अपरिमित फायदा होईल. अनेक प्रकारच्या करमणुकीच्या साधनांची तेथें तरतूद केल्यास कामगारांना दुर्व्यसनांपासून परावृत्त करितां येईल. पण त्याशिवाय तो एक लोकशिक्षणाचा सर्वोत्कृष्ट मार्ग होईल. व्याख्यानें, वर्तमानपत्रें, वादविवाद, भाषणें यांच्याद्वारें कामगारांना त्यांच्या सद्यःस्थितीची कल्पना देतां येईल. तसेंच आज कोणत्या गोष्टींची उणीव आहे, कोणत्या दिशेनें प्रयत्न झाले पाहिजेत व आपलें ध्येय काय असावयास पाहिजे इत्यादि गोष्टींची जाणीव या साधनांच्या मदतीनें कामगार लोकांना करून देतां येईल. प्रातिनिधिक राज्यपद्धतीला अशा प्रकारच्या प्रयत्नांची तर विशेषच जरूरी आहे. पण आपल्याकडे याचा अजून उपक्रमाहि झालेला नाहीं.

सबल तितके जगावे व निर्बल तितके मरावे हा सृष्टीचा नियम आहे खरा, परंतु मनुष्यसमाजासंबंधानें विचार करितां मनुष्याची आयुर्मर्यादा वाढण्याला त्याची नुसती शारीरिक सबळता पुरेशी होत नाहीं तर सामाजिक परिस्थितिहि चांगली असावी लागते आणि ही सामाजिक परिस्थिति सुधारण्याचे संघटित प्रयत्न करून कामगारवर्ग पूर्णायुषी करण्याचे कसे प्रयत्न चालले आहेत, हें उपरिनिर्दिष्ट माहितीवरून कोणाच्याहि लक्ष्यांत येण्यासारखें आहे.

# प्रकरण ९ वें.

# खेडीं आणि समाजसेवा.

Villages are the homes of our people. It is there that the bulk of the nation lives and lives in a rather very miserable condition, devoid of all ideas of sanitation, civic co-operation, business and education. Illiterate, ignorant insufficiently fed, insufficiently clothed, very poorly housed, surrounded by insanitary conditions, given to litigiousness, oppressed by petty officials whose number is legion, exploited by their own countrymen, landlords, their condition is simply pitiable.

LALA LAJPAT RAI.

मोठमोठ्या वस्तीचीं शहरें हीं अलीकडेसच अस्तित्वांत आलीं. विशेषतः औद्योगिक क्रांतीपासून यांची वाढ बेसुमार झाली. आपल्या मुंबई शहराची वस्ती इ. स. १८०० मध्यें १,५०,००० होती ती थोडथोडी वाढत जाऊन आतां साडे अकरा लक्ष झाली आहे. गांव सोडून शहरांत येण्याची ही प्रवृत्ति अलीकडे तर इतकी वाढली आहे कीं कांहीं दिवसांनीं खेडीं साफ ओसाड पडतील कीं काय अशी आतां भीति वाटूं लागली आहे. कारण खेडेगांवांची हल्लीं अशी स्थिति झाली आहे कीं, त्यांत म्हातारीं माणसें, स्त्रिया व मुलें हींच सामान्यतः राहूं लागलीं आहेत. साधारणपणें मुलगा वयांत आला कीं तो शहराची वाट धरतो. त्यामुळें तरुण व कर्तृत्ववान् माणसें खेड्यांत दुर्मिळ होऊं लागलीं आहेत आणि याचा परिणाम दिवसेंदिवस कमी होणारें शेतीचें उत्पन्न अधिक कमी होण्यांत व्हावा हें अपरिहार्य आहे. विशेषतः हिंदुस्थानदेश कृषिप्रधान असल्यामुळें या परिस्थितीचा परिणाम शेतीवर फारच अनिष्ट होत आहे.

खेडें सोडून शहरांत जावें असें खेड्यांतील लोकांना वाटण्याला अनेक कारणें झालीं आहेत. खेड्यांतल्या खेड्यांत करितां येण्यासारखे लहान लहान धंदे वाफेच्या यंत्रांच्या स्पर्धेमुळें नाहींसे झाले आहेत आणि व्यवहारोपयोगी

बारीकसारीक वस्तु ज्या आजपर्यंत खेडेगावांत तयार होत होत्या त्याहि आतां शहरांतूनच येऊं लागल्या आहेत. यामुळें खेड्यांतील राहाणी इतकी परावलंबी झाली आहे कीं खेड्यांत राहाणाऱ्या लोकांना हरघडी लागणारी कोणचीहि वस्तु शहरांतून आणल्याशिवाय दुसरें गत्यंतर उरलेलें नाहीं. अशा रीतीनें घरगुती धंदे बुडून खेड्यांतलि लोकांची उपासमार होऊं लागली आहे. शिवाय शहरांतील भपकेदार राहाणी दूरच्या लोकांना आकर्षित करिते आणि प्रवासाच्या सोयी वाढत चालल्यामुळें शहरांतील सुखसोयींचा अनुभव प्रत्यक्ष घेणें कोणालाहि सोपें झालें आहे. अनेक कारणांमुळें शेती दिवसेंदिवस कमी होत चालली आहे आणि त्यामुळें केवळ पोट भरण्याकरितां, इच्छा नसतांना-सुद्धां शहराची वाट धरणें अनेक शेतकऱ्यांना भाग पडत आहे. अशा रीतीनें चरितार्थ चालण्याकरितां माणसानें एकदां स्थलांतर केलें कीं पोटाला मिळेल तेंच स्थल आपलें घर असें तो मानूं लागतो आणि ह्या नवीन जागीं आपल्या सुखसोयी पाहूं लागतो. त्याच्या मनाप्रमाणें साऱ्या गोष्टी जुळल्या तर त्याला पूर्वींच्या स्थलाचें हळू हळू विस्मरण पडतें. पण तो तेथें स्थिरस्थावर होऊं शकला नाहीं तर त्याचा ओढा पूर्वींच्या ठिकाणाकडे असतो.

## खेड्यांतील स्वाभाविक राहणी.

परंतु उपरिनिर्दिष्ट स्थित्यंतर समाजहिताला फारसें पोषक होत नाहीं. खेड्यांतील राहाणी आणि शहरांतील राहाणी ह्या दोहोंत महदंतर असतें. पहिली स्वाभाविक असते तर दुसरी कृत्रिम असते. खेड्यांतलि घरें आंत सूर्यप्रकाश घेण्याइतकीं आरोग्यदृष्ट्या चांगलीं बांधलेलीं नसलीं तरी त्यांच्या सभोंवार विपुल मोकळी जागा असते व तेथें सर्व दिवसभर सूर्यप्रकाश असतो; त्यामुळें तेथील हवा फारशी वाईट होत नाहीं. उलटपक्षीं, शहरांतील घरांची बांधणी एकाच हेतूनें केलेली असते. तो हेतु हा कीं अधिक भाडें कसें मिळवितां येईल. त्या घरांना हवाच मिळणें कठीण तर मोकळी हवा कोठून मिळणार? खाण्याच्या जिन्नसांपैकीं भाजीपाला हा ताजा म्हणावयाचा पण तो ताजा असणेंच शक्य नाहीं. कारण तो कोणत्या तरी दूरच्या ठिकाणाहून कैक दिवसांचा प्रवास करून आणि कैक माणसांनीं चढउतर केल्यानंतर मग तो तेथें येतो. फार काय पण पाणीसुद्धां पिण्यायोग्य होण्यासाठीं अनेक प्रकारचीं औषधें त्यांत मिसळून तें शुद्ध करण्यांत येतें. खाद्यपेयांचे जिन्नस शरीराला उपकारक नाहींत, हवा

मोकळी व शुद्ध नाहीं, राहण्याला पुरेशी जागा नाहीं आणि उद्योगधंदा वाईट परिस्थितींत करावा लागतो. याचा परिणाम असा होतो कीं, शहरांत अनेक प्रकारचे रोग होतात, समाजांत असंतोष उत्पन्न होतो, अनेक प्रकारचे अन्याय होतात, समाजाच्या नाशाला कारणीभूत होणारीं अनेक व्यसनें माणसाला लागतात, कायदे मोडणारांची संख्या अतोनात वाढते, माणसाची आयुर्मर्यादा कमी होते, आणि एकंदरीनें समाजाची प्रगति होण्याऐवजीं समाजाची अवनति होण्याला सुरवात होते. नैतिक दृष्ट्या शहरांतील राहाणी तर अगदींच हानिकारक असते. सांपत्तिक अडचणीमुळें शहरांत सहकुटुंब राहणें पुष्कळ लोकांना शक्य नसतें. एकटा राहिल्यानें मनुष्य व्यसनाधीन होतो आणि एकटे राहणारांची संख्या वाढल्यानें वेश्यागारांसारखीं स्थळें अस्तित्वांत येतात. उलटपक्षीं, खेड्यांत सहकुटुंब राहाणें सोपें जातें व सांपत्तिक दृष्ट्या फायद्याचें असतें. कारण शेतकऱ्याला घरांत माणसें अधिक असतील तेवढीं हवींच असतात. त्यांचा त्याला शेतीच्या कामीं उपयोग होतो. त्यामुळें खेड्यांतील परिस्थिति कुटुंब जोडण्याला व कुटुंबाच्या वाढीला कारणीभूत होते, तर शहरांतील परिस्थिति कुटुंब मोडण्याला व कुटुंबाच्या नाशाला कारणीभूत होते. समाजाच्या सुखाचें नाश करणारें हें वातावरण शहरांत उत्पन्न होऊन किंवा शहरांतील माणसांना पीडा देऊनच थांबत नाहीं तर त्याचा फैलाव थेट खेड्यापर्यंत होतो. कोणत्या तरी भयंकर रोगानें शहरांत आजारी पडावें आणि बरे होण्याचे सर्व उपाय हरले कीं गांवाचा रस्ता धरावा. गांवीं औषधपाण्याशिवाय नुसत्या हवेनेंच पुष्कळ लोक बरे होतात हें खरें; पण या नवीन रोगांची साथ तेथें पसरते आणि तेथील हवा दूषित करिते. सारांश यांत्रिक युगानें उत्पन्न केलेली ही नवीन परिस्थिति शहरांबरोबर खेड्यांच्याहि नाशाला कारणीभूत होत आहे. तरुण लोक आपली महत्वाकांक्षा पुरी करण्याचीं साधनें खेड्यांत नसल्यामुळें शहरांत जातात. त्यामुळें खेडीं अधिकाधिकच उजाड होऊं लागलीं आहेत. खेड्यांच्या सुधारणेकडे कोणीच लक्ष देईनासें झालें आहे. म्हणजे एकीकडे तरुणांना आकर्षित करणारीं साधनें वाढत आहेत तर दुसरीकडे असलेलीं साधनें कमी होत आहेत. आणि ही अनिष्ट परिस्थिति वाढत्या प्रमाणांतच आहे.

शहरांत स्थायिक झालेले लोक पुनः खेड्यांत राहावयास जातील हें शक्य नाहीं असें गृहीत करून चाललें तरी खेड्यांतून शहरांत जी माणसांची वाहती लागली आहे ती बंद झाल्याशिवाय खेड्यांची सुधारणा होणार नाहीं. तरुण

लोकांची दृष्टी शहराकडे जाण्याऐवजीं खेड्यांकडे फिरल्याशिवाय, खेड्यांतच राहावें, खेड्यांचीच सुधारणा करावी, आपल्याला हव्या त्या सुखसोयी खेड्यांतल्या खेड्यांतच घडून आणाव्या अशी तेथल्या बहुसंख्याक लोकांची महत्वाकांक्षा असल्याशिवाय खेडीं ऊर्जितावस्थेस पोंचणार नाहींत. कांहीं वर्षांपूर्वी अमेरिकेची स्थिति अशीच झाली होती. बहुतेक सारे तरुण लोक खेडीं सोडून शहरांत जाऊं लागल्यामुळें खेडीं निर्जन होतात कीं काय अशी लोकांना भीति पडली होती. परंतु लवकरच ह्या अनिष्ट गोष्टीकडे पुढाऱ्यांचें लक्ष्य गेलें आणि अनेक प्रकारें खेड्यांची सुधारणा होऊं लागली. त्यामुळें तरुणांचें लक्ष्य तेथें खेड्याकडे आतां इतकें वेधलें आहे कीं, शेतकी कॉलेजांतील विद्यार्थी आपलें शिक्षण पुरें झाल्यानंतर आपल्या गावीं शेती करण्याकरितां जातो आणि असे शेतकी कॉलेजांतील पूर्ण शिक्षण घेतलेले पण स्वतः शेती करणारे तिकडे पुष्कळ शेतकरी आहेत व शेतीसंबंधीं पूर्ण माहिती देणारीं कॉलेजेंहि जागोजागीं आहेत. तेथें शेतीची अनेक प्रकारें सुधारणा झालेली आहे. अगदीं खेड्यापाड्यांत सुद्धां शेतीच्या आणि दुसऱ्या अनेक बाबतींत विजेचा उपयोग करण्यांत येतो. लोकांच्या करमणुकीचीं अनेक साधनें जागोजाग असतात आणि एखादा मनुष्य फारच महत्वाकांक्षी असल्याशिवाय आपला गांव सोडून सहसा शहरांत जात नाहीं. जपानमध्येंहि घरबैठे धंदे अनेक असल्यामुळें खेड्यांतील लोकांची अशी उपासमार होत नाहीं आणि प्रत्येक माणसाला पोट भरण्यासाठीं शहरांत जावें लागत नाहीं. परंतु आपल्याकडे गांव सोडून शहरांत जाणारांची संख्या सारखी वाढत आहे, खेडीं ओसाड पडूं लागलीं आहेत, शेतीकडे पूर्णपणें दुर्लक्ष्य होऊं लागलें आहे. लहान लहान हातकामाचे धंदे जवळ जवळ नाहींसे होऊन गांवकरी लोक परावलंबी आणि परोपजीवी होऊं लागले आहेत. अर्धपोटीं उघड्या अंगानें काळ कंठणाऱ्या दीन विपद्ग्रस्त शेतकऱ्यांचें पोट भरूं लागल्याशिवाय ही वाहती थांबणें शक्य नाहीं.

## खेड्यांत समाजसेवेची आवश्यकता.

वरील स्थित्यंतरामुळें समाजघटनेवर विलक्षण परिणाम होऊन व्यक्तिसुख, कौटुंबिक आनंद आणि सामाजिक सुव्यवस्था यांचा बिघाड झाला आहे. शहरांतील अपुऱ्या जाग्यांत लोकवस्ती बेसुमार वाढल्यामुळें समाजाला हानिकारक अशा अनेक गोष्टी उत्पन्न झाल्या आणि हे अनेकविध सामाजिक प्रश्न सोड-

विण्याकरितां कैक समाजसेवक पुढें आले व समाजसेवा करणाऱ्या कैक संस्था स्थापन झाल्या. पण ह्या सामाजिक संकटांची वाढ अजून खुंटलेली नाहीं, इतकेंच नव्हे तर कैक वर्षें सतत प्रयत्न करूनसुद्धां ह्यांपैकीं कांहीं प्रश्न कोणत्या उपायांनीं सोडवितां येतील याबद्दल एकमत झालेलें नाहीं. शिवाय कांहीं सामाजिक संकटांच्या बाबतींत त्यांचा प्रतीकार करण्याचे अजून कांहींच प्रयत्न झालेले नाहींत. पण खेड्यांतले लोक शहरांत येऊन खेड्यांतली वस्ती कमी झाल्यानें व शहरांतील समाजसेवा करणाऱ्या संस्थांची संख्या वाढल्यानें खेड्यांतील समाजसेवेची अवश्यकता कमी झाली आहे अशांतला मुळींच भाग नाहीं. उलट कर्ती माणसें तेथें राहात नसल्यामुळें खेड्यांतील समाजसेवेचा प्रश्न फारच बिकट झाला आहे. शिवाय, पाण्याचे अनेक झरे मिळून ज्याप्रमाणें विहीर होते त्याचप्रमाणें सहस्रावधी खेड्यांतील लोक एकत्र मिळून एक शहर होतें, करितां शहरांच्या हिताच्या दृष्टीनें सुद्धां खेड्यांतील समाजसेवेची वाढ होणें अवश्यक आहे. म्हणजे खेडीं व शहरें हीं परस्परावलंबी असल्यामुळें या दोन्ही ठिकाणीं समाजसेवेची सारखीच जरूरी आहे. खेड्यांची सुधारणा करावयाची असली, गांव सोडून शहरांत जाणाऱ्या लोकांच लक्ष पुनः खेड्याकडे लागावें असे उपाय योजावयाचे असले, तर ग्रामसेवामंडळेंहि अस्तित्वांत यावीं लागतील. समाजसेवेच्या दृष्टीनें शहरांत ज्या गोष्टींची जरूरी असते त्याच गोष्टी खेड्यांतहि हव्या असतील असें म्हणतां येत नाहीं. तथापि कांहीं गोष्टींची दोहोंकडेहि सारखीच जरूरी असते.

खेड्यांची सुधारणा करावयाची म्हटल्यास अनेक प्रकारचे प्रश्न उपस्थित होतात. कारण पूर्वींचे स्वत: जमीन कसणारे जमीनदार नाहींसे होऊन त्या जागीं दूरस्थ जमीनदारांचा वर्ग वाढत आहे, जमिनीचे लहान लहान तुकडे पडत आहेत, एकाच्याच मालकीची जमीन दूरदूरच्या अनेक ठिकाणीं पसरलेली असते, शेत करणारा एक व मालक दुसरा, अशी बहुतांशीं स्थिति असल्यामुळें शेतीची सुधारणा करण्याबद्दल कोणालाच कळकळ वाटत नाहीं, हे व दुसरे अनेक शेतीसंबंधींचे प्रश्न सुटावयास हवेतच, पण त्याशिवाय शेतकऱ्यांची सांपत्तिक स्थिति सुधरली पाहिजे. हातमागासारख्या खेड्यांतल्या खेड्यांत करितां येण्यासारख्या धंद्यांचें नुसतें पुनर्जीवन करून चालावयाचें नाहीं तर व्यापारी दृष्टीनें ते कसे यशस्वी करितां येतील यासंबंधीं विश्वसनीय माहिती देणारे व तदंगभूत हरएक बाबतींत सल्ला देणारे व मार्गदर्शक होणारे प्रचारक

यांचें साहाय्य कोणाहि शेतकऱ्याला बिनपैशानें आणि बिनप्रयासानें मिळूं लागल्याशिवाय या गोष्टी यशस्वी होणें शक्य नाहीं. समायिक पत व समायिक भांडवल यांची शेतकऱ्यांना आज ओळखहि नाहीं. लहान लहान घरबैठ्या धंद्यांची माहिती करून दिल्यानंतर त्यांनीं तयार केलेला माल कसोशीनें विकला जाईल अशा प्रकारची व्यवस्था व्हावयास हवी. मोठे शेतकरी लहान लहान शेतकऱ्यांचा माल पाडून घेऊन त्यांची उपासमार करणार नाहींत याकरितां समायिक पत वाढवून गरीब शेतकऱ्यांचें रक्षण करावयास हवें. हें ध्येय सहकारी चळवळीच्या साहाय्यानेंच गांठतां येण्यासारखें आहे. सहकारी चळवळीविषयीं लिहितांना पतपेढ्यांची वाढ आपल्याकडे कशी होत आहे हें पूर्वीं दाखविण्यांत आलेंच आहे. परस्पर साहाय्यकारी पतपेढ्यांची चळवळ पूर्ण यशस्वी झाल्यास शेतकऱ्यांना ती कर्जमुक्त करूं शकेल. पण ही चळवळ अझून इतकी यशस्वी झालेली नाहीं. आज या चळवळीपासून कामगारांना व शेतकऱ्यांना इतकाच फायदा होत आहे कीं त्यांना या संस्थांतून अगदीं अल्पव्याजानें कर्ज मिळूं शकतें आणि त्यांना द्यावें लागणारें थोडें व्याजहि परक्यांच्या खिशांत न जातां पुनः त्यांच्या स्वतःच्याच खिशांत परत येतें. परंतु शेतकऱ्यांची स्थिति खरोखरीच सुधरावयाची असल्यास त्यांच्या ऋणमुक्ततेबरोबरच त्यांची समायिक पत व समायिक भांडवल वाढून त्यांना लागणारा कच्चा माल शक्य तितक्या कमी दरानें मिळण्याची व त्यांनीं तयार केलेला माल शक्य तितक्या अधिक दरानें विकला जाण्याची व्यवस्था सहकारी तत्वावर व्हावयास हवी. ही केवळ कल्पनाच आहे असें कोणाला वाटेल; परंतु डेन्मार्क, आयर्लंड वगैरे कृषिप्रधान देशांतील लोकांनीं हीं तत्वें प्रत्यक्ष अमलांत आणून आपली कल्पनातीत सुधारणा केली आहे. या चळवळीच्या पायीं त्या देशांतील शेतकऱ्यांची अतोनात भरभराट झालेली आहे. आयरिश लोक हे तर मूळचे शेतकरीहि नव्हत. ते मूलतः व स्वभावतः धनगर होत. परंतु सहकारी चळवळीच्या साहाय्यानें त्यांनीं आपला मूळचा दूधदुभत्याचा धंदा कल्पनातीत वाढविला, इतका कीं मोठमोठ्या राष्ट्रांनाहि या बाबतींत त्यांच्यापुढें हार खावी लागली. शेतीच्या बाबतींतहि त्यांनीं पुष्कळ सुधारणा केली.

सुमारें ३५ वर्षांपूर्वीं आयर्लंडमधील शेती व शेतकरी यांची स्थिति अत्यंत निकृष्ट होती. म्हणून शेतीचा धंदा सहकारी तत्वावर चालवून आयरिश शेतकऱ्यांची सांपत्तिक स्थिति सुधरावी या थोर आकांक्षेनें कांहीं परोपकारी पुढा-

त्यांनीं ही चळवळ इ. स. १८८९ सालीं हातीं घेतली. या आरंभीं पुढाकार घेणाऱ्या लोकांची संख्या हाताच्या बोटांवर मोजतां येण्याइतकीच होती. यांतले पहिले पुढारी मि. आर. ए. अँडर्सन हे होत. दुसरे एक परोपकारी जमीनदार लॉर्ड मॉन्टेगल हे होते. आयर्लंडमधील सहकारी चळवळीचे सुप्रसिद्ध पुरस्कर्ते आणि कर्तृत्ववान् पुढारी सर हॉरेस प्लंकेट हे तिसरे पुढारी होत. या व आणखी तीनचार लोकांच्या मदतीनें ही चळवळ सुरू झाली आणि पुढें अनेक प्रकारच्या संकटांना तोंड देऊन व पायाशुद्ध पद्धतीनें चालून पूर्ण यशस्वी झाली. आयर्लंड-मध्यें सहकारी चळवळ सुरू होण्याच्या सुमाराला शेतकऱ्यांना जमीनदारांच्या पारतंत्र्यांतून मोकळें करणारें एक बिल पास झालें होतें व त्यांत वाजवी खंड, कुळांच्या वहिवाटहक्काची शाश्वती व धान्य कोणालाहि विकण्याची मुभा या तीन अटी होत्या. याच सुमाराला शेतकऱ्यांना त्या वेळपर्यंत नसलेला एक रिपु—परराष्ट्रीय स्पर्धा—उत्पन्न झाला होता. शिवाय आयर्लंडमधील शेतें अगदीं लहान लहान असल्यामुळें त्यांची मशागत चांगल्या रीतीनें करणें शक्य असलें तरी शेतांची लागवड व धान्याची विक्री मोठ्या प्रमाणांत संघशक्तीनें केल्या-शिवाय तीं अर्थशास्त्राच्या दृष्टीनें यशस्वी होणें शक्य नव्हतें. आयर्लंडमधील शेतीचा धंदा कला या दृष्टीनें अगदीं मागसलेला होता त्यापेक्षां व्यापार या दृष्टीनें अधिक मागसलेला होता. कैक दिवसांच्या आपसांतील कलागतीमुळें आयरिश शेतकऱ्यांचें आयुष्य अगदीं कष्टमय झालें होतें, इतकें कीं खेड्यांतील शेतकऱ्यांना उमेद कशी ती राहिलीच नव्हती. आपल्या आर्थिक दुःखाचें आदि-कारण सरकार आहे अशी आयरिश लोकांची समजूत झाली होती. आणि आपल्याला स्वराज्य मिळालें तर आपली आर्थिक व सामाजिक स्थिति चुटकी-सरशी सुधरेल असेंहि त्यांना आणखी वाटत होतें. यामुळें राजकीय पुढारी म्हटला म्हणजे तो सर्व बाबतींत आपला मार्गदर्शक असें ते मानीत. शिवाय व्यापाऱ्यांचा या चळवळीला विरोध होताच. या स्थितीशीं आपली आजची स्थिति तंतोतंत जुळत नाहीं असें कोण म्हणेल ? एकंदर परिस्थिति अशा प्रकारें प्रतिकूळ होती तरी पण या चळवळीच्या बाबतींत प्लंकेटसाहेबांचा आत्मविश्वास दांडगा होता. आपण हातीं घेतलेलें काम आर्थिक दृष्ट्या मजबूत पायावर आहे आणि तें यशस्वी होण्यास काय तो कालावधिच लागणार आहे, या प्लंकेटसाहे-बांच्या अपेक्षेप्रमाणें आयर्लंडमध्यें शेतकऱ्यांची सहकारी चळवळ पूर्ण यशस्वी

झाली. तेथें दूधदुभत्याच्या कारखान्यांत ही चळवळ प्रथम सुरू करण्यांत आली. कारण हा धंदा तेथें फार पुरातनकाळापासून चालू होता. आयर्लंडमध्यें इ. स. १८९१ च्या वसंतऋतूंत सहकारी तत्वावर चाललेला दुधालोण्याचा पहिला कारखाना अस्तित्वांत आला. इ. स. १९१९ मध्यें या सहकारी तत्वावर चाललेल्या कारखान्यांची संख्या ३८० झाली, ५३,२४० सभासद झाले आणि रु. १०,५०,००,००० चें लोणी विकण्यांत आलें. आयर्लंडांत सहकारी चळवळ करणाऱ्या मंडळीनें प्रथम जरी लोण्याचाच धंदा सहकारी तत्वावर चालविण्याचें ठरविलें तरी केवळ दुधालोण्याचाच धंदा नव्हे तर शेतीच्या इतर शाखा आणि शेतकऱ्यांचा संबंध येणारा प्रत्येक जातीचा धंदा सहकारी तत्वावर चालवावा अशी त्या मंडळीची मनीषा होती; पण अंडीं गोळा करणें, त्यांची प्रत ठरविणें आणि तीं बाजारांत विकणें अशा क्षुल्लक बाबीपासून तों अत्यंत कौशल्यानें करावयाच्या व्यापारापर्यंत सर्व धंद्यांची प्रगति आयर्लंडांतील विशिष्ट परिस्थितीमुळें अगदींच मंदगतीनें होत होती. तथापि सहकारी चळवळीचीं तत्वें आयरिश शेतकऱ्यांच्या मनावर पूर्णपणें बिंबलेलीं असल्यामुळें सर्व आयरिश शेतकरी-वर्ग सहकारी चळवळींत सामील होणें हा काय तो कालावधीचाच प्रश्न होता.

हिंदुस्थानची पहिली खानेसुमारी इ. स. १८७१ मध्यें झाली. तदनंतर प्रत्येक दहा वर्षांनीं खानेसुमारी करण्यांत येत असते. या खानेसुमारीच्या आंकड्यांवरून असें आढळतें कीं लोकसंख्येच्या वाढीच्या मानानें उद्योगधंदा करणाऱ्या लोकांची संख्या प्रत्येक खानेसुमारीला सारखी कमी होत असून शेतीवर अवलंबून राहाणारांची संख्या सारखी वाढत आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं हिंदुस्थानांतील शेतीची सारखी भरभराट होत आहे आणि म्हणून बाकीच्या धंद्यांतील लोक दिवसेंदिवस अधिकाधिक शेती करूं लागले आहेत. शेतीवर अवलंबून राहाणारांची संख्या वाढण्याचें कारण असें कीं गेल्या अर्धशतकांत उद्योगधंद्याला लागणाऱ्या यांत्रिक सामानांत जी सारखी सुधारणा होत आहे ती आमच्या लोकांच्या गांवींहि नसल्यामुळें उद्योगधंद्याच्या स्पर्धेत आपल्या लोकांचा टिकाव लागेनासा होऊन ते धंदा सोडून शेतीकडे वळत आहेत. बरें, एका शेतकरीकुटुंबाकडे असलेल्या जमिनीचे प्रत्येक पिढीला अनेक वांटे होऊन ते अनेकांकडे जात असल्यामुळें आणि शेवटीं वांटणीला आलेल्या लहानशा शेतावर शेतकरी कुटुंबाचा गुजारा होत नसल्यामुळें तो तुकडाहि शेवटीं गहाणदाराच्या ताब्यांत जातो. अशा रीतीनें शेताचा मालक

असून स्वतः शेती करणारा शेतकरी वर्ग बदलत जाऊन वर म्हटल्याप्रमाणें दूरस्थ लोकांच्या ताब्यांत शेतें जात आहेत आणि शेतकऱ्यांची परंपरा तुटत आहे. जे शेती करतात त्यांना अर्धपोटीं राहाण्या इतकेंहि उत्पन्न त्यांतून मिळत नसल्यामुळें कर्ते सवरते माणसें परागंदा होतात आणि म्हातारीं कोतारीं मागें राहातात. त्यांना शेतीची मशागत मेहनत घेऊन करणें शक्य नसतें. परागंदा झालेले लोक वर्षातून कांहीं दिवस गांवीं येतात हें खरें, परंतु ते उपरे असल्या-मुळें शेतीच्या कामीं त्यांचा मुळींच उपयोग होत नाहीं. त्यांचें मन नेहमीं द्विधा झालेलें असतें; तें त्यांच्या गांवाबाहेरील कामावरहि स्थिर होत नाहीं आणि गांवीं शेतीकडेहि स्थिर होत नाहीं. अशा रीतीनें दोन घोडींवर ते उभे राहिल्या-मुळें दोहोंकडेहि निराधार होतात. शेतीला जितक्या माणसांची अवश्यकता आहे त्यापेक्षां कैक पटीनें अधिक पण अगदीं लहान किंवा अगदीं वृद्ध माणसें शेतीवर अवलंबून राहिल्यामुळें शेतीहि धड होत नाहीं व तिच्यावर अवलंबून राहिलेल्या लोकांचें पोटहि धड भरत नाहीं. अशा स्थितींत शेतीला अवश्य तितकीं लायक माणसें शेतीवर अवलंबून राहून बाकीच्यांनीं दुसरा उद्योग पाहिला तर सर्वांचेंच हित होईल. पंजाबच्या कलबर्ट साहेबांनीं असा निष्कर्ष काढला आहे कीं, हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांपैकीं शेंकडा ५५ शेतकऱ्यांच्याकडे अर्ध्या एकरापासून अडीच एकरापर्यंत जमीन कसण्याकरितां असते आणि एवढ्यांत त्याच्या कुटुंबाचा गुजारा होण्यासारखा नसल्यामुळें त्यांची स्थिति नेहमीं ओढगस्त असते.

सहकारी चळवळ ज्याप्रमाणें श्रीमंतांकरितां नव्हे त्याचप्रमाणें अत्यंत कंगाल स्थितींतील माणसालाहि तिचा फारसा उपयोग होऊं शकत नाहीं. ज्याचा आदा आणि खर्च यांची कधींच तोंडमिळवणी होत नाहीं, अशा दिवाळखोर माणसानें पतपेढींतून नेहमींच्या खर्चाकरितां कर्ज घेतल्यास तें देतां न आल्यामुळें त्याची पतहि जावयाची व पेढीहि बुडा-वयाची. पत हा सहकारी चळवळीचा प्राण आहे आणि पत राहाण्याला माण-साचा आदा आणि खर्च यांची निदान तोंडमिळवणी तरी व्हावी लागते. त्यामुळें या शेंकडा ५५ शेतकऱ्यांना वर निर्दिष्ट केलेल्या शेतकऱ्यांच्या सहकारी चळ-वळीपासून, त्यांची सांपत्तिक स्थिति सुधारल्याशिवाय, कितपत फायदा होईल याची शंकाच वाटते.

## खेड्यांतील आरोग्य.

हिंदुस्थानांत जमीन विपुल आहे, हवाहि उत्तम आहे आणि बाराहि महिने सूर्यदर्शन होत असतें त्यामुळें खेड्यांतील आरोग्य उत्तम राहाणें फारसें कठीण पडूं नये. शिवाय कोणत्याहि प्रकारें प्रयत्न केल्याशिवाय वरील कारणांमुळें आरोग्य आपोआप पुष्कळ सुधरतें. परंतु आरोग्यदृष्ट्या आपल्याकडील खेड्यांची स्थिति अत्यंत वाईट आहे. कोणत्याहि ठिकाणचें आरोग्य बिघडण्यास मुख्यतः दोन गोष्टी कारणीभूत होतात. त्या हवा आणि पाणी या होत. मनुष्याचा जीव जगण्याला प्रथम शुद्ध हवेची जरूरी असते, त्यानंतर शुद्ध पाणी हवें असतें, त्यानंतर खाणें व इतर गोष्टी लागतात. खेड्यांत घरांतील कचरा, गुरां-ढोरांच्या पायांखालील कचरा व मळमूत्र हीं घरानजीक टाकण्यांत येतात व तीं तेथेंच कुजूं देण्यांत येतात. खेड्यांत कोठेंहि पायखाने बांधण्यांत येत नाहींत; घराच्या आसपासची सर्व जागा त्या कामीं उपयोगांत आणण्यांत येते आणि मुलांना तर वाटेल तेथें बसण्याची मुभा असते. यामुळें आरोग्य तात्काळ बिघडतें व अनेक प्रकारची रोगराई उत्पन्न होते. कांहीं ठिकाणीं पाय-खान्यांऐवजीं लहान लहान खड्डे खणण्यांत येतात आणि ते कधींच साफ करण्यांत येत नाहींत. त्यामुळें हवा दूषित होते व जवळपासच्या विहिरींचें पाणी बिघडतें. विहिरींचें पाणी बिघडलें व पिण्यापुरतेंहि स्वच्छ पाणी मिळण्याची पंचाईत झाली कीं, लोकांना गांव सोडणें भाग पडूं लागतें. शेवटीं पाणी अशा रीतीनें बिघडण्याचें कारण वरील प्रकारचे बहिर्दिशेस जाण्याकरितां तयार केलेले खड्डे असून ते बुजवून टाकल्यावर विहिरींचें पाणी पुनः स्वच्छ पिण्यालायक झाल्याचीं कैक उदाहरणें आहेत. करितां पिण्याच्या पाण्यापासून निदान १०० यार्डांवर तरी अशा प्रकारचे खळगे किंवा घाण नसावी.

घाणीमुळें जितकें आरोग्य बिघडतें तितकेंच किंबहुना त्यापेक्षां जास्त आरोग्य बिघडण्याला पाणी कारणीभूत होतें. खेड्यांत पाणी मिळण्याचीं मुख्य ठिकाणें म्हटलीं म्हणजे नद्या, झरे, तळीं आणि विहिरी हीं होत. यांतील पाणी दूषित होण्याचीं मुख्य कारणें हीं असतात कीं त्यांच्या सभोंवार शेतीभाजी केलेली असते, त्यांतील घाण या पाण्यांत जाते. ह्या पाण्याच्या जागा लोकवस्तींत असल्यामुळें घरातील केरकचरा व माणसांजनावरांची एकंदर घाण या पाण्यांत जाते. माणसें याच पाण्यांत आंघोळ करितात व आपले कपडेलत्ते धुतात.

गुरांना पाणी पाजण्याचें हेंच ठिकाण असतें व म्हैशी रेडे याच पाण्यांत बसविण्यांत येतात. अशा नाना प्रकारांनीं या नदीनाल्यांतील पाणी खराब होतें. विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, नदीच्या काठीं वसलेल्या प्रत्येक खेड्यांतील लोक नदीच्या वरच्या भागांतील पाणी शुद्ध आहे असें समजून त्याचा खाण्यापिण्याच्या कामीं उपयोग करितात व नदीच्या खालच्या भागांत वाटेल त्या प्रकारें घाण करण्यास कचरत नाहींत. परंतु त्यांच्या समजुतीप्रमाणें नदीच्या खालचा भाग म्हणजे वस्तुत: शेजारच्या गांवाचा वरचा भाग असतो आणि अशा प्रकारचे सहस्रावधि गांव एका नदीच्या दुतर्फा असतात आणि त्या सर्वांना परस्परांनीं दूषित केलेलें पाणी प्यावें लागतें. खरें पाहातां विहिरींचें पाणी नदीच्या पाण्यापेक्षां स्वच्छ राहावें; परंतु बहुतेक ठिकाणीं विहिरींचें पाणी दोरीनें न काढितां विहिरींतून पाणी नेण्याकरितां पायऱ्या असल्यामुळें त्यांत नाना प्रकारची घाण जाते. विहिरीच्या कांठावरील घाण पाणी पुन: विहिरींत जाते. पुष्कळदां विहिरी झाडाखालीं असल्यामुळें झाडांची पानें व पक्षांची विष्ठा पाण्यांत पडते आणि विहिरींचें पाणी वाहतें नसल्यामुळें ही एकंदर घाण पाण्यांत कुजून हें पाणी नारूंचें घर बनतें.

वरील परिस्थितीमुळें अनेक प्रकारचे रोग खेड्यांत उद्भवतात. शिवाय शहरांतील कांहीं माणसें तेथील आरोग्यनाशक हवेमुळें अत्यवस्थ आजारी पडून पुन: खेड्यांत येत असल्याचें वर म्हटलेंच आहे. या दुहेरी कारणामुळें खेड्यांत आजारी माणसांची संख्या अपरिमित वाढते. हिंवतापासारख्या कांहीं रोगांचा फैलाव खेड्यांतून इतका झाला आहे कीं कांहीं खेडीं तर निर्जन होण्याच्या पंथाला लागलीं आहेत. या रोगांचा इतका फैलाव होण्याला अशुद्ध पाणी, दूषित हवा व आरोग्याला अपायकारक जागा हीं तर कारणें असतातच; पण ह्याशिवाय आणखी एक कारण असें असतें कीं खेड्यांत औषधोपचार होण्याला फार कठीण पडतें. एक तर जवळपास वैद्य नसावयाचा आणि दुसरें असें कीं वैद्य असला तरी त्याला द्यावयाला रोग्याजवळ पैसे नसावयाचे. त्यामुळें लोक होतां होईल तितकें करून घरगुती उपचारांवर भागविण्याचा प्रयत्न करितात आणि अगदीं अत्यवस्थ झाल्याशिवाय रोग्याला वैद्याचें औषध मिळत नाहीं. आणि तेंसुद्धां तीन चार मैलांवर वैद्याच्या घरीं जाऊन वैद्य घरीं भेटून रोग्याला औषध मिळेपर्यंत दोनदोन तीनतीन दिवस

जातात. तोंपर्यंत रोगी मरणोन्मुख होतो. औषधोपचाराच्या बाबतींत खेड्यांतील लोकांचे इतके हाल होत आहेत कीं त्याची कल्पनाहि करितां येणार नाहीं. खेड्यांतील लोकांना वैद्यकीय मदत मिळावी म्हणून सरकारनें एक नवीन योजना तयार केली आहे. तिचा हेतु असा आहे कीं, मेडिकल कॉलेजमधून पास झालेल्या विद्यार्थ्यांनीं आपल्या गांवीं जाऊन दवाखाने काढावे व त्या कामीं सरकारनें त्यांना पैशाची मदत द्यावी. पण या योजनेप्रमाणें या नवशिक्या डॉक्टरांनीं खेड्यांतून दवाखाने काढल्यास त्यांना इंग्रजी औषधांचा पुरवठा कसा होईल व रोग्यांना पैशाच्या दृष्टीनें तें कितपत परवडेल हा प्रश्नच आहे. शिवाय इंग्रजी औषधांवर लोकांचा अझून तितका विश्वास नाहीं. त्यापेक्षां तीच मदत देशी वैद्यांना देऊं केल्यास स्वदेशी वैद्यकाला उत्तेजन दिल्याचें श्रेय सरकारला मिळेल व गोरगरिबांना त्यांचें साहाय्य अधिक सुखावह होईल व कमी पैशांत घेतां येईल.

खेड्यांतील लोकांच्या सुधारणेच्या आड आणखी एक गोष्ट येत आहे ती प्राथमिक शिक्षणाचा अभाव ही होय. शेतीची सुधारणा कशी करितां येईल याविषयींची सामान्य माहिती शेतकऱ्यांना द्यावयाची असली, आरोग्याविषयींचे कांहीं नियम शेतकऱ्यांना समजावून द्यावयाचे असले, पाणी व जवळपासची जागा स्वच्छ राखिल्यानें त्यांचें आरोग्य कसें सुधरेल व बारीकसारीक रोग कसे टाळतां येतील, असे रोग झाल्यास घरच्या घरीं ते कोणत्या उपायानें बरे करितां येण्यासारखे असतात, वगैरे गोष्टींची माहिती शेतकऱ्यांना करून द्यावयाची असली तर शिक्षणाच्या अभावीं ती करून देतां येत नाहीं. या दृष्टीनें विचार करितां शहरापेक्षां खेड्यांतच खरोखरी प्रथम सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची अधिक आवश्यकता आहे.

प्रत्येक खेड्यांतील लोकांना लागणारा दाणागोटा, कपडालत्ता व व्यवहारांत लागणाऱ्या दुसऱ्या वस्तु खेड्यांतल्या खेड्यांत तयार होत असल्यामुळें प्रत्येक खेडें म्हणजे पूर्वीं जवळ जवळ एक स्वतंत्र संस्थानच असे आणि या एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेला पोषक असें एकंदर वातावरण असे. धंद्यांवरून जात अस्तित्वांत आलेली असल्यामुळें एकाच खेड्यांत अनेक जातींचे लोक असत इतकेंच नव्हे तर नेहमींच्या व्यवहारांत स्पृश्यास्पृश्यताहि मानली जात असे. पण वर्षांतून कांहीं सार्वजनिक प्रसंग असे असत कीं त्या वेळीं हा उच्चनीचपणाचा भाव विसरून जाऊन सर्व गांवकरी खांद्याला खांदा लावून तें कार्य साऱ्या गांवाचें

आहे असें समजून करीत आणि ही वहिवाट कैक पिढ्या चाललेली असल्यामुळें अशा प्रकारें एकत्र जमण्यांत कमीपणा तर कांहीं नाहींच, पण उलट तें एक प्रकारें मानाचें समजण्यांत येई. त्यामुळें कोणाहि सामान्य बुद्धीच्या माणसाला स्पृश्यास्पृश्यता किती फोल आहे हें सहज दिसे. परंतु आपल्याला उच्च समजणाऱ्या दुराभिमानी लोकांनीं अलीकडे या पुरातन चालींना कोणत्या ना कोणत्या सबबीवर फांटा देऊन या प्रसंगीं सर्वांत मिसळण्याचें सोडून दिलें आहे. त्यामुळें जातीजातींतील लवचीकपणा नाहींसा होऊन गांवांतील एकोपा मोडत चालला आहे. धंदे नाहींसे झाले, पण धंद्यांच्या पायीं उत्पन्न झालेली जात कायम राहिल्यामुळें वरिष्ठकनिष्ठ भाव वाढूं लागला आहे.

## समाजोन्नतीला अवश्य असणाऱ्या गोष्टी.

व्यक्तीचें व व्यक्तिसमूहाचें शत्रूपासून संरक्षण करणें हें समाजाचें ध्येय असतें. समाजाला दोन प्रकारचे शत्रू असतात. एक अंतःस्थ शत्रु व दुसरा बाहेरील शत्रु. अंतःस्थ शत्रूंची थोडी फार माहिती वर आलेली आहेच. त्याशिवाय परावलंबी लोक, व्यंग लोक, गुन्हेगार लोक हेहि समाजाला सहायभूत होण्याऐवजीं समाजाला भारभूत होतात. समाजाला नुसतें व्यक्तीचें किंवा व्यक्तिसमूहाचेंच नव्हे तर स्वतःचेंहि संरक्षण करावयाचें असतें, म्हणून समाजाचा गुन्हा हाच खरा गुन्हा असें मानण्यांत येतें. समाजाचा गुन्हा कोणता समजावयाचा व त्याला शिक्षा कोणती करावयाची हें ठरविणें फार अवघड काम असतें. याची सारी मदार लोकमतावर अवलंबून असते आणि लोकमत बदलेल त्याप्रमाणें या गुन्ह्यांच्या व्याख्येंत व शिक्षेंत बदल होत असतो. पण लोकमताची चाचणी करणें हेंहि अत्यंत कठीण काम असतें. कारण जनसमूह जर संघटित नसला, त्याला विचार करण्याची संवय नसली, वातावरण क्षुब्ध झालेलें असलें तर तो बरेंवाईट, न्यायान्याय याचा विचार करीत नाहीं. उलट उत्साहाच्या भरांत विकारवश होऊन वाटेल त्या गोष्टींना मान्यता देतो. तेथें समुदायाच्या ओघाबरोबर जाण्याची प्रवृत्ति असे. विचाराला किंवा न्यायबुद्धीला तेथें वाव मिळेनासा होतो. उलटपक्षीं, संघटित समाजांत विचारांचें प्राबल्य असतें. तेथें ज्या गोष्टी करण्यांत येतात त्या बुद्धिपुरस्सर, न्यायाला धरून व पूर्व तयारीनें करण्यांत येतात. लोकांचा नुसता जमाव हा अपक्व समाज असतो. अपक्व बुद्धीचा मनुष्य नेहमीं भावनाप्रधान असतो. वारा लागेल त्याप्रमाणें

वाहणें, त्याचा प्रतीकार न करणें किंबहुना त्याचा प्रतीकार करण्याची शक्ति अंगीं नसणें हा त्याचा स्वभावधर्म असतो. आणि मौजेची गोष्ट ही कीं, अशा प्रकारचा हा समाज इतका अस्थिरबुद्धि असतो कीं ज्याप्रमाणें पावसाच्या ढगांनीं चारी दिशा भरून जाव्या व आतां भयंकर वादळ व पाऊस येणार असें वाटावें पण थोड्या वेळानें वादळहि नाहीं व पाऊसहि नाहीं असें व्हावें, त्याप्रमाणें एखाद्या गोष्टीमुळें वातावरण इतकें भरून जातें कीं त्याचे परिणाम कोठवर पोंचतील ह्याचा कयासहि लागेनासा होतो आणि अत्यंत विचारपूर्वक व बुद्धिपुरस्सर एखादी गोष्ट करण्याइतका जर समाज संघटित नसला तर ती गोष्ट तितक्याच लवकर तो विसरून जातो. इतका कीं जणु ती गोष्ट घडलीच नाहीं! अशा प्रकारचे जमाव ( Mobs ) समाजाला हानिकारक असतात. अशा जमावांत कधीं कधीं चांगल्या गोष्टीहि होतात हें खरें, पण सामान्यतः त्यांत ज्या गोष्टी घडतात त्या समाजाला फारशा हितकारक नसतात. कारण त्यांत रानटीपणाचें बीज असतें. न्यायबुद्धि आणि सारासारविचार यांचा त्याला पाठिंबा नसल्यामुळें अशा समूहाकडून विधायक गोष्टींपेक्षां विघातक गोष्टीच फार होतात. करितां अशा बेगुमान जमावाचा प्रतीकार करणेंच चांगलें. समाजाचा पुढारी ओघाबरोबर जाण्यापेक्षां ओघांचा प्रतिकार करणारा लागतो तो एवढ्यासाठींच. रानटी लोक, क्रूर श्वापदें, धरणीकंप, अतिवृष्टि, अनावृष्टि अशा सारख्या दैवी आपत्ति हे समाजाचे बाहेरील शत्रु होत.

व्यक्ति किंवा व्यक्तिसमूह परस्परांच्या नाशाला तयार होतील तर समाज अस्तित्वांत राहूं शकणार नाहीं. समाज अस्तित्वांत राहण्याला सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता असते. सर्वांना परस्परांबद्दल सहानुभूति व प्रेम वाटावयास हवें असतें. एकमेकांचा प्राण घेण्याला निघालेल्या व्यक्तींचा कधींहि समाज होऊं शकणार नाहीं. किंवा नुसतीं माणसें एकत्र झालीं म्हणून त्यांना समाज हें नांव देतां येणार नाहीं. त्यांपैकीं कांहीं जणांना परस्परांबद्दल अंतःस्थ थोडें वैमनस्य वाटत असलें तरी त्याचा परस्परांचा नाश करण्याला कारणीभूत होण्याइतका अतिरेक होतां कामा नये. समाजांत अशाहि प्रवृत्तीचीं विरळ माणसें असतात. पण तो सर्वसाधारण नियम नाहीं. व्यक्तीव्यक्तींतील थोडे फार मतभेद प्रयत्नानें मिटवितां येतात हें कांहीं खोटें नव्हे, पण मूलतः दुष्ट लोकांचा समाज कधींहि बनवितां येणार नाहीं. व्यक्तीचें हित आणि समाजाचें हित यांची सांगड जेथें उत्तम प्रकारें घालण्यांत येते तो समाज पूर्णावस्थेस पोंचला असें समजण्यांत येतें.

दुसऱ्याची वस्तु जो चोरतो त्याचा समाजाची संपत्ति किंवा सुख वाढविणें हा उद्देश नसतो, परंतु दुसऱ्यानें पूर्वींच उत्पन्न केलेल्या संपत्तीचा त्याच्या नकळत अपहार करावा हा त्याचा हेतु असतो. दोन माणसें जुगार खेळत असलीं आणि त्यांपैकीं एक जिंकला तर त्यापासून समाजाची संपत्ति वाढत नाहीं किंवा कमी होत नाहीं. इतकेंच नव्हे तर त्या व्यवहारापासून समाजाचें कोणत्याच प्रकारचें कार्य होत नाहीं. हीं दोन माणसें जुगार खेळून आपला वेळ आळसांत घालवितात आणि त्यांपैकीं प्रत्येकजण कोणत्याहि प्रकारें मोबदला न देतां दुसऱ्याला लुटण्याचा प्रयत्न करितो. हा जुगार जरा मोठ्या प्रमाणांत असला आणि तीं खेळणारीं माणसें समाजांत जरा शिष्ट म्हणून समजलीं जात असलीं तर त्याला सट्टा हें साळसूद नांव देण्यांत येतें. पण त्याला नांव कोणतेंहि असलें तरी त्याच्या मुळाशीं असलेली घाणेरडी प्रवृत्ति नाहींशी होत नाहीं. सचोटीचा आव आणून ते समाजाला लुटण्याचा घाट घालतात आणि दैवानें किंवा दूरदृष्टीमुळें कोणत्याहि प्रकारें मोबदला, किंमत किंवा सेवा उलट न देतां आगाऊच उत्पन्न केलेली संपत्ति मिळविण्याचा प्रयत्न करितात. म्हणून ही प्रवृत्ति समाजहिताला पोषक नाहीं असें मानण्यांत येतें. तसेंच सर्व समाजाकडे दुर्लक्ष्य करून एखाद्या व्यक्तीच्या हिताकरितां किंवा अगदीं अल्पसंख्याक लोकांच्या फायद्याकरितां जेव्हां सर्व समाजाची म्हणून समजण्यांत येणारी संपत्ति खर्च करण्यांत येते तेव्हां तो खर्च सत्कार्यीं झाला, सर्व समाजाच्या हिताकरितां झाला, असें समजण्यांत येत नाहीं; तर ती समाजाच्या पैशाची लूट झाली असेंच समजलें जातें. सर्वांकडून कराच्या रूपानें पैसे गोळा करावे आणि त्याचा विनियोग सार्वजनिक कार्याकडे न करितां एखाद्याला नाहक्क आणि मोबदल्याशिवाय ते द्यावे त्याप्रमाणें हें होतें. सार्वजनिक पैसा सार्वजनिक सुख वाढविण्याच्या कामींच खर्च व्हावा हें केव्हांहि न्याय्य असतें.

अधिकांचें अधिक सुख हें समाजांचें ध्येय असें मानण्यांत येतें व तें खरेंहि आहे. पण हें सुख म्हणजे तरी काय ? अधिक संपत्ति, अधिक बुद्धि, सर्व धर्मांविषयीं सहानुभूतीचें धोरण, सर्वोत्कृष्ट शारीरिक सुधारणा कीं नैतिक उन्नति ? वस्तुतः यांपैकीं कोणत्याहि एक गोष्टीचीच सुधारणा झाल्यानें समाजाचें सुख वाढेल असें म्हणतां येणार नाहीं. समाजोन्नति होण्याला या सर्व

गोष्टींत सारखीच सुधारणा झालेली नसली तथापि काहीं ठराविक मर्यादेपर्यंत तरी त्या प्रत्येकाची प्रगति व्हावी लागते. नाहीं तर ज्याला संस्कृतीचा गंधहि लागलेला नाहीं असा एखादा रानटी समाजहि सुखी असतो. पण अशा प्रकारचें समाधान हें समाजाचें ध्येय होऊं शकणार नाहीं. उच्चतर राहाणीची उत्कट इच्छा आणि ती साध्य करण्याचे उपाय यांच्यावर हें सुख अवलंबून राहातें. आणि हेंच समाजाचें खरें ध्येय होय. तसेंच हें अधिकांचें सुख साधावयाचें तर हे अधिक म्हणजे तरी किती ? आणि अधिक सुख म्हणजे तें मापावयाचें तरी कसें ? सुखाची उपरिनिर्दिष्ट व्याख्या स्थूल मानानें खरी आहे असें धरून चाललें तरी ही अधिक संख्या आजच्या समाजाची कीं भावी समाजाची हा प्रश्न शिल्लक राहातोच. आजचा समाज व भावी समाज या दोहोंचा वस्तुतः यांत समावेश व्हावयास पाहिजे. कारण समाजांतील एक व्यक्ति दिवंगत होतें आणि दुसरी जन्मास येते. अशा रीतीनें संख्येच्या दृष्टीनें समाज नेहमीं समबळ राहतो. करितां कांहीं गोष्टींपासून समाजाचा तात्कालिक फायदा होण्यासारखा नसला तथापि त्या भावी पिढीच्या हिताकरितां आणि सुखाकरितां करावयाच्या असतात.

सारखी संधी, सारखे हक्क दिले तरी सर्व लोकांची स्थिति सारखी राहील असें नाहीं, असें पूर्वीं एका ठिकाणीं म्हटलें आहेच. कारण कांहींना शारीरिक व्यंगें असतात, कांहींच्यांत मानसिक दोष असतात, कांहींची नैतिक दृष्ट्या अधोगति झालेली असते, कांहींच्यांत स्वभावदोष असतात, कांहींच्या बाबतींत परिस्थि- तीचें बळ अधिक असतें; सांपत्तिक किंवा सामाजिक स्थिति, अपघात हेहि कांहींची वाढ खुंटवितात. या अडचणी शक्य तितक्या दूर करून प्रत्ये- काला आपली सुधारणा करण्याची संधी देणें व त्याचा मार्ग निष्कंटक करून त्याला स्वावलंबी करणें हा समाजसेवेचा हेतु असतो. शिक्षण, कायदे व दुसरे अनेक मार्ग या साधनांनीं हा हेतु तडीस न्यावयाचा असतो. कारण नुसती संधि व हक्क दिल्यानें मनुष्य सुधरतो असें नाहीं, तर त्यांचा उपयोग करून घेण्याची लायकीहि त्याच्या अंगीं यावी लागते. ती वरील साधनांनीं येऊं शकते.

# वेश्या व वेश्याव्यवसाय.

लेखक—पुरुषोत्तम गोविंद नाईक.

## किंमत आठ आणे.

### अभिप्राय.

वेश्याव्यवसायाला निर्बंध घालणें केवळ एखाद्या व्यक्तीस किंवा संस्थेस शक्य नसून त्या बाबतींत सामुदायिक प्रयत्न होणें जरूर आहे. यासंबंधीं रा. नाईक यांनीं केलेलें विवेचन आम्हांस पूर्ण संमत असून, वेश्याव्यवसायाचे दुष्परिणाम मॅजिक लँटर्नच्या साहाय्यानें दाखविल्यास ज्या लोकवस्तींत या व्यवसायाची फार वाढ होत आहे, अशी रा. नाईक तक्रार करितात त्यांच्यामध्यें जरूर तो इष्ट परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं. पुस्तक फार उपयुक्त असून संग्राह्य आहे. **विविधज्ञानविस्तार**. जून १९२४.

मद्यपान, जुगार यांप्रमाणेंच समाजाला शीलभ्रष्ट करणारा मोठा दुर्गुण म्हणजे वेश्याव्यवसाय होय. समाजांतील पुरुष व स्त्रिया या उभयतांच्या अधःपातामुळेंच हा दुर्गुण फैलावतो. वेश्या व त्यांचा व्यवसाय यांचें स्वरूप व कारणें काय, त्यांचे परिणाम काय होतात, हा दुर्गुण नाहींसा होण्याला कायदेशीर व इतर उपाय कोणते योजावेत, यांचें सांगोपांग विवेचन सदर पुस्तकांत श्री. नाईक यांनीं केलें असून समाजसुधारणेच्छु स्त्रीपुरुषांनीं तें एकवार अवश्य नजरेखालून घालावें. पुस्तकांतील विवेचन मुंबई शहरांतील पाहणी करून केलें असलें तरी या रोगाचा फैलाव इतरत्रहि झाला असल्यानें त्यांतील सामान्य माहिती इतरांसही मार्गदर्शक होईल. **केसरी**. ता. १०–६–२४.

शरीराचा क्रयविक्रय करण्याचा उद्योग समाजांत राजरोस चालू आहे, व त्यामुळें समाजांत अनेक आपत्ति व धनास धोका उत्पन्न होत असतो. करितां या व्यवसायाबद्दल भवति न भवति होऊन त्याचें निमूर्लन अथवा नियंत्रण साधण्यासाठीं समाजास प्रवृत्त केलें पाहिजे. शासनसत्ता समाजाकडे उत्तरोत्तर अधिकाधिक येत असल्यामुळें समाजांतील नीतिमत्ता वाढविण्यासाठीं आजपर्यंत सरकारच्या तोंडाकडे लोक पहात आले, त्याप्रमाणें आतां लोकांचे तोंडाकडे पाहण्याचा प्रसंग आला आहे. करितां वरील लेख प्रसिद्ध करून रा. पुरुषोत्तम गोविंद नाईक यांनीं समाजाची अथवा ईश्वराची चांगली सेवा केल्याबद्दल आह्मी त्यांचें अभिनंदन करितों. **उद्यम**. जुलई १९२४.

मनुष्यमात्राची सुधारणा होण्यास लागल्यापासूनच समाजांत अनीतीच्या मानल्या जाणाऱ्या, पण त्यांत राजरोस राहाणाऱ्या व वाढणाऱ्या अशा ज्या कांहीं थोड्या अत्यंत अनिष्ट अशा गोष्टी आहेत त्यांपैकींच वेश्या व वेश्याव्यवसाय ही एक होय. समाजाची अनेक बाजूंनीं भयंकर अवनति करणाऱ्या अशा या व्यवसायासंबंधें मुद्देसूद व चिकित्सापूर्ण असें विवेचन या पुस्तकांत लेखकानें केलेलें असून त्यावरून मुंबईसारख्या शहरांतून पैशाचे लोभानें वेश्यागारांचा धंदा करणाऱ्या दलालांच्या हातून त्यांचे जाळ्यांत गुरफटणाऱ्या दुर्दैवी वेश्यांची कशी गांजणूक होत असते यांचें भयंकर चित्र डोळ्यांपुढें स्पष्ट उभें राहतें. अशा प्रकारचें अत्यंत उपयुक्त पुस्तक प्रसिद्ध करून मुंबईच्या समाजसेवासंघानें आपल्या आतांपर्यंतच्या सामाजिक वाङ्मयांत महत्वाची भर टाकली आहे यांत शंका नाहीं.

**बलवंत**. ता. ३०–४–२४.

येथील समाजसेवासंघाचे ' एक आजन्म कार्यकर्ते ' श्री. नाईक यांनी या पुस्तकांत ' वेश्या व वेश्याव्यवसाय ' ह्या प्रश्नाचा सांगोपांग विचार केला आहे. ह्या पुस्तकामुळे समाजसेवाविषयक मराठी वाङ्मयांत एका नवीनच विषयावरील सुंदर पुस्तकाची भर पडली असून समाजशास्त्र व समाजसेवा ह्या विषयांची आवड असणारांस हें पुस्तक उपयुक्त झाल्यावांचून राहणार नाहीं. पुस्तकाची भाषा साधी व सफाईदार असून बाह्यांगही सुबक व सफाईदार. किंमत बेताची आहे. **युगांतर.** २९-६-२४

वेश्यांचा धंदा हा प्रत्येक राष्ट्रांत निंद्य व दूषणीय मानला असतांहि प्रत्येक राष्ट्रांत स्वतनुविक्रय करून त्यावर निर्वाह करणारा वेश्यांचा वर्ग असतोच; व प्रत्येक राष्ट्र आतां हा वर्ग अनिष्ट असला, तरी तें अपरिहार्य संकट आहे असें धरून चालत आहे. आजपर्यंत हा धंदा कांहींसा स्थानिक स्वरूपाचा होता, पण आतां या धंद्याला ' अंतर्राष्ट्रीय ' स्वरूप आलें आहे, असें या पुस्तकांतील माहितीवरून दिसतें.

वेश्यागमनाची दुष्ट चाल पुष्कळशी कमी होण्यास शहरांतील राहणीची सुधारणा व दलालाच्या धंद्यावर निर्बंध हेच उपाय बरेच परिणामकारक होतील. म० गांधींसारखे सुधारक हे काम हातीं घेतील तर त्यांचा फायदा समाजास झाल्याशिवाय राहणार नाहीं. श्री० नाईक यांनीं हें पुस्तक लिहून समाज सुधारकांचें लक्ष या विषयाकडे वेधलें याबद्दल त्यांना धन्यवाद देणें अवश्य आहे. **महाराष्ट्र.** २५-६-२४

या निबंधांत समाजांत वेश्या आणि त्यांचे धंदे उत्पन्न होण्याचीं कारणें दाखविलीं असून ह्या धंद्यापासून समाजाचें होत असलेलें अपरिमित नुकसान दाखवून दिलें आहे. विषयाची विवेचनात्मक आणि मुद्देसुद चर्चा केली आहे. त्याचप्रमाणें प्रस्तुत धंदा नष्ट होण्यास कायदेशीर आणि सामाजिक सुधारणात्मक उपायांची योजना कशी करावी ह्याचाही विचार केला आहे. आणि त्यामुळें पुस्तक वाचनीय व मननीय झालें आहे. श्रीयुत नाईक हे एक कसलेले लेखक आहेत तेव्हां पुस्तकाच्या भाषेसंबंधानें लिहिण्याची आवश्यकता नाहीं. व्यवसायप्रतिबंधास्तव ठिकठिकाणीं संघ स्थापून संघटनात्मक प्रयत्न केले तरच ह्या धंद्याचें समाजांतून कायमचें उच्चाटन होण्याचा संभव आहे. **जागृति.** १०-५-२४

समाजाच्या नाशास साथीचे रोग जसे कारणीभुत होतात तसेच समाजाच्या नैतिक नाशास व्यभिचार हा प्रमुखत्वानें कारणीभूत होतो. आणि व्यभिचाराच्या ' वेश्या ' ह्या स्पष्ट खुणा होत ! मुंबईस जवळ जवळ जगांतील सर्व प्रान्तांतील माणसांचा वावर असल्यामुळें, आणि सुमारें ११॥ लक्ष लोक तेथें राहत असल्यामुळें, वेश्यांचा धंदाही तेथें मोठ्या प्रमाणावर चालावा यांत नवल नाहीं. श्री. **नाईक** यांनीं या निंद्य प्रकाराकडे सर्वांचें लक्ष वेधावें म्हणून विविध माहितीनें भरलेलें हें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. हें वाचण्यासारखें आहे.

वेश्या व त्यांचा धंदा जगांतून समूळ नष्ट होईल ही कल्पना जरी शक्य नसली, तरी वेश्यांस व त्यांच्या व्यवसायास आळा घालून, देशांतील शक्तीची जोपासना करणें हें स्वराज्य मिळविण्यापेक्षाहि महत्वाचें आहे. आणि या दृष्टीनें विचार करता श्री. नाईक यांचा हा प्रयत्न सर्वस्वी स्तुत्य आहे. **दीनमित्र.** ११-५-२४.

REFBK-0003025